

# अंत नाही

राजा कदम

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अंत नाही

(कादंबरी)

लेखक : राजा कदम

# अंत नाही

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अंत नाही

लेखक : राजा कदम

सम्पर्क- “कंट्री पार्क”, फ्लॅट एफ / ५०१,

दत्तपाडा रोड, , बोरिवली ( पूर्व ), मुंबई ४०००६६

मो. ९३७२६८२२२५/ 9372682225

ई मेल -- : shardulkad@gmail.com, shardul.kadam@fedfina.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com


प्रकाशन : ८ नोव्हेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## राजा कदम



जन्म: १३ ऑगस्ट १९४३

शिक्षण: पदवीधर; पदव्युत्तर जर्नालिझम अँड पब्लिक रिलेशन चा डिप्लोमा.

नोकरी: एका मोठ्या पब्लिक सेक्टर कंपनीतून प्रथम श्रेणी अधिकारी म्हणून २००३ ला निवृत्ती.

आवड: वाचन; लेखन; चित्रकला रेखाटने वगैरे.

हायस्कूल ला असल्या पासून वाचनाची आवड लागली. सुरुवातीस बाबुराव अर्णाळकर यांच्या पुस्तकांचा फडशा पाडला. धनंजय आणि छोटू रात्री स्वप्नात भेटायचे! कॉलेजच्या वाचनालयात जी. ए., जयवंत दळवी, आनंद यादव, पु.ल., दिलीप चित्रे, चि. त्र्यं. वगैरेंच्या लेखनाचा प्रभाव पडला. त्याच वेळी इंग्रजी कादंबऱ्यांचे बऱ्यापैकी वाचन झाले. जेम्स हॅडली, रॉबिन कुक, अल्बर्ट कामु, आयर्न रँड इत्यादींचे कल्पना विश्व आणि शब्द सामर्थ्य वाचून अवाक होत गेलो. मग स्वतःलाच ऊर्मी येऊ लागली. सुरुवातीस भाराभर लिहिलेल्या कथा साभार परत आल्या. नंतर "हंस" चे आनंद अंतरकर, "सत्य कथेचे" राम पटवर्धन," प्रपंच" चे माधव कानिटकर आणि कोकणचे माजी आमदार (कै) अप्पासाहेब; उर्फ राजाराम शिंदे या मान्यवरांचे उत्तेजन मोलाचे ठरले. स्वभावातील भिडस्तपणा मुळे योग्य वयात, वेळी समोर आलेल्या कला क्षेत्राकडे वळलो नाही. परिणामी नुकसान झाल्या बद्दल सोस नाही. प्रापंचिक अडचणी कोणास नसतात? या कारणांना अर्थ नाही. आळसा मुळे बरेच लेखन पडून राहिले. हरवले. असो!

आधुनिक तंत्रज्ञानाचा माझ्या दोन्ही मुलांचा अनुभव फार उपयुक्त ठरला.

लेखन प्रपंच: पहिली कादंबरी "सारं काही" मॅजेस्टिक ने प्रसिद्ध केली. तिला १९८३ मध्ये प्रथम प्रकाशनाचा उत्तम लेखनाचा राज्य पुरस्कार मिळाला.

नंतर "घनदाट", "आता कुठली सुख निद्रा", "कैफियत" या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

"ए ब्रोकन स्टेप" ही इंग्रजी कादंबरी बूक गंगा वर प्रसिद्ध झाली.

"अवशेष" कादंबरी मेहता प्रकाशनाने प्रसिद्ध केली. तिला २००९ मध्ये सर्वोत्कृष्ट मराठी कादंबरीचा श्री. ना. पेंडसे राज्य पुरस्कार मिळाला.

याच कालखंडात जवळपास ४० कथा प्रसिद्ध झाल्या. यातील निवडक कथा दिवाळी अंक, बक्षीस पात्र आहेत. त्यांचा एकत्रित कथासंग्रह निघू शकेल.

सन २०१० ते २०१३ मध्ये मी रेखाटलेली २०० च्या वर व्यंग चित्रे "ग्लोबल मराठी" मध्ये प्रसिद्ध झाली. त्यांचे पुस्तक रूपाने प्रकाशन होऊ शकेल.

धन्यवाद.

राजा कदम

९३७२६८२२२५/ ९८१९३६६८६९

अर्पण पत्रिका

सलील आणि शार्दुल या दोन मित्रांस

पप्पा

या कथेतील सर्व पात्रे, प्रसंग व स्थळे काल्पनिक असून त्यांचं कोणत्याही वास्तविक व्यक्तींशी साम्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग असेल.

# अंत नाही

(कादंबरी)

पत्ता :

राजा कदम

“कंट्री पार्क”

फ्लॅट एफ / ५०१,

दत्तपाडा रोड,

बोरिवली ( पूर्व ),

मुंबई ४०००६६

मो. ९३७२६८२२२५

# चोवीस तास उलटले.

परिसर स्मशानभूमीचा. शहरात असून वेगळा. स्वतंत्र. पूर्ण. बाहेरून कठड्य़ांच्या बंदोबस्तातला. लोखंडी गेटवर स्मशानभूमीची मोठी वेलांटीसारखी पाटी. हिंदू स्मशानभूमी. म्हणजे इथे मुस्लिमांनी दफन होण्यासाठी फिरकायचं नाही. ख्रिश्चनांना प्रवेश नाही. जशा तुमच्या कबरी, ग्रेवयार्ड्स, तशीच ही चिताभूमी. आमची. मोठालं लोखंडी गेट. आतला प्रशस्त परिसर. विरक्त. पारोसा. पुष्कळशी माजोरी झाडं. दुःखद ओल्या मातीत वाढल्यामुळं एवढ्याश्या आभाळातून टवकारून बघत आहेत अशी वाटणारी. बोचरं गवत. त्यातली पिवळी निळी बटणफुलं. लाकडांचे ओंडके. ढीग. तराजू. मचूळ पाण्याचे तीन नळ. सिमेंटच्या तीन अरुंद वाटा. त्यापलीकडे चार चितांच्या जागा. राखाडी. उंचावरून खाली उतरणाऱ्या शेड्स ; पत्रे. त्यावर ढीगभर पाचोळा साचलेला. पत्र्यांतून धूर घुसमटत पिळवटून वर जाऊ पाहणारा. आचके देणारा. काहींच्या खाली धगधगणाऱ्या चिता. त्यांचे उष्ण भपकारे. त्यामुळे दबून जाणारी उदास उभी माणसं. चेपल्यासारखी. गरम गालफडांची. एवढसं आभाळ खाली आलेलं. मुर्दाड भिंती. त्यावर अज्ञात मृतांच्या लिहिलेल्या तारखा. श्लोक. नियमावलींचे फलक. हवेतला तुपकट वास. चरचर आवाज. वगैरे.

वस्तीत, गर्दीत राहूनही, जिवंतपणात हा पूर्णविराम याची निश्चिती सांगणारं हे ठिकाण. आणि पलीकडे कठड्याबाहेर हमरस्त्यावरून बेदरकार जाणारी वाहनं. रात्री गेटवर अमानुष उजेडाचे फटकारे मारून धावणारी. त्यांचा गर्विष्ठ गूं गूं आवाज. रस्त्यावर पुष्कळशी माणसं. एकमेकातून जाणारी. या पलीकडल्या परिसराची गर्दीला ओळख आहे. पण तमा नाही. तमा असण्याचं कारणही नाही. किंबहुना, स्मशान हे पोस्टऑफिसला पत्त्यासाठी एक लँडमार्क झालेला आहे.

या लँडमार्कच्या अवतीभवती थोडयाश्या अंतरावर चारी बाजूंनी उभ्या असलेल्या महाकाय इमारती. सकाळी गॅलरीत ब्रश करताना उभं राहून धगधगणाऱ्या चिता बघण्यासाठी यांची नजर मेलेली. हे रोजचंच.

-------असं..

# चोवीस तास उलटले –

आपण इथं असू.

आत्महत्त्या केलीच असती तर एव्हाना सगेसोयरे, मित्रगोत्र जमले असते. त्यांना वेळ काढावा लागला असता. नळावरचं मचूळ पाणी गालफडांवर, हातपायांवर घेत राहिले असते. धगधगत्या चितेकडे बघत आपापसात गुणगुणले असते. बरेचसे फिलॉसॉफीकल वगैरे झाले असते. चितेतल्या ओंड्क्यांच्या लालपिवळया उजेडाचा परिणाम स्मशानातल्या कचेरीतल्या निर्विकारपणे बसलेल्या कारकुनावर झाला नसता. भिंतीवरच्या घड्याळावर झाला नसता. इतक्या वर्षांची मृतांच्या नावांची आणि पत्त्यांची नोंद पोटात घरून सुस्त लठ्ठ झालेल्या रजिस्टरवर काडीमात्र बदल झाला नसता. या मातीला नष्टतेचे आकर्षण असलं तरी राखेचा जन्म भराभर होत आहे. सावली चटावलेली आहे. सुस्त लठ्ठ रजिस्टरनं मगरासारखं तोंड उघडून, श्रीपाद जगन्नाथ सावंत, वय बासष्ट, पत्ता, वगैरे वाक्यं पोटात घेऊन तोंड बंद केलं असतं. ' आत्महत्त्या ' शब्दाखाली लाल रेघ मारली असती. आपल्या अस्तित्वाचा मतितार्थ हा. एवढासा.

वेळ संध्याकाळी सातची समजू.

म्हणजेच, आणखी पाचसात तासांनी काही मित्रगोत्र बायकांशी रत होऊन गाढ झोपलेले असतील. शनिवार असलाच तर काहीजण क्लब्जमध्ये रमी ब्रिजचा डाव टाकून बसले असतील. पण आता, या क्षणी गुणगुण अशी चालली असती,

“मनुष्यजन्म किती योनीतून फिरून एकदाच मिळतो म्हणतात. आणि यानं स्वतःला फुकटचोट संपवलं पण साला!”

"नाहीतर काय? माणसं कशाकशा कष्टात आपली जगत असतात. वर्षानुवर्षे अंथरुणात हगतमुतत, शिव्याशाप खात कुजत लोळत असतात. ह्याला सूख अजीर्ण झालं --------"

"इट्स क्रेझी यार! इट्स अक्यूट स्विसाईड! बस, आया मनमे और मार डाला खुदको!"

"परसोच बोलता था, डायबेटीस कंट्रोलमे है. गाडी सर्विसिंगके लिये लेके जाना है. इंटर्नेटपर इलायतवाला छोकरा और बहू बोलते है! वेबसाईट, कॅमेरापर दिखते है. सबकुछ ठीकठाक है!"

"तो?"

"तो क्या?"

"इलायतवाला लडका आया है. सावंत के पीछे उसकी मां है यार!"

"बहू आयी है क्या?"

"मालूम नै!"

"काल पहाटे दोनला सातव्या मजल्यावरून खाली उडी घेतलन. बिनधास्त! खाली सोसायटीच्या चाळीस गाड्या पार्क केलेल्या. हा नेमका फर्नांडीसच्या सूमोवर पडला. टेरेसवरून सफेद सूमो लालभडक टोपी घातल्यासारखी दिसत होती! सात मजले खोली काय, जोक आहे काय? द साईट वाज सो पॅथेटीक!"

कॉलेजला मानसशास्त्र शिकवणारा दोस्त बोलला असता, "कॅन यू इमॅजीन? पहाटे दोनची वेळ. सारं शहर साखरझोपेत. सोसायटी साखरझोपेत. टेरेसवर हा, आपला श्रीपाद सावंत स्वतःला झोकून देतो. डोळे मिटतो. सात मजल्यांची उंची. तेथपासून सूमोवर पडण्याची त्याची मनस्थिती कशी असेल? कॅन यू इमॅजीन? त्या अर्ध्या मिनिटात मरणमोहाची ओढ असेल कि --आयुष्याचा अंतिम निर्णय घातक ठरला म्हणून पश्चात्ताप झाला असेल? त्याचा चित्कार सात मजल्यांच्या दरीत विरून गेला असेल?"

--मानसशास्त्रवाला विचार चवीनं कुरतडीत बसेल.

इतर मित्र बोअर झाले असते.

( फालतू बकबक करतोय साला! सगळं जग याला शाळाच वाटते. )

“पोलीसला चिट्ठी मिळालीय. स्वखुशीनं आत्महत्त्या करतोय. कोणासही जबाबदार धरू नये. झालं! तपासाचं झंझट मागे न लागल्यामुळे पोलीस सावंतला धन्यवाद देतील. केसफाईल बंद करतील. पोस्टमार्टेम मामला संपला की हवा?”

“इट्स अ फेटल पंच. आता नात्यातली सारी जमलीत. उपयोग काय?” ”काही म्हणा. श्रीपाद सावंत सज्जन माणूस होता. कोणाच्या ना अध्यात ना मध्यात. रिटायरमेंट पण तसं एन्जॉय केलन नाही बघा! अलीकडे बराच एकलकोंडा वाटायचा------” “पाहीलत ना? सुखवस्तू माणसाला पण आयुष्य इतकं अर्थहीन वाटू शकतं तर?” “वेल! डिपेंडस्! या जगात मस्त जगायचं असेल तर माणसानं थोडं स्वार्थी, थोडं निर्लज्ज आणि बरचसं बिनधास्त व्हायला हवं. इमोशनल ब्रेकडाउन कोणाला होत नसतो रे? पण असा निर्णय योग्य नव्हे!”

मित्रांच्या गुणगुणण्याला अंत नसतो.
( चिता शांत होईस्तो नातेवाईक थांबतील. तेही निघतील. मुलगा थांबेल शेवटपर्यंत.

आपण कशाला? नऊपाचची विरार लोकल मिळेल. उशीर होतोय. चला. )

●

आत्महत्त्या दुसऱ्या प्रकारेही करता आली असती. फ्लॅटमध्ये एकटेच तर होतो! मुलगा सून विलायतेत. आई तालुक्यात, गावी. बायको दिल्लीत! रक्तसंबंध हे एवढेच. वाक्य अर्धवट खुंटल्यासारखे. तेही शेकडो हजारो मैल दूरवर पसरलेले. अपार. आपण मात्र फ्लॅटमध्ये एकटे. स्वयंभू.

००००० जस्ट स्लिट द व्हेन्स अँड रिलॅक्स इन द बाथटब. हॉलीवूडच्या नट्यांसारखं. या हॉलीवूडवाल्यांचं एक आकर्षक तंत्र असतं. त्यांची कॅमेराट्रिक, अँगल्स, रंगरसायन, मानसिक संघर्षाचं संगीत, दिग्दर्शन ००००० हॉस्पिटलच्या उत्तुंग इमारती, वेगानं चढउतरणारे एलेव्हेटर्स, वक्र पायऱ्या, स्वच्छ स्वच्छ कॉरिडॉर्स आणि मनुष्यहीन शांतता.! टप टप टप टप एकांत. अशा स्थितीत नट्यांकडून करून घेतलेला अभिनय. टोटल इंपॅक्ट एवढा की ती आत्महत्त्यापण आकर्षक वाटावी! अ सॉफिस्टीकेटेड डेथ! त्याआधी त्या ड्रिंक्स वगैरे घेतात ००००० ००००० किंवा सायनाईड घेणं.

०००००० किंवा मध्यरात्री लोकलच्या अमानुष सुर्याखाली सरळ क्षणात नष्ट होणं.

०००००० किंवा पॉईण्ट थर्टीएट रिवॉल्वरनं मस्तकात ट्रिगर दाबणं.

ठोssssssssss. लाईक अ होल इन द हेड!

०० किंवा कोकणात जाणाऱ्या कोणत्याही रातराणीत बसून कशेडी घाटाचं तिकीट काढायचं. पहाटे दीड दोनला बस घाटात थांबेल. उतरायचं. प्रवाशी गाढ झोपेत असतील. गरम उबदार जिवंतपणा घेऊन बस निघून जाईल. आपणही तसाच सावकाशपणात घाट उतरू लागायचं. कभिन्न काळोखात अक्राळविक्राळ काळाभोर घाट हिंस्त्र श्वापदासारखा गुरगुरत आपली वाट बघत असेल. गर्द दरीतून खूप खालून घाट चढणाऱ्या चुकारू वाहनांचे झळाळणारे टिंब दिवे. त्यांच्या उजेडाचे आकाशात फिरणारे रेषांचे झोत. वाहनांचं गुरगुरणं. बाकी सारं शांत शांत. एकाकी. सुनसान. खिशातली व्हिस्कीची बॉटल एका दमात घशात उतरवायची. झिंग चढली कि खालच्या दरीत झोकून द्यायचं. स्वाहा. सो सिम्पल. आपण पृथ्वीच्या पोटात कडेलोट होणारे. बाकीचे सगळे साखरझोपेत. खिशात अर्थातच चिठ्ठी. आपल्या आयुष्यातली ती दोन वाक्यांची शेवटची सृजनशीलता.

याहूनही थ्रिलमध्ये मरायला संधी आहे. जमल्यास बलात्कार करायचा. पण तो आपला पिंड नाही. मग एखादं हॉटेल बुक करायचं. चिक्कार पिऊन सिगरेटस् ओढून पॉर्न फिल्म्स बघत हस्तमैथुन करून पोटभर झोपेच्या गोळया घ्यायच्या. सारं काही सिद्धहस्त.आपल्या पूर्वजांचे पिरॅमिडस्, त्यांचे शिव्याशाप, आशीर्वाद, याचं विराट दर्शन डोळ्यांपुढे घेऊन चिरदाह अनंतात विलीन व्ह्यायचं. चिठ्ठी मात्र लिहून ठेवायची. मरणोत्तर कोणाला त्रास नसावा. पतंगाला पुन्हापुन्हा ज्वालेत झेप का घ्यावी वाटते, हे कळायला हवं.०० 

--पहाट उजाडू नये असं खूपदा वाटतं.पण पहाट उजाडतेच!

मित्रांना प्रश्न पडेल.

सगळयांनाच रास्त प्रश्न पडेल. विलायतेतल्या मुलाला - श्यामलाही.

मित्रांचा सामुदायिक प्रश्न असा ;--

श्रीपाद सावंतला एकाएकी असं काय झालं? त्याच्या जागी आपण असतो तर? उरलेलं आयुष्य मस्त मजेत घालवलं असतं. आपण साले खानदानी बकाल! मऊशार झुन्न, ए.सी., पळणारी गाडी असलेल्या माणसाला दुःखाची झळ ती का आणि कशाला लागावी? ठीक आहे. वयोमान आहे. शरीरात कुठेतरी कुरबुर असणारच! पण औषधं आहेत की!

फक्त जगण्याची इच्छा हवी.

मित्रांचं बरोबर आहे.

यामागे जगण्याची इच्छा हवी. ठराविक वयात ठराविक गोष्टी घडतात. केस येतात. घाट बदलतो. आवाज फुटतो. वासनांचा दर्प वाढतो. मग मस्तीही येते, तसचं हेही. वयोमानानुसार डायबेटीस, हायपरटेन्शन, बी. पी. अर्थ्रायटीस इ. इ. आजारांची ओळख होणं हा शरीरधर्म आहे.

आपण शहरात वाढलेलो. सिक्स्टी ट्रिलीअन सेल्समध्ये सतत प्रदूषण सोशीत जगलेलो, त्यामुळे शरीरात आत दलदल झाली असेल तर पत्ता नाही. तेव्हां हे आजार म्हणजे गंभीर स्थिती नाही.

इमानेइतबारे चाळीस वर्षे नोकरी केली. हा पाच फुट आठ इंच श्रीपाद सावंत बऱ्यापैकी डयूज घेऊन निवृत्त झाला. स्वतःचा फ्लॅट. गाडी.सोबत माणूस नाही. मुलगा परदेशी. म्हातारी आई तालुक्याला. कर्तबगार बायको दिल्लीला. तशी आर्थिक चणचण नाही. दाही दिशा एकच सल्ला. खूप केलंत. मुलाला उच्च शिक्षण देऊन परदेशी पाठविलंत. त्यानं आंतरजातीय लग्न केलन. त्याची मर्जी. तुम्ही आता आराम करा. जियो और जिने दो. निवृत्त झालात. हे वय

वानप्रस्थाश्रमाचं. इतरांच्या संसारात लुडबुड करणं नाही. अगदी मुलाच्याही. त्याला त्याच्या पद्धतीनं जगू द्या. त्याची लाइफस्टाईल, खर्च, वारेमाप कर्ज अंगावर घेण्याची वृत्ती, यावर सल्ला देणं सोडून द्या. मुलं मोठी झाली. पिढी बदललीय. काळवेळ बदललाय. संस्कार बदललेत. समुद्राची लाट येउन वाळूची घडी बदललीय किंवा पार विस्कटून तरी गेलीय. खंत करू नका. तुमच्या या वयात ज्या गोष्टींचा घोर लागायचा, बाऊ वाटायचा त्या गोष्टी आज हास्यास्पद झाल्यात. नवीन कल्चर, ब्रॉड थिंकिंग वगैरे. तेव्हां, मुलाच्या संसाराचं तारू भरकटत चाललंय याची चिंता नसावी. ती अर्थहीन आहे.

आराम करा. निश्चिंत असा. साठीनंतर येणारं प्रत्येक वर्ष बोनस आहे. ही ईश्वराची कृपा. ( हा ईश्वर असावा काय? ) तो असो अगर नसो. हा प्रश्न अजूनही सुटत नसेल तर जगबुडी येणार नाही. ईश्वराचंही काही अडत नाही. खुशाल असा.

ईश्वर असलाच तर बाप्पानं एवढं दुःख का देऊन ठेवलयं? नैराश्य का पसरवलंय? गर्भश्रीमंत लोक अर्धांगवायुनं अंथरुणात का सडत आहेत? त्यांना भेटायला येणारे गब्रू नातेवाईक, त्यांच्या नजरेतली तुपकट कणव, उशापायथ्याला ग्रंथ वाचणारे भाडोत्री धर्मगुरू, यांचा त्यांना वीट येत असेल का?

पैशाचं भक्कम पाठबळ इथे निरर्थक का ठरत आहे? पैसा हेच सर्वनाशाचं कारण आहे का?

रक्ताचं पाणी करून एखादी पिढी कर्तृत्वाचा मोठा उद्योगसमूह रचते. आणि पुढची पिढी सर्वकाही मुळासकट उद्ध्वस्त करून टाकते! हे असं व्हायचंच असेल तर पहिल्या पिढीच्या कर्तृत्वाचा, त्यागाचा अर्थ तो काय? ज्यांनी त्याग केला त्यांनी पुढच्या पिढीकडून मोठ्या परतफेडीची अपेक्षा ठेवलीच पाहिजे का? राजवाड्यांचे खांब कोसळायला असे गदाधारी वंशज जन्म का घेतात? दूर डोंगरातल्या एकाकी गुहांसारखं आयुष्य असं गूढ अनाकलनीय आहे. पुष्कळसं असंबद्ध आहे. एकाचा दुसऱ्याशी ताळमेळ नाही.

तेव्हां, आराम करा.

म्हणजे नेमकं काय करा? रिटायर झाल्यावर हातातली साचलेली कामं हाती घेऊन हळूहळू मोकळी करा. गावी ऐंशीच्या पुढे पोचलेली आई आहे तिच्याकडे लक्ष द्या. बघा.

गावाकडची आई हे एक अजब रसायन आहे. तिचं जुनं हाड. खुटखुटीत अंग. तिखट कान. चष्म्याच्या जाड भिंगापलीकडची बेरकी नजर. बुब्बुळं मोठी करणारी. चांगली स्मरणशक्ती. तीन पिढ्यांचा इतिहास तिला पाठ. खरंतर आपल्याला तिनं गावशीव सोडून तालुक्याला वाढवलं. म्हणजेच तिचं तरुणपणही शहरात गेलेलं. पण आपण तिला मुद्दाम आपल्या मोठ्या फ्लॅटमध्ये आणली तेव्हां म्हातारी कोंड्ल्यागत झाली. आठवड्यात फिक्कट पडली. अंगावर भिंती पडतात म्हणाली. दिवस संपत आलेत आणि भिंती जिवंत झाल्याचा फोबिया सुरु झाला!

मग तिला आपण तालुक्याला छोटासा डबल रूम घेऊन दिला. आत टी. व्ही. मोलकरीण. सारं काही आटोपशीर. रुममध्ये पोटभर प्रकाश. या स्वातंत्र्यामुळे म्हातारी खुलली. पुन्हा टुकटुकीत झाली. भिंती पडायच्या थांबल्या. तालुक्याची गार हवा. चारी बाजूना डोंगराच्या निळसर खडी. त्यांच्यातून रोरावत येणारा पाउस. त्याच्या धुवाधार लाटा. पोपटी निसर्ग. डोंगर पायथ्यातून जाणारा मुंबई गोवा हायवे. सारं तिला हवं ते.

ती दर महिन्याला मेडिकल चेकपला जायची. ...

तिथला तरुण डॉक्टर तिच्या शरीररचनेकडे, उत्साहाकडे, मोठ्या चिकित्सेने बघायचा. छानशा गप्पा मारायचा. डॉक्टरच्या घराण्यात या वयात पोचण्यापूर्वीच माणसं मातीमोल झालेली. त्यामुळे त्यालाही स्वतःचं कॅलेंडरवरचं वर्ष जवळपास कळालेलं. म्हणून नवल करायचा. तिच्या चेकअपचं नाटक करून हसून म्हणायचा, आई, कधीतरी डोकं गरगरणं हा वात आहे आणि या वयात तो शरीरभर फिरतो म्हणूनच त्याला वात म्हणतात! तुमचं सगळं उत्तम. नो बी. पी. नो डायबेटीस. नथिंग! या गोळ्या लिहून देतोय त्या रात्री झोपताना घ्या. झोपण्यापूर्वी दोन चमचे ब्रँडी घ्या. सकाळ संध्याकाळ दोन चपात्या, फळं, भरपूर दूध! बास! स्वतःचा मामला. असं सुदृढ आयुष्य मिळायला मागच्या जन्माची पुण्याई लागते. तुमच्या खाती भरपूर आहे बरं!

आयुष्याचा मतलब आईला कळालेला आहे. आपण ज्या शरीरातून आलो त्या शरीराला शंभरी गाठण्याची जिद्द, प्रबळ इच्छा आहे. मग आपल्या मनातच दूरवर कुठेतरी सतत एक

नकारघंटा का वाजत असते? गावात आईच्या वयाचं कोणी उरलं नाही. जे गेले त्यांच्या जुनाट फोटोंना सुतळीचे हार लागले.

००००००--तो मागं असाच केंव्हातरी सुट्टीवर आला. आईच्या शेजारी बसला. तिचं त्याच्याकडे लक्ष नव्हतं. म्हातारीनं आंघोळ केलेली. अंगाभोवती लुगडं गुंडाळलेलं. उंचीतलं. खाटेवरच्या उशीला वितभर आरसा उभा केलेला. खाटेवर बसून चष्म्यारहीत डोळयांनी आरशात स्वतःला निरखीत बसली. डोक्यात सुपारीएवढ्या केसांच्या बुचड्यातून फणी फिरवीत राहिली. व्हॅसलीननं हाताच्या लोंबत्या गुलाबी कातडीवर मालिश करीत बसली. डोळयांवरून अंगठे दाबले. तो तिच्या खिजगणतीही नव्हता. इतकी स्वतःत शिरलेली. त्याला तिची तशी हालचाल मजेशीर वाटली. म्हणाला,

“आये! आता आरशात काय बघायचं उरलंय?”

कोणीतरी स्वप्नात ढकलल्यागत म्हातारी तटस्थ झाली. रात्री वाटीत पाण्यात ठेवलेल्या दाताच्या कवळया बोटं चेपीत तिनं तोंडात घातल्या. मिठाई खाल्ल्यागत तोंडाची हालचाल केली. मग चष्मा चढवला. काळजीपूर्वक ट्रांझिस्टरवर बातम्या चालल्या होत्या त्या बंद केल्या.

मग विचारलं,

“तुम्ही काहीतरी विचारलंत?”

( आईनं आपल्याला आम्ही तुम्ही केव्हापासून करायला सुरुवात केली बरं? नक्की आठवत नाही. बहुधा आपलं लग्न झाल्यानंतर असेल. )

“हेच! आरशात आता काय बघायचं राहीलंय विचारलं!

"मी राहीलेय! मी-मी- सावंतराव खोताची बायको. बँकेतल्या श्रीपाद जगन्नाथराव सावंताची आईस. विलायतेत माझा नातू, शाम, इंजिनियर आहे त्याची आजी! वरीष्ठ वरीष्ठ नागरिक. लक्ष्मीबाई सावंत! माझ्या नावामागं इतक्या डिग्र्या लागलेल्या हैत बघा!"

---- श्रीपाद सावंत हसला.

"एक डिग्री सांगायची विसरलीस आये! कर्तबगार सुनेची सासू!"

---मागून अंगावर कोणीतरी अचानक घोंगडी टाकल्यागत म्हातारी घुसमटली. आरशात टवकारून बघत म्हणाली,

"शब्दाला शब्द झोंबतोय त्यात करतूद कसली वो? तुम्हाला ती लाख लाभो. माझ्या नातवाला, शाम्याला निरोप धाडा. विलायतगिरी खूप झाली. सावंतांच्या वंशाला दिवा नको? परजातीच्या पोरीशी लग्न केलंन. दोन वर्षे झाली! चार पिढ्यांचा इतिहास है हा! पोरी खंडीभर झाल्या पण प्रत्येक सावंताला एकाच मुलगा! शाम्यानं वेळ लावला तर वंश खुंटेल म्हणावं!"

शुभ्र झिरझिरीत प्रकाशात त्याला अस्वस्थल्यागत वाटलं.

"वंशवेल खुंटेल म्हणतेस. तो ठेवून तरी काय कळस गाठलाय आम्ही? आमच्या पणजोबांनी दोन बायका केल्या. एक अशीच गेली. दुसरीला मुली आणि एक मुलगा झाला. आमचे आजोबा, वंशाचा दिवा, शोभेला ठेवा! त्यांनी नुसते गावगुंडी केली. बाकी चुलतभाऊ झाले. मग आमचे पिताजी. त्यांनी मर्दुमकी केली म्हणा! ब्रिटीशांच्या जमान्यात मिलिटरी पोलीसचं मेडल घेतलं. दरोडेखोरांशी झटापटीत कामी आले. ते वारले तेव्हां मी तुझ्या पोटात होतो आये."

"तुमच्या आधीच्या भैणी देवानं उचलल्या. हे नियतीचे फेरे हैत वो!"

"त्यानंतरचा पुढचा प्रवास तुझा एकटीचा आहे. त्या काळात तू मोठ्या निर्धारानं गाव सोडून तालुक्याच्या ठिकाणी आलीस. मला वाढवलंस. शिकवलंस! म्हणूनच मी आज बँकेच्या मॅनेजरपर्यंत चढू शकलोय!"

"कोणत्याही आईनं तेच केलं असतं."

"नाही. त्या काळात ती अशक्य गोष्ट होती. त्यावेळी देश स्वतंत्र पण झाला नव्हता. माझा जन्म त्रेचाळीस सालचा. त्यावेळची गावातली कर्मठ संस्कृती. त्यात तुझ्यासारख्या स्त्रीनं वैधव्याचा शाप घेऊन घर सोडणं, ही एक वेगळया मातीची स्त्रीच करू शकते."

"तुम्ही जाणीव ठेवलीत ते ऐकून पोट भरलंय."

"खूप खूप सोसलं आहेस तू आये. माझ्या बायकोनं तरी काय केलयं? तेच! राजकारणात राहून दूरवरून लहान मुलावर, शामवर सतत लक्ष ठेवलयं! आज तो विलायतेत आहे. जातीतली नसली तरी मुलगी भारतीय आहे."

"दोन वर्षं झाली. त्याची बायको नासावते काय?

"आजच्या पिढीचं काही कळत नाही आये. पाश्चात्य विचारसरणी. हे ---वंशवेल वगैरे त्यांच्या धोरणात बसत नाही!"

"म्हंजे वो? निर्वंशी सावंतांची खानदान------"

"पाप पुण्य सगळं मनाचे खेळ आहेत म्हणे. आपण मस्त जगायचं. बास. तू इतकी जगलीस कारण तू स्वतःची तशी काळजी घेतलीस म्हणून. मागची पुण्याई वगैरे थोतांड आहे."

"सावंतांचं नाव नष्ट करणं पाप है!"

"मग मुलाच्या शोधात पाच मुलींचं लटांबर आयुष्यभर पेलीत राहायचं. नाही का?"

"निर्वंशी माणसांचं तोंड बघू नये म्हणतात वो!"

"खूप जगणं म्हणजे वेळेवर येणारं मरण आणि जगणं यांचं चुकलेलं गणित म्हणे."

----- आईच्या डोळयात क्षणभर उठलेली अस्वस्थ रेघ त्याच्या लक्षात आली.

आईच्या फणकाऱ्यानं तो क्षणभर स्तिमित झाला. ती त्याच ओघात फटकन बोलली,

"मिल्ट्रीचा बैल नि पोलीस करील तेच व्हैल!"

तिच्या या वाक्यात विचित्र अर्थ भरलेला आहे असं त्याला वाटलं. तिला राग आलेला आहे.

उठून कॉटशी गेला आणि तिचे पाय चेपीत बोलला,

"तुझी शंभरी मी दणक्यात साजरी करणार आहे आये! लोकांची तोंडं आपण किती काळ बंद करणार गो? आपण बिनधास्त राहायचं!"

म्हातारीला खूप बरं वाटलं. चुरगळलेला कागद सपाट व्हावा तसा तिचा चेहरा उजळ स्पष्ट झाला. त्याच्या विरळ केसातून बोटं फिरवीत पुटपुटली.

"तुमची तब्येत हटलीय. डागदराची औषधं सुरु झाली ना?"

"तर? बी. पी. आहेच. आता डायबेटीस पण दिसू लागलंय म्हणे!"

"असं का व्हावं?"

"कायकी, आजकाल लहानमुलानापण डायबेटीस असतो."

"माझ्याशी उत्तर है वो!

"काय ते सांग!"

"चिंता. ह्या चिंतेनं तुम्हाला आजारी केलयं. तुमच्या वडलांना पण हीच चिंता खात व्हती. रात्रंदीन ड्यूटी ड्यूटी आणि ड्यूटी. त्यात त्यांनी स्वतःला खतम करून टाकलं. तुम्ही तेव्हा पोटात व्हता."

श्रीपाद सावंतनं वडिलांच्या भिंतीला लावलेल्या फोटोकडे पाहीलं. डोक्यावर कॅप. खांद्यावर फिता. छातीवर बिल्ले. करारी मुद्रा. कॅमेऱ्यावर रोखलेली नजर आणि अस्पष्ट स्मित. लाथ मारील, तिथं पाणी काढील असा रोबस चेहरा. म्हातारीनं त्यांच्या फोटोला हात जोडले. कपाळाशी नेउन नमस्कार केला. शब्द जड वाटले,

"सुखी व्हा. आनंदात ऱ्हा वो! हा तुमचा चिरंजीव चिंतेनं पोखरलाय त्याची चिंता वळखा नी आशीर्वाद द्या. इतकी वर्षे तुम्ही पेन्शन देऊन मला मानात ठेवलीत. स्वतः मात्र धर्तीवर पडलात! आज तुम्ही असतात तर हा तुमचा वंशाचा दिवा पोलीसात मोठा हापिसर झालेला तुम्ही बघितला असता. पण मी त्याला बँकेचा मॅनेजर केलाय!"

त्यानं आईकडे रोखून पाहिलं.

"आये तुला एकटेपणा खायला येत नाही?"

"मेल्यानो! माझ्या मरणाची वाट बघताय व्हे? ऐकून घ्या. मी माझी स्वतंत्र है! माझ्या नवऱ्याची पेन्शन खाऊन जगतोय. मी माझ्यासाठी मुखत्यार है! मी अगदी - तुमच्यावरबी अवलंबून नै! सांगून ठेवतो! मी लक्ष्मीबाई सावंत, माझा नवरा शेर व्हता. ड्युटीवर असताना दरवडेखोरांशी लढताना गेलाय! मी त्याची बायको है म्हणावं!"

चष्म्यावरील पाणावलेली तिची डोळयांची बुब्बुळं सीताफळांच्या बियांसारखी दिसत होती. नाकाची बोंडी लालसर मऊ वाटत होती. गाल खाली उतरले होते. गळयाशी कातडी लोंबत होती. त्यानं गुणगुणत विचारलं,

"बऱ्याचदा एकांतात तुझ्या तोंडून ऐकत आलोय आये. बाबांनी तुला धाकात कोंडून ठेवलेलं होतं. तू तरुणपणी छान गोरी होतीस. बाबांचा तुझ्यावर लांबून सतत पहारा असायचा. खरं?"

"अगदी खरंय!"

"मुळात ते मिलिटरी पोलीस. त्यात संशयी वृत्ती. बोलू नये, पण मला वाटतं ते गेले आणि मगच तू खऱ्या अर्थानं मुक्त झालीस. खरं?"

"असं का म्हणता?"

"म्हणजे --तुला विचार स्वातंत्र्य मिळालं गो! दीर्घायुष्य मिळालं. खोटं बोलतोय का मी?"

त्याच्या डोक्यातून फिरणारी म्हातारीची कृश बोटं थांबली. रुपली. आता खिडकीतून झगझगीत सूर्यप्रकाश खोलीत येत होता.

बाहेरून जाणाऱ्या माणसांचा पांढरा पट्टा भिंतीवरून सरकत होता. तिनं आवंढा गिळला,

"तुमची पण चिंता तीच आहे ना?"

"कसली?"

"जी मला लागून राहिली व्हती ती? नवऱ्याचं वाईट चिंतू नये म्हणतात. पण बाईचं जगणंच अशक्य करून टाकणारा नवरा नशीबात आला तर त्याच्यासाठी वटपौर्णिमेला फेरे घालायाच हवेत काय?"

"खरायं. तुझ्यासारखं कितीतरी बायकांना वाटतही असेल ---"

"हे का? तर रिवाजापोटी. धर्मापोटी. मी फेरे घालायची बापडी. पण मनात काडीची इच्छा नसायची वो! मी हे चारजणीत बोलायची नी बातमी आगीसारखी पसरून जमान्याचा राग आंगावर यायचा वो! चालीरीती झुगारनारी म्हणून जाच व्हायचा. या असल्या विचारामुळीच

मी रंडकी झालो म्हणायची! हा जाच मला मान्यच नव्हता म्हणून तुम्ही अंगठयाएवढं असताना मी गावशीव सोडलं वो!"

श्रीपाद सावंत जराजरासं हसला.

"ग्रेट! त्या काळात तुला समाज सुधारायचा होता तर!"

"नाहीबा! जे मनाला पटलं तेच केलं! तुमच्या बापाला वचन दिलं होतं ते मी पुरं केलं. तुम्हाला तालुक्याला नेऊन शिकवलं. जिद्द केली. बास!"

"तुला बाबांचा जाच सहन होत नव्हता. नियतीनं ते ऐकलं. बाबांना वीरगती मिळाली. तुला बऱ्यापैकी पेन्शन सुरु झाली. खऱ्या अर्थानं तू सुखी झालीस. बरोबर?"

"तसं म्हणा. पण माझं काय चुकलं काय?"

"मी असं कुठे म्हणालो?"

"नखाएवडे असल्यापासून तुमच्या आजारपणात, शिक्षणात कुठे कमी पडलो काय?"

त्याला एकदम चुटपुटल्यागत झालं.

या वयात म्हाताऱ्या आईला हा विषय काढून दुखावणं बरं नव्हे. तिचं वय हळवं, लहान मुलासारखं झालेलं आहे. थोडसं हट्टी. हेकट. आपलं तेच खरं म्हणणारं. त्यात ती जगजाहीर बंडखोर होती.

"तसं नव्हे आये! तुझ्यासारखी आदर्श माता-----"

"दुनिया काय बी म्हणू दे. मी माझं काम केलं. आज तुमचे बाबा असते तर दुसरंच चित्र दिसलं असतं. ह्या भिंतीवर तुम्ही माझ्या फोटोला हार घातला असता."

------त्याने आईकडे थंडपणे पाहिलं.

“इथे कोण कोणाच्या मरणाची वाट बघत बसलेला आहे असा दुष्ट विचार करणं चुकीचं आहे आये. अशुभ आहे. पण नवऱ्याच्या लाथा खाऊन लोचटपणे जगणारी तू नव्हतीस म्हणून प्रगती झाली!”

म्हातारीनं पदर तोंडाशी घेतला. कंठ धरून पुटपुटली,

“नवरा जेव्हा चालीचा संशय घेतो तेव्हा बायको आतून फुटून जाते वो! देवानं जवानी, सुंदर रूप दिलं हा माझा दोष काय? सुंदर बायको दुसऱ्याची, ह्याच विचाराचा तुमचा बापूस व्हता. मग जगावं कसं?”

---------आईच्या लिबलिबीत तोंडाकडे बघत म्हणाला,

“मी तर बाबांना पाहीलं नाही. त्याचं दुःख पोटात कशाला ठेवू? पण तुझ्यामुळे मी आज उभा आहे आये!”

“काय नाव ठेवण्यासारखं घडलं असेल तर स्पष्ट बोला. समोर ह्यांच्या फोटो है तो ऐकतोय.”

त्याला चमत्कारीक एकलकोंडं वाटू लागलं. आईच स्वतःच्या चारित्र्याविषयी मुलाला प्रश्न टाकतेय! गळा भरून आला. दोघंही तशी उतरणीला लागलेली. तो साठीच्या पुढे. ती पंच्याऐंशी. रणरणतं उन आत शिरायला बघत होतं. वरचा गरगरता पंखा. हवेचा भोवरा भिंतीत घुसमटून अधिक उष्णता देणारा. त्यानं खिडक्या उघडल्या नाहीत. आईशी मन मोकळं करायचं होतं. लहान झाल्यागत वाटू लागलं.

तिला आतल्याआत गलबलल्यागत झालं. आता कोण कोणाचं उणंदुणं काढणार? एकमेकाला ओरबाडणार? मनाला जखमी करणार? दोघंही वयानं पार पलीकडे पोचलेत. इथे कोणी अजरामर नाही. तो म्हणतोय तेही खरंच. आता आरशात काय बघायचं उरलेलं आहे? आपलं

आयुष्य हे असं. एका वाताहतीचं प्रतिबिंब. आरसा विद्रूप लिबलिबीत हसतोय. फेकून चुरा केला तरी चुरा हसतोय. दिवस संपत आले आहेत. सावलीची बोटं जमिनीत पसरत आहेत.

"स्पष्ट बोला. तुम्हीच वकील नी तुम्हीच जज!"

"तरुणपण एकटीनं कसं जाळून टाकलंस आये? तू स्वतःवर किती अन्याय केला आहेस याची तुला कल्पना आहे का? अगोदर मुली झाल्या. ज्या त्या काळात औषधपाणी नाही म्हणून पटापट गेल्या. मी उशीरा झालो. सावंतांचा वंशदीप!"

"तुमच्या बाबानं सावंतांचा स्टॅम्प मारला व्हता म्हणून. तुम्ही पोटात असताना ड्युटीवर खूनखराबा झाला. वंशाचा दिवा वाढवायचं वचन मी त्यांना दिलं व्हतं. मी वचनाला बांधील ऱ्हायलो. वंश पोटात नसता तर सुंदर कुडीला जिंदगी कमी नव्हती वो! ज्या वस्तीत तुमाला घेऊन वाढवीत व्हतो त्या वस्तीत घराघरात बदनाम नाती नांदत व्हती!"

"बदनाम नाती?"

"कुठल्या घरात ती नसतात? बदनाम म्हंजे विचारानं बदनाम. पांढऱ्याधोप कपड्यात, शिकल्यासवरल्यात बदनाम विचार काय कमी असतात? त्यात मी गोरीगोमटी. विधवा. पण मी तुमच्याकडं बघत मन रोखलं. कुडी रोखली. तोल गेला असताच तर मी लोकांना जबाबदार धरलं नसतं. जेवडी लोकाला गरज व्हती तेवडी माज्या जवानीला पण व्हतीच की!"

आईच्या पातळ ओठांतून बुड्बुड्यांसारखे फुटणारे शब्द कानात साठत होते. हे तिचं व्रत, कर्मकाष्ट होतं. त्या काळातले संस्कार होते. तिनं आपल्याच मुलाला वकील आणि न्यायाधीश करून या वयात न्याय मागितला होता. हे विपरीत, एखाद्या प्रायोगिक नाटकासारखं वाटू लागलं. स्टेजवर दोन बाकडी आणि चार कमानी उभ्या करून तो दिवाणखाना समजायचा. आयुष्य असं समजण्यावर असतं का? शिवाय प्रौढ वयात मुलानं आईला, तुझं तरुणपण एकटीनं कसं जाळलंस असं विचारायचं असतं का? आणि विचारलंच तरी, आईनेही तेवढ्याच दमात, निसर्गाविरुद्ध,

इच्छांविरुद्ध झुंज दिली पण अपयश आलं असतं, इतक्या स्वच्छ शब्दात मन मोकळं करायचं असतं का? मन वढाळ वढाळ.

तिनं अचानकपणे विचारलं,

"पण तुम्हाला तरी संसारसूख कुठाय वो? सावन्तांवरचा श्राप अजूनही सरलेला नै! आता तुमचा मुलगा, शाम्या इलायतेत बायकोला दोन वर्षे उबावतोय! वंशाला दिवा नको?"

"तुला सांगीतलं ना ---------"

"तुम्हाला तरी तुमच्या बायकोनं काय सूख दिलान? ती तुम्हाला सोडून गेलीच ना?"

श्रीपाद सावंतला आईचा प्रश्न अपेक्षित होता. हा प्रश्न ऐकून त्याचे कान बोथट झाले होते. ते मुलभूत होते. आईनं स्पष्ट विचारलं, एवढंच. इतरांच्या चौकशा मोघम. खोचक. कुत्सित. काहीवेळा भाबडया. पण त्रासदायक. बेचैन करणाऱ्या.

तो तगमगला. उठून रुमच्या खिडक्या खाडखाड उघडल्या. खोलीत शिरायला उजेड तिष्ठत होता. त्याला वाटलं आता आपण समुद्रकिनाऱ्यावर एकटंच बसायला हवं होतं. समुद्राचं हिरवट काळंशार दूरवर ताणल्यासारखं पाणी. त्याची झिलमिल. ठिबक्यांनी उडणारे पक्षी. आभाळात मिसळणारे. एकाकी उदास वाटणाऱ्या बोटी. या समुद्राला विस्तृत विदीर्ण असा आतला शोक आहे. जो केवळ त्याला कळत आहे. त्याच्या मागं घड्याघड्यानी थापून ठेवल्यासारखे काळे खडक. त्यांत साचलेलं पाणी, खेकडे, शिंपले, पाणघोडे, जीवाणू यांना या विदीर्ण शोकाचं सोयरसुतक नाही. ती आपली जगत आहेत. समुद्र आपलाच समजून. जगायची तगडी इच्छा आहे.

त्यानं खिडकीबाहेर बघत पोकळपणे हसून म्हटलं,

"नर्मदेनं मला सोडलेलं नाही."

"तुम्ही तिला धरून ठेवली नै!"

"आम्ही घटस्फोट घेतलेला नाही. वेगळे झालोत म्हण. तुला माहीतच आहे. घरातल्या महत्वाच्या प्रसंगी ती मुद्दाम आपली भेट घेते. शामच्या लग्नाला ----"

"म्हंजे पोटच्या पोराच्या लग्नाला पण वेळ काढायचा नै म्हना की!"

"या विषयावर आपण वेळोवेळी बोललो आहोत आये! उगाच एकमेकांची मनं दुखवायची कशाला? इतकी वर्षे सरली. कुठं कोणाचं अडलं का?"

"ते तर झालंच वो! जगऱ्हाटी चालूच है!"

"पण आता विचारतोच. रागावू नकोस."

"बोला."

"माझं लग्न बाहत्तर साली झालं. लग्नाला समाजबांधव आला, पण दूरचा. जवळचं कोणी नाही. माझे मित्र आणि ऑफिसची माणसं. गावाकडचं कोणी नाही. पत्रिका पाठवूनही कोणी आशीर्वाद द्यायला फिरकलं नाही. याला जबाबदार कोण? गावानं आपल्याला जवळजवळ वाळीतच टाकलं. का?"

"का?"

"का?"

"राग! आपल्या घरावरचा राग वो!"

"याला कारण तुझी तऱ्हेवाईक वागणूक! तुझे समाजाला न पटणारे विचार हेच मूळ कारण आहे."

"तुम्हाला गावाकडे केव्हां पाठवलं नै म्हणून काय?"

"का नाही? माझं जन्मस्थान बघायला मला पंधरा वर्षाचा व्हावं लागलं आये! ते पण एकदाच! आपण समाजाशी नाळ तोडल्यागत वागलो असं तुला नाही वाटत?"

"ह्यात नुकसान किती झालं ते तुम्ही स्वतःलाच विचारा!"

"प्रश्न फायद्यातोट्याचा नाही. तुझे विचार तीव्र होते. गावाहून चुकून भेटायला आलेल्या बायकांशी तू हुज्जत घालायचीस. मला आठवतयं. समाजातल्या अशाच एका लग्नप्रसंगी तू विपरीत विचार मांडला होतास! आठवतंय तुला?"

"न आठवाया काय झालंय!"

"मुलाच्या लग्नात नवग्रहासाठी दिवंगत नवऱ्याचा फोटो शेजारी ठेऊन नवऱ्याची आई बसली तर काय हरकत आहे, म्हणून बोललीस! त्यावेळी केवढा गजब झाला होता तुझ्या या मतावर! आठवतंय ना? एक आमंत्रण आलं त्यात हा गोंधळ!"

-----म्हातारी हनुवटी हलवून हसली.

"मी अडानी बाई. मनाला पटेल ते बेधडक बोलायची!"

"अगो बाई, त्या काळात तुझे विचार प्रक्षोभक होते!"

"चालीरीती बदलायला नकोत केव्हातरी?"

"म्हणजे नक्की काय करायचं?"

"अहो माणूस एकदा मेलं कि त्याला पालखीत बसवा किंवा कचऱ्याच्या पेटीत टाका. उपयोग काय?"

"म्हणजे दसपिंड, कार्य, दुखवटा, सुतक या पारंपारिक प्रथांना तुझ्या मते काही किंमत नाही तर?"

“माझं एक मत. ह्या निमित्तानं माणूस एकत्र जमत असेल, तर ठीक. बाकी सारं झूठ --”

“म्हणजे?”

“ते माणूस जिवंत असताना त्याच्याशी जन्मभर भांडत रहायचं. त्याच्या इस्टेटीवर डोळा ठेवायचा. पण आजारपणात दवापाणी करायचा नै! केंव्हा मारतोस असं तोंडावरच विचारायचं! त्याच्या जिवाला दुख होत असेल कि नै? असं जिंदगीभर झुंजत ऱ्हायाचं. आणि ते माणूस मेलं की उर बडवून रडत बसायचं! हारतुरे घालून भजनं करायची. ही आपली माणसांची तऱ्हा!”

आईचा मऊ तांबूस चेहरा त्याला एकदम देखणा वाटू लागला. कुतुहल जागं झालं. या चेहऱ्यामागे काही ठोस विचार आहेत. थोडसं हसून बोलला,

“पंच्याऐंशी वर्षे अगोदर जन्माला आलीस हा तुझा दोष. तुझ्या विचारांची कदर करण्याची त्यावेळी समाजधारणा नव्हती.”

“आता तरी कुठे सुधारलीय वो?”

“सांग, कार्याला कावळा का शिवतो?”

“तो नाही शिवला तर जगबूडी येईल काय?

“आत्मा अतृप्त राहील त्याचं काय?”

“कुडी सोडून गेला कि आत्मा तुमाला तार पाठवून पत्ता देतोय काय?”

“घ्या मजा! मृत्यूनंतर आत्मा प्रेतयोनीत जातो. फिरत रहातो. दसपिंडाच्या दिवशी प्रत्येक अवयवाचं समर्पण आणि पूर्वजाना पिंडदान केलं की प्रेतयोनीतून आत्मा पंचत्वात विलीन होतो असं धर्मशास्त्रात लिहिलयं आये!”

"तुमची बुद्धी काय म्हणते ते बघा. नै पटलं तर बोलून दावायची धमक आंगात असावी म्हणजे झालं!"

"तुझ्या अशा विचारांनीच समाज दुरावला बघ!"

"समाजापासनं लांब ऱ्हायलो तरी डोळं उघडं ठेऊन जगतोय वो! माझा सोत्ताचा अभ्यास असतोय. जे पटत नै ते बोलून दावतोय-----"

"सामाजिक बांधीलकी म्हणून काही आहे कि नाही?"

"तुम्हीच विचार करा! माणसानं बदलत रहायला नको? गावात यकापाठोपाठ सुतक आलं की सणासुदीला पालखी थांबतेय. लग्न नै, बारसं नै, घरभरनी नै की वास्तुशांती नै! मग मुंबैतल्या चाकरमान्यांनी सुटीवर येऊन एकमेकांची तोंडं बघून परत जायाचं! हे तुमच्या शिकलेल्या मनाला पटतं काय?"

"परंपरांना मोड घालायची वेळ आलीय हे खरं."

"बरं. दुखवट्याच्या दिवशी विधवेच्या पुढ्यात सोयऱ्यांनी ढोपारभर लुगडी ठेवायची. ही काय रीत झाली? एकतर तिला नवरा गेल्याचं दुःख. लुगड्यांकडं बघत तिनं टिपं गाळायची! त्यापरस्वी भावाकडून एकच लुगडं घेऊन बाकीच्यांनी पैशाची मदत केली तर?"

श्रीपाद सावंत हसला.

"माझी बायको नर्मदा ही तुझी सुधारलेली आवृत्ती आहे आये. फरक एवढाच की तुला समाजपरीवर्तनाचं खूळ नव्हतं. नर्मदेच्या डोक्यात या स्वार्थी लोकांनी ते पुरेपूर भरलंय----"

"स्वतःच्या डोक्याची अक्कल नको?"

“जिद्दी बायकांच्या नवऱ्यांची शोकांतिका मी भोगतोय. नर्मदेला गृहीणी म्हणून चार भिंतीत संसार करायचा नव्हता. बाहेर पडली. माझ्या वाटेला एकटेपणा आला.”

खूप समजल्यागत म्हातारी खिन्नपणे हसली.

“तुमच्या बायकोनं तिही लोका झेंडा लावलाय. तुम्हाला चिंता कसली वो?”

“तू तरी जगावेगळं काय बोलणार म्हणा!”

“आईनं पोराला नुसता जल्मालाच घालायचा असतो व्है? तिच्या फटकूराची ऊब पण पोराला चालते. त्या ऊबेत पोर गपगार झोपतंय. पण तुमच्या बायकोला तेवढी सवड कुठली? नकावडा व्हता तेव्हा तिनं आपल्या झोळीत टाकला नी चालती झाली! तुमचा शाम्याच करंटा!”

तो केवळ हसला. आईचं हे दुसरं बालपण. त्यात तोंडाळ. स्वभावाला औषध नाही. पण लगेच सावध झाला.

“मी जवानी कशी घालवली म्हणून विचारायचा धीर केलाव. स्वतःच्या बायकोला असं कधी विचारलंत का?”

तिच्याकडे शांतपणे बघत तो गुरगुरला,

“त्या काळात मला जन्म देऊन तू स्वतः मनानं आणि शरीरानं सुरक्षित राहू शकलीस. मग शामला जन्म देऊन नर्मदा का राहू शकणार नाही?”

“याला कारण मी ----मी है, नी ती ती है!”

त्याला हे उत्तर सापेक्ष वाटलं. तिनं त्याच्या नजरेला नजर दिली. त्याच्या डोळयात आत शिरत गेली. मग डोळयांवरून पदर ओढून घट्ट केला. तोंडावर हाताचा पंजा दाबल्यागत करून

ओठातल्या ओठात पुटपुटली. जणू शब्द आतून बाहेर पडायला घाई करीत होते. पण ती पंजानं दाबीत होती. तरीही शब्द बाहेर पडलेच,

“बोलायला सोपं असतं वो! तुमच्या मागं विचारांची पीडा लागलीय. मी तुम्हाला जन्म दिलाय. बहीनाबाय म्हणतेय, आपुलिया दुःखे जैसे होतो क्लेश, दुजिया चित्तात तेची परी. सावंतांची मनच नासलेली. कुजकी.”

“मगाच एक वाक्य बोललीस आये. तुम्ही तिला धरून ठेवली नाही! मला सांग, बायकोला लाथेखाली तुडवणारी, शिव्याशाप देऊन दाराबाहेर फरफटत नेणारी एक संस्कृती असते. त्या संस्कृतीत तू मला वाढवलं आहेस का?”

“तुम्ही तरी काय करणार? तुम्ही एकटे. ना कोणाचा आधार. दोन मोठे भाऊ असते तर अशा फुकाच्या गमजा चालल्या नसत्या. एकलकोंड्या माणसाचं जग वेगळं असतं. बाहेरचं उन अंगावर घ्यायला कातडी निबर लागते वो!”

स्वच्छ झगझगीत प्रकाशात त्याला कळलं की आपण आईपुढे थिटे पडलो आहोत. आयुष्य विनामतलब आश्चर्य --खेदाच्या संमिश्र भावनेनं वेढावलेलं. आपलं विश्व तपशीलवार नाही. दुसऱ्यांच्या जीवनाचं परिमाण मोजण्याचं खूळ आपल्याला लागलेलं आहे का? इतरांपेक्षा आपल्यात वेगळं रसायन खेळत आहे का?

आपण जेव्हां एखाद्या फुलाला स्पर्श करतो तेव्हा तो स्पर्श अनंतकाळाला असतो कारण ते फूल मानवजात पृथ्वीवर येण्याच्या कितीतरी अगोदर जन्माला आलेले असते आणि मानवाच्या नंतरही अनंतकाळ जिवंत रहाणार असते. आपल्याला जे हे वाटतं, भावतं ते सर्वसामान्यांना वाटण्यास उसंत नसेल तर आपल्यात नक्कीच वेगळेपण आहे.

पुष्कळदा वाटतं की आपल्या दैनंदिन कार्यक्रमांना अर्थ काय? आपण नक्की कसल्या शोधात आहोत? वयाची साठी उलटली. दोन हजार चार साल उजाडलं. हे असंच संपणार काय?

आयुष्याचं गणित सुटणार नाही काय? टेन्शन मांजरपावलांनी येत आहे काय? अस्तित्वाचा बेवारशीपणा उत्कटपणे जाणवू लागला आहे काय?

हा आपला पराभव तर नव्हे?

# समुद्र.

एकोणीसशे त्र्याहत्तर सालचा.

हे साल म्हणजे देशाचा काही सुवर्णकाल नव्हता. शिवरायाचा राज्याभिषेक नव्हता. अठराशे सत्तावन्न नव्हतं. एकोणीसशे सत्तेचाळीसही नव्हतं. की आकाश कोसळलेलं नव्हतं. ताजमहाल कुतुबमिनार त्यांच्या जागी उभे होते. बोरीवली कांदीवलीकडे दाट जंगल होतं. आणि समुद्रही तोच होता. दोन्ही हात पसरलेला. नजरेपलीकडचा. पक्षांची झालर तोलून घेणारा. केव्हाही न सुरकूतलेला.

दोघं तरुणाईत ओल्या वाळूत पाय रोवून बसलेली. समुद्रावरून येणारा भणभण कोमट वारा. चणे खाऊन झालेले. वारा टरफलं मागे उडवीत होता. सिगरेट पेटवणं शक्य नव्हतं. शिवाय त्यानं सिगरेट ओढलेली तिला आवडत नव्हती. जीवनशैलीवर हे आक्रमण आहे असं त्याला खूपदा वाटायचं. लग्न झाल्या झाल्या आपल्याभवती खपाखप खांबांचं अदृश्य कुंपण केव्हां पडून जिवाला बरं वाटेना तेच कळेनासं झालं. निरर्थक लांबलचक वाटू लागलं.

बरं. तिनं हे प्रेमात सांगायची एक पध्दत असते. तीही नाही. सरळ ठोक मत. मला सिगरेट ओढलेली आवडत नाही. टीचभर पगारात तोंडाचा भपकारा विकत घ्यायची गरज नाही. झालं.

समोरच्या समुद्राला सांगायचं. लाटा उंच करायच्या नाहीत. बांधबांधोळीत गवताच्या तुऱ्यांवर उडणाऱ्या पागोळयांना सांगायचं. मी जवळपास असताना डोळे दुखतील इतकं बागडायचं नाही. कारण मला ते आवडत नाही. झालं.

त्याच्या बरोबरीच्या जवळपास त्याच काळात लग्न झालेल्या मित्रांच्या जेवणाच्या सुट्टीतल्या गरम गप्पा रुचकर असायच्या. मित्रांना मऊशार आयुष्य मिळालं पण आपण मात्र समुद्रातल्या ओलसर खडकासारखे का उरलोत तेच कळेनासं होई. मित्रांना प्रश्न नसतील? तेही आपल्यासारखेच मध्यमवर्गीय. महिन्याकाठी एकमेकांकडे पैसे मागून संसार ढकलणारे. मग शब्दांना बोचरेपणा येवूनही त्यांचं वैवाहीक जीवन असं तुपकट मऊशार कसं?

समोरच्या अथांग सागराशी उत्तर नव्हतं. तो आपला काहीसा अस्वस्थ, तरीही अपार पोचलेला. दूरवरचं आभाळ स्वतःत ओढून घेणारा. दोघं ओल्या वाळूत पाय रोवून बसलेली. गप्पशी.

मागं तेवढीच लांबलचक विस्तृत वाळू पसरलेली. कोरडी. तिच्यात फिरणारी भुरटी माणसं. पुढच्या ओल्या वाळूत किल्ले रचणारी मुलं. वाळूतच साईबाबांच चित्र काढून शेजारी थोटा भिकारी चित्रकार बसलेला. कोणी त्याचंच रेखाटन काढावं. चित्रावर पडणारी नाणी नजरेनं मोजून सुनाट राहीलेला भिकारी समुद्रवाळूतला माणसांचा प्रतिनिधी होता.

------एकोणीसशे त्र्याहत्तर मधला वाळूतला संवाद असा---

"तुमची आई विक्षिप्त आहे."

"समुद्र किती शांत पसरलाय नै? वर ढगपण संथपणे सरकत आहेत. जमत आहेत. अलग होत आहेत. सांजप्रकाशात उजळत आहेत!"

"तुमची आई विक्षिप्त आहे"

"रिलॅक्स नर्मदा! मुंबईच्या बुजबुजाटात काही क्षण निसर्गसान्निध्यात घालवायचं म्हणजे ही चौपाटी. उरलेला निसर्ग बोरिवलीपलीकडे गेलाय. आणखी चणे आणू?"

"त्यापेक्षा किमती खाणं पेलवणार आहे का? चणे खाणं दारिद्र्याची लक्षणं."

"कमॉन नर्मदा!"

"तुम्हाला माहित नाही. रात्री आपण बेडवर आलो की पलीकडे कीचनच्या दाराला कान लावून ती रात्र रात्र जागी असते. मला ती विकृती वाटते."

"समजून घे तिला गो. माझी आई तरुणपणी विधवा झालेली स्त्री आहे. तिनं स्वतःच्या भावनांचा कोंडलेला किल्ला केलाय!"

“म्हणून मुलाचा शृंगार कान चिकटवून ऐकायचा?”

“त्या दूरवर दिसणाऱ्या बोटी पाहिल्यास? जगाच्या पाठीवरून कुठून कुठून आलेल्या असतील! प्रवासी बोटी. तेलवाहू बोटी. त्यांच्यातली माणसं. रात्री दिवे लागले की ते पाण्यात तरंगणारे पाळणे वाटतील! लुकलुकणारे! फॅब्युलस!”

“तुम्ही ऑफिसला गेलात की मला स्पष्ट विचारते. शीः!”

त्याला वाटलं, कानावर हात ठेवून किंचाळावं. स्वतःला खूपसं सावरून हसल्यागत पुटपुटला,

“तिला वंशाचा दिवा हवाय ----------”

“वंशाच्या दिव्याविषयी लोक अशी चौकशी करतात?”

“मोठ्यांना उत्सुकता आहेत -----”

“मला तसं नाही वाटत. मला वाटतं ती आतून खूप भुकेलेली आहे. अतृप्त.”

“माझ्या आईविषयी असं बोललेलं मला आवडत नाही!”

“का?”

“तिनं डोळयांच्या वाती करून मला वाढवलंय. जिवाचं रान केलंय. ती - ती माझा ईश्वर आहे!”

“समोर - वरचे तरंगते ढग पाहिलेत?”

“हं”

“कल्पना करा आणि त्या ढगांकडे एकाग्रपणे बघत बसा. इच्छा करा की त्या ढगात मला एका सिंहाचं तोंड दिसू दे. तुम्हाला आश्चर्य वाटेल. ढग हळूहळू सिंहाच्या तोंडाचा आकार घेतात. हा अनुभव तुम्ही घेतलाय?”

“हो.”

“पण त्याच ढगाकडे जेव्हा मी बघते आणि इच्छा करते की मला एका साधुचं रूप दिसू दे, तेव्हां ढग साधुसारखे दिसतात! याचा अर्थ कळतो?”

“कळतोय. प्रत्येकाच्या दृष्टिकोनावर निसर्ग अवलंबून आहे. या उदाहरणात तुला काय सांगायचं आहे ते मला ऐकायचं नाही. आईनं आता पन्नाशी गाठलीय. तिला बाबांची पेन्शन मिळतेय. ठीक. पण मी धडपडतोय. मान्य आहे, मुंबईची आपली डबलरूम जागा कमी पडतेय ती. मी तिचा एकुलता एक मुलगा. आपलं लग्न झाल्या झाल्या तिला गावी जा, असं मी सांगू शकत नाही. एकतर तिनं स्वतःच गावशीव सोडलेलं आहे. माझ्यासाठी. आपल्याला तडजोड करायला नको का नर्मदा? मोठी जागा घेणं मला शक्य आहे का?”

“तुम्ही ऑफिसला गेलात की मला निर्लज्जपणे विचारते, रात्री दोन दोन वाजेपर्यंत एवढं काय बोलता? किती वेळा करता? शी :!”

त्याला वाटलं, कानावर हात ठेवून किंचाळावं. स्वतःला खूपसं सावरून हसल्यागत पुटपुटला,

आता समुद्र तिच्याकडे बघत होता. पोट संथपणे हलत होतं.

“चाळीशीपलीकडे भडका उडणाऱ्या काही स्त्रीया असतात. त्यातली ती एक आहे. आपल्या आयुष्यातला एकएक दिवस संपतोय याची तीव्र जाणीव या वयात स्त्रीला होत असते. जे काही भोगायला मिळालं नाही ते बकाबका खाण्याची भूक या वयात वाढते असं म्हणतात. उद्या समोरचं ताट दिसणार नाही याची भीती वाटत असते. मोनोपॉजचा प्रभाव असतो.”

तो जरासा हसला. उजवीकडून बायकोच्या रेखीव बाणेदार चेहऱ्याची रेघ बघत राहीला. उंच कपाळ. सरळ नाक. समोरचा समुद्र भेदणारी तीव्र नजर. किंचित जाड ओठ. या ओठांना

चावून खाण्याची इच्छा कोणाही पुरुषाला व्हावी. काहीशी टोकदार हनुवटी. या चेहऱ्याला सुंदर म्हणता येणार नाही. पण सावळी झाक. अंगानं घट्ट. जिद्दी. थोडीशी रुष्ठ.

"प्रौढ झाली तरी तुमची आई माझ्यापेक्षा सुंदर गोरी देखणी दिसते हे तुम्हाला माहीत आहे का? तिला याची जाणीवही आहे. बोलून दाखवते!"

"काय?"

"हेच! कुठून माझ्या श्रीपादच्या जीवनात आलीस देव जाणे! तो थोडा थांबला असता तर तुझ्यापेक्षां देखणी बायको मिळाली असती."

"खरंच आहे ते!"

"विनोद पुरे. आज आपल्याला काही महत्वाचे निर्णय घ्यायचे आहेत. लग्न होऊन दीड वर्ष झालं. आपल्या प्रापंचिक स्थितीवर मी विचार केलाय. मला भविष्य उज्वल दिसत नाही."

"तुला काय म्हणायचंय?"

"काही वेळा तुम्ही म्हणता की मी फार ड्राय वागते. वाटते. अबोल रहाते. याचं कारण तो माझा एकदीड वर्षातला स्वतःशी केलेला झगडा आहे. मला अर्धपोटी उत्कटतेनं जगता येत नाही. तुम्हाला ते पटो, न पटो."

त्याला वाटलं समुद्र अंगावर चाल करतो आहे. त्याची माफक अपेक्षा. पत्रिका गूण वगैरे बघून लग्न पद्धतशीरपणे झालेलं. राशीचक्रातलं गणित जमत होतं. त्याची रास वृश्चिक. थोडीशी कला वृत्तीची. रसिक. तिची मेष. टोकदार. बरीचशी आक्रमक. मुलींकडच्यांना सावंत घराण्याचा इतिहास ज्ञात होता. आईचा तऱ्हेवाईक स्वभाव, समाजाशी दुरावा माहीत होता. पण समाजानं अशी माणसंही समावून घेतलेली असतात. त्याचं तिशीला पोचलेलं वय कळत होतं. तरीही मुलगा पसंत पडला. बऱ्यापैकी व्यक्तिमत्व. व्यसनं माहीत नाहीत. सावंतांच्या वंशाचा दिवा. गावशीव नसलं म्हणून काय झालं? जग विलोभनीय आहे. मुलगा बँकेत आहे. चारपाच वर्षात परीक्षा देवून

ऑफीसर होईल. फिलहाल सध्या वरिष्ठ कारकून. बऱ्यापैकी पगार. उपनगरात डबलरूमची जागा. सोबत विधवा आई. सोसायटीच्या आसपास झोपडपट्टी. संडास, घाण, माशांचा उच्छाद, गटारं, उघडी पोरं, अर्वाच्य शिव्या, नशापाणी, मारझोड. हे सारं काही वाऱ्याच्या झोताबरोबर फुफ्फुसात घ्यायची झालेली सवय. आणि बाकीची वस्ती. नर्मदेच्या घरच्यांना सर्वकाही माहीत होतं. यथोचित लग्न पार पडलं. लग्नाला बरेचसे आले नाहीत.

त्याला वाटलं आपल्या आईची उरलेली गोष्ट आहे. ती पार एकाकी झाली आहे. कदाचित तिनं हेकटपणा दाखविला असेल. थोडी सैरभैर वागत असेल. पण त्याचा एवढा बाऊ करण्याची गरज नव्हती. प्रत्येक चार भिंतीत आयुष्याच्या गोष्टी सांभाळल्या जातात. तोल धरला जातो. गोष्टी फिजूल असतात. चार भिंतींच्या बाहेर पडत नाहीत. दाराखालच्या फटीतून पाझरू लागल्या तर अडवायच्या असतात.

त्याची माफक इच्छा. या दीड वर्षात एकमेकावर तुटून निपचीत पडण्याचा आनंद घ्यावा. त्यासाठी श्वापदवृत्ती पलीकडे जाणं पाप नव्हे. विकृतीही नव्हे. उत्कटता हवी. त्या गरजेनंतर सिगरेटच्या धुरात संगीत, साहित्य, कला यावर बोलावं. साथीदार शब्दाला मोताद असावा. वगैरे.

पण इथे समुद्राला साक्षी ठेऊन बायको गेल्या दीड वर्षाचं संसाराचं ऑडीट मांडीत होती! या वयात, वातावरणात धुंद वाटणाऱ्या एकांतात तिच्या मनातला झगडा त्याला अश्लील वाटला. तुटकपणे बोलला,

"मन मोकळं कर बघू!"

"या स्थितीत आपल्याला अजून तीन वर्षेतरी मूल नसावं. संसाराला सुखाचे दिवस हवे असतील तर मी नोकरी करणं गरज आहे. मी पदवीधर आहे. एकदा पर्मनंट झाले की मॅटर्निटी लीव्हपण मिळेल!"

----समुद्रानं फटकन खारा फटकारा मारल्यागत झालं.

“नर्मदे, आपण या विषयावर खूपदा बोललो आहोत!”

“आपण नुसते पहाटे दोन दोन वाजेपर्यंत बोलतच आहोत. आणि तुमची आई ते कान लावून ऐकते आहे! हेच! आपण निर्णयावर मात्र येत नाही.”

“तू नोकरी केलेली मला आवडणार नाही!”

तिनं त्याच्याकडे चेहरा वळवला. त्यानं समुद्र पाहिला.

“पुरुषार्थाला झोंबतो? की बायकोला ऑफिसमध्ये इतर मित्र भेटतील, बॉस जवळीक करील, आपली बायको शरीरानं नसली तरी मनानं साठ सत्तर टक्के दुसऱ्यांची, दुसऱ्यांसाठी विभागली जाईल, याची भीती वाटते?”

“काहीही समज. आमच्या घराण्यात स्त्रीयांनी नोकऱ्या केलेल्या नाहीत. शिवाय आपल्या लग्नाअगोदर माझ्या आईने या विषयावर तुझ्या आईवडीलांशी स्पष्ट मत दिलेलं होतं.”

तिनं खाऱ्या वाऱ्यानं उडणारे केस मागे बांधायला सुरुवात केली. दोन्ही हातानी रबरबँड घट्ट केला. तिची छाती प्रमाणापेक्षा उभार वाटू लागली. ती तन्मयतेनं ड्रेसिंगटेबलसमोर बसल्यागत हालचाल करीत होती. वाळूत बसून तिला कशाचीच पर्वा नव्हती. त्यानं तेवढ्यात चटकन चारी बाजूला पाहीलं. कोणी परका पुरुष तिच्या सैल हालचाली बघायला जवळपास नव्हता. केस नीट केल्यावर ती बोलली,

“लग्नाअगोदर केलेल्या बोलाचालीना आता तसा अर्थ उरलेला नाही. तुम्हाला किंवा तुमच्या आईला काय वाटतं हा प्रश्नपण कालबाह्य झालेला आहे. मी --मला काय वाटतं हे महत्वाचं आहे. उद्यापासून मी अर्ज करायला सुरुवात करणार आहे. मदत करायला माणसं तयार आहेत. तेवढी चौकशी मी केलीय. मला स्वातंत्र्य हवंय.”

कोणीतरी चार बोटं डोळयांत खुपसायला आणल्यागत त्याला वाटलं. तिचे शब्द त्याला झोंबले. फेसाळ लाटांवरून तुषार उडवीत तिचे शब्द परत परत आले.

मला स्वातंत्र्य हवंय!

स्वातंत्र्य हवंय!

हवंय!

क्षणभर वाटलं, वाळू मुठीत घेऊन तिच्या तोंडात कोंबावी. म्हणे, मदत करायला माणसं तयार आहेत. चौकशी करून ठेवलीय. म्हणजे काय? आपल्याला काही न सांगता हिने जनसंपर्क सुरु केला तर! त्याच्यातला व्हाईटकॉलर कारकून तिचा गळा दाबू शकत नव्हता. टोकदार बोलला,

"फार बदललीस तू नर्मदा!"

"हं. पैशाचं सोंग टिकतं का? शिवाय जीवनात पैसा सर्वस्व आहे. पॉवर आहे."

"पैशापेक्षा नीतीमूल्यांना मी महत्व देतो."

"बायकोला घरात कोंडून ठेवली म्हणजेच नीतीमूल्यं जपली जातात का? दर महिन्याला पंचवीस तारखेला कीचनमध्ये डबे ठणठणा वाजू लागतात. ते उतू जाईपर्यंत आणण्याची कुवत अंगात नसली तर ती आणायला मदत करण्यात नीतीमूल्यं कुठं कमी होतात? मी संसारात हातभार लावायचा म्हणते ना?"

त्याला वाटलं आतातरी समुद्रानं मदत करावी. पण समुद्र केवळ होता. तमाम वेदना सोशीत होता. वाळूतले दोन्ही हात तिच्या तोंडासमोर धरून समजूतीच्या स्वरात बोलला,

"हे बघ, तुझा माझा जन्म आपल्या परवानगीने झालेला नाही. प्राप्त स्थितीत आपण वाढलोय. आपण सुशीक्षीत आहोत. या विषयावर आपण थंड डोक्यानं विचार करू शकणार नाही का?"

"थंड डोक्यानं विचार करण्यात अठरा महिने सरलेत. या सोशीकतेलाही कुठंतरी अंत असावा. आपल्यासारखीच चारचौघी माणसं स्वतःच्या गाडयांतून फिरतात. हॉटेलींग करतात. हवा तसा पैसा उधळतात आणि आपण मात्र सदा स्टार्व्हींग, चिंतातूर बसतो. फुग्यातली हवा गेल्यागत दिवस ढकलतो. याला उपाय आहेत. नशीबाला दोष द्यायचा नाही. याला हेकटपणा म्हणायचं. मला -"

"पुन्हा तेच! लग्नाअगोदर परिस्थती स्पष्ट केली होती ना?"

"ती सुधारायची नाही असं स्टॅंपपेपरवर लिहून ठेवलेलं नव्हतं!"

"यू आर इम्पॉसिबल नर्मदा! हेही दिवस जातील गो!"

"म्हातारपणी मला मोठया फ्लॅटमध्ये जायचं नाही. शिवाय, एका वर्षात डिपार्टमेंटल परीक्षा देवून तुमच्यापुढे गेलेले तुमचेच मित्र मी पाहीलेत. मला कासवासारखं जमिनीवर सरपटत पाण्याच्या रेघा ओढीत चालायचं नाही."

"मग मर!"

"निघू या. मरायला मी लग्न केलेलं नाही."

दोघं उठली. एकमेकाकडे बघत काही वेळ उभी राहीली. हातांनी वाळू झटकली. समुद्राला संध्याकाळची गाज आलेली होती. तो पाय रुतवून उभाच राहीला. मिनीटभर वाट बघून ती चालू लागली. पंधरा पावलं पुढं जाऊनही मागं वळून पाहिलं नाही. पण तेवढया अंतरात तिचा पाठमोरा पुष्ट हिंदोळा बघायला दोनतीन पुरुषांनी मागं वळून पाहिलं तेव्हां तो वाळूतून तटकन हलला. पुटपुटला,

"बास्टर्डस!"

मनातल्या मनात हसू आलं. कारण इतरांसारखाच तोही एक पुरुष, बास्टर्ड होता! नजर जाळीत हिंदोळे बघणं आणि पायाच्या अंगठ्यापासून मेंदूपर्यंत चिकचिकीत विचार करणं नैसर्गिक आहे, हे त्याचं इन जनरल मत. सोईस्कर करून ठेवलेलं.

फ्राईडनं हा सिद्धांत केव्हाच लिहून ठेवलाय. आपण सारे प्राणीमात्र. मोकळे. अलीकडे शास्त्रज्ञांनी एक सुखद शोध लावल्याचं त्यानं वाचलं होतं. जे पुरुष हस्तमैथुन करतात त्यांना प्रोस्टेटग्लॅण्डस् चा कॅन्सर होत नाही.

ग्रेट! असं कोणी अधिकारवाणीनं पेपरात पांढऱ्यावर काळं करावं. छोटासा दिलासा मिळतो. मनातला गिल्ट निघून जातो. आपण प्राणीमात्र. मोकळे.

ती बरीच पुढं चालत गेलेली. उभार. बेपर्वा. उद्दामशी. बाकीची सगळी परतणारी गर्दी वाढलेली. बेफिकीर चेहऱ्यांची. मुखवटे आणि मुखवटे. सरकते. एकमेकात क्रॉस होणारे. तंग. उदास. हसरे. लंबक, चौकट, काळे, तपकिरी, तांबूस, घामट, स्वच्छ, नितळ. सरळ अंगावरून जाणारे. वचवचणारे. मधूनच हिंदोळे बघणारे. हे सर्व झेलीत ती मुक्त चालत होती. गुर्मीत. जणू प्रायोगिक सिनेमातल्या डायरेक्टरनं तिला सांगितलेलं. नुसती सरळ चालत रहा. ग्रेसफुली. मागं वळून बघायचं नाही. कोणासाठी थांबायचं नाही. तुझी पावलं पडावीत म्हणून यौवनवाट उसासलेली आहे. उलगडत आहे.

चालता चालता हाताची ओंजळ करून त्यानं सिगरेट पेटवली. पाठोपाठ ठराविक अंतरावर चालू लागला. मग मेथिड्रीन घेतल्यासारखे त्याच्या ऐन तिशीच्या मेंदूत रसरशीत भन्नाट एकसोएक विचार येऊ लागले ०००

●

## द वूमन प्रूव्हज डिफीकल्ट ०

काय करावं? काय करावं?

लगेच दुसरा विचार आला. आपण काय करू शकतो? तेराव्या मजल्यावरून हिला ढकलू शकू काय? किंवा हिचा गळा दाबू शकू काय? एखाद्या ट्रकवाल्याशी ' हिट एण्ड रन ' सापळा रचू शकू काय? आपण काय करू शकतो? साधा पिंजऱ्यात उंदीर सापडलेला पाहिला तर त्याचं स्वातंत्र्य हिरावल्याची हुरहूर लागते, असा आपला पिंड. वृत्ती. हिंस्र विचारांनीच आपल्याला थकवा येतोय०० या विचारांनी त्याला घाम फुटला.

जाणकार खूपसं बोलून जातात. लग्नानंतर शरिरांची धुंदी पहिली दोन वर्षे उतरत नाही. अंगावर मलयी दिसू लागते. परिसीमा झाल्यावर डॉक्टरकडे धावावं लागतं. वगैरे. वगैरे.

आणि इथं तर पंधरा फुटांवर चालणारा हिंदोळा म्हणतोय, मला कासवासारखं जमिनीवर पाण्याच्या रेघोट्या ओढीत सरपटायचं नाही. अठरा महिन्यांची दारिद्र्यरेषा पहा. तिनं मान वर करायचा प्रयत्नही केलेला नाही! पाताळधुंडी रेषा कपाळावर कोरलीय!

म्हणून मला स्वतंत्र व्हायचं आहे. हा व्यवहार आहे. टू प्लस टू फोर. शारिरीक तृप्ती, मानसिक समाधान, भावनिक एकाग्रता सारं बुकीश, बकवास आहे. इंपॉर्टन्ट इज ' एम ' व्हिटॅमिन! स्त्रीया दुबळ्या, हळव्या असतील. आणि सेंटीमेंटल असतील. मी नाही.

---- मी नर्मदा आहे.

दूर डोंगरात गूढपणाचा ताल देणारी. या नावातच आतवर एक धबधबा आहे. झम झम झम झम नाद देणारा.

आपल्या ऑफिसच्या दिनेश रिसबुडची बायको प्रायव्हेट कंपनीत अधिकारी आहे. दिनेशपेक्षा दीडपट जादा कमावते. दिनेश खुष. बायको खुष. एक मूल पाळणाघरात ठेवलयं. ते पण खुष. दुधात पाणी मिसळलं म्हणून काय झालं? सगळीकडेच खुषी आहे. बुचकारूनपण घेतलेली आहे.

मार्तुंडकरसर साहेबांची बायको ए.जी. च्या ऑफिसमध्ये वरिष्ठ कारकून आहे. चष्मा, पांढरेधोप केस, काळा रंग, दीडशे पौंड वजन. मेथीची गड्डी. कॉलेजला जाणारी दोन उद्दाम पोरं. हड्डीपसली मार्तुन्डकरसर साहेब. सगळीकडे आबादीआबाद आहे. तमाम समाधान पसरलंय. पंकज पुजारीची बायको छमकछल्ली आहे. तिचा बॉस आठवड्यातून नियमितपणे तीनदा रात्री अकरा वाजता सोसायटीच्या दारात गाडीने आणून सोडतो. त्यावेळी व्हिस्कीचे तीन पेग्ज घेऊन पंकज पुजारी बराचसा तत्वज्ञानी वगैरे झालेला असतो. त्याची छोटी मुलगी हायक्लास इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये शिकते. त्याची बायको सोसायटीच्या लेडीज हेल्थ क्लबची मुख्य आहे. योगा, सनबाथ, स्टीमबाथ, वगैरे. सगळीकडे बेधुंद तारुण्य आहे. उपलब्धता नुसती उसासलीय.

सारांश ---- हा निसर्गनियम आहे. इथं पापपुण्य बकवास आहे. आपण म्हणजे ईश्वराची रचना. ( हा ईश्वर असावा काय? ) शरीररचना एक गजबजलेलं शहर आहे. यात कुठे ना कुठे बारीकसारीक दंगे असणारच. त्यामुळं शरीर अस्वस्थ वाटतं. पण त्यात विशेष ते काय? पृथ्वीतलावरच्या अब्जावधी जीवजिवाणूना नीतिमुल्यांची विद्यापीठं माहीत आहेत काय? हे कालवे फक्त आम्हा माणसांनी स्वतःत खोदून घेतलेले आहेत. शोध लावलाय आणि खापर माथी थोपून घेतलंय. परिणामी संशयाच्या धुरात लोटलोय.

मन असं, पंकज पुजारीच्या तीन पेग्जनंतरच्या तत्वज्ञानासारखं केलं तर? एक नितांतसुंदर तळं होईल. पण ते आपल्या बाबतीत घडत नाही. आपल्या मनात, सुंदर न दिसणाऱ्या परंतु सेक्सी देहबोली लाभलेल्या आपल्या पत्नीविषयी असूया, संशय का निर्माण व्हावा?

खमॉन श्रीपाद सावंत! बी अ स्पोर्ट! ये बंबईया है. घरात पन्नाशीकडे झुकलेली, थोडीशी विक्षिप्त वाटणारी, बरी दिसणारी आई आहे. सुनेच्या राशीला सासू. दोन तलवारी एका म्यानात रहाणं कठीणच म्हणा! आज ना उद्या, आईला गावाकडे पाठवायला हवी. तिची सोय बघावी लागेल. हे तिला गोड शब्दात समजावून द्यावं लागेल. पण गोड! नर्मदेच्या सरळसोट भाषेत, --- 'थेरडे, विकृत झाली आहेस! आता तरुणांचा एकांत भिंतींना कान चिकटवून ऐकणं सोडून सरळ गावी जा! भजन करीत बस, नाहीतर मर! '

----आईशी असं बोलणं पद्धत नव्हे ००००

----- ती बससाठी थांबली. मागं वळून पाहिलं नाही. तिच्यामागे गुळावर पटापट माशा बसाव्यात तसे तिघेजण उभे राहीले. मग त्याचा नंबर लागला. बस आल्यावर झुंबड उठली तेव्हां हिंदोळ्यावर स्पर्शासाठी उतावीळ पंजे बघत त्यानं चवताळून स्वतःला आत कोंबलं. कंडक्टर आला. तिनं मागं न बघता अंगठा केला. तिचं हे वागणं त्याला फार खटकलं. जणू मागं सोम्यागोम्या आहे तो तिकीट काढील. त्याला क्षणभर वाटलं की तिच्या गजबजलेल्या शहरातून मद्यधुंद स्थितीत गाडी चालवून आत चिडबिचडीत करून टाकावं. हिला नेमका कशाचा माद चढलेला आहे? शोधायला हवं. चरफडत दोन तिकिटं काढली.

बिच!

लै माज आलाय.

आभाळातून पंजा खाली यावा तशी रात्र उतरली. त्या रात्री तिची इच्छा नव्हती. ट्यूबच्या प्रकाशात एक पाल भिंतीवरची बारीक किटकं चटचटा खात होती. रस्त्यावरून एक ट्रक खडखडत गेला. कुठंतरी कुत्रं विव्हळलं. त्यानं मच्छरदाणी सोडली.

थंडपणे ती पुटपुटली,

"आज सेफ नाही."

"इथे काहीच सेफ नाही."

"इच्छाही नाही."

"इच्छेचा प्रश्नच नाही."

"दमलै--------"

"बस साठी चांगली दमात चालत होतीस!"

"तुम्ही काय बोलताय ते कळत नाही!"

"सगळं कळतंय बरं!"

"स्पष्ट करा. मूड नको?."

"लग्नानंतर असा मूड कधी लागलाय?"

"व्यवहाराचं बोललं की मूड जातो का?"

"व्यवहाराशिवाय इतक्या रात्री आपण वेगळं काय बोलतोय?"

"अहो, आज खरंच दमायला झालंय."

---त्याला पुढं कळत होतं की आपण जो प्रवास करतोय त्यात राग, चीड आहे. आनंद म्हटलाच तर तो मिनीटभरचा गोडवा आहे. बाकी उरलाय तो मानसिक चेव. कसलासा बदला घेतल्याचा. खुन्नसमध्ये वर्चस्व दाखविल्याचा. मोठ्या कात्रीनं बागेतली फुलं कचकचा छाटून हवेत उडवल्याचा. त्या फुलांचा लगदा झालेला बघण्याचा. बुब्बुळं अर्धी खाली करून दात करकरा वाजवण्याचा.

----ती निपचित पडली. पाण्यातून बाहेर काढलेल्या सुतेरीसारखी. डोळे अर्धवट उघडे. त्यात नाईटलॅंपचा ठिपका. गच्च दातखिळी. कपाळभर घाम साचलेला. गळयात अस्पष्ट हुंदका साठलेला. तिनं घुटका गिळला त्याचा आवाज आला. त्यानं त्रयस्थपणे तिच्याकडे पाहीलं. मग नाडी बघीतली. उभार वक्षात कान चेपला. धुकधुक होती. रात्रीचा दीड वाजलेला. ओव्हरसेक्सनं कोणी मेलेलं त्यानं कुठं वाचलेलं नव्हतं. गॅलरीत येऊन सिगरेट पेटवली.

छातीत गरम झालं. समोरच्या झोपडपट्टीत त्रस्त जाग होती. मस्तकात समुद्र, वाळू, बसचा क्यू, उतावीळ पंजे, तिचे शब्द रिपरिपू लागले. परत फिरला. ती अजूनही निपचित.त्याच अवस्थेत. शिथिल. सैल. मुक्त. वेदनेची शीर कपाळावर उठलेली.

दुप्पट वेगाने प्रवास सुरु केला. चिखलातून घोडदौड व्हावी असा. दाराला आईचा कान लागलेला आहे की नाही त्याला माहीत नव्हतं. नर्मदेचा संशय खुळचट असावा. स्त्री जातीचा संशयी मेंदू गिचमिड कल्पनांची त्याज्य वस्तू असते. त्याला फाजील महत्व द्यायचं नाही. फक ऑफ!

पहाटे तीनला त्याचा डोळा लागला. श्रांत श्रांत. मग त्याला अचानकपणे तिची दया आली. गॅसवर गरम करायला ठेवलेल्या पाण्याला पहिला बुडबुडा फुटावा तास उमाळा आला. आणि स्वतःविषयी घृणा. आपण कोण? अ ब्लडी क्लर्क! बिनकण्याची मारखाऊ नोकरी. बॉसनं डोळे

वटारले तर निळी पिवळी पडणारी जमात. प्रमोशन बेडकासारखं दरवर्षी उड्या मारीत पुढं जाताना बघण्यापलीकडे कुवत अशी नाही. ओसाड वाटतंय. आता, या रात्री काय अशी मर्दुमकी केली? जे घडून गेलं त्यात कसला पुरुषार्थ होता? बिचारी मनात छिन्न झाली असेल. गोधडीसारखं उसवायला शरीर दिलंन. अनिच्छेनं विभागत राहीली.

पुढच्या आठवडाभर ऑफिसच्या कामात लक्ष लागेना. ओशट ओंगळ पारोसं वाटू लागलं. अंगात नुसता रंगाचा, संशयाचा सैतान धमन्यांतून फिरत होता. रेल्वेच्या खच्च डब्यात पुरुष मंडळी वचावचा बोलत असतात. ठो ठो हसत असतात. सकाळ संध्याकाळ कंपार्टमेंट्स बडवीत भजनं गात असतात. एखादी तरुण स्त्री चुकुन अशा डब्यात सापडली तर कंपार्टमेंटचं स्पंदन वाढत जातं आणि त्यातले आपण एक या समाजव्यवस्थेतले साक्षीदार प्रचंड घुमे म्हणून उभे असतो. काय मिळवलं?

●

इंटरकॉमवरून मार्तुंडकर साहेब बोलले,

“सावंत, ऑफिस सुटल्यावर पाचसात मिनिटं थांबा. थोडं बोलायचं आहे म्हणतो.”

“ठीक सर.”

श्रीपाद सावंतच्या छातीत क्लिक झालं. मार्तुंडकरसाहेबांची ही एक पुराणी वाईट संवय. कोणाला वरपासून खालपर्यंत सुकडासाफ झाडायचं असेल तर, थोडं बोलायचं आहे म्हणतो, संदेश यायचा. मग पाच दहा मिनिटात काशी व्हायची.

मार्तुंडकरसरसाहेब तसा सरळ माणूस. त्याचं वाचन बऱ्यापैकी झालेलं. 'सिनिक' वाटणारा. पण मनुष्यधर्मावर विश्वास ठेवणारा. कारकुनापासून साहेबीपर्यंत सावकाशपणे पण खात्रीने चढलेला. त्यामुळे मध्यमवर्गीय समस्यांची पूर्ण जाणीव. कॉम्रेडसारखी.

ऑफिसातले डायरेक्ट रिक्रूट ऑफिसर्स त्यांच्यापेक्षा खूपच तरुण, तल्लख, चलाख. ते साहेबांच्या वयाला मान देत. बुद्धीला नाही. हीरोहोंडापुढे साहेबांची मंजूळ घंटेची बैलगाडी चाललीय म्हणतात! खिदळतात. म्हातारा पिकलेल्या चिबुडासारखा उगाच केबीन अडवून बसलाय असं आपापसात कुजबुजतात. नुसती वर्षं ढकलतोय. अर्थात मार्तुंडकरसरसाहेबाना त्याची ना खेद ना खंत होती. या तरुण अधिकाऱ्यांची बारशी त्यांनी पाहीलेली होती.

“बसा सावंत.”

-----बसला.

“होमफ्रंट. कसं आहे?”

-----श्रीपाद सावंत क्षणभर थांबला. ताठरला.

“ठीक चाललयं साहेब!”

“नाही”

“म्हणजे?”

“गेला आठवडाभर बघतोय. ठीक चाललेलं नाही. तुम्ही तयार केलेल्या स्टेटमेंटसबद्दल अकाउंटस् डिपार्टमेंटमधून मेमो आलाय. सगळाच गोंधळ उडालाय. तुमची मनस्थिती ठीक नाही. अशा गफलती तुम्ही कधी केलेल्या नाहीत!”

------त्यानं मान खाली घातली. ऑफिस सुटून बाहेर शुकशुकाट झालेला. गजबजलेलं आणि मोकळं ऑफिस यात खूपच फरक असतो. रिकाम्या ऑफिसात फर्निचर जागं होतं. शिस्तीत समुदायात उभं राहून हल्ला करतंय की काय, असं वाटतं. साहेबानं नेमकं वेदनेवरच बोट ठेवलयं. या खात्यात तो तीन वर्षे होता. साहेब खडूस असेल. हड्डीपसली एक असेल. पण त्याला दुसऱ्यांच्या दुःखाची जाणीव होती.

क्षणभर श्रीपाद सावंत ब्लँक झाला. मग मध्येच छातीत मूठभर गच्च गच्च वाटू लागलं. कोणीतरी श्वास आवळून ठेवलेला आहे. त्यामुळे क्षणभर छातीत वीज चमकून गेली०० वरच्या पंख्यालाही भिरभिरल्यागत होऊन घाम फुटत आहे०० पण आता आपल्यासमोर कोणीएक धर्मगुरू बसलेला आहे. विचारीत आहे. आपली दुःखं स्वतःत शोषीत आहे. वगैरे. श्रीपाद सावंत हुंदका आल्यागत बोलला,

“फार कंटाळलोय. मला जीव द्यायचा आहे!”

“म्हणजे?”

“खरचं साहेब! मला जगायचं नाही आहे!”

“बरं. मग?”

"मी ---मी निष्क्रीय षंढ झालोय. आयुष्य तक्रारींची गाथा झालीय! मी स्वतःलाच मारून टाकीन. मला विचित्र स्वप्नं पडतात. मी मुंगीएवढा झालोय आणि माणसांच्या प्रचंड तळपायांपासून स्वतःचं रक्षण करीत धावत आहे! जिन्याच्या पायऱ्या माझ्या अंगावर वेगानं कोसळत आहेत, वगैरे. मी घाबरलोय हो!"

------आणि साहेबांच्या टेबलावर डोकं ठेवून तो लहान मुलासारखा फुटून फुटून रडू लागला. ऑफिस खुलं होतं. ऐकणारे फक्त मार्तुन्डकरसरसाहेब. ते समोर बसले होते. आपल्याला अचानक फांद्याबिंद्या फुटल्यागत वाटू लागलं. मग त्याला मन मोकळं करण्याची उर्मीच आली.

"मला जगावसं वाटत नाही."

"तुम्हाला वेडबीड लागलंय का सावंत?"या प्रश्नाची म्हाताऱ्या साहेबांकडून अपेक्षा करीत मान वर न करता तो मुसमुसत राहीला. वाटलं, साहेबांनी उठून निदान पाठीवरून हात फिरवावा. पण साहेब उठले. त्यांनी केबीनची खिडकी पूर्ण उघडली. पाच मजले खाली, घराच्या ओढीनं रस्त्यावरून जाणारी गर्दी पहिली. गर्दीचा सुस्त अजगर हळूहळू सरकत होता. मागं न वळता म्हणाले,

"इथून उडी टाकली तर जीव नक्कीच जाईल!"

श्रीपाद सावंतनं तट्कन मान वर करून पाहीलं. मस्तकात चिळकांड्या उडाल्या. चवताळून एका झेपेत खुर्ची ढकलली आणि टेबलावर चढून वेगानं खिडकीकडे धावला. त्याच वेगानं अर्ध अंग खिडकीबाहेर झेपावलं आणि किंचाळून डोळे मिटले.

मार्तुंडकरसाहेब दिसतात त्यापेक्षा काटक होते. त्यांनी श्रीपाद सावंतचा कमरेचा पट्टा धरला आणि पाठीत बोटं रुतवली. त्याला परत आत खेचलं. तो लडबडत साहेबांच्या खुर्चीत कोसळला. त्याची कॉलर धरून गपकन उचलून साहेब कर्कश्यपणे ओरडले,

' मूर्ख माणूस! तुझ्या खुर्चीत बैस!"

श्रीपाद सावंत एकदम आज्ञाधारक झाला. पांढराफटक. शून्य शून्य. माती रेती. साहेबांनी त्याचं उधार आयुष्य तोंडावर भिरकावलं होतं.

"मला तुझ्या मरणाची खंत नाही सावंत. पण मला शांतपणे जगायचं आहे. कळलं? या वयात पोलीस चौकशांचा ताप मला नकोय. बाहेर जा आणि गाडीखाली खुशाल जीव दे. बायकोनं घरात पाणउतारा करायला सुरुवात केली किंवा तिच्या संगतीत दुसरा कोणी आलाय, या संशयानं स्वतःचा खून करून टाकणारा नवरा संसार करायला नालायक असतो सावंत!"

"तुम्हाला कसं कळलं?"

"त्यासाठी फार मोठी अक्कल लागत नाही. दोन वर्षांपूर्वी लग्न झालेला माणूस जीवाला कंटाळतो तो याच कारणांमुळे!"

"मी ---लग्न करायला ---नको होतं."

"म्हणजे"

"म्हणजे ---माझ्यासारख्यानं ----"

"रस्त्यात टाळया वाजवतात, त्यातले का?"

"छे छे! तसं काही नाही हो!"

"मग निदान बायकोच्या याराला प्रथम ठार कर! मग सुरा घेऊन तिचा खून कर आणि समाधानानं जीव दे. तू अगोदरच असा गेल्यावर त्या दोघांना रान मोकळं का ठेवतोस? तुझ्या फोटोला हार घालून ती तुला हात जोडतील असं वाटतं का?"

श्रीपाद सावंत डोळे विस्फारून समोरच्या कृश काटक पण निश्चल म्हाताऱ्याकडे बघू लागला. कोण कुठला हा माणूस आपला साहेब. काही क्षणांपूर्वी यानं आपल्याला आत खेचलं नसतं तर एव्हांना आपण खालच्या फूटपाथवर मेंदू बाहेर पडून गतप्राण झालो असतो. विच्छिन्न. इथे तिथे. म्हाताऱ्यानं आपल्याला जीवदान दिलेलं आहे ०००० त्याच्या मनात एकदम आदरभावना निर्माण झाली.

"तसं काही नाही साहेब. पण जर का मी तिला स्वातंत्र्य दिलं तर तिला खूप मित्र मिळतील. तिच्यात तसलं आकर्षण आहे. अपील आहे------------"

"वय वीस बावीस असणार!"

"चोवीस"

"स्पष्टच बोलतोय. प्रेमविवाह का?"

"नाही. समाजातर्फे -------"

"समाजातर्फे मिळणारी सगळीच माहीती खरी असते का?"

"दुसरा सोर्सच काय?"

"नसतोच. आणि एकदा लग्न केलं की एकमेकांचा भूतकाळ खोदायचा नसतो. प्रत्येक तरुणीचं स्वतःचं गुपित असतं. ते शेवटपर्यंत ती कोणाला सांगीत नाही."

"ती फार वरचढ वागते."

"लग्नाअगोदर त्या स्त्रीचे किती मित्र होते याची तुला माहीती नाही. पण लग्न झाल्याबरोबर तिच्या संपूर्ण शरीराचा, मनाचा तू एकटा मालक झालास! नाही का?"

"तसंच असतं ना?"

“देशाच्या कुठल्या घटनेत हे लिहून ठेवलेलं आहे?”

“मग--- याचा अर्थ काय?”

“आणि पुरुषांचं काय रे? लग्नाआधी किती पुरुष कोरे असतात?”

“आपल्या संस्कृतीत हे बसत नाही साहेब!”

“त्यासाठी परस्त्रीबरोबर शय्यासोबत करायलाच हवी का सावंत? कसल्या संस्कृतीच्या बाता मारता?”

श्रीपाद सावंतनं मान खाली घातली.

“आपल्या सो कॉल्ड संस्कृतीनं आपल्याला उपाशी विकृत करून ठेवलंय सावंत! स्त्रीच्या सौंदर्याची तारीफ पुरुषांनी नाही करायची तर कोणी?”

“बोलायला हे सगळं ठीक वाटतं साहेब!”

“तुमच्यापेक्षा पंचवीस पावसाळे अधिक काढलेत मी. तुमचं रडगाणं यापुढे मला ऐकायचं नाही. आठवडाभर सिकलीव्ह घेऊन घरी बसा. शांतपणे जगण्यावर विचार करा.”

“सगळंच अर्थहीन झालेलं आहे.”

“तुमच्या पश्चात तुमच्या बायकोचं काय होईल हा विचार करू नका.”

“का?”

“तसा विचार करणं मूर्खपणा आहे. इथे कोणाचं कोणापायी अडलेलं नाही सावंत. उलट, तुमच्या पश्चात अधिक सुधारणा होतात हे सत्य आहे. आणि हे सत्य कळल्यावर वाईट वाटून घेण्याचं कारण नाही.”

“हे बाकी खरं आहे साहेब!”

“पण आत्महत्त्या हे त्यावरचं उत्तर नाही. खोखोच्या खेळात विशिष्ट खांबाला वळसा घालून धावावं लागतं. आयुष्यातही असे विचारांचे खांब ' भोज्ये ' असतात. जो थांबला, शिवून परतला नाही तो संपला! तुमच्यासारख्या लोकांना आयुर्वेदातली सेंटॉरी पुष्पौषधी फायदेशीर ठरते.”

------- श्रीपाद सावंत थिजून गेला. साहेबांनी ड्रॉवर उघडून सिगरेटचं पाकीट काढलं. पुढं केलं. श्रीपाद सावंतनं हावरटपणाने एक सिगरेट बुचकारून घेतली. साहेबांनी ओठात एक अडकवून दोघांच्याही सिगरेटस् पेटवल्या. पंख्याच्या वाऱ्यामुळे धूर केबीनभर झाला. पसरला. डोळे बारीक करून ते पुटपुटले,

“जीव दिला असतात तर या सिगरेटचा स्वाद घ्यायचा राहून गेला असता सावंत! मी तुमची स्थिती पाहीली. थोडा सैल झालो. माझ्यासारखा रुक्ष माणूस एवढं जवळीकतेनं कसा बोलू लागला असं तुम्हाला नाही वाटलं?”

“मी----मी फक्त मला ऐकून घेणाऱ्याच्या शोधात, मनस्थितीत होतो साहेब! सॉरी ०”

“ठीक. पण यापुढं स्वतःला सांभाळा. पुन्हा ऑफिसच्या कामात चुका केलेल्या मला खपणार नाहीत! आऊट!”

श्रीपाद सावंत खांदे पाडून बाहेर आला.

साहेब खिडकीत आले. श्रीपाद सावंतला पाच मजले खाली फुटपाथवरून गर्दीतून तुरुतुरु जाताना पाहिलं. मोटारींना चुकवीत तो फुटपाथवर गेला होता. स्वतःला वाचवीत होता. पुढं पुढं सरकत होता. गर्दी त्याला उपाशीपोटी चाटतेय कि काय, वाटत होतं.

---- ते खुर्चीत बसले.

आपल्या आयुष्यात आपण कितीवेळां आत्महत्त्येचा विचार केला यावर चिंतन करू लागले ००००

---स्किझोफ्रेनिया हा तीव्र मानसिक आजार आहे. सावंतला आता वस्तुनिष्ट हालचालींचीही भीती वाटू लागलेली आहे. फोबिया. हा स्वतःच वेगळं वास्तव तयार करू लागला आहे. बायकोविषयी खूप पझेसिव्ह होऊ लागला आहे. जरा कुठे संशय आला तर मत्सरानं, संशयानं जाळून खाक व्हायचं. नरडी दाबायची. नाहीच जमलं तर जीव द्यायचा! फ्राईड म्हणतोय की जीवनेच्छेइतकीच मरणेच्छा पण तीव्र असते आणि आत्महत्या एकशेऐंशी डिग्रीत केलेला खून असतो.! …

साठी जवळ येतेय. आता लैंगिक आकर्षण कमी होऊन तेथे कम्पॅनियनशीप भावना उरते हा विचार बायकोशी बोलण्यापुरता ठीक आहे. आयुष्यातली पाचदहा वर्षे उरलीत. पुढचा जन्म डुकराचा असेल. या जन्मातल्या इच्छा याच वेळी शमवायच्या नाहीत तर केव्हा? खरंतर, दुसरा जन्म म्हणजे तरी काय? एक विचार, या पलीकडे काही नाही. मानवी शरीरात कायापालट होत असतो. शरीरातल्या पेशींचं आयुष्य आठवडयापासून सहा महिन्यापर्यंत आहे. मृत पेशींची जागा नव्या पेशी घेतात. जन्माला आल्यापासून अखेरपर्यंत रहाणारी एकच चीज. आपली जीन्स! या जीन्सचे वारसदार म्हणून नवी पिढी निर्माण होत असते.

हा प्रोसेस जर अखंड चालू आहे तर माणसाला मृत्युचं भय का वाटावं? आपले वारसदार आपणच नाही का?

हा सावंत मूर्ख माणूस आहे. तो मेला, असं उद्या कळलं तर आपल्याला वाईट वाटणार नाही ००० गेल्याच आठवडयात आपलं बी. पी. वर गेल्याचं डॉक्टरनं सांगितलंय. एनाप्रील पाईव्ह नियमीत घ्यायला हव्यात. नाहीतर हायपरटेन्शन होईल आणि केस हार्टअटॅकपर्यंत पोचेल! सगळा वातच आहे!

---हेल विथ धिस डॉक्टर!

---- ते खुर्चीत बसले. दुसरी सिगरेट पेटवली.

फुटपाथ बदलताना श्रीपाद सावंतला कळलं की आपल्याला भूक लागलेली आहे. गेला आठवडाभर लागली नव्हती. पण रोज रात्री घरी रागानं प्रवास व्हायचा. ती मुकाटपणे सहन करायची. कुठे प्रतिकार नाही. त्याची इच्छा, त्रास होतो म्हणून तिनं एकदा तरी म्हणावं. पण तेही नाही. परिणामी राग अधिक आणि, प्रवास दाहक व्हायचा. या संबंधी पहिल्या रात्रीचा संवाद शेवटचा झाला.

----- हे असं कुठपर्यंत चालायचं? ००

समोरच्या मध्यम हॉटेलात शिरला. कोपऱ्यातली खुर्ची ओढली. हॉटेलच्या सिलिंगला चित्रविचित्र कलाकृती. जुनं ठोस फर्निचर. भिंतीवर समोरासमोर अवाढव्य आरसे लावलेले. त्यामुळे खुर्ची ओढून बसणारे अनेक श्रीपाद सावंत दिसले. हॉटेलात चार गिऱ्हाईक बसली तरी गर्दी झालीय असा आभास व्हावा! मार्तुंडकरसरसाहेबांनी जर वेळीच खेचून घेतलं नसतं तर? तर ----------ते क्षण बेभान मूर्ख होते. त्यात पाच मजल्यांची तीव्रता होती. रस्त्यावरची माणसं पिसाळलेल्या मुंग्यांसारखी सैरभैर झाली असती. क्षणभर स्तब्ध झाली असती. मग उबगली असती.

"कोण तुजायला ट्राफिक जाम करायला पडला?"

"ही लुक्स यंग! बेच्चारा. उसके बिना बालबच्चे लावारीस होंगे यार!"

"पाचवा मजला काय? तसं वाटतं. कुठलं ऑफिस आहे तिथे?"

"कोणी वरून ढकलला काय?"

"अरे -- अँब्यूलन्स तरी बोलवा ---"

"भडव्याला ऑफीसं सुटल्यावरच नेमकं तडमडायचं होतं!"

“सात चोवीसची अंबरनाथ सुटेल! थांबलास तर स्टेटमेंट घ्यायला पोलीस थांबवतील. आपल्याला व्याप कमी आहेत का? चल फूट लवकर!”

हे असंच. अधिक, उणे.

दोन तासांनी आईला आणि नर्मदेला कळलं असतं. सोसायटीच्या लोकांना पण.

दुःख ० दुःख ०० दुःख ००० दुःख ०००? अचंबा आणि दुःख. सोसायटीला कंठ फुटला असता,

“पुअर गाय! ही हॅड नॉट एन्जॉईड मॅरीड लाईफ यार!”

“वाइफ इज सो यंग. क्या करेगी अब ---”

“एल.आय. सी. बिलआय.सी. पॉलिसी असेल म्हणा. सुईसाईड कव्हर असतं ना?”

“म्हातारीचा एक मुलगा. सावंतांचा वंश खुंटला. त्याचा बाप मिलिटरीत होता म्हणे. म्हणजे आईला पेन्शन असणार. पण बायकोचं काय? याचा पी. एफ. ग्रॅच्युइटी ------”

“तिला तिथेच नोकरी मिळायला हवी. तशी शिकलेय. पर्सनॅलिटी पण बरी आहे तिची.”

“सावंतच्या बॉसला मी ओळखतो. पोलीस म्हणतात कि सावंत शेवटी बॉसबरोबर होता --”

“म्हणजे ------ म्हाताऱ्यानं ढकलला की काय? हाः हाः हाः!”

“आजकाल कोणाचं कशावर प्रेम बसेल सांगता येत नाही!”

--- अशा संवादाना अंत नसणार. रस्त्यावरचे अनोळखी. सोसायटीचे ओळखीचे. एवढंच. सावंतच्या घरावर कुऱ्हाड कोसळलीय. आपण चार भिंतीत सुरक्षित आहोत. ही ईश्वराची कृपा. एकदा शिरडीला जाऊन यायला हवंय ०००००

खुर्चीत बसल्यावर त्याला भूक अधिक वाटली. आरशातल्या अनेक सावंतांनी एकच ऑर्डर दिली. एक समोसा, व्हेजिटेबल सॅन्डवीच आणि कडक चहा. सिगरेट पेटवली.

"मला पण सिगरेट दे. आणि सॅन्डवीच चहा मागव."

----समोर पाहिलं. कॉलेजचा जुना दोस्त, मकरंद झा. जवळजवळ तीन वर्षांनी अचानक टपकलेला. पण दोघांनाही त्याचं काही वाटलं नाही. दोघांच्या चेहऱ्यावर तीळमात्र बदल नाही. अगदी काल भेटल्यासारखं. बकाल. दुष्काळपीडित. अरेतुरेतलं नातं.

श्रीपाद सावंतनं सिगरेट दिली. सॅन्डवीच चहा मागितला. मकरंदकडे बघून गुरगुरला,

"बाहेर लाल स्टँडर्ड पार्क होतेय ती बघ. आत तो ती आणि त्यांचा मुलगा. तो आपल्यापेक्षा दीडदोन वर्षांनी सीनियर असेल. पण तिघांच्याही अंगावरची मस्ती बघ. ऐष करायलाच जन्म घेतलाय त्यांनी! आता ती फॅमिलीरुममध्ये शिरतील. शे दोनशेची उंची ऑर्डर देतील. गपागप खातील. रात्री एकमेकावर पडून सुखात झोपतील. हे जीवन. नाहीतर तू आणि मी! भूकबळी म्हणून जन्माला आलेलो. डॉक्युमेंटरीत बांधबांधोळीवर बसायला सुध्दा कोणी बोलावणार नाही!"

मकरंदनं खप्पड गालांवर वाढलेली काळी दाढी कुरवाळली. त्याच्या टपोऱ्या डोळयांत क्षणभर ठिणगी दिसली. त्यानं मान मागं वळवून स्टँडर्डमधून उतरणारं पुष्ट तरुण जोडपं आणि त्यांचा गोंडस मुलगा पाहीला. मान वळवून आरशातल्या अनेक प्रतिमांकडे टवकारून बघत काळयाभोर दाढीत एक स्मितरेषा उमटवली. उजव्या हाताच्या किडकिडीत बोटांनी टेबलावर ताल धरला. मग बोलला,

"तुझी कारकुनी अजून संपलेली दिसत नाही श्रीपाद!"

"नाही. तुझं काय? तीन वर्षांनी उगवतोयस!"

मकरंद हसला. सैर केसातून बोटं फिरवली. बोटातल्या तीन पितळेच्या जाड अंगठया दिसल्या.

"माझी नवी फियाट बाहेर उभी आहे. मी काय नाही तेवढंच विचार! मी सिव्हील इंजिनियरिंग जाणतो. म्युनिसीपालीटीतल्या सर्व खात्यांशी माझी दाट ओळख आहे. त्यामुळे मोठे बिल्डर्स माझ्या संपर्कात असतात. मी ऑटोमोबाईल्स ओळखतो. मुंबई सी.आय. डी. ना गुप्त बातम्या पुरवतो. मधूनच मला सत्यजित रे सिनेमाची ऑफर देतो. मला रोल पसंत नसतो म्हणून मी तो नाकारतो. मराठी नाटक निर्मात्यांना माझी नाईट परवडत नाही. मी माझी दारं त्यांच्यासाठी बंद करतो!"

--- कपातल्या चहाच्या पुडीच्या ठिपक्यांकडे बघत श्रीपाद सावंत गुणगुणला,

"थोडक्यात, तू बेकार आहेस."

"तसं म्हण."

"बाहेरची फियाट तुझ्या मित्राची किंवा भावाची असू शकेल."

"तसं म्हण."

"आता सँडवीच चहा मिळाला, म्हणजे आजचा दिवस बरा गेला."

"तसं म्हण."

"हे असं -- मित्रांना शोधीत हॉटेलांभोवती घुटमळायचं!"

"तसं म्हण."

"दिवस ढकलायचे."

"तसं म्हण."

"सॉरी. पण हि स्थिती का आली?"

"का आली?"

"स्वभावाला औषध नाही. आयुष्य म्हणजे कविता नाही."

"तसं म्हण."

"तुझी मला गंमत वाटते मक्या!"

"का?"

"तुला फ्रस्ट्रेशन येत नाही?"

"कशाबद्दल"

"या अवस्थेबद्दल. जगण्याबद्दल?"

"जगण्यानं अवस्थेचं काय केलंय?"

"तुझ्याशी काही बोलण्यात अर्थ नाही."

"तसं म्हण."

"जोवर लग्न करून संसारात पडत नाहीस तोवर हे भन्नाट जिणं ठीक आहे रे! पण ही स्थिती म्हणजे आयुष्य नव्हे!"

"तसं म्हण."

"तिशी सरली. असं भणंग किती काळ काढणार मक्या?"

वेटरनं टेबलावर डिशेस आणून ठेवल्या. टेबलावरचा बोटांचा ताल थांबला. डिश मोठया चवीनं बघत मकरंदनं सहज विचारलं,

"तू किती वेळ काढू शकतोस?"

"सांगशील तेवढा."

"पटापट खाऊन घे. आपण माझ्या घरी चाललोय."

श्रीपाद सावंतनं बिल दिलं. दोघे बाहेर पडले. उकाडा वाटत होता. हॉटेलच्या आवारात खरंच एक गाडी उभी होती. फियाटच्या सीटवरची पारदर्शक कव्हरं पण काढली नव्हती. मकरंदनं गाडीचं दार उघडलं. डेकजवळ ठेवलेलं फाय फाय फाय सिगरेटचं पाकीट पुढं केलं. दोघांनी सिगरेटस् पेटवल्या. गाडीत अगोदरच मादक सुगंध दरवळत होता. डेक चालू केला. मायकेल जॅक्सनचा चित्कार कमी करीत मकरंदनं गाडी सुरु करीत म्हटलं,

"शो मॅन पुढल्या महिन्यात घटस्फोट घेतोय. तू पेपरात वाचशील तेव्हां माझी आठवण काढ."

"शो मॅन?"

"राजकपूर रे! --------------"

"तो घटस्फोट घेणार?"

"पेपरात वाच, मग कळेल."

"हे तुला कोणी सांगितलं मक्या?"

"दुसरं कोण? वैजयंतीमाला! तिचाच मला फोन आला होता!"

"तुला? तिचा?"

"का? त्यात काय झालं?"

"हे सगळं--------अजब वाटतयं------"

"आता तिचं सिमल्याला शूटिंग चालू आहे."

"आणि तिनं फोन करून हे तुला कळवलं?"

"तुला माझा हेवा वाटतोय का?"

"तुझ्या थापांची परिसीमा झालीय मक्या!"

“तसं म्हण!”

श्रीपाद सावंत खिडकी बाहेरचं धावतं भुरभुरतं जग बघत बसला.

“श्रीपाद! तुला वाटत असेल की मी स्वप्नात जगतोय. खरं?”

“त्यात खोटं काय?”

“आपल्या आयुष्याला आपणच बंधनं का घालतो बरं!”

“मी रॅशनल थिंकर आहे हा माझा दोष समज.”

“रॅशनल थिंकींग हा पळपूटपणा आहे श्रीपाद! तुला कारकुनीपलीकडे श्वास घ्यायला वेळ मिळाला नाही!”

श्रीपाद सावंतच्या छातीत गच्च व्हायला लागलं. पाण्यातल्या मासळीगत फियाट लवलवत पळत होती. मकरंदचा गाडीवर चांगला कंट्रोल होता. मशीनचा गुं गुं आवाज येत होता. गाडीनं माउंटमेरी रोडची वळणं घेतली. समुद्रकिनारी रस्त्याला लागून उंच उंच उच्चभ्रू इमारती उभ्या होत्या त्यातल्या एका फाटकात शिरली. श्रीपाद सावंतला मनातल्या मनात कळलं की या बांद्र्याच्या परिसरात कुठल्या एका इमारतीत शिरण्याची आपली लायकी नाही किंवा आपला कुठला एक नातेवाईक तसा जन्माला आला नाही. फियाट आवारात गेली. फ्लॅट पाचशेवीसच्या स्टील्ट पार्कींग मध्ये उभी राहीली. नजरेत मग्रूर वाटणारी गब्रू बापांची गुबगुबीत पोरं सोसायटीच्या आवारात खेळत होती. टंच पोरींभवती घोळके जमले होते.

सोसायटीचा मोठा कॉम्प्लेक्स. पाचपंधरा इमारतींचा, हजार खिडक्यांचा. स्वच्छ नियमबद्ध. काही फ्लॅट्सवर डॉक्टर वकील चार्टर्ड अकाउंटण्टसच्या पाट्या. पाळणाघरांच्या जाहीराती. इमारतींच्या घेरात निळ्याशार पाण्याचा स्वीमींग पूल. पाण्यात हुंदडणारी तरुण मुलं. तट्ट छातीच्या बेदरकार पोरी. सिमेंटच्या बाकड्यावर बसलेली वृद्ध माणसं. पेपर वाचणारी. भिरभिर बघणारी. गब्रू तरीही एकटीशी. तट्ट छातींवरून नजर घरंगळणारी. गुबगुबीत, कुत्री

फिरवणाऱ्या उतारवयाच्या सुळसुळीत कपड्यातल्या म्हाताऱ्या. हे आणि ते. इथल्या फ्लॅटमध्ये सत्यनारायणाच्या पूजेला भटजी दीड हजार रुपये दक्षिणा घेतो.

मकरंदबरोबर तो चालू लागला. सिक्यूरिटीवाल्यांनी त्याला सॅल्यूट केले ते त्यानं पाहिल्यागत करून मान हलवून स्वीकारले. सुमार कपड्यातल्या मकरंदलाही इथे सॅल्यूट देणारा परिसर आहे! आपण त्याच्या बरोबरीनं चालणारे. म्हणजे आपणही सिक्यूरिटीवाल्यांच्या मते श्रीमंत उच्चभ्रू आहोत, या विचारानं तो सुखावला. आपण कोणीतरी आहोत.

“मक्या, सॉरी. मी तुला टोचून बोललो यार.”

“म्हणजे कसा?”

“हेच! मध्यमवर्गीय----------”

“तू स्वतःला समजतोस म्हणून मध्यमवर्गीय राहीलास!”

“तू---एकट्यानं या तीन वर्षात कसं उभं केलंस?”

“मी कोण आहे काय करू शकतो तुला सांगितलं!”

“पण पटलं नाही.”

“आता पटलं?”

“हं. पण हे कसं शक्य आहे? मला जमलं का नाही?”

“तू स्वतःला मोल्ड केलं नाहीस!”

“छे छे! हे कल्पनेबाहेरचं वाटतयं रे!”

“मग नाही समज!”

"ग्रेट आहेस मक्या!"

"तसं म्हण."

सगळंच अनाकलनीय. अजीबसं.गूढ. आत्महत्त्या केली असती तर अशा मेंदूला झिणझिण्या देणाऱ्या मित्राची गाठ पडली नसती. आपल्याच वयाचा एक मित्र आयुष्यात सम्राट कसा होऊ शकतो काळात नव्हतं. बऱ्याच गोष्टी राहील्या असत्या. मकरंदनं फ्लॅट पाचशेवीसची बेल दाबली.."

आतमध्ये अत्यंत आधुनिक पॉश फ्लॅट. तृप्तसा. सारं काही पोटातलं पाणी उंचावणारं. चक्रावून टाकणारं. एका साडेपाच फूट उंच बस्टी, कमनीय, गव्हाळ तरुणीनं मंद स्मित करीत दार उघडलं. मकरंद गुरगुरला,

"श्रीपाद मीट गुलशन, माय स्वीटी."

गुलशननं तिचा मऊ हात श्रीपादच्या हातात दिला. डोळयांत जगाची अदाकारी आणून त्याच्या डोळयांत रोखून पाहीलं. श्रीपाद सावंत एकदम कोमेजून गेला. तिच्या अंगावर पूर्ण कपडे होते. पण घट्ट. इतके घट्ट कि आतील देहबोलीला शब्द सुचावेत. रेषन रेष बाहेर फुटायला बघावी. उघड्या अंगाला नुसता चंदनाचा लेप लावलायसा वाटावा. शरीरानं कुठं कुठं बंडखोरी करावी. गुदमरलेलं वाटावं.

"बियर घेणार श्रीपाद?"

------घशाला कोरड पडलेली.

"चालेल."

गुलशनचा हिंदोळा आतल्या रूममध्ये गेला. दोन चिल्ड बियरच्या बाटल्या, ग्लासं, वेफर्स, काजू, मूगडाळ, तिखट शेंगदाणे आणून ठेवले. सिगरेटची पाकीटं ठेवली. तिघेही गुबगुबीत

मऊशार खुर्च्यात बसली. बोटीत बसल्यागत वाटलं. गुलशननं सिगरेट पेटवली. मकरंदनं बाटल्या फोडल्या. ग्लासं भरली. लागोपाठ तीन सोनेरी ग्लासं भरली. लागोपाठ तीन सोनेरी ग्लासं पोटात गेल्यावर श्रीपादला एकदम नवं नवं, फ्रेश, टवटवीत वाटू लागलं. जीवन असंही नशेलं असतं! हे ॥

पहाटेच्या दवात उघडणाऱ्या शुभ्र कळीसारखं. हे सारं मोफत! खिशाला पैशाची चाट नाही. महिन्यातल्या साडेतीनशे रुपये पगारात आपल्याला खर्चाची दोन टोकं जवळ आणताना फेफरं येतं! गेल्या तीस वर्षात शरीरात अंतर्बाह्य सुखावह वाटणारं पेय गेलेलं नव्हतं. तो बडबडला,

"मक्या, मकरंदा हे सारं तुझं?"

"नाही."

"मगाच काय बोललास?"

"तसं म्हण म्हणालो. माझं काही नाही. जे आहे ते माझ्या कर्तृत्वाचं. मी तुला हॉटेलात काय बोललो? मी कोणत्याही क्षेत्रात अज्ञानी नाही. मी माझा मास्टर आहे. मी स्वतःला ' साहेब ' म्हणून हाक मारतो. माझ्या जीवनाचा मीच सी.एम.डी. आहे. मला स्वतःचा खूप अभिमान आहे. आदर आहे. म्हणून मी आलिशान जगतो. या जगण्यावर शतदा प्रेम करावे! श्रीपाद मी ---- मी आहे!"

"आणि या ----- या ------कोण?"

"मैत्रिण. तिला मराठी येत नाही."

"बरं झालं."

"का?"

“आपले खाजगी संवाद त्यांना कळले असते!”

-------मकरंद दाढीत खुदकन हसला.

“त्यांनं काय झालं असतं रे? बघ श्रीपाद, मी बोललो आणि तू चटकन विश्वास ठेवलास!”

“म्हणजे?”

“गुलशनला पाच भाषा येतात. मराठीपण येतं!”

------मऊशार खुर्च्यात तिघंही सैल झाली. गुलशन थोडीशी हसली. तिच्या गोबऱ्या गालावर बारीकशी खळी दिसली. बियरचा परिणाम झाला होता. हा सुखाचा ओतप्रोत फ्लॅट. फर्निचर. त्यात वावरणारी मुक्त माणसं, त्यांची सलगी.

मुकेशचं जुनं गाणं आठवलं -----' अपनी भी क्या जिंदगी है निराली. जहा चले ठुकराये हम, वही है बोतल खाली ' ००००

“तुझं बँक बॅलन्स काय श्रीपाद?”

“बँकेत काम करतो. बॅलन्स कुठलं?”

“फर्गेट. हिची फिगर कशी वाटते तुला?”

------बियरनं धीर दिला होता. आतून कोणीतरी असं उचलून धरलं होतं. त्यात जुलमी डोळयांनी थोडीशी झिंगपण दिली होती. पटकन बोलला,

“धष्टपुष्ट, पण रेखीव आहे.”

“ती मॉडेलिंग करते. गुजराती नाटकात काम करते. नाटकातलं एक वाक्य तिनंच मला सांगितलं आहे! गुलशन, सांगू?”

------गुलशन अंगाचा हिंदोळा करीत आत गेली. मकरंद खुदकन हसून बोलला,

"सुंदर स्त्रीच्या दोन्ही पायात संमती असेल तर पैशाला तुटवडा नाही. हे ते वाक्य!"

"मला----- अर्थ नाही कळला-------"

"कारकूनच आहेस. सोडून दे."

"मक्या तू लकी आहेस यार!"

"लकी म्हणजे?"

"हे असंच! ही ऐष. मैत्रिण. कलंदर जगणं. काहीच वस्तुनिष्ठ वाटत नाही!"

"चुकतोस तू. सगळंच वस्तुनिष्ठ असतं बघ. फक्त ते स्वीकारायला आपण कचरतो."

"म्हणजे?"

"म्हणजे असं. या माझ्या मैत्रिणीला, तू सेक्सी दिसतेस म्हणायचे गट्स तुझ्यात नाहीत!"

"खरांय------"

"निदान मित्राजवळ मन मोकळं कर श्रीपाद!"

"कसं?"

"स्पष्टच बोलतो. ऐक, उद्या पहाटेपर्यंत रहायचं असेल, सिगरेटस् शराब, सेक्स हवा असेल आणि तीन हजारांची गॅरण्टी देत असशील तर ---------एन्जॉय लाईफ! ऐष कर! अरे इथे उद्याची कोणाला काळजी हवीय?"

श्रीपादनं ग्लास खटकन ठेवलं. ए. सी. रूममध्ये त्याला घाम फुटल्यागत झाला. कानावर विश्वासच बसेना. तीनदा खुर्चीतून उठायचा प्रयत्न करीत बुड्बुड्यागत बोलला,

“निघतो.”

मकरंद आणि गुलशन खिंकाळल्यागत त्याला वाटलं. त्यांच्याकडे बघण्याचा धीर झाला नाही. दारापर्यंत पोचल्यावर त्याला गुलशनचे फिसकारलेल्या मांजरासारखे शब्द ऐकू आले. ती मकरंदवर चिडली होती.

“बियर और स्नॅक्सका खर्चा कौन देगा? तेरा बाप?”

“मेरे अकाउंटपर लिखना यार!”

“कैसे फूटपाथके भिखारी दोस्तलोग लाता है!”

“मुझपर छोड दे. प्लीज!”

“अबतक चार हजार रुपैया होगया. छोड दू?”

“ठीक है यार --------”

“शडाप!”

श्रीपाद सावंतला हा संवाद ऐकवेना. दार उघडून बाहेर आला. मकरंद मांजरागत चालत पाठोपाठ आला. त्याच्या चेहऱ्यावर तोच निबर भाव होता. दाढीत अस्पष्ट स्मित. त्यानं विचारलं,

“श्रीपाद, पोचवायला येवू? कुठं रहातोस?”

“मी एकटा जाईन.”

“आर यू ऑल राईट?”

“यस----”

“लग्न केलंस?”

"येस"

"बायको काय करते?"

"गृहीणी आहे----"

"नोकरीला लाव!"

"गरज नाही."

"पत्ता दे. एकदा येईन मी."

श्रीपाद सावंतन विलक्षण संतापानं मकरंदला थोबाडायला हात उगारला. त्याच्या डोळयातली ठिणगी बघत मकरंद गुरगुरला,

"लकी आहेस. बाय!"

मकरंदचे शब्द बोबडे आले. या क्षणापर्यंत आपल्याला नर्मदेची आठवण झाली नाही हे श्रीपादला सावंतला जाणवलं.

टप टप टप टप चालत बांद्र्याच्या समुद्रकिनारी येवून बसला. शरीर पिसागत झालेलं. पण आतले सिक्स्टी ट्रिलीयन सेल्स प्रभावित झालेले. काहीशा तिटकाऱ्यानं मागं पाहिलं. इलेक्ट्रोकार्डियोग्रॅमच्या इंडीकेटरवरचे बिम बिम आलेख उडावेत तशा मागच्या इमारती वरखाली होत आहेत असं काहीबाही वाटलं. डोकं अजूनही उतरलं नव्हतं. आता सगळया इमारती दिव्यांनी पेटल्या होत्या. उंच होऊन हसत होत्या. जमिनीतून वर उसळलेले झगझगीत खांब वाटत होते. रस्त्यावरुन पेटत्या दिव्यांच्या मोटारी एकमेकीना चुकवीत धावत होत्या. आभाळात निळे तांबडे नियॉन साईन्सचे वक्रगोल सावकाशपणे फिरत होते. टॉवर्सवरचे लाल ठिपके आभाळात गेल्यागत वाटत होते. आणि समोर रात्रशी. तिच्या खालचा समुद्र. एकाकी. शांत. कुठं काही घडलं नव्हतं. कोणापायी अडलेलं नव्हतं.

घराच्या ओढीनं उठला. बियरचं पाणी झालं. मकरंद ह्या भेटला. नसता, तर आयुष्याची दुसरी गोष्ट कळली नसती. वेल, माणसं अशीही जगतात. ऐष करतात. नेहमी स्वप्नात वावरतात. मग उंची कशीही गाठा. टोलेजंग जगतात. मकरंद भणंग असेल पण आज गाडी पळवतोय. आलिशान फ्लॅटमध्ये बियर पितोय. भाडयाच्या स्त्रीशी व्यवहार करतोय. कमिशन खातोय. नो मेलोड्रामा. नो इलफिलींग्ज, नो सेंटीमेंट्स प्लीज! ग्रॅण्ड रिडक्शन सेल चाललेला आहे.

नर्मदेला असा पुरुष हवा होता काय? ०००० एकदा ती समुद्राच्या वाळूत बोलली होती. पैसा सर्वस्व आहे. अलीकडे ती पार एकटी पडलीय. स्वतःला उसवून घेतेय. अशा उसवून घेणाऱ्या स्त्रीया फोरास रोडवर पण उभ्या असतात. स्वतःचा ताप, खोकला, उबळ फूटपाथवरच्या दिव्याखाली, मेकपखाली दडपून असतात. त्यांची कुठंच तक्रार नसते.

नर्मदेचीही.

रात्रीचे साडेनऊ वाजले. तब्बल अडीच तास उशीर झाला. असं कधी घडलं नाही. गाडीच्या चेंगराचेंगरीतून रोज सातच्या ठोक्याला घरी भाजीबिजी घेऊन जाण्याची संवय. ओशट वाटलं. सवयीनं मध्यमवर्गीय सोयायटीकडे पाय वळले. अविश्वासानं थांबला.

त्याचा ब्लॉक दुसऱ्या मजल्यावर. तिथे गॅलरीत दोन अनोळखी राठ, दांडगट पुरुषी चेहरे सिगरेट्स फुंकीत उभे होते! सोयायटीतली माणसं त्याच्याकडे परग्रहावरून उतरलेल्या प्राण्याकडे बघतात तशी बघत उभी होती. त्याच्या छातीत मूठभर गच्च झालं. सावकाशपणे जिन्याच्या पायऱ्या चढून श्रीपाद सावंत दारात आला. दार उघडंच होतं. आत ट्यूबचा फक्क उजेड पडला होता. पंख्याखाली खुर्चीत आई बसलेलीं होती. शेजारी खाटेवर सोसायटीच्या कोणी बायका बसलेल्या होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर अनावश्यक उत्सुकता. आई उठून पुढे झाली. रडवेलीशी. त्याच्या गालफडांवरून बोटं फिरवीत तिनं विचारलं,

"इतका वेळ कुठं गेला व्हताव बावा?"

"काय -- झालं?"

गॅलरीतून एक राठ चेहरा पुढे झाला.

"पोलीस. आम्ही तुमच्या ऑफिसला फोन केला. कोणी मार्तुंडकर नावाच्या इसमानं, तुम्ही ऑफिस केव्हाच सोडल्याचं सांगितलं. विशेष म्हणजे, त्याला जपा म्हणाला! म्हणजे काय? होतात कुठे मिस्टर? रात्रीचे साडेनऊ ---------"

"काय झालं?"

"तुम्ही होतात कुठे?"

"काय झालं?"

खाटेवरची एक शेजारीण अनावश्यक पुटपुटली,

"सभ्य माणसांनी गुंडांच्या वाटी जाऊ नये बाई! सिनेमात, टी.व्हीत, बातम्यात काय काय स्टोऱ्या दाखवतात, पाहिलत ना?"

"काय झालं पण?"

------आईनं चेहरा उजळ करीत म्हटलं,

"तुमची बायको झाशीची रानी झालीय बावा!"

"म्हणजे?"

---दोन्ही चेहऱ्यांनी हाताच्या इषाऱ्यांनी बायकांना थांबवलं. घडयाळ बघत बोलले,

"सगळं कळेल सावंत! पोलीस स्टेशनात चला. आधीच खूप उशीर झालाय."

"नर्मदा कुठाय?"

"तुमच्या मिसेस पोलीस स्टेशनात तुमची वाट बघत बसल्यात. चला!"

"काय झालं?"

"वायरलेसमध्ये बोलू चला!"

आईचा उजळ चेहरा बघून धीर आला. आयुष्यात प्रथमच श्रीपाद सावंत पोलीसांबरोबर वायरलेसमध्ये बसला. डावीकडचा चेहरा बोलू लागला तेव्हां सिगरेटचा भपकारा आला.

"तुमची मिसेस कराटे चॅमपियन हाय काय?"

"का?"

-------उजवीकडचा चेहरा हसला. त्याची पांढरीशुभ्र कवळी दिसली.

“तिनं----ज्या प्रकारे शफीला तोडलाय ती पद्धत प्रोफेशनल वाटली!”

“शफी? कोण शफी?”

“सांगतो. तुमच्या मिसेसनी स्टेटमेंट दिलीय ती अशी ००

आज संध्याकाळी चार वाजता नेहमीप्रमाणे त्या भाजी मंडईत गेल्या. मंडईच्या कठड्यावर शफी आणि त्याची गॅंग नेहमीप्रमाणे स्त्रियांची छेडछाड काढीत होती. तुमच्या मिसेसनी दोन दिवस त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. पण आज शफीने एक पाऊल पुढं टाकलं. त्यानं सर्वांसमोर तुमच्या मिसेसना नको तिथं घसट आणि स्पर्श केला.

काय होतयं हे कळायच्या आत शफीच्या कानफटात चार वेळां चप्पल झणाणली. नंतर त्याच्या गुप्तांगाला ढोपराचा दणका दिल्यावर शफी रस्त्यावर आडवा पडला! त्याची गॅंग आणि पब्लिक नुसतं बघत उभी होती. तुमच्या मिसेसला कोणीही मदत केली नाही. परंतु सतत पाच मिनिटं शफी तुमच्या मिसेसच्या लाथा खाऊन काळानिळा पडला. त्याची गॅंग पळून गेली. मग पोलीस व्हॅन आली आणि शफीला अँब्यूलंस करून हॉस्पिटलला हलवला. तुमच्या मिसेस आता ए.सी.पी. साहेबांच्या केबिनमध्ये बसून आहेत. त्यांची स्टेटमेंट संपलीय.”

श्रीपाद सावंतच्या कानात शब्द भुरुभुरु शिरत होते. आपली बायको गुंडाला झोडीत होती तेव्हा आपण मकरंद झाच्या ईझी गोइंग मैत्रिणीबरोबर बियर पीत होतो. की मार्तुंडकरसर साहेबांच्या समोरून पाचव्या मजल्यावरून खाली उडी मारीत होतो? कळत नव्हतं. नर्मदेला आपल्या आईनं झाशीची राणी म्हटलं. शेजारणींनी मात्र मध्यमवर्गीय पातळ रक्ताची रास्त भीती व्यक्त केली. ती खरी होती. आपणही अशावेळी मंडईतले पब्लिकच होतो. पुचाट. बघे.

आपल्या बायकोनं गेला आठवडाभर आपल्याकडून होणारा अत्याचार सहन केलेला आहे. भोगला आहे. त्याचा राग, स्फोट रस्त्यावरच्या गुंडाला लाथाडण्यात झालेला आहे!

खरंतर ती आपल्यालाच शफीच्या रुपात तुडवीत होती! आता खरा भीतीचा प्रवास सुरु झालेला आहे!

"दोन प्रेस रिपोर्टर्स बसलेत. उद्याला पेपरात तुमच्या मिसेसचा फोटो आणि मर्दुमकी झळकणार बघा सावंत! डेरींगबाज बाई!"

"त्यांना ब्रेव्हरीअवार्ड द्यायला हवं! :"

"मुंबैत गुंडाच्या समोर जायला अंगात पॉवर लागते बरं! आम्हा पोलीसांच्या बायकापण असं डेरींग करणार नैत!"

श्रीपाद सावंत गुदमरला. नक्की काय होतंय कळेना. नर्मदेचं हे रूप नवीन होतं. धिस वूमन कुड बी डेंजरस! ऱ्हासपर्व सुरु झालंय.

पोलीस स्टेशनात ए.सी.पी. परुळेकर साहेबांचं केबीन भरलेलं. त्यानं पाहीलं. नर्मदा मधल्या खुर्चीत शांत बसलेली. तरीही उठाव. देखणीशी. त्याला पाहून तिच्या चेहऱ्यावर तीळमात्र बदल झाला नाही. तो इतका नगण्य झाला होता. तिच्या शेजारी स्वच्छ सफेत साडीतल्या चाळीशीपुढच्या दोन स्त्रीया बसलेल्या. बदकांसारख्या. त्यांचे चेहरे उग्र, आग्रही, उत्सुक, उजळ झालेले. एकजण ए.सी.पींच्या टेबलावर मुठी आपटून तावातावानं बोलत होती. श्रीपाद आल्यावर ती थांबली. एका राठ चेहऱ्यानं त्याच्यासाठी, नर्मदेशेजारी खुर्ची आणून ठेवली. नर्मदेनं त्याच्याकडे थंडपणे पाहीलं. तिची ती नजर त्याला अपमानास्पद वाटली. आपण हिच्या खिजगणतीतही नाही आहोत. केबीनमधलं डस्टबिन झालोत. किस पेड की पत्ती.

ए. सी. पी. परुळेकरांचा चेहरा बुद्धासारखा शांत. गंभीर. आकाश कोसळावं, विजा कडकडाव्यात, धुवाधार पाऊस पडावा, पोलीस स्टेशनचं छप्पर खाली यावं, बाहेर गोळीबार व्हावा, काचा फुटाव्यात, मुडदे पडावेत, पण परुळेकरसाहेबांच्या चेहऱ्यावरची शांती ढळणार नाही. इतका तल्लीन चेहरा. राखेनं पुसून कपाटात ठेवावा.

शेजारच्या चाळीशीच्या स्त्रीनं श्रीपाद सावंतकडे एक कटाक्ष टाकला. तिच्या आवाजात खर्जेपणा, नेतृत्वाचा तोरा होता.

"मी मिसेस शुभ किरपेकर. तुमच्या एरियातली कार्पोरेटर आहे. तुम्हाला माहीतच असेल म्हणा. तुमच्या मिसेसने आज जो पराक्रम, धाडस दाखवलंय त्याला तोड नाही. समाजात स्त्री म्हणजे एक भोगवादी वस्तू झालेली आहे. मी स्त्रीमुक्ती संघटनेची अध्यक्षा आहे. तुमच्या मिसेसना मी आमच्या कार्यालयात सामील करून घेणार आहे. हे एक सोशल वर्क आहे. इथे धडाडी वृत्तीच्या स्त्रीयांची फार गरज आहे श्रीयुत सावंत! मी ए. सी. पी. साहेबांना आता हेच सांगीत होते. आजच्या या घटनेला खूप प्रसिद्धी मिळायला हवी! फोटो यायला हवेत. तुमच्या घराला निदान दोन महिने पोलीस प्रोटेक्शन मिळायला हवं! मुंबईत गुंडांचा इतका सरळ सरळ अपमान कोणी केलेला नाही. तुम्ही तुमच्या मिसेसना प्रोत्साहन देऊन, समाजकार्याचं हे व्रत घेऊन आमच्या संघटनेत, पक्षात यायला पाठींबा द्यायला हवाय! काय सावंत?"

तिचा प्रश्न वसकन अंगावर आल्यागत वाटला. त्यानं चटकन ए. सी. पी. साहेबांकडे पाहीलं. परुळेकरांचा चेहरा कोरीव लेण्यासारखा वाटला. श्रीपाद सावंतला तो माणूस भयानक आवडला. तेवढ्यात एक फोटोग्राफर उपटला. त्यानं कार्पोरेटर किरपेकर बरोबर नर्मदेचा आणि श्रीपादचा फोटो चलाखीनं काढला. पोलीसांच्या शिव्या पडण्यापूर्वीच पटकन नाहीसा झाला. कार्पोरेटरचा ट्रांझीस्टर पुन्हा सुरु झाला.

"तेव्हा परुळेकर साहेब, मी माझ्या एरीयातल्या मिसेस नर्मदा सावंतांसारख्या धडाडीच्या तरुण कार्यकर्त्यांची एक बैठक पुढच्या आठवड्यात घेणार आहे. त्यावेळी तुम्ही आमच्यासाठी एक तास मोकळा ठेवावा. मी तुम्हाला तारीख आणि वेळ अगोदर कळवीनच म्हणा! मिसेस सावंतानी--------------"

हाताचा जाडजूड पंजा गपगन उभा राहीला तेव्हा ट्रान्झीस्टर आपोआप बंद झाला. ए. सी. पीं.च्या भव्य कपाळावर एकच उभी आठी उमटली. पुरेशी. घोगऱ्या संथ आवाजात ते गुरगुरले,

"आता मिस्टर सावंत इथे आलेत. मिसेस सावंत आहेत. आता फक्त या दोघांनीच इथे बसावं. मला दोघांशी बातचीत करायची आहे. दोन मिनिटात हे केबीन मला मोकळं झालेलं बघायचं आहे."

क्षणभर केबीनमध्ये सन्नाटा पसरला. हाताचा जाडजूड पंजा आणि कपाळावरची आठी तशीच दिसत राहीली.

शब्दांचा जादूसारखा परिणाम झाला. जुन्या डॉक्युमेंटरीतल्या पावसाच्या खरबराटात माणसं पटापट अदृष्य व्हावीत तशी गर्दी भराभर बाहेर गेली. मिसेस किरपेकर बसूनच राहीली. पाच दहा क्षणानंतर पंजाची जाडजूड बोटं उडवली गेली. कार्पोरेटर किरपेकरला कळलं. दरवाजा उघडा आहे. बरीचशी नाखूष होऊन तीही बाहेर गेली. परुळेकरांनी बेल दाबून तीन कप चहा मागितला. खाली बघून बोटं मोजीत नर्मदा गप्प बसली होती. श्रीपाद सावंतनं तिच्याकडे ओझरतं पाहीलं. परुळेकरांनी किंचित हसल्यागत केलं. त्यांची नजर तीव्र, अंगाला खिंडारं पाडतीलशी वाटणारी. एका शब्दानेही न बोलता आपल्याला आरपार पहात आहेत असं श्रीपाद सावंतला वाटलं. चहा आला. परुळेकरांनी भेदकपणे पहात विचारलं,

"तुमच्या बॉसला, मार्तुन्डकरला फोन लावला. माझी ओळख दिल्यावर तो माणूस थोडा अस्वस्थ वाटला. नक्की काय झालं? ऑफिस सुटल्यावर तुम्ही कोठे गेला होतात?"

"वेळ झाला खरा. कॉलेजचा एक जुना मित्र भेटला. त्याच्या घरी बांद्र्याला गेलो होतो."

----नर्मदेनं मान वळवून नवऱ्याकडे पाहिलं. परुळेकरांनी अंदाजानं वाक्य फेकलं,

"नेहेमी वेळेवर येता? आजच उशीर?"

“हा ड्रामा होईलसं वाटलं नव्हतं साहेब!”

----परुळेकरांच्या चेहऱ्यावर लाखमोलाचं अस्पष्ट स्मित आलं.

“मी तुम्ही इथे आल्यापासून पाहातोय. सर्वजणं तुमच्या सौ.चं तोंडभरून कौतुक करीत आहेत. पण----तुम्हाला------वेल, कसल्यातरी धक्क्यातून बाहेर यायला वेळ लागतोय वाटतं मिस्टर सावंत!”

------श्रीपादनं ए. सी. पी. ची नजर चुकवीत म्हटलं,

“मुंबईत सुखानं, सुरक्षित जगायचं असेल तर स्टंटबाजी करून चालायची नाही साहेब! तुम्ही दोन महिने पोलीस संरक्षण द्याल हो! पण पुढे काय? पेपरात नाव येईल, सत्कार होईल. सगळं सगळं होईल. पुढे काय? वेळ कोणासाठी थांबतो का? जीवनातले अपघात, सूड, हींसा हे अविभाज्य रंग आहेत!”

“थोडक्यात, तुमच्या सौ. नी दाखविलेलं धैर्य तुम्हाला आवडलेलं दिसत नाहीतर?”

टेबलावर चहाचा कप खटकन, ठेवून नर्मदा खणखणीतपणे प्रथमच बोलली,

“साहेब! मी तुम्हाला स्टेटमेंट दिलेली आहे. मी जे काही केलयं ते माझ्यापुरतं मर्यादीत आहे. माझ्या कुटुंबियांचा यात काहीही संबंध नाही. सगळा समाजच षंढ झालाय तर मी यांना दोष का देऊ? त्यांचा शब्दनशब्द खरा आहे. उद्या भर बाजारात हे मवाली बायकांना उघडउघड दाबतील आणि अशा बायका घरी आल्या की रात्री त्यांचे नवरे त्यांना फळवतील! गुंडांनी हाताळलं तर ते स्वीकारायचं, कारण ही मुंबई आहे. त्या गुंडांच्या सावलीत जायची पण नवऱ्यांची धमक नाही! असं सुरक्षित सुखात रहायचं. पण उरलेल्या सभ्य समाजात बायकोनं काही करायचं म्हटलं की नवऱ्यांच्या मनात संशयाची भुतं नाचू लागतात!”

श्रीपाद सावंत एकदम अस्वस्थ झाला. आपल्याला टेबलावर नागडं करून प्रत्येक अवयव सुटा करून ठेवल्यागत वाटू लागलं.

परुळेकरांचा जाडजूड पंजा पुन्हा वर आला. एका परपुरुषापुढे आपण अनावश्यक खूप बोलून गेलो असं नर्मदाला वाटलं. मान खाली घालून ती पुटपुटली,

"सॉरी!"

परुळेकरांच्या चेहऱ्यावर लाखमोलाचं स्मित पुन्हा आलं. जगातल्या दुर्मिळ वस्तूकडे बघावं तशा उत्सुक नजरेनं हातातला बॉलपेन बघत बसले. पुटपुटले,

"इंटरेस्टींग. हे पहा. तुमच्या वैयक्तिक मतांवर भाष्य करण्यासाठी मी इथे बसलो नाही. अंगात संचारल्यासारखे बाहेर समाजकार्यकर्ते बसलेले आहेत. वागत आहेत. त्यांना किती सहकार्य करायचं हा तुमचा प्रश्न आहे. मिसेस सावंतनी केलेली कृती माझ्या कक्षेत कौतुकास्पद आहे. शिवाय ही घटना माझ्या ज्युरीस्डीक्शन खाली येते म्हणून मला भाग घ्यावा लागतोय. तुम्हाला आमच्या डिपार्टमेंटचं सहकार्य मिळेल. योग्य ते बक्षीस मिळेल. मिसेस सावंतना मला एकच प्रश्न विचारायचा आहे. तुम्ही आज संध्याकाळी चार वाजता बाजारात जी कृती केलीत ती अचानक उद्रेक झाला म्हणून केलेली नव्हती. तुम्ही त्या गुंडाचा लैंगिक, मानसिक, छळ दोन दिवस सहन करूनच हा निर्णय घेतलात. मागील दोन दिवसात तुम्ही या संदर्भात तुमच्या पतीशी एका शब्दानेही तक्रार केली नाही. याचा अर्थ हा धाडशी निर्णय सर्वस्वी तुमचा स्वतःचा आहे. यातील संभाव्य धोक्यांचा तुम्ही नक्कीच विचार केला असणार. नाही का?"

----नर्मदेनं ए. सी. पी. च्या डोळयात रोखून बघत म्हटलं,

"आयुष्यात संभाव्य धोके जमिनीत पुरून ठेवलेल्या सुरुंगासारखे पावलोपावली आहेत म्हणून माणसानं पुढचं पाऊल टाकायचं नाही का?"

"फाईन! तुमचं उत्तर मला आवडलं. तुम्ही पाच मिनिटं बाहेरच्या रुममध्ये बसा. मला तुमच्या मिस्टरांशी दोन मिनिटं बोलायचं आहे."

------नर्मदा चटकन उठून दुसऱ्या रुममध्ये गेली. दार बंद झालं. बॉलपेन काळजीपूर्वक टेबलावर ठेवून परुळेकरांनी विचारलं,

"सिरोटोनिन. हा शब्द केव्हा ऐकलाय?"

"नाही."

"मग सांगतो. माणसाच्या मेंदूमधल्या विशिष्ट जीवरसायनाचं संतुलन बिघडणं. उदास व्यक्ती या बिघाडामुळे आत्महत्येचा प्रयत्न करतात मिस्टर सावंत!"

-----श्रीपाद सावंतनं मान खाली घातली. पुटपुटला,

"आता कितीजणांपुढे मी माझं दुबळेपण उघडं करणार आहे देव जाणे! साहेब, मी मार्तुन्डकरसाहेबांपुढे पोरकटपणा केला -------"

"मूर्खपणा म्हणा!"

"मूर्खपणा केला------"

"हाही सेक्शन ३०९ प्रमाणे गुन्हा आहे!"

"कबूल. काय शिक्षा करताय?"

"मानवी मन गुंता आहे. काही लोकांना पाण्याची भीती वाटते. हायड्रोफोबिया. कोणाला खोलीची, उंचीची, अंगावर काहीतरी कोसळतंय, हीच त्यांची भीती. लाल रंगाची, तीक्ष्ण हत्त्यारांची. काहींना तर स्वतःचीच भीती वाटू लागते! आपल्या हातून कळत नकळत गुन्हा घडेल ही भीती! अशी माणसं आत्मकेंद्री होतात. तुसडेपणानं वागतात. सतत इतरांचे व्यवहार संशयानं

बघतात. सर्वजण आपला नाश करायला टपलेत, आपण प्रचंड असुरक्षित आहोत, ही भीती! अति झालं की पश्चात्ताप. कोणी ऐकायला नाही. मग आत्महत्त्या!"

"मान्य. तुम्ही पोलिसांचे मुख्य आहात साहेब. माझ्याविषयी मीच काय सांगावं? मार्तुन्डकर साहेबांनी फोनवर सर्व काही सांगून टाकलचं असेल!"

"स्वेच्छामरण, युथनेशिया, हा पण गुन्हाच आहे!"

"कबूल."

"मिस्टर सावंत, तुमचा अश्वत्थामा झालेला आहे. एकदा का तो माणसाच्या मनात शिरला की शरीरात कॅन्सरसारखा पसरत जातो. जन्ममरणाच्या शरीरावर आणि मनावर जखमा, संशय ठेवून भ्रमिष्ट फिरणारा. त्यात सकारात्मक दृष्टीकोन विरत जातो. निगेटीव्ह विचार प्रबळ होतात!"

-----श्रीपाद सावंतच्या डोळयांत टचकन पाणी आलं. ढिसाळल्यागत वाटलं. दुःखाला स्पर्श करणारी माणसं फार कमी झालीत. परुळेकर एकदम जवळचे झाले.

"साहेब! पोलीसखात्यातही इतकी सहृदय माणसं असतात हे मी आजच बघतोय!"

------परुळेकर जराजरासे हसले.

"मी आता काय करावं साहेब?"

"एकच. मिसेसच्या स्वभावधर्माशी तडजोड करण्यासारखे गुण आपल्या अंगात आहेत का, याचा शोध घ्यावा. दुसऱ्याच्या अंतर्मनाला स्पर्श केलात तर ईश्वराचा भास होतो असं म्हणतात. आपण स्पर्श करीत नाही त्यामुळे माणसं तटस्थ रुक्ष वाटतात."

"मला सांगा, गुंडाला तिलाच स्पर्श करावासा का वाटला?"

"हा न्यूनगंड प्रत्येक देखण्या स्त्रीच्या नवऱ्यात आढळतो. तुमचा प्रेमविवाह का?"

"नाही."

"मुलीविषयी किती माहिती होती?"

"काही नाही ------"

"लग्नाअगोदर या गोष्टींचा विचार का केला नाही?"

"अशी कॉम्प्लिकेशन्स अपेक्षित नव्हती!"

"तुमची स्त्री बाणेदार आहे. अ स्ट्रॉंग कॅरक्टर. तिचा प्रत्येक शब्द असा इथे झोंबतो. पण तो शब्द खरा, प्रामाणिक आहे. त्यात स्टंट करण्याचा इरादा नाही. मित्र म्हणून एक सल्ला देतोय. अशा प्रकृतीच्या स्त्रिया शांत नसतात. विद्रोही बंडखोर असतात. त्यांना अन्याय सहन होत नाही. प्रसंगी वाईटपणा घेऊन प्रतिकार करतात."

"मग मी काय करावं?"

"त्यांना आवर घालायचा असेल तर एकच उपाय. त्यांच्यावर प्रेमाचं नाटक करीत चुचकारून संसार करायचा!"

"म्हणजेच, सदा पडती बाजू घेऊन त्यांना डोक्यावर घ्यायचं, असंच ना साहेब?"

"पत्रिकेतले गुण जमले होते का?"

"अगदी पाहिजेत तेवढे!"

"तुमचा पिंड कर्मठ, अर्वाच्य होण्याचा नाही सावंत. तुम्ही पातळ रक्ताचे आहात. हाडाचे क्लार्क आहात."

"माझ्यावर चांगले संस्कार झाले आहेत. काही व्हायोलंट करणं मला असभ्य आडाणीपणाचं वाटतं साहेब!"

"आत्मनाश हा यावरचा उपाय नव्हे."

"मी मलाच शिक्षा करीत होतो."

"मार्तुंडकरांकडून कळलं. तुम्ही मानसिक दृष्ट्या कोंडलेले, हवालदील झाला आहात. अशावेळी माणूस विरक्त होतो किंवा व्हायोलंट. संस्काराच्या नावाखाली तुम्हाला यातलं काही जमत नाही! तुमची स्त्री तुम्हाला समजून घेऊ शकत नाही आणि तुम्हाला तिला शिक्षा देता येत नाही! कारण तुम्ही असभ्य, रॉ नाहीत!"

"अगदी खरं!"

"यावर दुसरा एक उपाय आहे सावंत!"

"प्लीज!"

"तुमच्या मनातला कोंडलेला राग ऐकायला तुम्हाला नेहमी श्रोता मिळणार नाही. शिवाय तो तुम्हाला सहानुभूति दाखवीलच हे सांगता येणार नाही सावंत! तुम्हाला वाचनाची आवड आहे ना?"

"ती असती तर बँकेच्या परीक्षा दिल्या नसत्या?"

"मी वाङ्मयाची पुस्तकं म्हणतोय-----"

"नाही. तशी खास आवड नाही."

"मग लावून घ्या. तुमच्या आवडीचा विषय असेल त्यावरच्या कथा कादंबऱ्या वाचा. तुमचं मन रमेल. मग हळूहळू तुम्हाला जीवनातल्या इतर रसांची ओळख होईल."

“ठीक आहे! पण त्यामुळे माझा मानसिक ताण जाईलसं वाटत नाही साहेब!”

“अगोदर वाचन तर सुरु करा! मग लेखनाकडे वळा!”

---श्रीपाद सावंतनं ए. सी. पी. कडे नवलानं बघत विचारलं,

“म्हणजे सगळे लेखक माझ्यासारखे न्यूनगंडानं पछाडलेले असतात असं तुम्हाला म्हणायचं आहे का?”

“सृजनशीलता किंवा कला ही वेदनेपोटी जन्माला येते. त्यासाठी तुमच्यासारखं संशयी दुबळं मन लागतंच असा समज करून घेऊ नका सावंत!”

“अहो साहेब-------लेखक होणं खायची गोष्ट आहे का?”

“प्रयत्न तर करा! माणसातले सूप्त गुण कळायला काही निमित्त लागतं. प्रयत्न करा! हे बघा सावंत, ईश्वरानं जन्माला घालताना कुठे हात आवरता घेतलेला नाही. आपणच आपलं अंतर्मन चाचपून बघत नाही हा ईश्वराचा दोष नाही.”

“तुम्ही----माझ्याकडून फार मोठ्या अपेक्षा करताय साहेब! अहो मी कोणी विचारवंत नाही किंवा माझी शब्दसम्राट होण्याची पोच नाही!”

“कमॉन सावंत! तुम्ही तरुण आहात. लाईफ इज ब्युटीफुल! त्याचा असा नाश करू नका! आणि आपण फक्त एकदाच जगतो हे लक्षात ठेवा. मी एक पोलीस माणूस आहे. रोज मृत्यू बघतोय. पण त्यातूनही जगण्याची जिद्द असणारी माणसंही बघतोय. माझा सल्ला मनावर घ्या.”

“थँक यू सर. तुमचा अमूल्य वेळ----”

“मनात येईलते लिहीत सुटा. सुरुवातीला तुम्हाला हा खुळचटपणा वाटेल. पण मी सांगतो. तुमच्यातला एकलकोंडेपणाचा, कोंडलेपणाचा निचरा होत चालला आहे याचा आश्चर्यकारक शोध

तुम्हाला लागेल! तुम्हाला माहीत नसेल. मोठमोठ्या कलाकृती वेदनेपोटीच अजरामर झालेल्या आहेत सावंत! हे सत्य आहे. पुस्तकांसारखा मित्र नाही. हा सुखद अनुभव तरी घ्या!"

"असा सल्ला तुम्ही प्रत्येकाला देता का साहेब?"

ए. सी. पीं. च्या केबिनमध्ये मंद प्रकाश प्रसरण पावला होता. बाहेर अंतरावर शब्दांचे एकमेकात मिसळणारे आवाज. गोंधळ. त्यांनी बॉलपेन उचललं. नव्या नजरेनं त्याकडे बघत म्हणाले,

"मी पोलीस आहे. मला पंधरा फुटांवरून माणसाचा वास येतो. योग्य माणसालाच मी सल्ला देतो. जमल्यास थोडंफार समाजकार्य करा, ही आम्हाला शिकवण आहे. त्यामुळेच नवराबायको एकमेकाबद्दल तक्रारी नोंदवायला येतात त्या आम्ही शक्यतो दर्ज करून घेत नाही. त्यांना एकदोनदा मोफत सल्ला देतो. थोडीशी कायद्याची भीती दाखवतो. जीवनाचा कानमंत्र देतो. तुम्हाला नवल वाटेल. अशी जोडपी पुन्हां पोलीस स्टेशनला तक्रार घेऊन येत नाहीत."

"मला तुम्ही लिहिण्याचा सल्ला का देताय?"

"त्यापलीकडे काही ठोस करण्याचा तुमचा पिंड नाही म्हणून. तुमची मानसिक स्थिती, अवस्था प्रकृती बघून. मी नेहमी लेव्हललाईन बघतो. एका हार्डनट गुन्हेगाराला मी बॉक्सर होण्याचा सल्ला दिला. काही पत्ते दिले. तो योग्य ठिकाणी पोचून शिकला. तो आज स्टेटलेव्हलवर चॅम्पियन आहे. दुसऱ्याला स्वतःचा धंदा सुरु करायला सांगितलं. आज त्याचे मालाडला दोन गाळे आहेत."

"थँक्स. माझ्या बायकोला काय सल्ला देणार आहात?"

------परुळेकरांनी जाडजूड पंजा हस्तांदोलनासाठी पुढं केला.

जराजरासं हसून म्हणाले,

"घटस्फोट घ्यायला नक्कीच सांगणार नाही! बेस्ट लक!"

----- मध्यरात्री सायरेन वाजवीत पोलीसव्हॅन दोघांना घेऊन घरी आली. सोसायटीतली एरवी सामसूम होणारी घरं टक्क दिवे लावून गॅलऱ्यात, खिडक्यात ओथंबून गेलेली. शेजारच्या दोनतीन मध्यमवर्गीय इमारतीनाही जाग आलेली.

काहीतरी अतर्क्य विलक्षण धडाडीचं, भीतीचं, हवं नकोसं वाटणारं घडलेलं होतं. पांढरपेशांना छाती धडधडवणारी उत्सुकता लागलेली. रात्री जेवत असताना टि. व्ही. वर दिसणारा हिंसाचार, अमानुष अत्याचार डोळे वटारून बघणाऱ्यांचा तो वर्ग होता. आपल्या परिसरातही असं काही घडू शकतं. पोलीसव्हॅन नेहमी गुन्हेगारांना कोंबून नेते. पण आज आपल्यातल्या एका श्रीपाद सावंत आणि त्याच्या बायकोला आदरानं घरी पोचवते! वॉव!! हे विपरीत आहे. अशक्यप्राय आहे. इमारती आपल्या जाग्याच होत्या. व्हॅन सोसायटीच्या कंपाउंडमध्ये उभी राहील्याबरोबर सोसायटीला हातपाय फुटले. तरुण मुलंमुली जिन्यांवरून धडाडाडा धावत खाली आली. पुरुषांनी श्रीपाद सावंतला उचलून घेतलं. नर्मदेला काँग्रॅट्स केलं.

हे सारं नकोसं होतं. श्रीपाद सावंत घामेजला. कोमेजला. बायकोनं, मर्दुमकी केली. लोकांनी त्याला हीरो केलं. हे त्याला मनोमनी आवडलं नाही. अंगावर शेणाच्या गोवऱ्या थापल्यागत झालं. पण हौसेला मोल नाही. व्हॅन त्रयस्थपणे राउंड घेऊन गेली. झळाळत्या डोळयांनी. गर्दीला रात्र नव्हती. माणसं दुसऱ्या मजल्यावर जिन्यानं चढली तेव्हां नर्मदा थोडया कणखरपणे म्हणाली,

"प्लीज! प्लीज मला एकटीला सोडा.!"

गर्दीनं आपापसात पाहिलं. कोणाला समजलं. कोणाला शिष्टपणा वाटला. कोणाला श्रीपादची गंमत वाटली. कोणाला नर्मदेला पुन्हा पुन्हा बघावीशी वाटली. माणसं ओसरली.

------आईनं हसऱ्या चेहऱ्यानं दार बंद करून म्हटलं,

"सासऱ्याचं नाव काडलंस वो बाय! ते पण गुंडांशी सामना देतानाच गेले. शाब्बास!"

----काही न बोलता नर्मदा बाथरुमला गेली. आई खट्टू झाली. तिला वाटलं आतातरी नर्मदेनं बोलावं. पोटात भूक वाढत होती. जेवण मुकाट्यानं झालं. दोन तासापूर्वी माणसांची वर्दळ होती. आता नुसता तोंडाचा मचक मचक आवाज येत होता.

----रात्री नाईटलॅंप लावला. निळसर प्रकाश खोलीभर झाला. ती कॉटवर शांत पडली. वरचं सिलींग बघत. फिरता पंखा तिच्या हिशोबी नव्हता. त्याने मच्छरदाणी सोडली. जाळीची सावली दोघांवर पसरली. तिच्या शेजारी त्यानेही अंग टाकलं. पाच मिनिटं कोणी कोणाशी बोललं नाही. क्षणभर त्याच्या डोळयांवर झोपेची जड पापणी आली. त्यातच दुपारी भेटलेली गुजगुजीत गुलशन आठवली. परुळेकर साहेबांनी मकरंद झा ला कोणता सल्ला दिला असता देव जाणे! शेजारी दोन्ही हातांची उशी करून ती एकटक वर पाहत शांत पडली होती. टक्क. त्याने उजव्या कुशीवर वळून तिच्याकडे पाहीलं. छातीची टेकाडं उभी झाली होती. क्षणभर त्याच्या मनात वासनेची एक तिरीप आली आणि गेली. मग स्वतःचीच लाज वाटली. त्याला कळलं की या लाज वाटण्यावर आपण गेले दहा पंधरा दिवस विचारच केलेला नाही आपल्यावर वासनेचा तवंग चढलेला होता. आज, पाण्याखालून गुदमरून डोकं वर काढावं आणि चारी दिशा बघावं तसं झालेलं आहे. तवंगाखाली असताना तिच्या मनाचा, इच्छांचा विचारच केला नाही. ती बलात्कार सोशीत राहीली. अंग सुजवीत गेली.

------ किंबहुना आपल्याला विचार करायचाच नव्हता.

किंबहुना तिच्या उफाळलेल्या शरीरावर राग काढायचा होता. पण तिनं प्रतिकार केला नाही. नुसती सोशीत राहीली. आणि त्यातच आपला पराभव होत आहे हे दिवसेदिवस वाटू लागलं. हा पराभव असह्य होऊन आपण आत्मनाशाला निघालो होतो००००

ऑफिसच्या पाचव्या मजल्याच्या उंचीवरून पार लगदा झाला असता का? ईश्वरानं हे शरीर दिलंय. त्याची क्लिष्ट रचना आणि त्यातले सिक्स्टी ट्रिलीयन्स सेल्स! शेकड्यांनी हाडं. स्वप्नात, कीर्रर्र जंगलात धावत जाताना आडव्या येणाऱ्या चित्रविचित्र आकाराच्या वेलींसारखे त्या हाडांचे

आकार. अगणित धमन्या. प्रत्येक अवयवातून प्रामाणिकपणे वहाणाऱ्या. रक्ताभिसरण, वृषाणू, कवटीत बसवलेला चिकट मेंदू! हे लाखमोलाचं शरीर पाचव्या मजल्यावरून लोटताना आपण त्याची किंमत विचारात घेतली होती का? ००००० याच शरीरावर अब्जावधी वृषाणू उत्पादत, जगत, मरत आहेत, त्यांचं काय?

-----त्यानं पाहीलं. तिच्या डोळयांच्या कडेतून एक थेंब गालावरून ओघळत होता. त्याने बोटाने तो थेंब पुसला. अचानकपणे त्याला तिची दया आली. समाजबांधवानी दोन वर्षांपूर्वी आयुष्यात आणून दिलेल्या या एका तरुण स्त्रीवर आपण कोणत्या अधिकारानं पुरुषत्व दाखवीत होतो? तिच्या कुशीत डोकं खुपसून गुरगुरला,

"सॉरी."

तिनं घुटका गिळला. त्याचा आवाज ऐकू आला. पुटपुटली,

"मी आई होणार आहे."

तिचं हे वाक्य इतक्या सहजपणे बाहेर आलं की त्यानं न कळल्यागत डोकं उचलून तिच्याकडे प्रश्नार्थक पाहीलं. तिच्या चेहऱ्यावर कणभरही भावना, दुःख, आनंद, वेदना दिसली नाही. नुसता ढोबळ पसरट चेहरा. सत्यजित रेच्या फिल्ममधल्या एखाद्या स्त्रीसारखा. कोरा. स्थीर. ती बोलली,

"मी आई होणार आहे. हा गर्भ मला वाढवायचा आहे. आणि तो पोटात आहे तोवर मला आनंदी रहायचं आहे. मला मुलगाच होईल. पण तो धष्टपुष्ट झाला पाहीजे. मी मातृत्वाचा अभिमान घेऊनच घराबाहेर पडेन."

घशाला कोरड पडतेय असं त्याला वाटलं.

"म्हणजे?"

"सावंतांच्या घराण्याला वंशाचा दिवा देणं माझं कर्तव्य आहे. मी पार पाडीन. मुलाचा जन्म होईपर्यंत मला मानसिक त्रास देऊ नका. निदान तुमच्या वंशाच्या दिव्यासाठी मला आनंदी ठेवा. मुलगा बाहेर आल्यावर योग्य वेळी मी बाहेर पडेन. मला तुम्ही अडवायचं नाही. मी तुम्हाला सोडचिठ्ठी देणार नाही. तुमच्याविषयी माझी काही तक्रार नाही. मी जिथे जिथे असेन तिथून तुमच्या-माझ्या मुलाला भेटायला अवश्य येईन. शक्यच झालं नाही तर माझ्यापरीनं आर्थिक मदत करीन. पण आई म्हणून माझी त्याच्यावर सारखी नजर असेल."

"काय बोलतेस तू हे नर्मदे!"

"योग्य तेच बोलतेय. मी या समाजात आग पेटवलीय. पेटत्या अंगानं मला बाहेर पडायचं आहे. मी इथे नसले की या घराला कसलाही त्रास नाही. त्रास माझ्याबरोबर प्रवास करणार आहे. मला भविष्य दिसतयं. मोहोळाला मीच हात घातलाय. डंख मलाच होऊ दे. आता अधिक उहापोह नको."

"तुला वेड लागलयं!"

"म्हणूनच बाहेर पडतेय. वचन देतेय. तुम्ही कोणत्याही बंधनात नाही. दुसरी स्त्री, मैत्रीण ठेवा. माझ्यापुरतं हे सारं जळून खाक झालेलं आहे -------"

"ऐकून घे!"

"एकच विनंती. माझ्याविषयी कणभर जरी तुमच्या मनात ओलावा असेल आणि तुमचा मुलगा गुंडा व्हावा अशी इच्छा असेल तर मला संरक्षण देणं तुमचं कर्तव्य आहे. येत्या नऊ महिन्यात शारीरिक दृष्ट्या मी पुन्हा त्या गुंडाला सामोरं जायला तितकीशी समर्थ नसेन. तेव्हां प्लीज! मी तुम्हाला नंतर त्रास द्यायला येणार नाही. शेवटची विनंती समजा. गुड नाईट!"

तिनं अंग कुशीवर केलं. त्याच्याकडे पाठ. त्याला क्षणभर वाटलं की पाठीपुढची नर्मदा कायमची अदृष्य झाली आहे. आपल्यातलं बरंचसं काही हळूहळू पायऱ्या उतरून निघून चाललेलं आहे. रिकामे झालोत.

-------तो सपाट झाला.

आपली आई विक्षिप्त. आपण असे. आणि आता बायकोची भर!

काय घर आहे!

या घराला चारी बाजूंनी तोरणं लावायला हवीत. या घरच्या माणसांची तोंडं लोकांनी अगदी सकाळी, शुभ म्हणून बघावीत! उदो उदो व्हावा! ०० 

आणि दुसऱ्या दिवशी पेपरांनी, बातम्यांनी हैदोस घातला. ००००००० अगदी ऊर फुटेस्तो०००० सळसळा हातोहाती गेले. या अचानक प्रसिद्धीच्या झगझगाटात करपून गेल्यागत झालं. आता पुन्हा हितचिंतकांचा ससेमिरा! रस्त्यावर उभी राहून ब्लॉककडं बघणारी पब्लिक.

हेल!

# गडावर...

“तुम्ही सुखी आहात ना?”

श्रीपाद सावंत सावध झाला. हलक्या शब्दात प्रश्न विचारलेला. न विचारल्यासारखा. विश्वासातला. तळहातावरच्या पिसाला हळूच फुंकर घालावी असा. प्रश्न खालच्या गर्द झाडीतून तर आला नाही? वरचं नित्तांतसुंदर आकाश. ताऱ्यांनी जडावलेलं. गडावरच्या मातीत शुभ्र शुभ्र वाटणारी असंख्य अस्पर्श इवलीशी फुलं. वरच्या चांदण्यांसारखीच, पण मंद. आणि खालच्या गर्द रानजाईवर चांदण्यांचा वर्ख पसरलेला. गडाखालची दाट झाडीची दरी सावलीसारखी विस्तीर्ण पसरून गेलेली. अशा सावलीत मिसळलेली चंदेरी झालर. आताची.

हा आसमंत, हा गड, किमया, सगळंच विस्मयजनक हेतुपुरस्सर निर्माण केल्यासारखं. निश्चल. काहीसं एकाकी. गर्द दरीत घाट आहे. रात्री घाटातून जाणारी वाहनं उजेडांचे पुंजके हलवतात. घाटाला गंभीर नाद देतात. एकटेपणा अधिक वाढवतात. गडाला वळसा घेणारा घाट. ही निसर्गाची किमया.

सकाळचं वेगळं असतं. सकाळच्या कोवळया उनात गडावरून खाली उतरत जाणारी हिरवट दरी उग्र वाटते. बोलायला बघते. विनाप्रयोजन सावकाशपणे हलतेय की काय, वाटते ००

“तुम्ही सुखी आहात ना?”

पुन्हा प्रश्न.मोठाल्या दगडावर शेजारी पांढरीशुभ्र दाढीवाले गृहस्थ बसले होते.श्रीपाद सावंतला मृदू शब्दात विचारीत होते. जणू त्याच्या उत्तरासाठी श्वास रोखून तिष्ठत होते.दरीतर केवळ होती.

“मी असावा, असं तुम्हाला का वाटावं?”

वृद्ध गृहस्थ माफक हसले. बरचसं कळल्यागत त्यांनी मन हलवली. अंगावरच्या भगव्या उपरण्यानं स्वतःचं कृश शरीर गुंडाळल्यागत केलं. त्यांचं गुणगुणनं वाऱ्याबरोबर आलं,

“माणसाचा जन्म आनंदासाठी असावा. मी बघतोय. गेले पंधरा दिवस या गडावर एक स्वयंसेवक म्हणून तुम्ही स्वतःला अगदी झोकून दिलेलं आहे. आलात तेव्हां बोललात की --' मी दूर जमिनीवरून आलोय! ' हे चार शब्द फार बोलके आहेत. तुम्ही गडावर सेवा करताहात. मोजकंच बोलताहात.स्वच्छ आचरण ठेवताहात. तुम्ही फारच अबोल आहात श्रीयुत दिगंबर गायकवाड!”

श्रीपाद सावंत गृहस्थांकडे रोखून बघत राहीला.

“तुम्हाला एक मुलगा आहे. फार हुशार आहे! तुमच्या पत्नीच्या निधनानंतर तुम्ही केवळ निष्ठेनं, जिद्दीनं तुमच्या मुलावर, त्याच्या शिक्षणावर लक्ष ठेवलंत. तुमची पत्नी ऐन तारुण्यात तुम्हाला सोडून गेली. तिच्या आत्म्याला शांती मिळाली असेल बघा!”

“आयुष्य असं तुकड्या तुकड्यांनी जोडलेलं असतं ना? इथे काहीही बंदिस्त, एकसंघ नाही.”

“तुम्ही छान बोलता. तुमचं वय काय?”

“पुढल्या वर्षी पंचेचाळीसावं लागेल.”

“बघा! तुम्ही दुसरं लग्न केलं नाही. का?”

“का?”

“मी सांगतो. तुम्ही दिवंगत पत्नीला वचन दिलंय. तुमच्या मुलाला चांगलं वळण लागावं म्हणून स्वतःच्या सुखांचा त्याग केलाय!”

“त्यागाची अपेक्षा दामदुपटीच्या परतफेडीची असते म्हणतात!”

“तरीही, तरीही तुमचा पिता म्हणून फार मोठा त्याग आहे श्रीयुत गायकवाड! तुम्ही पिता म्हणून महान आहात बरं!”

“असं म्हणता?”

“तसंच. खरं तर तुम्ही सुखी हवेत. तुम्ही दूर जमिनीवरून इथे गडावर आलात. गुरुमाऊलीच्या चरणी पंधरा दिवस राहीलात. मला खात्री आहे. तुम्हाला इथे नक्कीच मनःशांती मिळाली असेल!”

“तुमचं म्हणणं, दुःखी माणसांनीच या गडावर यावं. नाही का?”

“तसं नाही बरं! तथाकथित वरवर सुखी दिसणारी बरीच माणसं भक्तगण म्हणून या गडावर येतातच की! पण त्यांना भीती वाटत असते.”

“भीती कसली?”

“आपल्या सुखाला कोणाची दृष्ट तर लागणार नाही? अंधारात दाबा धरून बसलेलं दुःख, समस्या, चिंता पटकन अंगावर उडी तर मारणार नाही? माणूस त्यालापण घाबरतो. इथे त्याला मग मनःशांती मिळते.”

“खरं आहे. हा भुरळ घालणारा निसर्ग, वनस्पतीतला, दगडातला जिवंतपणा यात त्याला जगण्याचा अर्थ कळत असला पाहीजे.”

“छान बोललात श्रीयुत गायकवाड. धनाढ्य वर्ग या आश्रयाला, गडाला आर्थिक सहाय्य देतो. समाधानानं परततो.”

-----श्रीपाद सावंत गप्प बसला. मनात पडझड झाली. रोज हजारोच्या संख्येने लोक गडावर येतात. त्यांचं मन भक्तीभावानं भरलेलं असतं. या डोंगरात एक योगी बसलेला आहे. तो ईश्वराचा अवतार आहे. या जन्मी तो आपल्याला प्रत्यक्ष बघण्याचं भाग्य लाभलेलं आहे! इथे येणारा प्रत्येकजण वारकरी.

इथे जातपात, गरीबी श्रीमंती भेदभाव नाही. सारे निसर्गाचे देणेकरी. गुरुमाऊलीच्या दीव्य दर्शनासाठी गड चढणारे. माऊली पाण्यात समाधीला बसतात. तीन तास पाण्यावर तरंगतात.

सूर्याकडे एकटक बघत रहातात. त्यांचं नक्की वय कोणास माहीत नाही. नव्वदीपुढे असावं. त्यांचं लक्ष तरुण पिढीवर असतं.

गुरुमाऊली अंतर्ज्ञानी आहेत. कोण कोणत्या हेतूने त्यांच्या चरणावर डोकं ठेवतो ते त्यांना अगोदरच कळत असतं. त्यांच्याविषयी बऱ्याच आख्यायिका आहेत. एकाच वेळी ते चार ठिकाणी दर्शन देतात. ते ज्ञानी महंत आहेत. त्यांच्यामागे एक तेजोवलय फिरत आहे असा भास होतो. ईश्वराचा अंश आहेत. वगैरे.

"मी दुःखाच्या शोधात आहे."

पांढऱ्या शुभ्र दाढीचे गृहस्थ या उत्तरानं थोडेसे हसले. थोडासा दुधी आणि उरलेला पडवळांनी रचलेला दिसणारा त्यांचा कृश देह किंचित थरथरला. समोर हात पसरून पुटपुटले,

"ते तर सागरा एवढं अमाप पसरलेलं आहे बरं!"

"क्षमा करा गुरुजी. पण तुम्ही जो सागर म्हणताय ती वस्तुस्थिती आहे. शरीर नाशवंत आहे. कितीही चोचले केले तरी योग्य वेळी व्याधींच आक्रमण शरीराला घेरतंच. यावेळी द्रव्य पण मदतीला येत नाही. नाहीतर टाटा बिर्ला अजरामर झाले असते. मी म्हणतोय ते हे दुःख नाही."

"मग तुमचं दुःख कोणतं श्रीयुत गायकवाड?"

"मी माझ्याच शोधात आहे असं म्हणा."

"स्वतःच्या शोधात म्हणजे दुःखाच्या, असं तुम्हाला का वाटावं?"

"कारण यापलीकडे मी काही अनुभवलेलं नाही."

"तुम्ही म्हणता ती वस्तू स्थिती म्हणू या. एका पुत्राला जन्म दिलात तेव्हां तुम्ही शरीरसुख अनुभवलेलं आहे. तुमचा मुलगा हुशार याचा आनंद तुम्ही अनुभवलेला आहे."

"क्षणिक समाधानाला सुख म्हणायचं का?"

"सुख निरंतर मिळत नाही म्हणून स्वतःचा शोध घेत दुःखालाच चाचपडत रहायचा प्रयत्न करणं, असं म्हणायचं का?"

"वाटल्यास तसं म्हणा."

"हा शोध माणसाइतकाच जुना आहे श्रीयुत गायकवाड! आत्महत्त्या ही कल्पनाही तशीच. पण तुम्हीच तुमच्या प्रश्नाचं उत्तर दिलेलं आहे बरं! स्वतःचा शोध म्हणजे दुःखाचा, हे तुमचं म्हणणं. तुमचं उत्तर भूतकाळातल्या अनुभवांवर वेदनांवर अवलंबून केलेलं आहे. नाही का?"

"तसं म्हणायला हरकत नाही."

"जीवनातली धुंदी ज्यांना कळते ते भूतकाळात शिरत नाहीत. त्यांना रोज उद्याची पहाट खुणावीत असते."

"बोलायला ते सगळं ठीक वाटतं."

"अहो, तुमचं वय अवघं पंचेचाळीस! माझ्याकडे बघा. मी अठ्ठ्याहत्तर वर्षांचा आहे. व्यवस्थित प्रपंच केला. साठीनंतर निवृत्त झालो-----"

"तुमची माझी गोष्ट वेगळी आहे गुरुजी!"

"कळलं. तुम्हाला संसारसुख मिळालं नाही, एकटेपणा खुपसा वाट्याला आला म्हणून तुम्ही दुःखी आहात. नाही का?"

"तसं म्हणणं चुकीचं होईल का?"

वृद्ध गृहस्थ थांबले. त्यांच्या डोळयांच्या कडा ओल्या झाल्या असल्यागत पुटपुटले,

“क्षमा करा श्रीयुत गायकवाड. प्रत्येक आयुष्य ही एक स्वतंत्र कादंबरी, हेच खरं! तुमची गोष्ट वेगळी, इतिहास वेगळा ------

“मला तुम्हाला बोलताना अडवायचं नव्हतं. पण तुम्ही नीट संसार केलात आणि अठ्ठ्याहत्तर वर्षे आयुष्य अनुभवलेलं आहे. मला कळू दे. तुम्ही सुखी आहात का?”

“का नसावा? साठीनंतर मी विरक्ती घेतली बरं! लगेच सर्व आर्थिक व्यवहारांची पद्धतशीरपणे गुंतवणूक केली. मग तरुण मुलांच्या संसारात लुडबूड न करता इथे गुरुमाऊलीच्या चरणी आलो. गेली अठरा वर्षे मी अत्यंत समाधानात आहे!”

“याचा अर्थ, माझ्यासारखेच तुम्ही -----------”

“मी विधूर नाही. माझी पत्नी मुलामुलींच्या संसारात मस्तपैकी लोळत असते. एखादी मुंग्यांची राणी असते तशी! पती म्हणून मी माझं कर्तव्य चोख पार पाडलेलं आहे बघा! एक सांगतो. जीवनात द्रव्याला मोठं महत्त्व आहे बरं!”

“विरक्ती घेऊन दोन तपं झाली तरी तुमचं मत हेच आहे का गुरुजी?”

“अठरा वर्षे गुरुचरणी राहूनही मी या मतावर ठाम आहे बघा. म्हणूनच निवृत्तीनंतर गुंतवणूक अशी केली की त्याच्या व्याजावर माझी पत्नी, मुलांना एका पैशानेही जड न होता मानात राहू शकेल. मी तिच्या आजारपणाचा विमा काढलेला आहे. मला इथे पेन्शन येते त्यातून मी प्रिमियम भरत असतो बरं!”

“त्या तुमच्याबरोबर का आल्या नाहीत?”

“जीवनपद्धती. हे एकच उत्तर. ऐष. भोगवाद. चैन. आर्थिकदृष्ट्या मी धोरणी असल्यामुळे आजही तिला मुलांच्या तोंडाकडे बघण्याची वेळ आलेली नाही.”

“हे बरं केलंत.”

"तुम्हाला एकच मुलगा आहे. हुशार आहे. पण थोरला म्हणून एक सल्ला देवू?"

"सांगा नं!"

"तुमचा मुलगा अगदी कलेक्टर झाला तरी त्याच्या मनिऑर्डरची वाट बघण्याची स्वतःवर वेळ आणून देवू नका! मुलाला ताट द्यावं पण पाट देवू नये!"

"ताट द्यावं पण पाट देवू नये. आपल्याशी इतकं असावं की घेताना मुलांचे हात थिटे पडावेत!"

"लाखातलं बोललात श्रीयुत गायकवाड!"

"क्षमा करा गुरुजी. पण तुम्ही तुमच्या आयुष्यातल्या बऱ्याच गोष्टी गृहीत धरून चालला आहात असं तुम्हाला नाही वाटत?"

वृद्ध गृहस्थांनी नवलानं मान वर केली.

"म्हणजे?"

------श्रीपाद सावंत चांदण्यात केवळ हसला.

"काही नाही. तुम्ही छान बोलता गुरुजी! बोलत रहा."

---------मग ते छान बोलत राहिले.

"तुमचे विचार मला परिपक्क वाटतात. तसेच माझ्या पत्नीचेही विचार परिपक्क आहेतच बरं! तिला प्रपंचाची मोठी आसक्ती आहे. नातवंडांच्यात रमायचंय. मुलांना कोणीतरी प्रौढ वाटाड्या असावा हे तिचं मत. नातवंडांच्या हगण्यामुतण्यात ज्या आजाआजीचं अंग ओलं होत नाही त्यांना मोक्ष मिळत नाही हे तिचं मत! मी तिला इथे गुरुचरणी यायला कसं सांगू?

"खरं आहे तुमचं."

"कदाचित माझ्या मुलांना माझा हा पलायनवाद आहे असं वाटत असेल. बाप म्हणून माझा रागही करत असतील! पण मी का चिंता करावी? पैसा असेस्तो नातेवाईक झुरळासारखे चिकटून रहातात बरं!"

"आजारपणात मुलांची आठवण येईल!"

"तरुणपणी मित्रांच्या सहवासात जीवनाच्या सर्व रसांचा पूर्ण आनंद घेतलेला मी माणूस आहे. पण प्रपंच नेटका केला बरं! निर्णय पक्का घेतला आणि गुरुचरणी आलो."

"तुमचा विचार सूज्ञ वाटतो गुरुजी."

"गेल्या अठरा वर्षात गुरुमाऊलीबरोबर मी देशभर प्रवास केलाय. कुंभमेळे पाहीले. स्वामी ईश्वराचा अंश आहेत. मी तर या योगीच्या सान्निध्यात वावरतोय श्रीयुत गायकवाड! मनुष्ययोनीत येवून एवढं पुण्य मला मिळालेलं आहे बरं!"

"भाग्यवान आहात. पण रागावणार नसाल तर एक प्रश्न विचारू?"

"अवश्य!"

"या पवित्र भूमीवर येणारी माणसं वेगवेगळी आहेत. काही माझ्यासारखी भुरटी. काही तुमच्यासारखी. सर्वस्व वाहीलेली. इथे येणारा भाविकवर्ग सर्व थरातला आहे. काही गर्भश्रीमंत आहेत. विलास, ऐश्वर्याचा कंटाळा आला म्हणून या निसर्गरम्य ठिकाणी चारआठ दिवस विरंगुळा म्हणून ते येत नसतील का?"

"ते येतात की!"

"लाखांची देणगी करणं त्यांना जड जात नसेल! शिवाय या पवित्रभूमीत येवून प्रत्यक्ष गुरुमाऊलीचं दर्शन घेतल्याचं समाधान पण घेत असतील की! गुरुमाऊली अंतर्यामी आहेत ना? या वर्गाचा हेतू त्यांना कळत नसेल का?"

----शेजारच्या गृहस्थांना खोकल्याची उबळ आली. थोडं उपरोधानं म्हणाले,

“मी पुन्हा सांगतो श्रीयुत गायकवाड. जीवनात द्रव्याला मोठं महत्व आहे बरं! हा श्रीमंत वर्ग आमचा आश्रयदाता आहे! तुम्ही किंवा मी नव्हे! या वर्गात एक प्रकारचा दंभ, दांभिकपणा असतोच! पण बराचसा भोळसटपणापण असतो. हा आमचा त्यांच्याबद्दलचा अभ्यास आहे. आपण जे कशाही मार्गे मिळवलंय, त्याला पाय फुटू नयेत, सुरक्षित असावं, सतत वाढत रहावं, शत्रू निर्माण होऊ नयेत ही भीती मन कुरतडत असते बरं! अशावेळी मनोधैर्य देणारा कोणीतरी समर्थ लागतो. गुरुमाऊलींशिवाय दुसरा कोण असणार हो?”

“खरं आहे. पण या उच्चभ्रूंच्या व्यसनांचं काय?”

“ते तर आलंच! आमचे तरुण स्वयंसेवक त्यांना उंची सिगरेट्सची पाकीटं आणून देतात. परंतु या मठातर्फे नम्र विनंती असते. हा परिसर एका दीव्य अवतारी पुरुषाचा आहे. त्याचं पावित्र्य सांभाळा. इंद्रियांवर काही काळ ताबा राखायला शिका.”

“त्यांना हा सल्ला पटतो?”

“पटतो. गडाच्या खाली उतरून सिगरेटी ओढतात. बियरबारांमध्ये बसतात. समाधान झालं की परततात!”

“यांना कसली दुःख आहेत देव जाणो.”

“जीवनातली असुरक्षीतता. लक्ष्मी झोप देत नाही. वेगवेगळ्या रुपात वैरी आसपास वावरतोय, ही भीती!”

“माणसानं नेहेमी खरं बोलायला हवं का?”

“नेहेमीच नाही. कॅन्सरपेशंटशी डॉक्टर खरं बोलत नाही. वकीली डावपेचात खरेपणाला बोथटधारेची उत्तरं मिळतात. मनुष्यवध गुन्हा आहे. पण दोन प्रवासी एका बोटीतून मध्यसमुद्रात

पोचल्यावर अन्नधान्य संपल्यावर केवळ भूकेपोटी एकानं दुसऱ्याचा वध करून भक्षण केलं तर गुन्हा नाही."

श्रीपाद सावंत चांदण्यात जराजरासं हसला.

"श्रीयुत गायकवाड, इथे प्रत्येकाला जगायचं आहे. अगदी खडकातल्या खेकड्यांना, मातीतल्या गांडुळांना, शिंपल्यांना, विक्राळ प्राण्यांना, समुद्रातल्या वनस्पतीला, जे जे श्वसन करते त्या सगळयांना! हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे."

खालची दरी गडद होत होती. एका वाहनाचा भर वाढल्यामुळे घाट चढताना कण्हल्यासारखा आवाज येत होता.

"इथे रूलींग पार्टीचे मंत्री येतात तसेच विरोधकही. सिनेमास्टार्स आणि अंडरवर्ल्डवालेही! कारण हा ईश्वराचा मुक्त उघडा दरवाजा आहे. अगदी स्वतःला नास्तिक म्हणवून घेणारे मनःशांतीसाठी गुरुचरणी येतात तेव्हां मनुष्य स्वभावाची गंमत वाटते बरं!"

"मनुष्यस्वभाव! मोठा गुंताच आहे तो."

"तुम्हाला माहीतच असेल. परवा आपल्या विभागाच्या आमदार सौ. नर्मदादेवी सावंत इथे येणार आहेत ते!"

----खालच्या अरण्याला चरचरा बोटं फुटल्यागत वाटू लागलं. आकाशात झू ss म कॅमेरा लावून हे अरण्य विस्तृत पसरट, काहीसं, विखूरलेलं, विकृत दिसू लागलं. यापुढचा संवाद फार जागरूक व्हायला हवा असं वाटून गेलं.

"हं! ऐकलंय खरं!"

"त्यांचा मुलगापण बोर्डात आला आहे बरं! पेपरात बातमी आलीय. त्या निमित्ताने त्या इथे दहा हजारांचा भंडारा घालणार आहेत. बाई मोठी बाणेदार, धोरणी बघा!"

“ऐकलंय खरं!”

“तुमचा मुलगापण बोर्डात आला आहे ना?”

“नाही. पण तो स्कॅलर आहे”

“बरं.”

“असं बोर्डात आलेल्या सर्व मुलांच्या पालकांची एक बैठक घेतली जाते. ओळखीपाळखी, सत्कार होतात, वगैरे ऐकलेलं आहे---------”

“असेल. मला कल्पना नाही गुरुजी! मला तरी तसलं आमंत्रण आले नाही, गुरुजी!”

“जेथे तेथे राजकारण येतंच तर?”

“कल्पना नाही.”

“या निमित्ताने नर्मदादेवी दहा हजारांचा भंडारा घालणार आहेत. इथे गुरूमाऊलींचे दर्शन घेणार आहेत.”

“ऐकलंय खरं!”

“पण स्वभाव! आपलं तेच खरं मानणाऱ्या! मी इथला ज्येष्ठ स्वयंसेवक म्हणून हक्कानं बोलू शकतो. त्यांच्या या हट्टी स्वभावाचा अनुभव पत्रकारांना, विरोधकांना येतो हे तुम्ही पेपरात वाचीत असालच!”

“वाचलंय.”

“भंडारा घालणार म्हणाल्या तेव्हां आम्ही त्यांना नम्र विनंती केली की तुम्ही तुमच्या पतीना आणि मुलालाही घेऊन यावे. या गडावरच्या ऋषीचं दर्शन त्यांनाही घडू दे. आशीर्वाद घेऊ दे. तर म्हणे ----नाही!”

“का ----बरं?”

“त्याच जाणोत! तुम्ही त्यांना प्रत्यक्ष पाहीलंत का?”

“तशी गरज वाटली नाही ------”

“बाई एकदम वादळी व्यक्तिमत्व हो! त्यांचा इतिहासही तसाच वादळी. मुलाला गुरुमाऊलींच्या पायाशी आणला असता तर काही बिघडलं असतं का? मी सांगतो बघा. या राजकारण्यांना हृदयच नसतं! भावनाशून्य यंत्रासारखी वागणारी ही जमात आहे. त्यांच्या अतिजवळ भल्यांनी जाऊ नये. पैसा सत्ता, राजकारण डावपेच याची झिंग असावी म्हणा! त्यांचा फॅमिली फोटो कुठे प्रसिध्द झालेला नाही. त्यांनी प्रेसमिडीयाला तशी सक्त तंबी दिलेली आहे!”

“तऱ्हेवाईकपणा केला की लोक कौतुकानं बघतात!”

“अगदी मनातलं बोललात बघा.”

श्रीपाद सावंतला संभाषण, घाट वेगाने उतरणाऱ्या वाह्नासारखं काहीसं भीतीदायक, कडेलोट करणारं वाटू लागलं. हा वृध्द गेले दीड ताप योगी महाराजांच्या सान्निध्यात वावरत आहे. न जाणो, याच्यातही कसला महंतपणा शिरला असला तर?

अंतर्ज्ञानानं आपल्याला पूर्ण ओळखून आपल्या अज्ञानातला आनंद घ्यायचा त्याने ठरवलं असेल तर? गृहस्थ मिश्किलपणे हसले तेव्हां तो सावध झाला.

“स्वामी गुरुजींचे कार्यक्रम वर्षभर अगोदरच ठरविलेले असतात. इथला परवाचा आनंदोत्सव म्हणजे त्यांच्या उपस्थितीत होणारा एकशेआठ दांपत्यांचा होमाचा विधी!”

“बरं झालं. मला हा सोहळा पहाता येईल.”

“परवा गुरुपौर्णिमा. आषाढ शुध्द चौदा. संन्यासिजनांचा चातुर्मास्यारंभ. व्यासपूजा. त्या दिवशी साईबाबा उत्सव आहे. प्रारंभ शिर्डीला आहे. वसंत ऋतुतली उष्णता शिगेला पोचविणारा हा ऋतू आहे. गुरुमाऊलींच्या सान्निध्यात होमाला बसायला पुण्य लागते बरं!”

“असा योग येणं कठीण.”

“आमच्या सौ. नर्मदा देवींच्या अंगात एकदम संचारलं! त्यांनी मला फोनवर सांगितलं की त्यांना मुलाच्या नावाने भंडारा घालायचा आहे. शेकडो भाविकांना महाप्रसाद द्यायचा आहे. त्याचबरोबर स्वामीजींचं दर्शनही घ्यायचं आहे.”

“त्यांनी वेळ बरा काढला!”

“मी त्यांना सांगितलं की तुम्ही गुरुपौर्णिमेला एकशेआठ जोडप्यांच्याबरोबर होमाला बसण्याची संधी घ्यावी. सोबत पतीदेव आणि चिरंजीवाला पण आणावे. या भूमीत तुमचं हार्दिक स्वागत आहे. तुम्ही आल्यावर शोभा येईल! यावर त्यांचं उत्तर काय असावं बरं?”

“काय”

“मी सांगतो श्रीयुत गायकवाड! राज्यकर्त्यांना काहीतरी सनसनाटी करण्याची हुक्की येते. म्हणाल्या, माझा मुलगा आणि पतीदेव येणार नाहीत. कारण विचारू नये! मी एक कुटुंबवत्सल स्त्री आहे. मी एकटीच होमासाठी बसेन. पतीदेवांची उपस्थिती गृहीत धरु या!”

श्रीपाद सावंतची छाती धडधडू लागली. आईची आठवण झाली. अशक्तपणे पुटपुटला,

“कसं शक्य आहे हो! एकतर हा धार्मिक पवित्र विधी आहे. इथे महाराजस्वामींच्या समोर साक्षात जोडप्यानं बसून होमाची पूजा करायची असते. आशीर्वाद घ्यायचा असतो. शिवाय अशी एकदा प्रथा पडली तर उद्या उठसूट कोणीही वजनदार व्यक्ती अनुकरण करू लागेल! हे म्हणजे, थोडसं समाजपरिवर्तन करण्यासारखं झालेलं आहे. शास्त्राला धरुन होणार नाही.”

--- गुरुजींचे डोळे चमकू लागले. म्हणाले,

“अगदी मनातलं बोललात श्रीयुत गायकवाड! पण हे तुम्हाला सुचलं कारण तुम्ही एक सारासार विचार करणारे पण मध्यम स्थितीतले गृहस्थ आहात! तुम्ही कोणी सेलिब्रेटी नाहीत किंवा तुम्हाला कोणत्याही प्रकारे प्रसिध्दीची हाव नाही.”

“पुढं काय झालं?”

“इथला व्यवस्थापक म्हणून मी आमदारबाईंना प्रेमाचा सल्ला दिला. म्हणालो, या धार्मिक स्थळी समाज ज्या उद्देशाने गडावर गुरुमाऊलीचा आशीर्वाद घ्यायला स्वखर्चाने इथे येतो, नियम पाळतो त्याचं उल्लंघन करणं आम्हाला शक्य होणार नाही. क्षमा करा. तुम्ही एकट्याच येणार असाल तर आनंद आहे. या शुभप्रसंगी येणारा भाविकवर्ग मोठा आहे. आम्ही त्याचं वर्गीकरण करणार आहोत. एकशे आठ जोडपी बसतील. त्यांचा एक वर्ग. ज्यांना जोडप्याने बसणं शक्य नाही परंतु भंडारा द्यायचा आहे यांचा दुसरा वर्ग. आणि केवळ इच्छेनुसार दान वर्गणी करणाऱ्यांचा तिसरा. तुम्ही दुसऱ्या वर्गात बसा. तुमचं स्वागत आहे.”

“त्यांना ते पटलं?”

“लगेच पटेल तर त्या आमदारबाई कसल्या हो? म्हणाल्या, मी दहा हजारांचा भंडारा घालीत आहे आणि माझा निरोप तुम्ही महाराजांना कळवा. मी तुम्हाला संध्याकाळी फोन करीन.”

“मग?”

गुरुजी मान हलवीत हसले. म्हणाले,

“मी तुम्हाला मगाचच म्हणालो श्रीयुत गायकवाड. आमचा उदरनिर्वाह आश्रयदात्यांनी सांभाळलेला आहे. हा एक व्यवहार आहे. शिवाय आमदारबाईंचा राजकीय दबदबा. मी इथला एक क्षुल्लक व्यवस्थापक! मी माझं म्हणणं गुरुमाऊलींच्या कानी घातलं आणि ते मंद हसले. त्यांचा निरोप मी बाईंचा फोन पुन्हा आला तेव्हा सांगितला. बाईंनी तो मान्य केला.”

"कसला निरोप?"

"निरोप असा. तुमचं स्वागत आहे. सांगीतल्याप्रमाणे तुम्ही दुसऱ्या वर्गात प्रवेश घ्यावा तुम्ही महत्वाच्या व्यक्ती आहात. त्यामुळे इथे तुमची स्वतंत्र व्यवस्था केली जाईल. तुम्ही गुरुमाऊलींशी एकांतात पंधरा मिनिटे बोलू शकता. परंतु नम्र विनंती. इथे होणारा एकशेआठ जोडप्यांचा सामुदायिक धार्मिक विधी, होमहवन सकाळी बरोबर साडेनऊवाजता सुरु होणार आहे. त्यासाठी एकाग्रता लागणार आहे. तेव्हां तुम्ही याल त्यावेळी तुमच्या आगमनाने इथे धार्मिकविधीसाठी बसलेली माणसं विचलीत होणार नाहीत याची पूर्ण जबाबदारी तुमची असेल! तुमच्याबरोबर येणारी मंडळी, पोलीसफोर्स, फोटोग्राफर्स, पत्रकारवर्ग इत्यादी मंडळींची गर्दी गोंधळ होऊन गडावरची शिस्त भंग होणार नाही याची काळजी घ्यावी. तसं काही घडल्यास गुरुमाऊलींशी आपणास एकांतात बोलण्याची परवानगी मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी!"

श्रीपाद सावंत हसला. आपण जे बोललो तेच गुरुमाऊलीने वेगळया शब्दात सौ. नर्मदादेवीना कळविले याचा सूक्ष्म अभिमान, आनंद वृद्ध गृहस्थांच्या चेहऱ्यावर पसरलेला त्याने पाहिला.

"गुरुजी धन्यवाद. हे अगदी योग्य शब्दात झालं. नाही का? गडावरची शिस्त प्रथम महत्वाची. या राजकारणी लोकांच्या नादी भल्यानं जाऊ नये. वाटेल तसा धुरळा उडवतील. बाई येणार आहेत हे मी पण वाचलं होतं. मला त्याच्याशी कर्तव्य नाही."

"माझा तुमच्यावर विश्वास आहे. माणसाची पारख व्हायला वर्षे लागत नाहीत. ही आतली गोपनीय गोष्ट आहे. तुम्ही बाहेर वाच्यता करणार नाही ना?"

श्रीपाद सावंतनं दीर्घ श्वास घेतला.

"त्याची काळजी नसावी गुरुजी. रात्र झालीय. पहाटे काकडआरतीला उठायचं आहे. चलावं."

गृहस्थ उठू लागले. त्यानं हात दिला. थरथरून परत बसले. बापुडवाणेसे.

"गुरुजी! तुमचं वय झालंय. तुम्हाला मृत्यूची भीती वाटते का?"

------गृहस्थांनी मान वर करून त्याच्याकडे पाहीलं. पुटपुटले,

"या पुढचं वीसपंचवीस वर्षांचं जग कसं असेल ते बघायला मिळणार नाही, यांचं दुःख कोणाला वाटणार नाही बरं."

"कळलं. आपण निघू या."

"जन्ममृत्युपलीकडे गेलेला मी कोणी योगी नव्हे."

"तरीही तुम्ही सुखी आहात!"

"अर्थातच! अर्थातच श्रीयुत गायकवाड!"

ते त्याचा आधार घेऊन नीट उभे राहिले. प्रसन्नसे हसले. त्याच्या खांद्यावर हात ठेवून महाद्वाराकडे चालत राहीले. त्यानं हलकंच विचारलं,

"हे -----नर्मदादेवींचे पती --- काय करतात?"

"कोणा मोठया बँकेत अधिकारी आहेत म्हणे! सुरुवातीला मुंबईला होते. बऱ्याच वर्षांपूर्वी बाईंपासून वेगळे झाल्यावर त्यांनी मुंबई सोडली. बदल्या झाल्या. सध्या खेडला ब्रँच मॅनेजर म्हणून आहेत असं ऐकलंय"

"बरं."

नर्मदा गडावरच्या आश्रमाला भेट देणार. त्याला ते माहीत होते. पंचवीस दिवसांची सुट्टी टाकली. स्वतःला अदृश्य करून, दिगंबर गायकवाड म्हणून गडावर आला. पंधरा दिवसात ' श्रीयुत गायकवाड ' म्हणून संपूर्ण गडावर स्वतःचं ओळखपत्र नक्की केलं. स्वयंसेवकात मिसळून गेला. त्यांच्यातला झाला. गडावरचे वृद्ध गुरुजी त्याच्या मवाळ वागण्यामुळे जवळ आले. मृदू बोलू लागले. इतक्या दिवसात मनात एकच धुकधुक होती. आश्रमाला भेट देणाऱ्या हजारो

भाविकांमध्ये अनपेक्षितपणे कोणी ओळखीचा चेहरा निघून त्यानं,"श्रीपाद सावंत!"म्हणून हाक मारू नये.!

-----असं होऊ नये. प्रार्थना चालली होती.

----श्रीपाद सावंत क्षणभर संभ्रमात पडला. आपण नेमके कोणत्या उद्देशाने इथे आलो आहोत? इथे येण्याचे प्रयोजन काय?

-----इतकी वर्षे आपण संधी शोधत होतो का?

स्वतःला अनोळखी करून या पवित्र परिसरात, स्वयंसेवकात मिसळून काय मिळवलं? स्वामी गुरुमाऊली अंतर्ज्ञानी आहेत. त्यांना आपली खरी ओळख पटलीही असेल! काय मनात म्हणाले असतील? ते योगी आहेत. आपण क्षुद्र मानव. इच्छा, वासना संशयानं पछाडलेले. शोध घ्यायचाय. त्या वृद्धाला सांगीतलं. आपल्याला दुःखाचा शोध घ्यायचाय. आपलं नेमकं दुःख कोणतं? आपला---नर्मदेचा मुलगा----शाम बोर्डात आलेला आहे. नर्मदा परवा आश्रमाला दहा हजारांचा भंडारा देणार आहे. होमासाठी बसणार. गुरुमाऊलींचे जवळून दर्शन घेणार. त्यांच्या डोक्यावर फुलांचा मुकुट घालणार. हार घालणार. फळांची पेटी, पेढे देणार. लाऊडस्पीकरवरून तिच्या नावाचा उदोउदो होणार! महाप्रसाद म्हणून शे पाचशे भाविक पोट भरून जेवणार.

अन्नदाता सुखी भव म्हणणार. पोटात भूक असताना ताटातल्या अन्नाची किंमत कळते. जेवल्यानंतर प्रत्येक जण स्वतःचं ताट धुणार. होमासाठी स्वामी महाराज दर्शन देतील. भक्तगणांसाठी पुन्हा संध्याकाळी दर्शन देतील. लोक तिष्ठत बसतील. सौ. नर्मदादेवी सावंत, या तालुक्याच्या आमदार या दुर्गम गडावर आश्रमात पायधूळ झाडणार! भूमी पावन करणार! सांगता येत नाही. कदाचित हेलीकॉप्टरमधून झूssम कॅमेरा लावून मुंग्यांसारखी गडावर माणसं चढतील त्यांचा क्लोजअप शॉटही घेतील. कोणीतरी वार्ताहर कौतुक शब्दात कॉमेंट्री करील! लोकांचं मानसशास्त्र हा एक स्वतंत्र विषय आहे. इथे एखाद्याला देवपण देणं फार कठीण नाही ००००००

०००० चांदण्यांच्या पार्श्वभूमीवर सगळा परिसर ताजा प्रसन्न वाटत आहे. भाविकांचे शेकडो हात हवेत उंचावले जात आहेत ०० शेतात तुरे हलावेत तसं. आकाशात चिद्घोष चाललेला आहे, आणि आपलं बुजगावणं ताबुजासारखं हवेत फिरवलं जात आहे! ०००० या चमत्कारीक विचारानं थांबला. पाय धुवून अस्वस्थपणे झोपायला गेला.

इतके दिवस ठीक गेले. कोणी ओळखलं नाही. पण आता नर्मदा येणार आहे. आमदारकीचं वलय घेऊन. गर्दीला घेऊन. तिच्या आसपास फिरणारे चिल्लर लोक पुष्कळसे असतील. कोणी सांगावं, त्यातला कोणीएक आपल्याला ओळखीलही. समाजातला, नात्यातला कोणीही. म्हणूनच तो गर्दीपासून लांब काहीतरी गौण काम करीत वेळ काढायचा. मधल्या दहा पंधरा वर्षातलं तिचं घरी येणं एक कुटुंबाचा घटक म्हणून औपचारीक होतं. माफक बोलणं व्हायचं. लाल दिव्यांच्या गाडीतून जाणं व्हायचं. पण आज त्याला नर्मदादेवी सावंतांना राजकारणाच्या वलयात फिरतांना जवळून बघायचं होतं. इच्छेतल्या अनिच्छेनं ००००

## दुसरा दिवस.

पहाटेपासून गडाला जाग आलेली. पहाटे पाचची काकडआरती सुरु झाली. शूचीर्भूत होऊन भक्तगण मंत्रोच्चार करीत अपार श्रद्धेनं गुरुमाऊलींच्या दर्शनासाठी हॉलमध्ये उभे होते. एका बाजूला पुरुष. दुसरीकडे स्त्रीया. मखर सजवलेलं. धूपगंधाचा वास हॉलभर होऊन वातावरण मंत्रावल्यागत झालेलं. तरल. हळुवारपणे तळहातावर घेतल्यासारखं. काहीशी विरक्तीची भावना गंधवासाबरोबर पसरणारी.

स्वयंसेवकाबरोबर श्रीयुत गायकवाड म्हणून तो काउंटवरची स्वामीजींची पुस्तकं, आयुर्वेदिक औषधांच्या बाटल्या, पावत्यांची पुस्तकं वगैरे लावीत होता. सकाळ झाली की माणसं वाढणार होती. सगळयांनी त्याला गृहीत धरलं होतं. हा अबोल माणूस निरुपद्रवी आहे. यानं स्वतःची दुःखं त्याच्याशीच ठेवलेली आहेत. दुपारी उसंत मिळाली तरी झोपत नाही. गुरुमाऊली ध्यानस्थ बसले तर हा दूरवर खडकावर बसून तंद्री लागल्यागत त्यांच्याकडे बघत उनात बसून रहातो. टेलीपथीवरून कदाचित हा आपली दुःखं गुरुमाऊलीशी व्यक्त करीत असेल! सांगता येत नाही. हा माणूस असा. वेगळा वेगळा. अतीथी म्हणून इथं आलेला. मनात येईल तेव्हां गड उतरून तरतरा निघून जाणारा. मुक्त. भटक्या. कलंदर. एकला चलो रे, मानणारा.

स्वामीजींचं आगमन झाल्यावर जल्लोष झाला. शंख वाजू लागला. त्याच्या आवाजानं हॉल भारल्यागत झाला. सोबत टाळ मृदंग नाळ वाजू लागली. तेजोमय झालं. वाद्य संगीत सांभाळणारे स्वयंसेवक तेजस्वी वाटू लागले. त्या दिवसाचा मुख्य भाविक आपल्या पत्नीसह आरती घेऊन उभा होता. सगळया जगाचं कारुण्य चेहऱ्यावर आणून स्वामीजींची आराधना करीत होता. आतून बाहेरून सगळीकडून पवित्र, दीव्य, उदात्त, विस्तृत वाटत होतं. एकजीव झालं होतं. मन वढाळ वढाळ. पण आता या ईश्वराच्या मानवी दर्शनानं भूतकाळ गेला रे गेला, भविष्यात प्रकाश दिसू दे, स्थैर्य येवू दे, मनःशांती मिळू दे, ही माफक इच्छा होती.

पहाटेच्या उजेडात मंद प्रकाशात हॉल काहीसा जांभळा किरमिजी वाटत होता. तबकातल्या आरतीच्या ज्योतींनी मुख्य भाविक आणि त्याच्या बायकोचा चेहरा तुकतुकीत घामट झाला होता. इतका वेळ उभं रहाणं थोडं कठीण झालं होतं. पुरुषाच्या उघड्या मऊ छातीमधून घामाची एक मोठी रेघ सुटलेल्या पोटावरून घरंगळत खालच्या पितांबरात झिरपत होती. कल्पना नाही. या भाविकाच्या मुंबईला दागिन्याच्या दोनचार पेढ्या असू शकतील. आलीशान फ्लॅट्स असू शकतील. एखादी रखेली असेल. इन्कमटॅक्सवाल्यांचा ससेमिरा लागत असेल. काहीही असू शकेल. कल्पना नाही.

आरती झाल्यावर गुरुमाऊली मखर सोडून गेली. सकाळी नऊ वाजता गडाकडे येणाऱ्या भक्तगणांची रीघ लागली. गड चढत असताना मध्येच, वाटेच्या कडेला नारळ, हारतुरे, फुलांचे छोटे स्टॉल्स लावलेले होते. आयुर्वेदिक औषधांची, पुस्तकांची, गुरुमाऊलीच्या फोटोंची, गडाची माहीती सांगणाऱ्या पुस्तिकांची दुकानं होती. चहापाण्याची टपरी होती. लहान मुलांच्या चेहऱ्यावर, आपण कोणत्यातरी जादूमय ठिकाणी जात आहोत ही उत्सुकता होती. पायथ्यापासून वरपर्यंत स्वयंसेवकांची साखळी करून भाविकांची काळजी घेतली जात होती. वृद्धांना हात दिला जात होता. पोलिसांच्या मोटारसायकली गडावरून झुरळांसारख्या दिसत होत्या.

अर्ध्या तासानं मुख्य हॉल भरला. शुभ्र दाढीवाले गृहस्थ हळू हळू हॉलमध्ये आले. सगळ्यांना नम्र नमस्कार करून उभे राहीले. त्यांच्या अंगावर झुळझुळीत भगवा अंगरखा आणि भगवं धोतर होतं. त्यामुळे ते कोवळे दिसत होते. कपाळावर उभं गंध.

त्यांनी गुरुमाऊलींच्या रिकाम्या आसनाला मस्तक टेकून नमस्कार केला. डोळं मिटून नामस्मरण केलं. त्यांचं कृश, मध्यम उंचीचं गव्हाळ व्यक्तिमत्व एकदम बुद्धिमान वाटू लागलं. संपूर्ण हॉल त्यांची प्रत्येक हालचाल बघत स्तब्ध झाला. त्यांनी माईक हातात घेतला. अपार कणवेनं हॉलभर नजर टाकली. डोळं मिटून प्रसन्नपणे हसले. गंभीर आवाजात बोलू लागले,

“इथे आलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषाला, आबाल वृद्धाला, मुलामुलीला, या आश्रमाच्या सेवकाचा मनःपूर्वक नमस्कार. फार लांबून आला आहात. प्रवास केलात. गुरुमाऊलींच्या दर्शनासाठी, श्रद्धेपोटी तुम्ही मंडळी गड चढून इथे आला आहात! धन्य आहे ही भूमी, हा परिसर. जोवर ही श्रद्धा आहे तोवर जीवनात आनंद आहे. माझा नम्र सल्ला आहे. ज्ञानी व्हा. आत्मपरीक्षण करा. दुःख कोणाला नाही हो? आपण सारेच मर्त्य आहोत. दुःखाचे साक्षीदार आहोत. पण प्रत्येकाला अदृश्य सूप्त मन असतं बरं! काम क्रोध मद मत्सर लोभानंतरचं हे मन. याची आपण केव्हां जाण घेतलेली नसते. सृजनशीलता किंवा क्रीएटीव्हीटी हा त्यातला एक भाग. या मनाची रुपं ईश्वरी आहेत बरं!”

समोर बसलेल्या श्रोत्यात थोडी हालचाल झाली. एक तरुण उभा राहीला. गुरुजींना नमस्कार करून त्यानं विचारलं,

“मी आपल्याला काही विचारू शकतो का?”

“अर्थात! अर्थातच! बोला!”

“ईश्वर आई वडिलांच्या रुपात असेल तर तो मला मान्य आहे. पण हा समज ढोबळ आहे. प्रजोत्पादन ही नैसर्गिक प्रक्रीया असल्यामुळे त्यातला आनंद आणि नंतर मातृत्व पितृत्वाचं येणारं उदात्तीकरण ही आपली हिंदू संस्कृती आहे. आनंद, हे सत्य आहे! तेव्हां, ईश्वर हा त्यापेक्षाही वेगळा चमत्कार असेल तर मला सांगावा गुरुजी!”

गुरुजी मंद हसले,

“ईश्वर असलाच तर तो दिसत का नाही हेच तुम्हाला जाणून घ्यायचं आहे ना?”

“होय”

“मन आहे का?”

"मन म्हणजे ------ विचार, असं मी समजतो गुरुजी."

"तुमचा समज अगदी खरा आहे बरं! पण हा विचार कुठून येतो?"

"माणसाच्या मेंदूतून ना?"

"छान. मग जेव्हां एखादा न्यूरोसर्जन मेंदूचं ऑपरेशन करतो तेव्हां त्याला मेंदूमध्ये मन सापडायला हवं नाही का?

---- तरुण निरुत्तर होऊन बसला. गुरुजी हसून म्हणाले, मन लक्ष कोटी योजने जातं बरं! अगदी चंद्र सूर्यावर पण भ्रमण करतं. मेंदू आपला मनुष्याच्या कवटीत सुरक्षित असतो! म्हणजेच, कृष्णाची इवलीशी मूर्ती म्हणजे प्रत्यक्ष ईश्वर नसून आपलं मन एकत्रित करण्याचं ते एक साधन आहे. श्रद्धेनं चंचल मन एकरूप झालं की तिथे ईश्वरशक्ती उभी असते सज्जनहो!"

"गुरुजी, मी इथे उत्सुकतेपोटी आलो आहे. माझे प्रश्न इथल्या भाविकांना कदाचित आवडणार नाहीत. कृपा करून गैरसमज नसावा."

"तुमच्या मनातल्या शंका खुशाल विचाराव्यात बरं! माझ्या बुद्धीनुसार मी उत्तर देईन. तुम्ही फार सौजन्यानं बोलत आहात. विनम्रता हा पण ईश्वरी गुणच नव्हे का?"

"मी इथे दाखवीत असलेली जनसमुदायासमोरची विनम्रता हे माझं ढोंगही असू शकेल!"

"शक्यता नाकारता येत नाही. पण तुम्ही स्वतःला केव्हाच फसवू शकत नाही, बरं का?"

"हो. पण मला ईश्वर दृष्य स्वरूपात कसा दिसेल?"

"आज तुम्ही या गडावर त्याच्याच दर्शनासाठी आला आहात!"

------- तरुण नुसताच बसून राहीला. खूप समजल्यागत मान हलवून गृहस्थ स्मित करून बोलले,

“तुम्ही ज्ञानी आहात. माझं उत्तर एवढंच. ईश्वर ज्याला ज्या प्रमाणात हवा असतो तेवढयाच प्रमाणात त्याला मिळतो.”

-------- मग गुरुजींनी छानसं बोलायला सुरुवात केली ००००

दुपारी स्वामींचं दर्शन घेण्यासाठी भक्तगणांची रांग लागली. स्वामी प्रत्येकाने दिलेली भेट स्वीकारीत. समोरच्या तबकात ठेवलेले एखादे फूल, फळ, देत, डोक्यावर हात ठेवीत. कुंडीत ठेवलेली एक भस्माची पुडी देत. काहीजण त्यांच्याशी हट्टानं बसून बोलायचा प्रयत्न करीत. स्वामी शांतपणे ऐकून घेत. एखाद दुसऱ्या शब्दानं उत्तर देत. जमिनीवर बोटं फिरवून कुंडलीसारखी आकृती काढून दिशा दाखवीत. स्वामींनी आपल्या डोळयात पाहिलं, स्पर्श केला, आपलं ऐकलं, दिशा दाखवली, प्रसाद स्वहस्ते दिला, उत्तर दिलं, या कृतकृत्य भावनेनं भाविक तृप्त होत. आयुष्यातलं बरचसं काही मिळालं म्हणून पिसासारखे हलके होत ०००

श्रीपाद सावंत आश्रमाच्या बाहेर आला. दुपारच्या उनात खालचा निसर्ग उसळून वर यायला बघत होता. गडावर थराथरानं उंच होत गेलेली झाडं, मोठाल्या शिळा, तयार केलेली पायवाट, आणि सर्वात खाली विस्तीर्ण पसरलेला परिसर. ऊष्ण ऊष्ण वाटत होतं. इथल्या रचनेचा, दैनंदिन व्यवहारांचा, तेचतेचपणाचा आणि रोज तीच बौद्धिक डोसांची भाषणं देणाऱ्या गुरुजींचं त्याला नवल वाटलं. अठरा वर्षे हा गृहस्थ या गडावर स्वामींबरोबर, परिसराबरोबर फिरत आहे आणि आनंदी आहे. स्वतःचे विचार इतरांवर आदळीत आहे. लोक त्याच्याही पाया पडतात तेव्हां सूप्त समाधान घेत आहे. ग्रेट! तब्बल अठरा वर्षे हे जमून गेलेलं आहे.

उद्यां आमदार सौ. नर्मदादेवी सावंत या गडावर येणार आहेत. आज, आता हातात कापडी फलक बांबू घेऊन बाईंच्या पार्टीचे कार्यकर्ते इकडंतिकडं फिरत होते. योग्य जागा शोधत होते. काही ठिकाणी फलक काठ्यांवर उभं करण्याचं काम चालू होतं.

मोठाल्या फलकावर बाईंच्या पक्षाचं चिन्ह, पक्षाची धोरणं आणि बाईंचा मंद स्मित दाखवणारा भव्य ठळक बोलका चेहरा दिसत होता. प्रत्येक फलकावर वाऱ्याबरोबर फडफडत होता. बाई सरळ बघत होत्या. त्यामुळे आपण कोणत्याही बाजूला फिरलो तरी त्यांची डोळस नजर आपल्यावर लागलेली आहे आणि त्या गालात हसत आहेत असं श्रीपाद सावंतला वाटू लागलं. अस्वस्थल्यागत झालं.

आपली खरी ओळख होणार नाही याची काळजी घेत तो गड उतरू लागला. कोणी त्याच्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही. कोण कुठला श्रीयुत दिगंबर गायकवाड उर्फ श्रीपाद सावंत! गर्दीतला एक. किस पेड की पत्ती! तृण. कीटक! आमदार सौ. नर्मदादेवी सावंत या नावात चिरडून नाहीसा, नष्ट झालेला! त्याच्या बेपत्ता नावाची बाईंना खिजगणतीही नव्हती. गरज नव्हती. सौ. नर्मदादेवींच्या मुलाने, शामने बोर्डात नाव कमावले आहे. म्हणून बाई दहा हजारांचा भंडारा उद्या गुरुपौर्णिमेला गडावर देणार आहेत! स्वामींचे दर्शन घेणार आहेत. त्यांच्याशी एकांतात काही वेळ बोलणार आहेत. धन्य धन्य! बाई मोठ्या धीराच्या. त्यांच्यातर्फे पार्टीचा जयजयकार असो! बाई तेज. कर्तुत्ववान. गेल्या दहापंधरा वर्षात त्यांनी कामाचा वेग झपाटा असा दाखवला की भल्याभल्या राजकारण्यांनी तोंडात बोटं घालावीत. विरुद्ध पक्षांनी त्यांना स्वतःकडे खेचण्यासाठी जंग जंग पछाडले. आमीषं दाखवली. धमक्याही दिल्या. पण बाई खंबीर. त्यांचं कर्तृत्वच मुळात एका समाजकंटकाला लाथेखाली तुडवण्यात सुरु झालेलं आहे. त्यांचं व्यक्तिमत्व ठोस. नजर धारदार. शब्द झोंबरे. वक्तृत्व मस्तकात झिणझिण्या आणणारं. स्त्रीवर्गाचा त्यांना राज्यभरातून पाठींबा. ही स्त्री बंडखोर आहे.

स्त्रीचं नेमकं दुःख, वेदनेवर बोट ठेवून पुरुषवृत्तीच्या माजोरीपणावर शस्त्र उगारणारी ही उग्र बाई आहे. ज्येष्ठ राजकारणी तिला ' धडपडणारी मुलगी ' म्हणून तिच्या ओलसर घामट पाठीवरून प्रेमानं हात फिरवतात. ती दौऱ्यावर असताना सिक्यूरिटी अरेंजमेंट करावी लागते. बाईंच्या गेल्या पंधरा वर्षांच्या राजकीय कारकीर्दीत त्यांच्यावर दोनदा प्राणघातक हल्ला झालेला

आहे. एकदा त्या उतरल्याबरोबर वाहनाचा स्फोट झाला. दुसऱ्यांदा, पोलीसांची साखळी तोडून त्या गर्दीत मिसळल्या तेव्हां त्यांच्या दिशेनं एका चकचकीत चाकूचा वार झाला. वार दुसऱ्या शेजारच्या अंगरक्षकाला लागला आणि बाई वाचल्या! बाई अशी वादळी. झंझावाती. जे जे करील ते कौस्तुकास्पद ठरविणारी. विरोधकांना आणि पुरुषांना जगणं मुष्कील करून टाकणारी. विरोधकांचं म्हणणं, या बाईला पेपरांनी फाजील प्रसिद्धी देवून डोक्यावर चढवून ठेवलेलं आहे. जळफळाट करण्याइतकं. कोणा एका संपादकानं तिच्या चारित्र्याविषयी सूचक शंका घेतली तेव्हां त्याच्या ऑफिसमध्ये जाऊन सर्वांसमक्ष फाडफाडफाडफाड थोबाडणारी. सौ. नर्मदादेवी सावंत हवीशी आणि नकोशीही झालेली आहे. असह्य वाटत आहे. तिच्याशिवाय बरचसं काही काही ठप्प ठरणार आहे. हेही कळत आहे. सुसरबाई तुझी पाठ मऊ म्हणून तिच्याकडून कामे करून घेणं, हा धोरणीपणा समजला जात आहे. झेड सिक्यूरिटी नको नको असं त्या ओरडून सांगीत असल्या तरी रुलिंग पार्टीला ती न देणं म्हणजे विस्तवाशी खेळ वाटत आहे. अशी ही जबराट बाई. तीव्र. जमिनीतून भक्कन वर आलेली. मग तिखट झालेली.

----हे सारं रंजित, कौतुकमिश्रीत सनसनाटी ऐकण्याची सवय श्रीपाद सावंतला गेली पंधरा वर्षापासूनची आहे. परंतु त्यानं ऑफिसमध्ये सक्त ताकीद दिलीय. त्याच्या खाजगी जीवनाविषयी एका शब्दानेही विचारलेलं त्याला खपायचं नाही. नो नॉन्सेन्स प्लीज!

शामला शाळेत या गोष्टींचा काही वेळा त्रास होतो. श्रीपाद सावंतला हे कळलं. शाळेच्या मुख्याध्यापकांकडे जाऊन त्याने मृदू शब्दात पण रोखून बघत म्हटलं ००० माझ्या मुलाचं कोवळं वय बघा. त्याची हुशारी बघा. त्याच्या फीमध्ये कुठे कमतरता आहे का सांगा. त्याची वर्तणूक बघा. तरीही, त्याला मानसिक त्रास होईल अशी मित्रांची बोलणी, शाळेच्या स्टाफची बोलणी त्याच्या कानावर जाणार नाहीत याची काळजी घ्या! त्याची आई कोण आहे हे तुम्हाला सांगायची गरज नाही. मुलाचे आईवडील एकमेकांपासून दूर असतील तर तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. काही तत्वे असतील. तेव्हां, तुमच्या संस्थेचं भलंबुरं करणं सर्वस्वी तुमच्या हाती आहे सर! मुलगा

ऐकत नाही. त्याच्या आईवडीलांचं त्याच्यावर बारीक लक्ष आहे याची कृपया नोंद घ्यावी धन्यवाद!

---- शाळांना तेवढं पुरेसं होतं पण आपण जे बोललो त्यात नर्मदेचंच वर्चस्व सांगावं लागलं आणि त्याचा परिणाम झाला याची रुखरुख त्याच्या मनात लागून राहीली ०००

गडाच्या पायथ्याशी आल्यावर त्यानं वर पाहीलं. पांढऱ्या कपड्यातले भक्तगण गडावर स्वार करणाऱ्या सैनिकांसारखे दिसत होते. पायथ्याशी झाडांच्या झावळयांच्या आडोशाला चहापाण्याचं एक छोटसं हॉटेल होतं. त्यानं सिगरेट पेटवली. निघाला. पायाशी सावली लडबडत होती.

बाझवे, आता आपण इथले दोन दिवसांचे पाहुणे आहोत. इथलं प्रशस्तीपत्रक घेऊन भिंतीवर चिकटवायचं नाही. कोणी एकानं, श्रीयुत गायकवाड सिगरेट ओढीत हॉटेलात चहा पीत होते म्हणून वर गडावर चुगली केली तर आकाश कोसळणार नव्हतं. नर्मदा गेली की इथला प्रवास संपला.

लाकडी फळयांनी उभारलेल्या हॉटेलच्या बाहेर मातीतच अंगणासारखी लहान जागा होती. त्यात दोन बाकडी आणि लाकडी खुर्च्या होत्या. वायरलेसमधून आलेले पोलीस शिपायी खुर्च्या अडवून कांदाभजी, चहा, सिगरेटी, ओढीत गप्पा मारीत होते. मधूनच ख्या ख्या ख्या खिंकाळत होते. हे हसणं पोटातून आलेलं. तीस पस्तीशीच्या तरुण पुरुषांचं खिंकाळणं. विषय गरमागरम असणार. नटनट्या, कुंटणखाने, बारबाला किंवा असंच काहीतरी. अंदाज घेत श्रीपाद सावंत शेजारच्या जवळच्या खुर्चीत बसला. कांदाभजी चहाची ऑर्डर दिली. पोलीसांच्या चौकटीकडे न बघता नुसता कान लावून बसला. शब्द कानावर आदळत राहीले ००० मातीत खुर्ची रुतत आहेसं वाटू लागलं ००० चारी दिशा लोक हेच बोलत आहेत का, कळत नव्हतं.

“ही देवाची भूमी हाय साल्यांनो! सकाळी सकाळीच जरा चांगली भाषा बोला की!”

"घ्या मजा! आपली पोलीसची नोकरी. सारखी हुंगत वास काढीत फिरणारी ------"

"उद्या आणखी पोलीसफोर्स येईल. च्यायला, हे व्ही. आय. पी. लोक येणार म्हटलं की पोलीसांच्या झोपेचं खोबरं! इनिस्पेक्टर दिवाडकर साहेब तर बाईचा जाम राग करतो बघा. एकतर बाईमाणूस. त्यात पोलीस हपिसरांवर जाम खार खाते. सगळया पब्लिकसमोर त्यांना फोदलवते! कुठल्या बाप्याला हे आवडेल? एकतर तिला सोत्ताची बिल्कुल काळजी नाही. जनतेची --------"

"गव्हर्मेंटनं चढवून ठेवलीय तुज्यायला!"

"पण तिला पब्लिकचा पाठींबा जबरी आहे हां! तशी ती सोशल वर्कर म्हणून राज्यात एक नंबरी है बघा. प्रश्नच नाही. बाई तशी हुशारच. स्वतःचं समाधान झाल्याबिगर हातचं काम सोडणार नै! जरा चालबाजी तिच्या लक्षात आली की अपोझिट पार्टीची शंभरी भरलीच म्हणा. तिचं भविष्य उज्वल है. खासदारकी लांब नै!"

"आपला काशिनाथ काय म्हणतोय?"

"आता कसं बोललास!"

एकानं इकडं तिकडं पाहीलं आणि सगळयांच्या कानात कुजबुजला तसा ठो ठो ठो हास्याचा फवारा उडाला. एकमेकाना टाळया दिल्या गेल्या.

"कायच्याबाय बोलतोय साला------"

"आपल्याला पटत नाय यार!"

"न पटणाऱ्या खूप गोष्टी घडत असतात बाबा!"

"काशीनाथनं स्वतः सांगीतलं? चार पेग पोटात गेल्यावर भकला असेल!"

“नाही यार! शुद्धीत असतानाच बोललाय तो!”

“बाईच्या कानावर यातलं काही गेलंच ना, तर ती त्याला डिसमिस करील नी आपल्याला सस्पेंड!”

“बाई डेंजरस आहे हे काशीनाथला सांगा.”

“अशावेळी कुठला पुरुष उद्याचा विचार करतो का भडव्यांनो? फुकटात अडतीस, तीस, चाळीस बदकासारखं गुबगुबीत---------”

“ए गप! कोणी ऐकेल तर?”

“नुसत्या अफवा. पुरावा आहे का या गोष्टीला?”

“अशा गोष्टीचा पुरावा ठेवतो का कोणी? आणि राजकारण म्हणजे तरी काय हो? माणसानं एकटं तरी किती रहावं?”

“दिवसाचे अठरा तास काम करते म्हंतात! मग कधीतरी मनाला विरंगुळा नको? शिवाय बॉडीगार्ड म्हणून काशीनाथ सूर्वे सारखा आसपास असणारच की!”

“हाः हाः हाः हाः!!”

------श्रीपाद सावंत तटकन उठला. क्षणभर त्याच्या अंगात रक्ताच्या चिळकांड्या सैरभैर फिरल्या. आपण कोण, हे या चेकाळलेल्या पोलिसांना सांगून त्यांचे बकलनंबर्स लिहून घ्यावेत. एकतर ते घाबरून चळचळा मुततील, नाहीतर निर्लज्जपणे विचारतील,

“बायकोला कडीकुलुपात का ठेवली नाहीस रे? अंगात पॉवर असती तर ठेवायची! आता ती पब्लीक फिगर झालीय. कळलं? तिला तिच्या पॉवरची नशा चढलीय. तब्येतीनं पण समाधानी वाटतेय. निदान चेहऱ्यावर तरी बेपर्वा वाटते. नुसती समाजसेवा समाजसेवा आणि समाजसेवा!

रात्रंदिन देहभान विसरून काम करतेय. आपल्या फिगरवर पुरुषी डोळे झोंबतात, याचं सुख ती घेत असेल तर ती काय तुम्हाला टेलीफोन करून सांगणार आहे का? शेवटी माणूसच ना? त्यात स्त्री! स्त्रीविषयी हजारो वर्षांपासून विद्वानानी काय लिहून ठेवलंय सावंतराव? यासाठी बायको अति शिकलेली करायची नसते. आम्ही आमच्या बायका नाही का खुराड्यात ठेवल्यात? काय तोंड वर करून ओळख दाखवताय राव! आता निघा की! येड्याचा बाजार!"०००००

----त्याला वाटलं की गडावर आता चढून जाण्यात काही अर्थ नाही. कपड्यांची बॅग राहीलेय. ती मरू दे. नर्मदेविषयी बातमी चोवीसतास पुढे आलेली आहे. ज्याच्या त्याच्या तोंडी आहे. ते सत्य आहे. कोणाकोणाची तोंडं धरणार? उद्या गुरुपौर्णिमा ०० ती स्वतः इथे येणार. तिच्याभोवती पार्टीवाल्यांचा, पोलीसांचा, सामान्यांचा गराडा असणार. नुसती आमदार असली तरी तिचं जनमनात वजन वाढलेलं दिसतयं ०० अगदी जनतेच्या मनातच बसलीय!

तरीही गड चढला. इतके दिवस झाडू मारली. त्यामागचा हेतू तरी साध्य होऊ दे! प्रारब्ध चुकलेलं नाही. पोलीसांची भाषा हे जनमत आहे. विधीलिखित बदलणार नाही. गेल्या पंधरा वर्षांत नर्मदा शामला भेटायला त्याच्या प्रत्येक वाढदिवशी येते. त्याला खाऊ देते. भेटी देते. आपल्या म्हाताऱ्या आईबरोबर रहाते. माफक बोलते. सुरुवातीची काही वर्षे तिला दिवसापुरता तरी एकांत मिळायचा. पुढे पुढे तोही बंद झाला.

कारण घराबाहेर पडल्यावर ती एक स्वतंत्र स्त्री झाली. ' मला स्वातंत्र्य हवंय! ' म्हणून एकेकाळी तिनं ते ओरबाडून घेतलेलं आहे. आयुष्याला वेगळा मोड मिळाला. तिनं तो वळवला!

हे कसं अचानक कसं घडलं? हे राशीचक्र आहे का? मेष राशीची स्त्री टक्कर देणारी असते. दीड तपात तिनं चमत्कार केले. खरंतर तिला एक साधं सुखवस्तू मध्यमवर्गीय जीवन हवं होतं. तिच्या आयुष्यात उलथापालथ आपण केली. एका मुलाला जन्म देवून तिनं मातृत्व सिद्ध केलेलं आहे. आता ती आपल्यापुढं योजने गेली आहे. दुसऱ्या दिवशी ती निघून गेल्यावर आपणही

निघणार. कोणाला सांगायचं नाही. वृद्ध गृहस्थानाही नाही. जो स्नेहसंबंध जोडला तों त्यांना स्वाभाविक वाटला तरी जाणीवपूर्वक होता. कोणाएका श्रीयुत दिगंबर गायकवाडशी. आपल्याशी नाही ००० लॉस ऑफ आयडेंटिटी ०००००

------आमदार बाई येत आहेत. गडावर वेगळी हालचाल दिसू लागणार. गडाचा पायथा पोलीसांच्या वाहनांनी भरणार. प्लेन कपड्यातले बळकट तेलकट पोलीस चकचकीत नजरांनी भाविकांबरोबर फिरणार. कानाला मोबाईल्स लावणार. त्यांची ताठर हालचाल त्यांच्यातला पोलीस लपवू शकणार नाही. मग राजकारण्यांचा ताफा. गडावरील वरीष्ठांची धावपळ. खालपर्यंत जाऊन नव्वद अंशात वाकलेलं स्वागत. डोक्यावर धरलेली छत्री. कमांडोंचा फेरा. पुढं केलेलं थंड पेय. बसायला खुर्ची. जवळपास फॅमिली डॉक्टर । फोटोग्राफर्स. शेजारी गुप्तपोलीस. स्त्री ऑफिसर्स. बाई लाख मोलाच्या आहेत हो!

------आणि बॉडीगार्ड काशीनाथ सुर्वे!

-----सारखा सावलीसारखा वावरणारा.

उंच. तगडा. देखणा नाही, पण रोबस. त्याची अल्सेशियन कुत्र्यासारखी नजर. कमांडो. शूटर. प्रसंगी पाच पुरुषांना भारी पडण्याची बॉडी लँग्वेज. चित्यासारखी चपळ. इतका एकरूप वाटावं, तो नसेल तर सौ. नर्मदाबाईंची सावलीच निघून जाईल!

तरीही दोघांच्याही चेहऱ्यावर आपापलं कर्तव्य प्रामाणिक रहाणार आहे. गेली पंधरा वर्षे आपण खूप जागरूकपणे पेपरामधल्या बातम्या, टी. व्ही. न्यूज, मासिकं इ. इ. वाचीत आहोत. एखादा कीटक आपल्या तंद्रीत एकाग्रपणे पान कुरतडीत रहातो, तसे. या जागरुकतेत थोडासा न्यूनगंड, बराचसा घुमसणारा राग अपयशाची भावना आणि संशय! काहीच सापडलं नाही तर काल्पनिक रंजीत कथानक करायची थोडीशी विकृती लागलेली आहे का? ही विकृती पांढरपेशी, स्वतःला वर्षानुवर्षे कुरवाळणारी ०००० मास्टर बेटींग ००००

----यात, आपला अंकुर पाणीदार निपजलाय ही एकच जमेची बाजू. तो स्वच्छ नाव लिहीतो. शामकांत श्रीपाद सावंत. बरं वाटलं. त्याची आई नर्मदाबाई येतात. त्याला भेटतात. माफक बोलतात. त्यांची नजर घरभर भिरभिरते. काही हवं नको तर निःसंकोचपणे सांगा, असं आवर्जून सांगतात. आपल्याकडे बघून मंद स्मित करतात. ' कसे आहात? ' विचारतात. शामला पोटाशी घेतात. अभंगच आहे---- घार हिंडते आकाशी, चित्त तिचे पिलांपाशी ०००० झाड आपलं उंच वाढलंय पण बसायला सावली नाही.

उडालेली धूळ बसल्यावर पलीकडचं दिसू लागतं. बाईविषयी संशयास्पद वाचलेलं कुठं आठवत नाही. छापीलच कोण हो? दुसऱ्या दिवशी त्याचं कानफट फुटतं! पण मग हॉटेलात ते रिकामटेकडे पोलीस पुसट मोजमापपट्टी घेऊन खिंकाळत का होते?

हा काशीनाथ सुर्वे कोण?

कोण?

कोण?

टेनिसच्या चेंडूसारखा हा प्रश्न सारखा आपटून परतत आहे. ' बॉडीगार्ड ' नावाचा केव्हीन कोस्लरचा तुफान गाजलेला इंग्रजी चित्रपट आपण पाहीलाय ००

ही पाश्चात्यांची मातीच वेगळी. चोवीस तास ओपियम घेतल्यासारखी. त्यांच्या आयुष्यात सारांश लवकर येतो. आपली माती दोन बोटात चिकटणारी. बांडगुळी.

हा कोणी काशीनाथ सुर्वे आपल्याला छळ छळ छळतो आहे. जीव द्यावासा वाटतो. पशुपक्षांना आपलं मरण अगोदर कळतं म्हणे. घार चोचीनं माती उकरते. मानवी स्पर्श झालेल्या कावळयाला त्याची जमात चोची मारून ठार करते. जन्म देवून मांजर पिल्लांना मटकावते. मादीवरून नरात भांडणं होतात. पण ती मोकळया आभाळाखाली. खुल्लंखुल्ला. जिंकणारा नर

अंगावर घ्यायला माद्या उत्सुक असतात. वर्षातला ठराविक काळच त्यांना हे आक्रमण पछाडतं पण मानवाचं तसं नाही. वर्षातले बारा महिने पुरुषाच्या मेंदूत एक कुत्रा सूप्तावस्थेत सतत फिरत असतो. हे पिशाच्च सतत भटकत असतं आणि त्याला शांती नसते. आम्हा मानवासारखे इतर प्राणी संशयानं पछाडले जात नाहीत. एकमेकाला रक्तबंबाळ करून मोकळे होतात. आभाळ लगेच स्वच्छ करतात.

------त्यांच्यात झुरणारा देवदास नसतो.

------आत्महत्त्या करायला गुरुदत्त नसतो..

------माणूस विचार करतो ही पीडाच आहे!

केशवसुतांच्या ओळी आठवतात,

“मृत आशांच्या चितावरुनिया,

पिशाच्च माझे भटकत राहे

शांती नसेची तया”

गडावरची व्यवस्था लक्षणीय. नर्मदाबाईंचे फलक होतेच. पण त्याच्याही अगोदर गुरुमाऊली महाराजांचा प्रसन्न मुद्रेचा मोठा फलक आणि गुरुपौर्णिमेच्या दिवशी एकशेआठ जोडप्यांचा होणारा होमसमारंभ याची जाहीरात गडावर, शहरात, पेपरात झळकत होती. विखूरली होती.

मंत्र सुरु झाले. होमाभोवती बसलेले पाच ब्राम्हण एका पाठोपाठ मंत्र म्हणू लागले. जोडप्यांना वेळोवेळी सूचना देवू लागले. जोडप्यांच्या रांगामधून स्वयंसेवक हॉलमध्ये फेऱ्या घालू लागले. तूप, समीधा, धूप उदबत्तीचा पुरवठा करू लागले. एखाद्या जोडप्याला ब्राम्हणांचे आदेश पटकन कळले नाहीत तर त्यांना स्वयंसेवक मार्गदर्शन करू लागले. जोडप्यातल्या पुरुषांनी पांढराशुभ्र झब्बा, लेंगा टोपी आणि स्त्रीयांनी हिरवा शालू, नथ दागीने घातलेले. मंत्रोच्चारात केलेल्या सूचनेनुसार हालचाली करणाऱ्या पुरुषांच्या टोप्यांची सामुदायीक हालचाल पांढऱ्याशुभ्र कापसाच्या बोंडांनी वाऱ्याच्या झोताबरोबर डुलल्यासारखी वाटत होती.

मुख्य होमासाठी स्वामीमहाराज प्रत्यक्ष त्यांचे तेजस्वी दर्शन भक्तगणांसाठी देणार होते. एकवीसाव्या शतकातला हा योगी. तपस्वी. त्याने स्वतःचा इतिहास केलेला. लहानपणी विरक्ती घेतलेली. हिमालयातून निघून संपूर्ण भारतखंडात भ्रमंती केलेली. जीवन जनकल्याणार्थ समर्पित केलेलं. विन्ध्य आणि सह्यपर्वताच्या सान्निध्यात जलसाधना आणि घोर तपश्चर्या केलेली. प्रत्येक भाविकाच्या हृदयात घर बसवलेली ही विभूती. चमत्कार. श्री. त्र्यंबकेश्वराशी याने तप केलेला. या शिवभूमीत दर बारा वर्षांनी कुंभमेळा होतो. त्रिनेत्री अशा या त्र्यम्बकेश्वराचे भव्य मंदिर हेमाडपंथी असून यावर देखणं कोरीवकाम केलेलं आहे.

गुरुमाऊलींविषयी आख्यायिका दाही दिशा पसरलेल्या. साईबाबांप्रमाणे त्यांनीही तीन वेळा कायापालट केलेला आहे. अशा तेजस्वी मुनीचं आज आपण सपत्निक दर्शन घेत आहोत! विराट वाटत आहे.

शिवाय आज शुभदिन आहे. एरव्ही टी. व्ही. वर दिसणाऱ्या सौ. नर्मदादेवी सावंत आमदार आज स्वतः गुरुमाऊलींच्या दर्शनाला येत आहेत! आपणात मिसळणार आहेत. आज हे धर्मराजकारणाचं एकत्र दर्शन होत आहे! गडावर वर्दळ वाढलेली. श्रद्धा आणि उत्सुकता समुद्रासारखी झालेली. स्वामीजींचं पवित्र दर्शन, आशीर्वाद आणि नर्मदादेवींना जवळून बघण्याची संधी! झाडं, फुलं, वेली, पक्षी, सारा निसर्ग तरारल्यागत होऊन प्रतीक्षा करीत होता.

श्रीपाद सावंत स्वयंसेवकांच्या गर्दीत उभा होता. पायऱ्यांच्या दोन्ही बाजूना पुष्कळशी माणसं कुतुहलानं उभी होती. भगवी साडी ब्लाऊज घातलेल्या आमदार नर्मदादेवी सावंत गडाची चढण सावकाशपणे चढत होत्या.

कपाळावर सोनेरी थंड गॉगल. सोबत त्यांच्या डोक्यावर छत्री धरलेली एक पोलीस अधिकारी. नर्मदादेवींशी घसट असल्यागत हसत बोलत होती. इतर चाहते ठराविक अंतरावरून पुढं मागं चालत होते. अंबारीच्या आसपास कुत्री मांजरं चालावीत तसे. चेहऱ्यावर अप्रूप. तरीही गुरुमाऊलींच्या आदेशानुसार इथे कमालीची शिस्त होती. गर्दीला कुजबूज, पण इस्त्रीसाठी शर्ट ताणावं तशी शिस्त.

श्रीपाद सावंत उत्सुक झाला. गेल्या पंधरा वर्षात नर्मदेला अशी दुरून पहाण्याची उर्मी आली नव्हती. गरज नव्हती. कोण समजते स्वतःला? पेपरांना तिचं कोण कौतुक! तिचे वेगवेगळे मूडस् टिपण्यासाठी पेपरांची चुरस लागायची. बाई रोबस. उद्दाम. काही जणांनी तिची कात्रणं कपाटात ठेवली असतील! पुरुषांचा काही नेम नाही.

पुरुषांची गढूळ नजर, हा संशोधनाचा विषय आहे. बहुतांशी फोटोग्राफर्स पुरुषवर्ग. त्यामुळे गढूळ नजरेची गरज त्यांना भावलेली. त्यामुळे स्पोर्ट्समध्ये भाग घेणाऱ्या स्त्री खेळाडूंचे नेमके कोणत्या अँगल्सचे फोटो तमाम जनतेला आवडतील हे प्रेसवाल्यांना ठोस कळालेलं असतं. त्या दृष्टीने दुसऱ्या दिवशी आंबटशौकी नजरांसाठी पेपरांच्या शेवटच्या पानांवर फोटो प्रसिद्ध होत असतात ००

सौ. नर्मदादेवी सावंत यांची देहबोली, सदा घामानं ओलं असलेलं ब्लाऊज आणि प्रौढपणातली जपून ठेवलेली सुडौल शरीरसंपदा हा फोटोग्राफी डिपार्टमेंट्सचा चवीचा विषय होता.

आणि हा विषय युनिव्हर्सल होता.

श्रीपाद सावंतला कशाचीच तक्रार नव्हती. आता वय वर्षे पंचेचाळीस. ऐन पंचविशीत, अतिरेक होऊनही शरीर तयारच राहिल्याचा अनुभव. उपसा असा नाहीच. उपलब्धतेला अंत नव्हता. नर्मदेनं स्त्रीत्व, मातृत्व सिद्ध केलं. वंशाला दिवा देवूनच घराबाहेर पडली. पुढे श्रीपाद सावंतचा वाळवंटी प्रदेश सुरु झाला. या प्रदेशात अस्वस्थ मार्गांनी पायपीट झाली.

-----पुढची पंधरा वर्षे त्याच्या शरीररचनेचं काय झालं? पुढची पंधरा वर्षे सौ. नर्मदादेवीच्या शरीररचनेचं काय झालं?

निवृत्तीनंतर गुरुजींनी पुढची अठरा वर्षे गुरुमाऊलींच्या या आश्रमात आश्रय घेतलाय. भक्तगण ज्येष्ठ संयोजक म्हणून त्यांच्याही पाया पडतात तेव्हां देवपण मिळाल्याचा सूक्ष्म आनंद घेतात. त्यांच्या शरीररचनेचं काय झालं?

साठीनंतर मनुष्य एकदम संत होऊ शकतो का? असलं महात्म्य आपल्याला पेलवेल का? गुरुजी या वयातही म्हणताहेत की द्रव्य जीवनाची गरज आहे. मग त्यांच्या विरक्तीपणाचा, भाषणबाजीचा ढोंगीपणा नाही का? गुरुजींच्या मनात वासना येतच नसतील, हे पटणारं गणित नाही! प्रश्न आणि प्रश्नच! डिस्टर्बिंग. अब्जावधी माणसांच्या दुनियेत आपली तळ नसलेली घुसमट होत आहे ००

आपले विचार इतके परिपक्व असूनही एका व्यक्तीवरच लक्ष ठेवण्याची विकृती आपल्याला का लागावी? इतकी वर्षे सरली. आता त्या व्यक्तीच्या हालचाली मोजण्याचं प्रयोजन काय? आपलं जगणं एक फिजूल गोष्ट झाली आहे. आपण आत्महत्त्या केलीच तर पंजात वरच्यावर

पिलाला उचलून सुरक्षित फांदीवर नेऊन ठेवणारी आपल्या शामची आई खंबीर आहे लहान मुलाला नेहमी कोणीतरी सहानुभूती दाखवावी अशी सूप्त इच्छा असते. आपलं पण एक लहान मूलच झालेलं आहे का? परिणामी, जीवनातलं मनोहरी केव्हाचं करपून गेलेलं आहे का?

एक भन्नाट पण मूर्ख विचार मनात येतो ०००

नर्मदेविषयी ज्या वल्गना उठतात त्या खऱ्या ठराव्यात. मग आपण इंग्रजी सिनेमासारखे प्रथम तिला आणि नंतर तिच्या याराला गोळया घालून ठार मारावं. पोलिसांच्या स्वाधीन व्हावं. ग्रेट! आपल्याला समाजाची सहानुभूती मिळेल का? एरव्ही तेरव्ही आपण आत्महत्त्येच्या विचारानं पछाडलेलोच असतो! मनाचा हा ताण दुखरा आहे ००

०००० पंधरा दिवसात पहिल्यांदाच गड गजबजलेला. उत्सवासारखा. पिंपळानं सळसळावं तसा. आणि सगळयांचे डोळे आमदार सौ. नर्मदादेवी सावंत यांच्या ठोस व्यक्तिमत्वावर लागलेले होते.

देवीना त्याची जाणीव असावी. आपल्याला बघण्यासाठी शेकड्यांनी माणसं ताटकळत असतात हा विचार सुखावह आहे.

स्वभावानुसार बाईनी केलंच! पोलीसांचं कवच, साखळी तोडून त्या एकदम सभागृहामध्ये घुसल्या. स्त्रीवर्गात जाऊन बसल्या तेव्हां त्यांच्या आजूबाजूच्या स्त्रीया, मुली काहीतरी अनपेक्षित घडत आहे अशा नवलानं बाजूला सरकल्या. धग लागल्यागत. त्यांच्या चेहऱ्यावर कौतुक पसरलं. नर्मदादेवींनी मोठ्या ममतेनं एका आईकडून तिची पाच वर्षांची छोटी मुलगी आपल्या मांडीवर घेतली. सभागृहात फोटोग्राफर्सना बंदी होती. पाच मिनिटं स्त्रीयांच्यात घालवल्यावर नर्मदादेवी उठल्या.

वृद्ध गृहस्थ खुर्चीत बसले होते. बाई जवळ आल्या तेव्हां गृहस्थ लगबगीनं उठले आणि त्यांनी बाईंना खुर्चीत बसायची विनंती केली. गर्दीत उभ्या असलेल्या श्रीयुत दिगंबर गायकवाड, उर्फ श्रीपाद सावंतला माणसांच्या या एकंदर वृत्तीचीच घृणा आली.

गुरुमाऊलींच्या या पवित्र भूमीत कोडगेपणाची परिसीमा झाली होती. ठीक आहे, आश्रम धनाढ्यांच्या पैशावर चालतोय, पण म्हणून त्यांना फाजील मोठेपणा देण्याची ही काही रीत नव्हती. लाचारीला पण एक मर्यादा असावी. म्हाताऱ्याची वाणी रसाळ आहे. मृदू आहे. तो जनांना मार्गदर्शन करतोय इथवर ठीक. पण वयाचा विचार असावा. पोटच्या पोरीच्या वयाएवढ्या एका राजकारणी स्त्रीसाठी स्वतः उठून खुर्ची देणं सभागृहाच्या बऱ्याच जणांना खटकलं असेल. पण नव्वद टक्के लाकडं सरणावर चढली तरीही व्ही. आय. पी. ना देवपण देण्याची खुमखुमी अजून गेलेली नाही! त्यांच्यात आणि पाळीव कुत्र्यांच्यात फरक तो कसला? हद्दच झालीय! हे कसले गुरुजी? कसला महंतपणा? ही तर स्वतःच्या पोरांनी हाकलून लावलं म्हणून निवृत्तीनंतरचा काळ सुरक्षित जाण्यासाठी आश्रयाला आलेली बांडगुळं आहेत! अंतर्यामी स्वामींना हे कळत आहे. तरीही अशांना ते पोशीत आहेत. कारण स्वामींना भाटांची गरज आहे. वय हे इथं शिक्षण झालेलं आहे ००००

-----मग गुरुजींनी नेहमीची टेप लावली. नम्रतेची. उपकारांची. ओशटभाषेची. सभ्यतेची. दुपारी मुख्य होमासाठी सौ. नर्मदादेवी सावंत स्वतः बसल्या. नेहमी कार्यालयात खुर्चीत बसायची संवय. जमिनीवर बसण्याची पार मोडून गेलेली. पाटावर बसताना थोडा त्रास झाला. त्यांचं शरीर हालचालींनी, घामानं ओलं झालं. त्यांच्या प्रत्येक मोहक हालचालीवर अख्ख्या सभागृहाचे डोळे झोंबत होते. धुरामुळे. स्वामींच्या अस्तित्वामुळे, वास्तूच्या पावित्र्यामुळे, अबोध हालचालींमुळे, मनाची कवाडं हळूहळू उघडल्यामुळे, भक्तीभावामुळे. इ. कारणांमुळे.

----भंडारा झाला. जीवसेवा परमोधर्म वचनानुसार शेकडो माणसं जेवून तृप्त झाली. मग स्वामी महाराजांशी वीस मिनिटं एकांतात बोलण्याची सौ. नर्मदादेवी सावंतांना परवानगी

मिळाली. अशी ईश्वरचरणी बोलण्याची संधी मिळायला आयुष्यात पुण्यकर्म करावं लागतं. धन्य धन्य ते भाग्यवंत! त्या होत्या.

श्रीपाद सावंतनं गर्दीत मिसळून या काशीनाथ सुर्वेविषयी शोध सुरु केला. कुठेच सापडेना. खूप खणून झालं. मग एका बलदंड, मोबाईल कानाला लावलेल्या सी. आय. डी. ला त्यानं सरळ विचारलं,

"साहेब! काशीनाथ सुर्वेला भेटायचं होतं!"

"कोण?"

"काशीनाथ सुर्वे! मॅडमचा बॉडीगार्ड ---------"

"तुम्ही?"

"त्याचा बालमित्र. जवळजवळ वीस वर्षांनी भेटतोय! म्हटलं, बघूया ओळखतो का ----"

"नाव?"

"मी दिगंबर गायकवाड. काशीनाथ सुर्वे मॅडमचा अंगरक्षक आहे म्हणून ऐकलं!"

------मोबाईल बंद करून सी. आय. डी. फुत्कारला,

"हं :! त्या समोरच्या सायबाला विचारा!"

श्रीपाद सावंतनं हवेत तुच्छतेनं उडवलेल्या जाडजूड बोटांच्या दिशेनं पाहिलं. सी. आय. डी. च्या उच्चारातली नक्की भावना कळली नाही. पोटात असूया वाटली. वाटली नाहीही. चालत एका उंच तगड्या पाठमोऱ्या पोलीसअधिकाऱ्याकडे गेला. गडाच्या संपूर्ण दबलेल्या गदारोळाकडे पाठ करून खालचा हिरवट निळसर ताण एकाग्रतेनं बघत अधिकारी उभा होता. प्रश्न

विचारल्यावर पोलीसानं गॉगल काढला. मान वळवली. तेच ठराविक शुष्क प्रश्न. तीच उत्तरं. पोलीस गुरगुरला,

"काशीनाथ चार दिवस सुट्टीवर गेलाय. त्याची आई आजारी आहे म्हणून. मी त्याला तुमचं नाव सांगतो. काँटॅक्ट नंबर द्या."

श्रीपाद सावंत हसला. बोलला,

"राहू दे साहेब! पुन्हा त्याची माझी भेट किती वर्षांनी होतेय तेच मला बघायचंय! ही तिसरी वेळ! आयुष्यातली ही एक गमतीदार चुकामूक आहे बघा! मी गेले दहा दिवस इथे आहे."

"काशीनाथला माहीत आहे का?"

"छे हो! लहानपणी आम्ही खूप मारामाऱ्या करायचो! दांडगट होता काशीनाथ!"

पोलीसानं डोळे बारीक केले. भेदकपणे शोधू लागले.

"तुम्ही काय करता मिस्टर --- गायकवाड?"

"काहीच नाही! सारखा भटकत असतो. पाय फुटतील तिकडे वळतो. मित्रांची अचानक भेट घेतो. काहीना आवडतं. चिकित्सकपणे माझ्याकडे बघतात. माझं आयुष्य असं कलंदर भटकं आहे म्हणून! काहीजण मला मुर्खात काढतात! आपण हे असे सडेफटींग. स्वतःला शोधतोय!"

----- पोलीसानं गॉगल पुन्हा डोळयांना लावला. श्रीपाद सावंतकडे पाठ फिरवून हिरवट निळाई बघत खांदे उडवून गुरगुरला,

"खोटं बोलायला अंगात धमक लागते मिस्टर! तेही एका पोलीस ऑफीसरसमोर! तुम्ही निघा."

----- श्रीपाद सावंत गर्दीत मिसळला. उगाचच अपराधी, ओशट वाटू लागलं. या तगड्या पोलीसाची नजर आता पाठीमागे लागणार आहे. नशीब वाईटच. दुर्बुध्दी सुचली आणि आमदारबाईंच्या अंगरक्षकाची चौकशी केली. नेमकी तीही पोलिसांशीच! बाईंच्या बॉडीगार्ड

विषयी कुठल्या पुरुषाचं मत चांगलं असणार? आपण साला खरंच मूर्ख आहोत. शतमूर्ख आहोत! आपण पाण्याला बोट लावलेलं आहे. गेले दोन दिवस गडावर पोलीसांची शोधक नजर फिरत असणार. पोलीस घातकी. स्वतःच्या बायकोवरही विश्वास ठेवणार नाहीत. त्यांची घ्राणेन्द्रियं तीक्ष्ण. पंधरा फुटांवरून त्यांना गोष्टीचा वास येतो. नतद्रष्ट जात. आपला बाप पण मिलिटरी पोलीसच होता. संशयी!

आपली भरली. शेकडो भाविकात मिसळूनही आपण आता तांदळातल्या खड्यासारखे टिपले गेलो आहोत! विरघळत आहोत. मोठया शहाणपणानं स्वतःवर पोलीसांसाठी तांबडा दिवा लावून घेतला आहे! मूर्ख. आपण या पृथ्वीवरचे माठ आहोत! इथल्या प्रत्येक माणसाचीच नजर आता आपल्याकडे संशयानं बघतेयसं वाटू लागलंय! अगदी स्वयंसेवकांचीसुद्धा. कोणीही चिमटीत धरून उचलावं आणि चार कानफटात द्याव्या! अगदी आरपार झालोत! ००० 

----गर्दीतून दूर जाऊन एका दगडावर बसला. गडावर सोहळा चाललेला. चैतन्यमय, आनंदी, सतेज, भक्तीपूर्ण. माणसं कशी प्रसन्न, तरुण लगबगीत दिसत होती. कार्यकर्ते उनात भिरभिरत होते. पांढऱ्या पक्षांसारखे. गडावरून फलकांचे तुरे हवेत हलत होते. तुऱ्यात सौ. नर्मदादेवी सावंत, आमदार, मंद मंद हसत होत्या. हालचालीमुळे त्यांचं हसणं जिवंत वाटत होतं.

-------श्रीपाद सावंतला घृणा वाटली.

----या उंचावरून खालच्या दरीत उडी टाकावी का? आपल्याला नक्की काय हवं आहे? कसल्या शोधात आहोत? नर्मदेनं एक मूल देवून आपल्याला सोडलं. शांतपणे. ठामपणे. दहा बाय बाराच्या डबलरुममध्ये तिनं खळखळ केली नाही. आपल्या म्हाताऱ्या आईनं थोडीफार केली. पंधरा वर्षांपूर्वी तिच्या डोळयांत तेवढ्याच शांतपणे बघत नर्मदा बोलली होती,

“आई, मला अडवू नका! प्लीज! मी असेन तर या घराला शांती मिळणार नाही. माझ्या डोळयात वणवा पेटलेला असतो. तो या घराला होरपळून टाकील. सावंतांच्या या घराला दुःख देणं म्हणजे पाप आहे असं मी समजते. मी यापुढे अन्यायाविरुद्ध बंड करायचं ठरवलयं. खूप राळ उठेल. मला

कल्पना आहे! समाज मला वाळीत टाकील. छी:थू करील. मी एकटीनं त्याला तोंड देईन. उडालेला धुरळा नीट बसल्यावरच पलीकडचं ओळखीचं दिसेल. तोवर काही नाही! मला पेलवून घेणारं हे सावंताचं घर नाही. आशीर्वाद द्या आणि मला मोकळी करा. मी माझा, आईचा धर्म सोडणार नाही. वचन देते. आई! तुम्हीही बंडखोरच आहात! पण तुमचा काळ वेगळा होता. मी तुमची सुधारलेली आवृत्ती आहे असं समजा. मी तुमच्या मुलाला, ह्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिलेलं आहे. पण मी घटस्फोट घेणार नाही. मागीत नाही. येते!"

आणि नर्मदा दार उघडं ठेवून गेली.

पुढील पंधरा वर्षात श्रीपाद सावंत समाजात जिथे जिथे वावरला, लग्नसमारंभात गेला, तिथे त्याच्याशी तिरकस चौकशी होत गेली. तोही तेवढ्याच निर्ढावपणे उत्तरं द्यायला शिकला. आठपंधरा दिवसात बायकोविषयी पेपरात काहीतरी बातमी येत असायचीच. ती प्रमाणापेक्षा हुशार निघाली. योग्य त्या पक्षात घुसून स्वतःचं अस्तित्व सिद्ध करू लागली. प्रसंगी वाद घालू लागली. तिचे प्रतिकार तीव्र असायचे. पोलीसकस्टडी व्हायची. ती काय बोलते हे ऐकण्यासाठी वार्ताहर तिची वाट पाहू लागले. ती स्वतःसाठी म्हणायची, आपण एकदाच जगतो. या जगण्याचं सोनं होऊ दे ०००००

----गडाच्या उतरणीवरचा वेलांट्या घेत गेलेला हिरवा निळा निसर्ग, बोटं शिवशिवत उनातल्या श्रीपाद सावंतला गिळायला दबा धरून बसला होता. अगदी पायथ्याला माणसांची ये जा होत असावी. नसावीही.

"गायकवाड!"

श्रीपाद सावंत दचकला. घामानं चिपचिपलेल्या तोंडानं त्यानं गर्रकन पाठ फिरवली.

पाच फुटांवर गॉगलवाला पोलीस अधिकारी उभा होता. हातात दंडा. उंच. दणकट. रुंद मनगट. रोबोटसारखा.

"आर यू ओके मिस्टर गायकवाड?"

---- त्याला क्षणभर वाटलं की ऑफिसरच्या रुंद खांद्यावर मान टाकून ढसढसा रडावं. स्वतःला सावरून त्यानं रुमालाच्या बोळयानं तोंड पुसलं आणि अशक्तपणे पुटपुटला,

"साहेब! मी ---- मला फिट्स येतात. फार एकटा आहे मी. सारखा फिरत असतो. मला गर्दीत गुदमरल्यासारखं होतं म्हणून इथे या दगडावर बसलो. सारखी भ्रमंती. मित्रांना असा अचानक भेटतोय. आयुष्यात ऊनच उन पसरलंय-------"

"तुम्ही थंड घेणार का?"

"थँक्स! तसा बरा आहे मी. गेले दहा दिवस इथे गडावरच आलोय. इथे मनःशांती मिळते म्हणतात म्हणून आलो."

-----गॉगलवाल्याच्या दगडी चेहऱ्यावर स्मित आलं.

"मनःशांती मिळाली का?

श्रीपाद सावंतनं स्मित निरखीत विचारलं,

"आपली श्रद्धा आहे का साहेब?"

"इथं आलेला प्रत्येकजण श्रद्धेपोटीच आला आहे."

"पण तुम्ही नुसते ड्युटीवर म्हणून आलात!"

"तुम्ही हा प्रश्न मला का विचारलात गायकवाड?"

"मी तुमच्याकडे प्रथम आलो तेव्हा तुम्ही गडावरच्या चैतन्याकडे पाठ करून तटाशी उभे होतात म्हणून!"

----स्मित थोडसं रुंदावलं.

"याचा अर्थ, इतके दिवस इथे राहून तुम्हाला मनःशांती मिळाली नाही. असंच ना?"

----श्रीपाद सावंतनं किंचित हसल्यागत केलं.

“फार दुबळा माणूस आहे मी साहेब. देश, दिशा, देवालयं साधुसंताना बघून भेटून, वाचन करूनही मनाचा दुबळेपणा गेला नाही. मी त्यातच जन्मलोय. दुसरं काय हो?”

----गॉगलवाल्यानं दणकट पंजाचं वजन देत म्हटलं,

“नाराज होण्याचं कारण नाही गायकवाड! इथे येऊन मनाची शांती मिळालीच पाहिजे असा नियम लिहिलेला नाही. तुम्ही चाळीस पंचेचाळीशीचे तरुण आहात. रडत बसू नका! एन्जॉय लाईफ! उद्याची कोणाला खात्री आहे इथे? उद्या मी एन्काउंटरमद्ध्ये ठार झालेलाही तुम्ही ऐकाल! यू आर इंटरेस्टींग! काशीनाथला तुमची भेट झाली म्हणून जरूर सांगीन. रिलॅक्स! अहो एकटा जीव सदाशीव! फक्त तुमची कृती गुन्ह्यात बसणार नाही याची काळजी घ्या. घ्या मजा पाखरासारखी! निघतो!”

----गॉगलवाला फिरला. दणदण निघून गेला. त्याची पाठमोरी ऍथलेटिक बॉडी आणि डौल बघत श्रीपाद सावंतनं सुटकेचा श्वास घेतला. खांद्यावरचं ओझं अचानकपणे हलकं झालं. गॉगलवाला मैत्रीचं बोलला. खरं खरं. जे तत्वज्ञान पोपटपंची गुरुजींना माहीत असूनही बोलू शकले नाहीत. थोडीशी गंमत वाटली. यावेळी नाटक जमलं. पोलीस मित्रासारखं बोलला. डोक्यावरचा काळा ढग अचानकपणे दूर झाला. या दडपणापोटी आपण खरंच तटावरून उडी टाकून संपून गेलो असतो तर? खरंतर पोलीसाला संशय आलेलाच नव्हता! मनावरचं दडपण खोटं होतं. ते गेल्यावर जगायची इच्छा परत झालेली आहे का? काही कळत नव्हतं.

गॉगलवाला दण दण गेला. कारण ड्युटी पुन्हा सुरु झाली. आमदार सौ. नर्मदादेवी सावंत परत निघाल्या त्यांच्याबरोबर गर्दीची ओहोटी सुरु झाली. बाईंना गर्दी खेचण्याची किमया कळली होती. छत्रीच्या गोल वाटोळया सावलीखालून चालताना त्या लोकांना हात हलवून नमस्कार

करीत राहील्या. दगडावर उभा राहून इतरांबरोबर श्रीपाद सावंत बाईंना डोळयांत भरून घेऊ लागला.

बाई स्वतःच्याच प्रेमात पडल्या होत्या.

तसे गर्दीतले बरेच जण त्यांना डोळ्यांत भरून घेत होते.

वय वर्षे सदोतीसचा घाट. काहीसा बेफिकीर. उद्दाम वाटणारा. तरीही चेहऱ्यावर मंद स्मित. कपाळावर गॉगल. बरोबर लगबग चालणारी छत्रीधारी पोलीस अधिकारी. बाईंचा पूर्वीचा------ शरीराचा घट्टपणा थोडासा सैल झालाय की काय वाटणारा. परंतु परिणामी, हिंदोळ्याचा प्रभाव अधिक. झोंबरा. पुरुषाचा मेंदू भणाणून टाकणारा. त्यांना अर्थातच त्याची बिल्कुल पर्वा नव्हती. त्या स्वतःतच मश्गुल. त्यांनी सर्वार्थानं लोकांसाठी तन मन धन वाहीलेलं. पार्टीच्या लोकांनी जिथे तिथे लावलेले त्यांचे फलक वाऱ्यानं हलून स्वागत करीत होते. बाई अशा. घामट. उत्तेजक. लुसलुशीत. स्वाहा करण्याजोग्या.

मनात खळबळ झाली.

अर्धांग गडावरची हलचल खाली घेऊन चाललेलं आहे. गड काहीसा उदास होत चाललेला आहे. आणि आपण मात्र या मोठ्या दगडावर वेड्यासारखे दुर्लक्षित उभे आहोत. शेतातल्या बुजगावण्यासारखे. कावळयाच्या शिटीसारखे. अर्धे. दगडालापण जड झालेले. त्यामुळे उतरत जाणारा उनातला निसर्ग बोचरा वाटत आहे. इतक्या माणसात वरचं आभाळ एकाकी झालेलं आहे. सगळंच निरर्थक. कुठेच आवश्यकता नाही. गॉगलवाला पोलीसऑफिसर म्हणाला की उद्या एनकाउंटरमध्ये तो गेलेला तुम्हाला ऐकायला मिळेल! माणूस मरणासाठी इतका तयारीत राहू शकतो का?

काहीच कळत नाही.

“श्रीयुत गायकवाड!”

श्रीपाद सावंतनं सावध होऊन मागं पाहीलं. पुष्कळशी गर्दी गड उतरून गेली होती. कारण आकर्षण गेलेलं. नजाकत गेलेली. गडासाठी रितेपण सोडून दिलेलं.

गडाच्या पायथ्याला पावलांची रांगोळी विस्तृत होत जाणारी. पांगणारी. पोलीस गाड्या हलत होत्या. आता गडावर उरलेले भाविक होते. बाकीचे सगळे स्वयंसेवक इकडंतिकडं करत होते. अंतरावर शुभ्र दाढीचे गृहस्थ गुरुजी भगव्या वस्त्रात काहीसे अस्थिर, अचंब्यात उभे होते. त्यांच्या बुब्बुळात जगातलं पहिलं आश्चर्य जमा झालं होतं.

“मला हाक मारलीत आपण?”

“हो! तुम्हालाच. तुम्हाला गुरुमाऊलीनं एकट्यांना बोलावलंय!”

----श्रीपादच्या छातीत थंडगार लोट गेला.

“मला?”

“तुम्हाला श्रीयुत गायकवाड! मी सांगीतलं नव्हतं? गुरुमाऊली अंतर्यामी आहेत म्हणून? तुम्ही भाग्यवंत आहात हो! असा योग हजारात एखाद्यालाच मिळतो! चलावं तुम्ही!”

“मी इथे आहे हे त्यांना कसं कळलं?”

-----गुरुजींनी फक्त हवेत हात उंचावले.

“मला कशाला बोलावलं असेल गुरुजी?”

“ईश्वराची इच्छा! हा योग थोड्यांना मिळतो श्रीयुत गायकवाड! तुम्ही पुण्यवंत! तुम्ही एकटेच जा. तासाभरानं गुरुमाऊली ध्यानाला बसतील. त्वरा करा!”

-----छातीत मूठभर गच्च झालं. घाम फुटला. त्यानं हातपाय स्वच्छ धुतले. खोलीत जाऊन स्वच्छ सदरा लेंगा घातला. देवाचं, कुलस्वामीनीचं स्मरण केलं. हे काहीतरी अनपेक्षित घडत होतं एकट्यालाच स्वामी महाराजांनी बोलावलंय ही बातमी गडावर वाऱ्यासारखी पसरली. कुठला

कोण हा फिरस्ता माणूस. दुर्बोध. अबोलसा. असाच दहापंधरा दिवसांपूर्वी गडावर येतो काय, दगडावर एकटाच बसतो काय, रात्रीचा गडाच्या मध्यापर्यंत झाडामागे सिगरेटचे झुरके मारून पुन्हा वर वस्तीला येतो काय आणि या अशा पाहुण्याला गुरुमाऊली एकांतात बोलावतात काय! खरंच, अजब, अनाकलनीय असंबध्द वाटत आहे. आम्ही इथे महिने, वर्षे गडावर सेवा करीत आहोत. गुरुमाऊली सर्वांशी औपचारिक बोलतात. तेवढेच. असं खास बोलावणं नाही. हा असा योग आम्हाला अजून आलेला नाही! इथे मोठमोठे धनिक राजकारणी, महसूलखात्याचे अधिकारी येतात. पण त्यांनाही पाच मिनिटांच्यावर थारा नसतो. ते तर इथल्या व्यवस्थेचे आश्रयदाते! आणि हा सडाफटींग, कफल्लक आपल्यातला कोणीएक दिगंबर गायकवाड! आश्चर्य! अहो आश्चर्यम! गुरुमाऊली खरंच अंतर्यामी आहेत!

श्रीपाद सावंतने स्वामी महाराजांची खाजगी बैठकीची खोली त्यांच्या अपरोक्ष दोनदा पाहिलेली होती. त्या खोलीला एखाद्या मखराचे रूप होते. सर्वत्र भिंतीवर चिकाचे उंची पडदे. पुरुषभर उंचीच्या सदोदीत तेवणाऱ्या समया. धूप, फळफळावळ. स्वामी महाराजांची प्रसन्न देखणी तस्वीर. देखणे प्रशस्त आसन. ग्रंथ सामुग्री. भारुन टाकणारं वातावरण. शांत. उदात्त. पवित्र. मनमोकळं. ईश्वराचा वास भासवणारं. फुलाफुलाचं.

आता तर प्रत्यक्ष चैतन्याच्या अस्तित्वानं बैठक सजली होती. मागे तेजोवलय वाटत होतं. त्याने स्वामींना बऱ्याचदा जवळून पाहिलेलं होतं. आंघोळीला गेले की ते अगदी साध्या सामान्य साधुसारखे दिसत. स्वयंसेवक माफक बोलत. कोणी आजारी असल्यास स्वतः वनस्पतीपासून मुळ्यांतून औषध तयार करून देत. एरव्ही शेतीविषयी चौकशी करीत.

स्वयंसेवकांनी पेपरात वाचलेल्या राजकीय बातम्यांवर बोलत. गडावरील देखभाल आणि देशभर इतरत्र पसरलेल्या त्यांच्या मठांची आणि आश्रमांची चौकशी करीत. त्यांची आर्थिक व्यवस्था, कायदेशीर बाबी, जमीनजुमल्यासंबंधी त्या त्या जिल्ह्यातील, तालुक्यातील, महत्वाच्या

माणसांशी कागदोपत्री व्यवहार, वाटाघाटी, बोलाचाली इ. इ. विषयांशी संबंधीत अधिकारी वर्गाशी बोलत. नंतर पाण्यात उतरून तरंगत ध्यानस्थ रहात! स्वतःत जात.

श्रीपाद सावंत दूर दगडावर बसून ते पाही. ----- हा कोणी नुसता मुनी नव्हता. हा तर एखाद्या प्रचंड उद्योगसमूहाचा संचालक वाटायचा! ईश्वराचा अवतार हा त्याच्या व्यक्तिमत्वाचा एक पैलू असेल. पण तपस्वीपणातही प्रपंचाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हे ते उदाहरण होतं!

०००० आपण इथे पाहुणे आहोत. गुरुमाऊलीच्या देशभर पसरलेल्या संस्थांचे व्यवहार बघणारे त्यांचे मदतनीस नाही होत. थोडेच दिवस राहीलो. स्वभावात उतावीळपणा दाखविला नाही. सारखी मदतच करीत राहीलो. स्वामीनी आपल्याशी इतक्या दिवसात साधा शब्द उच्चारलेला नाही. एवढंच काय, आपल्याकडे दृष्टीक्षेपही टाकलेला आठवत नाही! गुरुमाऊली शीवाचा अवतार आहेत म्हणे. हटयोगी. धीराचे. मनुष्यरूपी. दीर्घायुषी. विद्वत्तेची झाक चेहऱ्यावर डोळयांत फाकणारी. त्यांच्यामागं तेजोवलय आहे असा भास होतो. सुंदर. तरल.

त्यानं पुढं होऊन स्वामींच्या चरणावर मस्तक ठेवलं. छाती धडधडत होती. स्वामी महाराज केशरी बैठकीत बसले होते. ताठ. धोत्र्याच्या फुलासारखे. त्यांच्या दोन्ही बाजूंना केशरी, पिवळीजर्द, जास्वंदी, निळी गुलाबी शुभ्र फुलंच फुलं पसरली होती. श्रीपादला मान उचलून समोर बघता येईना.

आज्ञाधारक मुलासारखा गप्प बसला. सावध झाला.

“आता तुम्ही माझ्या डोळयांत बघा.”

----- सुगंधी बैठकीतून शब्द आले. पावरीतून यावेत तसे. त्यानं स्वामींच्या डोळयांत पाहीलं. अर्धं मिनिट. शरीरातून उष्ण प्रवाह सुरु झाले. डोळयांच्या आत, अगदी आत प्रचंड वेगाने तेज प्रवाह सुरु झाला. आपण पापणी बंद करू शकत नाही. आपण समोरच्या दृष्टीत भारावले जात

आहोत. आपलं शोषण सुरु झालेलं आहे. ०० आपण कदाचित अस्तित्वहीन होऊन जाऊ. कानावर धीरगंभीर शब्द येवू लागले. सुटे सुटे.

"तुमचा भूतकाळ लख्ख दिसतोय. पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेसाठी निसर्गानं प्रकृती आणि पुरुष निर्माण केलेत. मनुष्य विचारी म्हणून चारित्र्याबद्दल बोलतो. पण चारित्र्य नुसतं स्त्रीकडूनच अपेक्षीत असावं काय?"

---- पावरीतून शब्द अलगदपणे बाहेर आले.

----- गुरुमाउलींनी जणू त्याच्या नजरेत शिरून त्याचं आजपर्यंतचं सगळं आयुष्यच उगाळून प्यायलं होतं! प्रस्तावनेची गरज नव्हती. आतल्या आत ढेपाळत चालला.

"मी काय बोलतोय हे तुमच्या पूर्ण लक्षात येत आहे. तुम्ही ज्ञानी आहात. फार एकलकोंडे झाले आहात. ऐका. वासना ही जीवनातली वस्तुस्तिथी आहे. ती यमुना भवनदी आहे. भवनदीच्या ऐलतीरावर आहे जीव आणि पैलतीरावर देव! ईश्वर. ही वासनानदी ओलांडल्याशिवाय ईश्वराची प्राप्ती होणार नाही. काम क्रोध आड पडिले पर्वत! राहिला अनंत पलीकडे. तुमचा शोध निरर्थक आहे. कारण तो तुम्हाला मानसिक ऱ्हासापलीकडे काहीही देणार नाही. तुम्ही आत्मपरीक्षण करा. लग्नानंतर तीन स्त्रियांशी संग करूनही दुसऱ्याच्या चारित्र्याच्या शोधात भटकणं नैतिकतेला धरून नाही. कार्य करीत रहावं. निसर्गनियमाविरुध्द शरीराचे, मनाचे क्लेष वाढवणं हा त्यावरचा उपाय नाही. तुम्ही पित्याचं कर्तव्य छानपणे करीत आहात. हा तुमचा पुत्र तुमचाच छोटा अवतार आहे. तुमचं प्रतिबिंब. पण ज्या उदरातून हे प्रतिबिंब तुमच्या मांडीवर खेळलं त्या उदराचा पिंड वेगळा आहे. शेवटी मनुष्यानेच मनुष्यजातीसाठी झिजायचं असतं. प्रत्येक भयापुढे विजय ठरलेला असतो. जे तुमच्यात आहे ते तिथे नाही. परंतु जे तिथे आहे ते तुमच्यातही नाही! तुमची इथली वस्ती संपलीय. तुम्ही निघू शकता."

श्रीपाद सावंतनं स्वामींच्या डोळयांत पाहिलं नाही. घशाला कोरड पडली. स्वामींनी आपला भूतकाळ पाहिला. अन्तःचक्षूंनी. ते योगी आहेत. आपल्याला पार विवस्त्र करून टाकलेलं आहे. ०० त्यानं अशक्तपणे विचारलं,

"संपूर्ण दोष माझाच का स्वामीजी? मला---माझ्या आयुष्यात फार मोठ्या अपेक्षा नव्हत्याच हो! मला जीवनसाथी घट्ट विणीचा, सुखदुःखात विश्वासानं मजबूत पायावर नातेसंबंध रुजवणारा, जपणारा हवा होता. मला काय मिळालं? समाजाचा तिरकस, कुजका सवाल. मानहानी! एक बायको मुठीत ठेवता येत नाही ही कुचेष्टा. एवढंच काय, मी नामर्द म्हणून तर बायको घर सोडून गेली नाही? अशा प्रकारची माझ्या घराच्या दाराखालच्या फटीतून सरकवलेली बेनावी पत्रं ०० हा मुलगा माझाच की कोणाची---- देणगी, हा जीव्हारी लागणारा प्रश्न ००००० काय काय सांगू? माझ्यातलं मनुष्यत्वच या प्रश्नांनी पुसलं गेलं आहे स्वामीजी! मग मी रागापोटी इतर स्त्रीयांचा विकावू भोग घेतला, त्याचबरोबर केवळ माझ्या स्त्रीनं मला न समजता ठुकरावून चालती झाली तिचा एखाद्या खुनशी माणसासारखा शोध घेतला तर काय झालं? तुम्ही दीव्यपुरुष आहात. मला न्याय हवाय. मी तर एक क्षुद्र माणूस आहे. तुम्ही जाणताच!"

-----स्वामी महाराजांनी श्रीपाद सावंतच्या डोळयातली ठिणगी पाहिली. अगदी मोठी पिशवी उलटी करून झाडावी तसा तो मोकळा झाला होता. त्यांनी मंद स्मित केलं. द्रोणामध्ये स्वतःच्या हातांनी सफरचंदाचे तुकडे केले. द्रोण पुढे करून म्हणाले,

"तुमच्यावर तुमच्या आईच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव आहे. तुमची मानसिक जडणघडण हे तिच्या मनात रुजलेले विचार आहेत."

"पण तिला खूप खूप जगावसं वाटतंय!"

"ही प्रत्येक प्राणीमात्राची इच्छा असते! माउलीचं काहीही चुकलेलं नाही. तुम्ही मात्र तिच्या विचारांचा विपर्यास केला आहे."

“तो कसा स्वामीजी?”

“हा प्रसाद घ्या.”

श्रीपाद सावंतनं उठून प्रसाद घेतला. गुरुमाऊलींच्या पुन्हा पाया पडून खांदे पाडून बसला. सगळं आयुष्यच ओवाळून स्वामींच्या पुढ्यात ठेवल्यागत वाटू लागलं. आपल्यावर इथल्या वातावरणाचा सूक्ष्म परिणाम होत चालला आहे हे त्याला कळलं. स्वामी बोलू लागले,

“तुम्ही गोंधळून गेला आहात. तुम्हाला निसर्ग आवडतो. फिरताना एक काळी भोर स्वच्छ शिळा दिसते. एकटी.. तिच्या डोक्यावर फक्त सहा इंच उगवलेली वनस्पती दिसते. याचा अर्थ काय? आपण पूर्ण ज्ञानी झालो या भ्रमात राहू नका. नवीन शोध घेण्याचा प्रयत्न केला नाही तर तुमची प्रगती होणार नाही.”

“मी खरंच गोंधळलोय स्वामीजी!”

“तुमच्या डोळयांपुढे आयुष्याचा लोंबकळता हलता आरसा आहे. त्याला स्थीर करा, मगच दिशा स्वच्छ दिसतील.”

“समझलो..”

“नेमकं हेच मी मघा तुमच्या सौभाग्यवतीशी बोललो. त्यांनी तुम्हाला केव्हांच क्षमा केलेली आहे.”

-----श्रीपाद सावंत दिङ्मुढ झाला.

“मी इथे आहे हे तिला कळलं का?”

“मला कळत होतं. माता म्हणून मी कुठे चुकतेय का, विचारीत होती. मी तिला मार्गदर्शन केलं. तुम्हा दोघांच्याही नशिबी पुत्राचा सहवास फार काळ नाही. कारण तो अत्यंत हुषार मुलगा आहे. त्याला तुमच्या बंधनात रहायला वेळ मिळणार नाही. मग तिनं पत्नी म्हणून कर्तव्यं विचारली.

मी तिला सांगीतलं की ती वेळ निघून गेलेली आहे. कारण तुम्हा दोघांचेही प्रवास समांतर रेषेत सुरु झाले आहेत. तिनं दुःखी होऊ नये. स्वतःला समाजकार्यात झोकून द्यावं. समाजाला तिची फार गरज आहे.”

“तिला मनःशांती मिळते का?”

------स्वामी मंद हसले.

“तिच्या तळहातावर मंगळरेषा आहे. रविपर्वतावर त्रिकोण आहे. मस्तकरेषा आणि आयुष्यरेषा यांच्या उगमस्थानी योग्य असे अंतर आहे. हे तिच्या धाडशी स्वभावाला पोषक आहे. एक प्रकारे ती शत्रूसंहारीणी आहे. मी तिचा स्वभाव ओळखून साधना मंत्र दिले.

“आणि माझं काय?”

“झाडाकडे बघा. या झाडातून लक्षावधी कांड्याच्या कांड्या काढता येतील. पण हे संपूर्ण झाड जाळून टाकायला एकच कांडी पुरते. कपाळाला टिळा लावणं म्हणजे संसार करणं नव्हे.”

“मी समजलो नाही. क्षमा करा!”

“वासनारूपी मानवाला चिंतेऐवजी चिंतन दिले पाहिजे. चिंता ही पाप निर्माण करते आणि चिंतन पुण्य. मन विशुद्ध होवू देत नाही.”

“मला सांगा, पत्नी म्हणून कर्तव्य विचारायचा तिला अधिकारच काय स्वामीजी?”

“मनुष्यस्वभाव आहे. काही क्षणी मन बेसावध, हळवं, कोमल होतं. माणूस यंत्र नाही.”

“तिचं अजूनही माझ्यावर प्रेम आहे का स्वामीजी?”

“प्रकाश जेवढा प्रखर तेवढाच काळोख गडद होतो. या गोष्टी सापेक्ष आहेत. हा प्रश्न तुम्ही सोडवायचा आहे. पण त्यासाठी स्वभाव बदलायला हवा. तो बदलला नाही तर दुःखाचा शेवट

होणार नाही. स्वतःचीच अंतयात्रा बघण्याचा हट्ट धरण्यात प्रयोजन नाही. तुमची इथली वस्ती संपलीय. तुम्ही निघू शकता."

श्रीपाद सावंतला खूप विचारायचं होतं. पण गुरुमाऊलीनं हाताच्या खुणांनी त्याला थोपवलं आणि डोळे मिटून ध्यानस्थ झाले. पुन्हा नमस्कार करून तो गाभाऱ्यातून बाहेर आला. मागचं दार हळूच आपोआप लागलं.

बाहेर आल्याआल्या त्याला बाहेरच्या जगात विलक्षण झपाट्यानं फरक पडलेला जाणवला. गवताची लव्हाळी झाली होती. सर्व स्वयंसेवक नम्र होऊन आदरानं बाजूला होत होते. एकमेकाच्या कानात कुजबुजत होते. एवढंच काय, शुभ्र दाढीचे वृद्ध गुरुजीही त्याच्याकडे प्रेमळपणे बघून मंद हसत होते. त्यांच्या डोळयांत वेगळी चमक दिसत होती. जवळीकतेची. कृतार्थतेची. तो खोलीतल्या कपाटातून बॅग काढू लागला तेव्हां वृद्ध गुरुजी खोलीत आले. खुर्चीत बसले.

"श्रीयुत गायकवाड! निघालात म्हणायचं?"

"तशी आज्ञा झालीय."

"दुःखाचा शोध लागला का?"

"दुःखाचा शोध अनिवार आहे. पण अंत नाही. शेवट दुःखच असल्यामुळे माझा मार्ग मीच शोधावा हा माऊलींचा सल्ला आहे! आत्मपरीक्षण हवंय. जमाखर्च तपासायचाय. पुढे ईश्वराची इच्छा, असं सांकेतिकपणे सांगीतलं गेलं!"

"इथं येवून समाधान झालं का?"

श्रीपाद सावंतनं बॅग भरून स्वतःचे कपडे बदलले. वृद्ध गृहस्थांकडे कणवेनं पाहीलं. त्यांनी नजर वळवली. त्याला कळली. किंचित हसून म्हणाला,

“प्रारब्ध आहे गुरुजी! यातून कोणाची सुटका नाही. स्वामी महाराजांना दीव्यदृष्टी लाभलीय. ती त्यांनी या युगात, मर्त्यलोकात मिळवलीय. माझ्यासारख्या अगणित अज्ञानी माणसांना संदेश देणारा तो एक अवतार आहे हे नक्की. मी निघतोय. तुम्ही माझ्यासारख्या त्रयस्थाशी जवळीक दाखवलीत. आभार मानायचे नसतात. ते ठरलेलं असतं. येतो!”

वृद्ध गुरुजींनी कनवटीला गुंडाळलेला एक कागदाचा कपटा काढला. थरथरत्या हातांनी त्याच्याशी देत पुटपुटले,

“यात माझ्या घरच्यांचे पत्ते लिहून दिले आहेत. त्या मुलुखात जेव्हां जाल तेव्हां शक्य झाल्यास त्यांना पाहा. भेटा. कुशल विचारा. वर्षे झाली हो! कोणाची गाठभेट नाही. पत्रव्यवहार नाही --------”

“तुम्ही स्वामीजींच्या आश्रमात सुरक्षित आहात हे सांगणारी बरीच माणसं भेटत असतील गुरुजी! तुम्हाला कसली काळजी?”

वृद्ध गृहस्थांच्या डोळयांच्या कडा ओल्या झाल्या. आवाज कापरा झाला.

“अशा खुशालीवर मनाचं समाधान होतं का श्रीयुत गायकवाड?”

“पण तुम्ही तर प्रपंचातून विरक्त झाला आहात ना?”

“ते---- इतकं----- सोपं असतं का?”

“मग तुमच्या तत्वज्ञानाचं काय? विरक्तीचं काय? कोऱ्या आभाळात एकाकी रेघ मारणाऱ्या घारीचं काय? आयुष्याकडे तटस्थपणे बघण्याच्या वृत्तीचं काय? तुम्ही रोज भाविकांना देत असलेल्या भाषणांचं काय गुरुजी?”

वृद्धांना एकदम रडूच कोसळलं. त्यांची ती दयनीय स्थिती श्रीपाद सावंतला बघवेना. त्याने गुरुजींच्या खांद्यावर प्रेमाने हात ठेवला.

"श्रीयुत गायकवाड, स्वामी गुरुमहाराज अंतःचक्षूने सारं काही क्षणात ओळखतात बरं! पाहा ना! मी इथे इतकी वर्षे आहे परंतु ते असे एकांतात माझ्याशी अजून बोललेले नाहीत! पण तुम्हाला ते अवघ्या दहापंधरा दिवसात शक्य झालं! मग आपणा दोघात श्रेष्ठ कोण? तुम्हीच ओळखा!"

"असं काही नाही गुरुजी!"

"तसंच आहे श्रीयुत गायकवाड! इथे मी आश्रयाला आलोय, मुलाबाळांना दुरावलोय म्हणून माऊलींनी मला आधार दिलाय. तुम्हाला आधाराची गरज नाही म्हणून जायला सांगीतलं!"

"तुम्ही दिलेल्या पत्त्यांवर सवडीने जाईन."

"एक विनंती. मुलं काय बोलली ते खरंखरं सांगायचं. कारण तुम्हाला खरेपणात दुःख फार असतं हे माहीत असूनही तुम्ही दुःखाच्या शोधात आहात. माझ्यासारखे पलायनवादी नाही! पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा."

"या अशा आयुष्याची उबग येवून सगळं संपून जावं, टाकावं, असं तुम्हाला कधी वाटलं नाही गुरुजी?"

"वाटलं. खूपदा. पण मला मृत्त्यूची भीती वाटते हो!"

"समजलो."

प्रखर प्रकाशानं खोली न्हाऊन गेल्यागत झाली. श्रीपाद सावंतने गुरुजींचे मऊमऊ अशक्त ऊबदार हात हातात घेतले. आतून कढ आल्यागत झालं. बॅग उचलली. चिठ्ठी नीट खिशात ठेवून गुरगुरला,

"शोध संपलेला नसतो तर?"

---- गृहस्थांनी मान डुगडुगवली.

श्रीपाद सावंत गड चटचटा उतरू लागला. त्याचे डोळे पाण्यानं भरले. मनुष्य हरलेला आहे. पार खचलेला आहे. शोधाला अंत नाही. गुरुजींची अवस्था स्वामीजींना कळालेली असल्यामुळे त्यांनी गुरुजींना सामावून घेतलं आहे. समजूतदारपणावर आयुष्याच्या गोष्टी सरकत आहेत. माणुसकीचा झिमझिमाट पडताना दिसत आहे.

गडाच्या पायथ्याशी आल्यावर त्यानं वर पाहिलं. आभाळमय डोंगराच्या पार्श्वभूमीवर गड उठून दिसत होता. त्यानं हात जोडून नमस्कार केला. स्वामीजींच्या भाषेला झोल होता.

---- इथं आता परत येणं नाही.

---- इथली वस्ती संपली आहे.

---- पुढचा प्रवास लिहिलेला आहे.

रिक्षानं प्रवास करू लागला. मागं पाहीलं. या ऐतिहासिक गडावर एक तपस्वी तप करतोय. व्यवस्थाही पहातोय. माणसांना आरपार ओळखतोय. हा ईश्वराचा अंश. जो आपल्याशी एकांतात बोलला! कोणाला खरं वाटणार नाही.

एस. टी. स्टॅण्डवर जाऊन त्यानं तिकीट काढलं. गाडीत चारपाच तुरळक खेडवळ प्रवाशी बसले होते. गाडीचा टप बऱ्यापैकी तापला होता. वेश्यागमन केलेलं स्वामीजींना कळलं. चेहरा खापरागत झाला.

---- खिडकीशी बसला.

---- बस सुरु होण्याची वाट बघू लागला.

# शब्दांगण

जमिनीच्या भोकातून पटकन डोकं बाहेर काढून उंदरानं प्रथमच बाहेरचं जग आश्चर्यानं टकमका बघावं तसं शब्दांचं होऊन बसलं.

शब्द अर्थवाही व्हायला पाच वर्षे गेली. शब्दांपायी अडून बसण्याची अस्वस्थता, हा अनुभव वेगळा होता. निर्मितीचा आनंद शब्दात व्यक्त करणं मुश्कील. तोही एक अनुभवच.

शब्द आयुष्यात आले ते अपघातानं. नर्मदा घराच्या पायऱ्या उतरून कायमची निघून गेली तेव्हां पोलीसस्टेशनचे ए. सी. पी. परुळेकरांनी दिलेला कानमंत्र तेवढ्याच पायऱ्या चढून मनात शिरला. परुळेकरांनी आपली कुवत ओळखून सांगीतलं की मनातला राग चीड कागदावर उतरवायला सुरुवात करा. तुमचा एकलकोंडेपणा निघून जाईल. आत्मघातकी विचारांचा निचरा होईल. बघा तर खरं! पुस्तकांसारखा मित्र नाही. वगैरे.

प्रयोग म्हणून सुरुवात केली.

प्रथम बऱ्यापैकी वाचन झालं. रिकामटेकडेपणा निघून गेला. मग कागदावर शब्दजुळवणी. वेळेचा अपव्यय होतोय की काय वाटू लागलं. वाचक होणं ठीक. लेखन आपला वकूब नाही. सगळेच लेखक झाले असते. सृजनशीलता उपजत असते. शब्द कसे फुलून यावे लागतात. उगाच नाही स्ट्रीम ऑफ कॉन्शसनेस म्हणतात! शब्दांना जन्म देणं, त्यांना खेळवणं, त्यांची मांडणी करणं, वाकवणं, वेगवेगळी रुपं देणं, लगाम घालणं, ही एक कला आहे. शब्द ईश्वराची निर्मिती आहे पण तिचा आस्वाद घेण्याची ताकद हवी. त्यांच्या रचनेला अर्थवाही करण्यासाठी काना, मात्रा, स्वल्पविराम, उद्गार चिन्हांचा फार मोठा वाटा असतो. इ. इ. इ. इ.

सुरुवातीला मासिकांच्या संपादकांकडे पाठविलेल्या कथा त्याच वेगानं साभार परत येवू लागल्या तेव्हां अचंबा, चुटपूट, राग आणि नंतर वाईट वाटू लागलं. एखादा संपादक चार ओळीचं मार्गदर्शन करील ही अपेक्षा होती. पण कोणालाही तशी गरज वाटली नाही, या गोष्टीचा अपमान वाटू लागला.

मध्येच वाटायचं, साभार परत कथांची रास परुळेकरांच्या टेबलावर ओतावी. चेहऱ्यावर अस्पष्ट स्मित ठेवून ते बोलले असते,

"लिहीत रहा!"

वर्ष दोन वर्षांनी कळत नकळत उमजू लागलं की काहीतरी लिहिल्याशिवाय आपल्याला करमत नाही. उर्मी येते. सिगरेट ओढण्याची वेळ टळून गेली की जी स्थिती होते तसंच काहीतरी होऊ लागलेलं आहे. परुळेकरांनी रुंद हसून म्हटलं असतं,

"उर्मी येते? मग लिहित रहा!"

एक जाणकार मित्र म्हणाला,

"लघुकथा ही तरुण मुलीच्या स्कर्ट सारखी असते. ती जर लांब, दीर्घ लिहीली तर विषय झाकला जातो. ती जेवढी शॉर्ट करशील तेवढी विषयाविषयी उत्सुकता वाढते!"

दुसरा म्हणाला,

"कादंबरी खिशात ठेवायचं नाटक असतं."

आपण लिहितो म्हणून असे मिश्कील जाणकार मित्र आसपास फिरू लागले. हेही कमी नव्हतं!

मग एका साहित्यातल्या दर्दी माणसाची गाठभेट झाली. अशीच. हस्तलिखित वाचून झाल्यावर त्यानं चष्मा टेबलावर ठेवून म्हटलं,

"मिस्टर सावंत, तुमचा पिंड कथाकाराचा किंवा कादंबरीकाराचा नाही हे निश्चित. तुम्ही अस्वस्थ आहात. पण तुम्ही चिंतन करू शकता. कथा कादंबरीत नाट्य, घटना, संवाद, सुरुवात

शेवट इत्यादी गोष्टींची केंद्रस्थाने, बलस्थाने जेवढी घट्ट बांधणीची कराल तेवढी तुमची कलाकृती दर्जेदार ठरत जाते. पुस्तकाचं भाग्य त्याच्या वाचकाच्या आकलनशक्तीवर असतं."

"मग मी काय करावं?"

"मी एक वाचक आहे. तुम्हाला मार्गदर्शन करण्याचा मला अधिकार नाही. पण तुम्ही विस्तृत, शब्दांची काटकसर न करता तुमचे चिंतन व्यक्त करीत लिहा. तुमचे विचार काहीसे डिस्ट्रक्टीव्ह वाटतात. लेखनामागे लेखकाचं व्यक्तिमत्व थोड्याफार प्रमाणात व्यक्त होत असतं. जीवनातली विफलता जी. ए. कुलकर्णी किती ताकदीनं व्यक्त करतात ते बघा. तुमचा पिंड बराचसा संशोधकासारखा वाटतो. तेव्हा, तुमचे लेखन त्या दृष्टीने व्हावे. मृत्यू हा विषय अप्रिय असला तरी मानवाला त्याचं नेहमी आकर्षण वाटत आलेलं आहे. त्याकडे कुतूहलाने बघण्याचा दृष्टिकोन योग्य शब्दात मांडणं हा प्रयोग सोपा नाही. तुम्ही अंतर्यामी प्रामाणिक आहात तेव्हां चांगलं लिहू शकाल."

जाणकारानं गोड शब्दात आपल्यातल्या बऱ्याचशा फांद्या छाटून टेबलावर नुसतं खोड उभं करून ठेवल्यागत वाटलं. पण त्याचा उद्देश सहृदय होता. काही महिने विचार केल्यावर जाणकार खरं तेच बोलला हे पटलं. आपल्या भाषेला लालित्य नाही.

वारुळातून मुंग्यांनी भळाभळा बाहेर पडून जमिनीवर सैरावैरा पसरवावं तसं शब्दांचं होतं. मग त्यांचं आक्रमण वाटू लागतं. आपण अनुभवाने, सरावाने शब्दाला मोताद आहोत. परंतु आकृतीबंद लेखन करणे हा वेदनामय अनुभव आहे. दोन तीनशे पानांचं बाड संपादकांकडे, प्रकाशकांकडे वाचायला देवून महिनेच्या महिने धडधडत्या छातीनं वाट पाहीली. लेखनबाड परत आल्यावर जीवनातली निरर्थकता व्यापक वाटू लागली. आपण खरंच इथे तिथे, कुठंच नाही होत. पावसाळयातली कुत्र्याची छत्री झालो आहोत.

आणि मग -- पुनर्लिखित केलेलं बाड अगदी अनपेक्षितपणे एका प्रकाशकानं स्वीकारलं! आर्थिक मदत मागून.

---------वाटलं, आपण जगप्रसिद्ध झालोत!

आपल्या नावावर एक पुस्तक प्रसिद्ध होत आहे, हा विचार जीव गुदमरून टाकणारा होता.

---------विलोभनीय होता.

-------आयुष्य कॅडिलोस्कोपी वाटू लागलं.

●

तो खुर्चीतून उठला.

"गाडी तयार आहे साहेब. सात तासांचा प्रवास आहे. तिकडे गेस्टहाऊसची व्यवस्था झालीय. आपण रात्री आठला पोचू. उद्या ब्रँच मॅनेजरला सकाळी दहाला बोलावलंय. अकाउंटंटनी दिलेल्या सर्व फाईल्स नीट बॅगेत आणि बॅग डिकीत ठेवलीय. निघायला हवं."

---- रघुनाथ राणे आत्मीयतेनं बोलत होता. केबीन सोडताना श्रीपाद सावंत सगळया स्टाफला उद्देशून गमतीनं म्हणाला,

"जेथे जातो तेथे तू माझ्या सांगाती! रघुनाथ राणे आणि मी गेली पंचवीस वर्षे या बँकेत एकत्र आहोत. माझी जिथे जिथे बदली झालीय तिथे तिथे हे गृहस्थ पाठीला पाठ लावून आलेत! आम्ही मागच्या जन्माचे भाऊबंद असावेत!"

---- स्टाफ हसला. साहेब बोलले! अगा हे अवचित घडले! फार क्वचित इतके मोकळेपणानं बोलतात. रघुनाथ राणेच्या अंगावर प्राजक्ताची फुलं पडल्यागत झालं. धन्य धन्य. साहेब क्लेरीकलपासून सिनियर ब्रँच मॅनेजरपर्यंत हळूहळू पायऱ्या चढले. या पंचवीस वर्षांत काहीजण जनरल मॅनेजरपर्यंतही गेले म्हणा, पण आपले साहेबही सिनियर ब्रँच मॅनेजर झाले. हे ही कमी नाही. फार काम करतात. लग्नानंतर पत्नी घर सोडून गेली. कर्तृत्ववान बाई! राजकारणात नावारुपाला आली. पण त्याचा फायदा आपल्या सावंत साहेबांनी कधी घेतला नाही. तसा मानी माणूस! त्याच्या खाजगी आयुष्यात कोणी डोकावलेलं त्यांना मुळीच आवडत नाही. तसे अगदी मोजके मित्र आहेत. आपले साहेब हॉटेल पार्ट्यांना जातात. ड्रींक्स घेतात काही बाही करतात! पण त्यांचा उपद्रव शेजाऱ्याला नसतो. टच मी नॉट ॲटीट्युड. त्यामुळे अध्यात मध्यात नसणारा सावंत साहेब बऱ्याच जणांना आवडत नाही. थोड्यांना आवडतो.

एकमात्र खरं. रघुनाथ राणे आणि सावंत साहेब एकाच वर्षी बँकेत लागले. साहेब क्लर्क म्हणून. राणे प्यून म्हणून. पंचवीसवर्षांत साहेब सीनियर ब्रँच मॅनेजर झाले आणि राणे रेकॉर्ड क्लार्क. या कालावधीत साहेबांच्या तीन ठिकाणी बदल्या झाल्या. गंमत म्हणजे, आठवड्याभरात रघुनाथ राणेचीही बदली त्याच ठिकाणी झाली! हा एक योगायोग. पण असे योगायोग विचार करण्यासारखे नसतात. या योगायोगांनी आपल्या वैयक्तिक जीवनात उपद्रव झालेला नसतो. हे अगदी सहजपणे, आपोआप घडतं. पाण्यात कागदी नाव सोडावी तसं.

आणि यात फार आश्चर्यही नाही. एकाच टेबलखुर्चीत तीस पस्तीस वर्षे बसून निवृत्त होणारे लोकही बघण्यात आहेत! ही मॅनेजमेंटची पॉलीसी असते. त्यात अप्रूप काही नाही ००. श्रीपाद सावंतला रघुनाथ राणे हा माणूस आवडायचा. उंच. किडकिडीत. सावळा. नेहमी पांढरास्वच्छ शर्ट आणि पँट घालणारा. मरणाचा स्वच्छ!

-----रघुनाथ राणेची स्वच्छता हा एक विषय होता. टिनोपाल माणूस. प्यूनचा युनिफॉर्म नेहमी झगझगीत. इस्त्रीत. पायातल्या चपलांना काळं पॉलीश. गुळगुळीत दाढी. पेपराची घडी घालताना त्याची चार टोकं नीट लावून सावकाशपणे घडी घालायची. पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत वाचायचं. पेपर वाचण्यासाठी रोज अर्धा तास बँकेत आधी यायचं. हातात घेतलेल्या कोणत्याही वस्तूवर अतोनात प्रेम, काळजी करायची. मन लावून स्टाफच्या टेबलखुर्च्या साफ स्वच्छ करायच्या. साहेबांचं केबीन, पेपर्स, कॅलेंडर, काचा स्वच्छ स्वच्छ. स्टाफला नेहमी वाटावं की आपण मंदिरात जात आहोत. गजाननाच्या फोटोला एक साधा हार आणि उदबत्तीचा सुगंध.

हा माणूस चाळीत रहायचा. पण घरात चकचकाट. प्रत्येक भांड्याची स्वतःची ठरलेली जागा. इकडचं भांडं तिकडे काय होईल? कपाटातली मोजकी शर्टस् पँटस्. मुलांचे कपडे हँगर्सना ओळीत लावलेले. खालची गुळगुळीत फरशी, भितींना डिस्टेम्पर. पण एक ठिपका दिसायचा नाही. साधा डास दिसला तरी त्यानं उडून जावं. भांड्यामध्ये घरातल्या माणसांच्या हालचाली

दिसायच्या. भांडयात बघून भांग पाडावा. घरातली माणसंही राणेच्या शिस्तीत तशीच जन्माला आलेली. प्रतिकाराचा ब्र नाही. एक मुलगा, एक मुलगी. सावळीच, पण देखणी. शाळेत नेहमी नंबर घेणारी.

राणेची सिगरेट ठेवण्याची एक स्टीलची चकचकीत चौकोनी डबी होती. दिवसातून फक्त तीन सिगरेटस्. मोजून घ्यायच्या. चवदारपणे ओढायच्या. त्याआधी सुगंधी सुपारी तोंडात टाकायची. त्यामुळे मिश्र वासात राणेच्या जवळ बसावसं कोणालाही वाटावं. माणूस तसा मितभाषी. राजकारणावर ऐकणं त्याला आवडायचं. कोणी वाद घातला तर माघार घेणारा. आयुष्य असं तोलून मापून झकासपणे जगायचं. साधेपणाने, धार्मिकपणे समाधानी रहायचं. या जगण्यावर शतदा प्रेम करावे. कोणाला सल्ला नाही. युनियनची जवळीक फक्त फी भरण्यापुरती. बँकेचा स्ट्राईक, मोर्चा, बंद म्हटलं की जीव तुटणारा हा एकमेव कर्मचारी. प्रमोशनसाठी कुरकुर नाही. ठेविले अनंते तैसेची रहावे.

राणेनं शृंगारही अगोदर ठरवून, बायकोला विचारून, तिचा मूड बघून, भविष्याचा हिशोब करून केला असावा असं स्टाफ म्हणे!

इतक्या वर्षांची ओळख असूनही श्रीपाद सावंत साहेबांकडे कामापलीकडे केव्हां बोलणं केलं नाही. तक्रार नाही. असा पापभिरू माणूस सगळयांना हवा असायचा.

घिसाडघाई, बेशिस्त, बेफिकीर स्टाफला राणेचं आयुष्यमान अजीर्ण व्हायचं. काहीजण त्याला टाळायचे. तरुणवर्ग चेष्टा करायचा. राणे माफक हसून विसरून जायचा. अशा माणसाला नक्की कसा बिघडवावा हे कोणालाच कळत नव्हतं. त्या काळातला हा फायनल. पण पेपराचं नियमीत वाचन. त्यामुळे मोजकंच बोलताना ज्ञानी वाटे. व्यवस्थेशी जागरूक वाटे.

श्रीपाद सावंतला या माणसाचं कुतूहल वाटायचं. त्याला माहीत होतं. रघुनाथ राणे जरी मितभाषी असला तरी आपण त्याला थोडीशी सलगी दाखवली तर तो भळभळा बोलू लागेल.

कथानकासाठी आपल्यातल्या लेखकाला एक पात्र मिळेल. माणसं अशी उत्सुक असतात. पण आपल्याजवळ यायला बिचकतात. कारण आपण स्वतःभोवती निर्माण केलेलं कवच. सारी माणसं या कवचापलीकडे. आई नाही. शामही नाही. त्यामुळे श्रीपाद सावंत एकलकोंडा, अबोल, माणुसघाणा आहे. घमंडी म्हणा. लग्न होऊन दीड तप बायकोपासून दूर राहीलेला माणूस. विक्षिप्त वागेल नाहीतर काय? पण त्याला कोणाच्या सहानुभूतीची गरज वाटली नाही. आपण भले. इतरही भले.

----कारमध्ये ड्रायव्हरशेजारी रघुनाथ राणे बसला. मागच्या सीटवर पेपर मांडीवर ठेवून श्रीपाद सावंत. कारनं शहर सोडल्यावर राणेनं प्रथमच विचारलं,

“साहेब, एखाद्या पुलाशी गाडी थांबवायला सांगू?”

“का?”

“आत बसवत नाही.”

“अरे, ए. सी. कार आहे राणे!”

“टूरीस्टवाले केव्हां गाड्या धुतात काय? पुलाशी नदी असेल. मी आणि ड्रायव्हर प्रथम गाडी धुवून काढू. अर्धा तासच उशीर होईल!”

----टूरीस्ट कारवाला गुरगुरला,

“दिवसाला दोन अडीचशे किलोमीटर गाडी पळत असते. रात्रीचा मुक्काम असला की आम्ही पेट्रोलपंपावर आंघोळ करतो. नी गाड्या धुतो. ही गाडी काल रात्रीच धुतलेली आहे. आणखी काय सालडी काढणार तुम्ही?”

----श्रीपाद सावंत हसला.

“राणे आपण प्रवास करू.”

रघुनाथ राणे गप्प बसला. साहेब म्हणतील ती पूर्व. ऑफीसनं एक स्टेनो आणि पी. ए. दिला होता. पण सर्व्हेसाठी बरोबर हा रेकॉर्ड क्लर्क राणेच असायचा. चोख बंदोबस्त ठेवायचा. राणेची कुरकुरही नसायची.

----ब्रँच मॅनेजर अरविंद आगाशे श्रीपाद सावंतला ज्यूनियर. त्याच्याकडे कोकणातली ब्रँच दिलेली. त्याने एका पार्टीला तिची तालुक्याची प्रॉपर्टी तारण ठेवून दहा लाख रुपये कर्ज दिलेलं. बँकेच्या हेडऑफीसवरून गुप्त माहीती आली की त्या पार्टीची प्रॉपर्टी अस्तित्वातच नाही! बनावट कागदपत्रे देवून आगाशेकडून दहा लाखाचं कर्ज उचललेलं होतं. बँकेला चुना लावला होता! श्रीपाद सावंतला मेमो आला. प्रत्यक्ष तालुक्याला जाऊन रिपोर्ट पाठवा. निपक्षपाती निर्णय घेऊन तुमच्या मते आगाशेवर नक्की किती चार्जेस लावायचे ते कळवा. आगाशेनं स्वतःची फायनान्शियल पॉवर एक्सीड केलेली आहे का? नजरचूक, कामाचं प्रेशर की, पार्टीशी ओले हात? आगाशे डॅशिंग आहे. नवीन आहे. त्याला समज देणं गरज आहे. तुम्ही ठरवा. कळवा. पुढचं एच.ओ. वर सोडा.

अरविंद आगाशे पस्तिशीचा तरुण. गलेलठ्ठ. बोक्यासारखा घारा हसरा. काळेभोर दाट केस. भव्य कपाळ. खुशालचेंडू वृत्ती. आल्या आल्या त्यानं श्रीपाद सावंतवर कब्जा घ्यायला सुरुवात केली ०००

“सावंतसाहेब! रिलॅक्स! आकाश फाटलेलं नाही. पार्टीने बोगस पेपर्स दिलेत. त्याच्या चार्टर्ड अकाउंटंटला मी दम दिलाय. तू व्हेरीफाय करून पार्टीचे पेपर्स बँकेकडे पाठवले आहेस! जर का ते बोगस निघाले तर तुझं लायसन्स रद्द करीन! तो आणि पार्टी आता नरम झालेत. चिंता नको. त्यांना सांगीतलं. आमच्या लीगल डिपार्टमेंटचे लोक पोलीसांसारखे आहेत. वसुली कशी करतात ते कळेल! रात्री अपरात्री येतील. दार ठोठावतील आणि सामान बाहेर फेकतील! सी. बी. आय. कडे केस गेली तर इज्जतचा पंचनामा होईल -----”

"मिस्टर आगाशे! प्लीज वेट. मी इथे हेडऑफीसच्या हुकुमानुसार तपास करायला आलोय. मला माझ्या पद्धतीप्रमाणे जाऊ द्या. तुम्ही काय काय केलंत त्याचा रिपोर्ट संध्याकाळपर्यंत पाठवा. नो इल फीलिंग्ज प्लीज!"

----आगाशे गडगडा हसला. त्याचं शरीर अस्वलासारखं हलू लागलं ०००० श्रीपाद सावंतला नवल वाटलं. माणसं इतकं बिनधास्त कशी जगू शकतात? त्याच्या जागी आपण असतो तर पहिल्यांदा जीव देण्याचा विचार डोक्यात आला असता! डोळे मिचकावून आगाशे बोलला,

"साहेब रिलॅक्स! सर्व काही ठीक होईल. नो प्रॉब्लेम! रात्री तुम्ही माझ्या घरी जेवायला यावं. ब्राह्मण आहे, पण माझी बायको पापलेट फ्राय छान करते! वाटल्यास ओली पार्टी -----"

"थँक्स. मी बँकेच्या गेस्ट हाउसमध्येच रात्रीची वस्ती करीन. शेजारचा सिंगलरूम राणेसाठी आहे. नो फॉरमॅलिटीज प्लीज!"

आगाशे प्रसन्न हसला. आदबीने खांदे उडवून निघून गेला. श्रीपाद सावंतला ही अशी नम्रता दाखविणारी माणसं घातकी वाटत. बँकेची गाडी घेऊन एका ज्युनीयर ऑफीसर आणि राणेबरोबर त्यानं दिवसभर भ्रमंती केली. पार्टीनं खरंच डोळयांत धूळ फेकली होती. गहाण ठेवलेल्या प्रॉपर्टीच्या ठिकाणी नुसते लाकडाचे मळलेले बोर्ड उभे होते. आत फॅक्टरी मशीनरी काही नाही. सारं हवेत झुक्कन विरून गेलेलं!

शेजारच्या लोकांच्या मुलाखती घेतल्या. सर्वामुखी एकच पालुपद. पार्टी बिलंदर आहे. तुमच्याच काय, आणखी तीन बँकांना त्यानं टोपी घातलीय! आहात कुठं? आणि तुम्ही बँकवाले तरी कागदावर पांढऱ्याचं काळं करण्यापलीकडे काय करणार? पार्टीला माहीत आहे. तुमचा ब्रँच मॅनेजर आगाशे मोठा गोडबोल्या आहे. कसा फसला देव जाणे! पण तुम्ही त्याला सस्पेंड करणार. पुढे काय? हे षडयंत्र आहे साहेब! आगाशेचे हात वरपर्यंत पोचलेत. बापजाद्याची कमाई आहे

त्याची! तुमचा रिपोर्ट एक आयवॉश आहे. मॅनेजमेंटला इमेज ठेवायची असते. पार्टीला राजकीय पाठबळ आहे. डोळयांत तेल घालून व्यवहार चाललेला आहे. वगैरे. दुसरे काय?

श्रीपाद सावंत ऐकत होता. परिसराचा फोटो घेत होता. स्वतःची मतं तयार करीत होता. पब्लीक बोलत होती त्यात तथ्य असलं तरी पुरावा नव्हता. आपला रिपोर्ट खरंच एक ऑफिस प्रोसीजर, आयवॉश. आगाशेवर चढलेली मलयी उतरविण्याची हीरोगिरी आपल्याला करायची नाही. जे दिसलं, ऐकलं ते लिहीलं. पुढचं तुम्ही बघा. आगाशेला लटकवा नाहीतर गळयात हार घाला. आपल्याला सुखदुःख नाही. राणेमात्र सावलीसारखा बरोबर फिरत होता. त्याला खूप वाटत होतं. गलिच्छ आगाशेला लॉकअप करावं. आपल्या सावंत साहेबांना प्रमोशन मिळावं.

श्रीपाद सावंत शांत होता.

गेस्ट रूमवर आल्यावर त्यानं केअरटेकरला आणि राणेला करडया शब्दात सांगीतलं. मी गुप्त रिपोर्ट तयार करतोय. रुममध्ये टी. व्ही. कॉम्प्यूटर ऑन असेल. मी फार उशीरा झोपणार आहे. त्यामुळे उद्या उशीरा उठेन. मला बेल वाजवून त्रास देवू नका. राणे, तुम्हाला लवकर उठायची सवय असेल. मॉर्निंग वॉकला जा. पण मी स्वतः बेल वाजवीपर्यंत कोणीही माझ्या दारावर टकटक करायचं नाही. कळलं?

कळलं.

केअरटेकर आणि राणेला कळलं. आगाशे साहेबाचे दिवस भरलेत. खाबुगिरी वर आलीय. बरं झालं. गलेलठ्ठ झालाय भडवा. स्टाफशीपण उद्धटपणे वागतो म्हणून ऐकलंय. घरात नवं फर्निचर, टी. व्ही., फ्रीज, स्टीरीयो, मायक्रोवेव्ह दर महिन्याला घुसत गेलं ते काय एकट्याच्या पगारावर? आता सावंतसाहेब आलेत. रात्री उशीरापर्यंत आगाशेचा पंचनामा लिहिणार आहेत. जोखमीचं काम आहे! त्यांना त्रास देणं नकोच. भजगोविंदा!

गेस्टरुममधला डबलरुम त्यानं लाईट लावून पाहीला. छान होता. आत दोन टी. व्ही., फोन, कॉम्प्यूटर, गुबगुबीत, बिछाना, सुबक टक्क फर्निचर, बाथरुम टॉयलेट, ऍशट्रे, वॉर्डरोब, हॉलमध्ये ड्रेसिंग टेबलाचा संपूर्ण उभा आरसा. सारं काही. एकट्यासाठी परीपूर्ण.

असा एकांत किती महिन्यात मिळाला नव्हता. पोट रिकामं होतं. श्रीपाद सावंतनं बॅग उघडली. कपडे काढले. स्वच्छ शॉवरबाथ केली. आगाशेच्या कर्तुत्वाची दिवसाभराची मरगळ पाण्याबरोबर गेली.

आरशात स्वतःला संपूर्ण नग्न पाहिलं.वय वर्षे सत्तेचाळीस. फार नाही. तीन वर्षांनी पन्नाशी लागेल. पण आज सत्तेचाळीस आहे. देहाची अवकळा कशी होते ते कळत होतं. देह देवाचे मंदिर. मंदिरातलं मांगल्य पार सुकून गेलंय. आपल्याला तसं जगायचं नाही.

बॅगेच्या तळाला असलेली व्हिस्कीची बाटली काढली. हा असा एकांत मिळेल हे माहीत होतं. मित्रांबरोबर आपण एखाद वेळी घेतो. पण मामुली. आपलं कवच तडकणार नाही याची काळजी घेतो. पण आज खूप प्यायचीय. साला आऊट होणं म्हणजे नक्की काय ते कळेल. केअरटेकर आणि राणे बऱ्याच दूरवर आहेत. आऊट कसं होतात? सिनेमात कसे झुलत झुलत बोलतात? दॅट इज् लाईफ! एक तमाम बेहोशी. धुंद. जगाला सलाम करण्याची. जग उधार देण्याची. जगाचं मोफत दान करण्याची. आपण कल्पनेला मोताद आहोत.

----व्हीस्कीची गडद लाल काळसर बॉटल. श्रीपाद सावंतनं बॉटल गालावरून फिरवली आणि परत आरशात पाहीलं. उद्दीपित वाटलं. व्हिस्कीची संगत एखाद्या टच्च तरुणीसारखी वाटली. मदहोषी. ज्वालेसारखी. धमन्यात अंगार वहाणारी. मस्तकात कॅडीलोस्कोपी दाखवणारी.

----टी.व्ही. लावला. अरनॉल्ड सिंग्रोफीक्सचा ' टर्मिनेटर ' लागला होता. हा माणूस यंत्र आहे. तो जे करील ते अशक्य वाटत नाही. चेहऱ्यावर दृढ शांत आत्मविश्वास. थंड नजर. शरीराचं पिळदार बलदंड लोखंड."आय विल् बी बॅक"म्हणेल तेव्हां समोरच्या इमारतींचा, गाड्यांचा,

माणसांचा चक्काचूर होणार असतो. हा मात्र भस्मासुरासारखा उभा. तो करतो ते पटत जातं. इतरांवर अन्याय होत असेल हा विचारही सिनेमा बघताना होत नाही.

कोणी बेल दाबलीच तर ऑफिसचं काम करतोय दाखवायला कॉम्प्यूटर ऑन केला.

श्रीपाद सावंत सुखावला. आपल्या हातून झुरळही मारलं जाणार नाही आणि इथे अरनॉल्ड जगाचा धुव्वा उडवतोय. टर्मिनेटर दोन तास विध्वंस करणार. ग्लासात व्हिस्की घेतली. सोडा ओतला. आरशासमोर खुर्चीत बसून स्वतःच्या प्रतिमेलाच चिअर्स केलं आणि हळू हळू घुटक्यांनी ग्लास संपवला. संपवू लागला. समोर ताटात चिकन तंदूरी ब्रेड भरपूर होता. वर पंखा गरगरत होता. बॅगेतून आणलेलं फरसाण, मुगडाळ, तिखट शेंगदाणे, काजू ०० दुसरा पेग पोटात गेल्यावर ऊष्ण वाटू लागलं. झूsssम! तिसऱ्या ग्लासानं, कांद्यानं, वजन हलकं झालं आणि आश्चर्यकारक तरंगल्यागत वाटू लागलं. ग्रेट! टू द हेल्थ ऑफ ०० हे!! नर्मदा!

-----नर्मदा!

नजरेपुढच्या वस्तूंवरून टपटप डोळे फिरविले तर त्या वस्तूंनाच स्वतःची संथ गती आली. वस्तू हळूहळू रांगेत येवून स्थिर होऊ लागल्या. झिलमिल झळकणाऱ्या प्रवाहासारख्या. लय घेणाऱ्या.

अरनॉल्डनं मशीनगननं दिसेल त्याचा चुरा करायला सुरुवात केली होती. त्याच्या मिशनमध्ये इतकी माणसं पटापट मरत होती. त्या प्रत्येक मरणाराचीही बायका पोरं असतील. म्हातारे आईबाप असतील. कोणी घरचं आजारी असेल याचं दुःख करायला अरनॉल्डला वेळ नसतो. प्रत्येक मृत्यूवर विचार करायला प्रेक्षकांना पण वेळ नसतो. तो मनुष्यसंहार करीत आहे याची खंत नसते. कारण तो प्रेक्षकांचा दूत असतो. आगीचे प्रचंड डोंब मागं टाकून तो पुढं पळत असतो. आजच्या माणसाची सूप्त हिंसा ती हीच काय?

चौथं ग्लास रिचवलं. सिगरेट पेटवली. सावकाशपणे उठून बॅगेतून आणलेली सी. डी. दुसऱ्या टी. व्ही. प्लेअरच्या स्लॉटमध्ये सरकवली. ' पॉर्न ' क्लिक झालं ०००० 

०००० मस्तक, घसा, पोट, डोळे सारे अवयव एकाच वेळी चाळवून जळजळू लागले. उत्तेजित झाले ०००० उत्तान शरीराचे मांसल जमाखर्च दाखवणाऱ्या पौष्टीक तारुण्याला बघताना श्रीपाद सावंतला तरंगतं आश्चर्य वाटू लागलं ००० आपलं आयुष्य तांबडया जर्द प्रकाशाखालून पसरत चाललेलं आहे ०० इथे भीतीने केव्हाच आत्महत्त्या केलेली आहे.

योग शास्त्रकार म्हणतात की इंद्रियसुखाविषयी निःस्पृहता ज्या प्रमाणात वाढत जाते त्या प्रमाणात मानवाच्या अंतःकरणातील रजोगुण कमी होऊन सत्वगुण वाढीस लागतो. बाह्य वस्तुनिष्ठ सुखे कितीही मिळाली तरी वासनांची तृप्ती होत नाही. उलट तूप अग्नीत ओतल्यावर तो ज्याप्रमाणे अधिकच भडकतो, त्याप्रमाणे विषयसेवनाने वासनांचा उपशम न होता त्या अधिकच वाढतात ००० म्हणूनच भोगवृत्तीचा निचरा होऊन त्यागवृत्ती वाढली पाहिजे. तोच खरा मनुष्यधर्म!

----भले! खरांय!

---- श्रीपाद सावंतला तरंगतं नवल वाटलं.

----- समोर ब्ल्यू फिल्मवर कायकाय चाललेलं आहे-----

---- पाच पेग्ज व्हिस्की, चिकन तंदुरी आणि सटरफटर पदार्थांनी वासनांचा एक परीपूर्ण रंधा पोटात चाललेला आहे. वॉशिंगमशीनमध्ये शिस्तबध्दपणे कपडयांचा फिरत रहातो तसा.

अरनॉल्डनं मशीनगननं कितीतरी वासनामय काही आजारपणामुळे डॉक्टराच्या ट्रीटमेंटखाली असलेली, स्वार्थी, कपटी, मालकाची मनोभावे नोकरी करणारी, कर्जबाजारी आयुष्यं अशी गवतासारखी उपटून चिरडून टाकलेली आहेत ०००

---- आणि या आयुष्यात खरं काय, खोटं काय हे न कळण्याच्या सीमेवर आपण झूsssम तरंगत कसरत करीत आहोत! हे!!

समोरच्या आरशात या स्थितीतले खरे खरे आपण आपल्यालाच बघत आहोत.

चिअर्स!!

ही प्रतिमा वैरी नाही.

पण सी. डी. तल्या प्रतिमांचं काय?

तारुण्य. बेधुंद. बेभान. देखणं. एकमेकावर तुटून पडणारं. लूटमार करणारं. इथे दुसऱ्याचा द्वेष नाही. चारित्र्यांचा शोध नाही. ना खंत ना खेद. फक्त आनंद. मस्ती. मदहोषी. कैफ.

या मनुष्यवस्तीत आपण इतके एकरुप होत असताना नेमके योगशास्त्रकार का आठवावेत? हे काहीतरी--- भयानक अश्लील समीकरण झालेलं आहे!

सी. डी. तल्या मनुष्यवस्तीला समाज, घरदार, आईबाप, भाऊबहीण कोणीच नसावं का? कोणत्या संस्कारात ही माणसं तरुण झाली? कळत नाही. या पृथ्वीवर काय काय चाललेलं आहे? जमिनीवरचे थर आणि या माणसांचे थर कोणत्या पातळीवर जात आहेत?

विकृती हा देखील आयुष्याचा एकांतातला अविभाज्य घटक आहे. म्हणूनच ज्ञानी सांगतात की शक्यतो एकांत टाळा. या एकांतातले क्लोजअप्स डोक्यात झूssन्न, झमझम, झांजा वाजवू लागले आहेत. अनावर झालं००००० झिंगलेल्या मस्तकात गोड झिणझिण्या उठल्या सिक्स्टी ट्रिलीयन सेल्स उत्तेजित झाले. एकदा. दुसऱ्यांदा०० टू द हेल्थ ऑफ----- नर्मदा!

-------नर्मदापण सरकारी गेस्टहाऊसमध्ये अशीच रहात असेल.

-------नर्मदा तरुण स्त्री आहे.

-------लग्नानंतर तिनं आपल्यापासून कदाचित नको तितकं शरीरसूख घेतलेलं आहे.

-------एकांत शरीरांना आव्हान करतो हे नैसर्गिक आहे.

-----तिच्या चुटकीवर सारी व्यवस्था हात जोडून उभी रहात आहे. तिच्यापुढं वाकत आहे!

--------म्हणजेच, तिला सी. डी. व्यवहार माहीत असतील!

--------नर्मदा प्रचंड गर्दीतली एक स्पष्ट व्यक्ती आहे.

--------उभ्या अंगठ्या सारखी.

--------या मनाला विरंगुळा, श्रांतपणा, शिथीलता, तृप्ती देणाऱ्या सी. डी. अमर्याद. लाटालाटांनी येणाऱ्या.

-----श्रीपाद सावंतचं समाधान झालं. गलितगात्र वाटत होतं. त्याच्या मेंदूत किडा वळवळला.

------नर्मदा जर सी. डी. बघत असेल तर दाराबाहेर तिचा अंगरक्षक काशीनाथ सूर्वे खुर्चीत बसलेला असेल!

------तिचा अरनॉल्ड तोच! आभाळव्यापी.

------त्याला प्रचंड घाम फुटला. वरचा पंखा केवळ, निरर्थक झाला होता. बोटांची गिचमीड वळवळ वाटत होती. घामानं अंग चिपचिपीत झालं. घबराट वाढली. आपल्याला हाय बी. पी. आहे का? असलंच तर हार्टअटॅक दाराबाहेर उभा राहून पाच मिनिटात आत येणार आहे का?

------असा झडप घालणारा मृत्यू आपल्याला हवा आहे!

आपण मात्र अनंतात विहारत असू!

काय गंमत आहे! इतकी वर्षे या शरीरात आपण विहार केला, चोचले केले, डॉक्टरकडे प्रसंगी नेलं, मनसोक्त, कुरवाळलं, आणि हे सारं साम्राज्य काही क्षणात निष्क्रीय होऊन आपण नितांत सुंदर अनंतात निघालो आहोत. इथे आज नाही. उद्याही नाही! ०००० 

श्रीपाद सावंतनं स्वतःला सावरलं. मनाच्या कुठल्याशा दिशेला त्याला कळलं. अरे! आऊट होणं ते हेच.

मग त्याला प्रामाणिकपणे सज्जन व्हावसं वाटलं ००

-----तोल सावरीत टी. व्ही. कॉम्प्युटर, सी. डी. प्लेअर बंद केला. काय काय करून वस्तू परत ठेवायच्या होत्या ०० खाण्याच्या प्लेटस् सिंकमध्ये ठेवल्या. व्हिस्कीची उरलेली बाटली नीट गच्च बूच लावून व्यवस्थित बॅगेत ठेवली. मस्त मस्त किक आली होती! झुलत असताना या साऱ्या वस्तू कशा पटापट जागी गेल्या! एरव्ही केवढा कंटाळा आला असता. जग साला किती निर्लज्ज, हींस्त्र, स्वार्थी, व्यभिचारी, लुच्चं, आहे! आपण एक प्रतिष्ठीत सीनियर मॅनेजर ऑफीस ड्यूटीवर चोख काम करायला इथे बंद चार भिंतीत आलो आहोत. आपण फार सभ्य आहोत. त्यानं लाईट घालवला. तत्पूर्वी चार भितींना मूळची पवित्रता आलेली आहे याची पुन्हा पुन्हा खात्री करून घेतली. समोरच्या आरशानेही ती मान्य केली. मग अंग मऊ मऊ बिछान्यावर झोकून दिलं.

------- आपण मेलो नाही. पण डोकं मणामणाच्या वजनानं जड झालेलं आहे. काळोखात डोळयासमोर गुलाबी लगदे लाटांसारखे उसळ मारीत आहेत. नर्मदा येत आहे. न पाहीलेला अंगरक्षक काशिनाथ सूर्वे येत आहे. तिची सावलीच झालेला ००० त्यानं मुठीत उशी गच्च धरली.

------ प्रथम चमत्कारीक अस्वस्थ वाटलं. घाम फुटला.

----- नंतर सुखे घुटके गिळू लागला. तोंडात चराचरा फुटणारी लाळ घुटक्यांना पुरेनाशी वाटेना. चूळ भरली.

----- मग पोटातून रेमटा उठला. गरम उष्ण डोह. पोटात घशात, गालात उसळणारा डोह. शरीर पिसासारखं हलकं झालं. प्रतिक्षिप्त क्रियांनी तो उठला. लाईट लावला. टॉयलेट्मध्ये जाऊन भडभडा ओकला. एकदा. दोनदा. तीनदा. पोटातली आतडी पिळवटून तोंडात आल्यागत झाली. डोळयांतून, नाकातून, भळभळा पाणी आलं. कमोडवर डोकं टेकून पंधरा मिनिटं तो फरशीवर नग्नपणे बसला. हातपाय पसरले. मग जड हातांनी त्यानं फ्लश केलं.

-----एकदम हलकं विदीर्ण वाटू लागलं. ओक्षाबोक्षी रडावसं वाटलं.

------पोटातलं सारं काही फ्लशबरोबर गेलं ००

------तो पार बापुडवाणा झाला. चिंब चिंब.

----नंतर उठून लाईट केव्हा बंद केला, कॉटवर बिछान्यात केव्हां पडला त्याला काहीही कळलं नाही. तो एक शून्य शून्य श्रीपाद सावंत झाला. अश्लाघ्यपणे धुगधुगत राहिला.

आपण हे का केलं? स्वतःला शिक्षा म्हणून? एक थ्रिल म्हणून! नर्मदेवरचा राग म्हणून?

-----काही कळत नव्हतं. डॅम इट!

रागाच्या भरात माणूस काय काय करून बसतो. झुरकन सकाळचे साडेआठ वाजले तेव्हां बाहेर कोवळं उन पसरलं होतं. डोक्यात घणाघात होत असताना श्रीपाद सावंतने डोळे उघडले. स्वतःची चमत्कारीक स्थिती कळली. ओशटपणे उठला. आपल्याला आणखी अवयव फुटले की काय, वाटू लागलं. हँगओव्हर होणार माहीत होतं. बॅगेतली सारीडॉन गोळी पाण्याबरोबर घेतली. सर्व वस्तू जिथल्यातिथं केल्या. अजूनही अंगं पिसासारखं हलकं वाटत होतं. आंघोळ केली. थोडं बरं वाटलं. ब्रेकफास्टसाठी बेल दाबायला हात खाली करणार तोच दारावर टकटक झाली. शर्ट पायजमा चढवून त्यानं दार उघडलं. बघतच उभा राहीला.

----- दारात ब्रँच मॅनेजर आगाशे आणि त्याची बायको उभी होती!

---- दोघंही एकमेकासाठी घडवलेली.

---- तृप्त. शांत. प्रसन्न. हसरी. पुष्ट.

"तुम्ही?"

दोघं आत आली. खुर्च्यात बसली. तिनं प्लास्टीकच्या पिशवीतून स्टेनलेस स्टीलचा गोल डबा आणला होता. त्याच्याकडे रोखून बघत डबा बाहेर काढीत ती स्वरयंत्र मधात बुचकळल्यागत गुणगुणली,

"हे म्हणाले, सावंतसाहेब इन्स्पेक्शनला आलेत. आज संध्याकाळी परत निघतील. सकाळचा नाश्ता म्हणून मी साजूक तुपातला शिरा आणलाय. खास तुमच्यासाठी. माझ्या हातचं खाऊन तरी बघा साहेब! काल रात्री आला असतात तर फिश फ्राय केलं असतं!"

----- श्रीपाद सावंत अवघडला. आगाशेकडे नुसतं बघत पुटपुटला,

"मिस्टर आगाशे, मला या फोर्मेलिटीज पसंत नाहीत म्हणून तुम्हाला बोललो होतो ना?"

----- आगाशेच्या बायकोनं नवऱ्याला हातानं खुणा करून गप्प बसवलं आणि तुकतुकीत चेहऱ्यानं हसून म्हणाली,

"साहेब! तुम्ही रागावलात?"

"तसं नव्हे मिसेस -----"

"कालींदी. कालींदी आगाशे. यांनी मला सांगीतलं होतं हो! पण मलाच रहावलं नाही. मागच्या खेपेला आपले जनरल मॅनेजरसाहेब आमच्या घरी जेवायला आले होते. एवढा मोठा माणूस, पण खूपच स्पोर्टी हो! श्रीनिवासन साहेब रात्री आमच्याकडेच वस्तीला होते. आम्ही तिघं अगदी पहाटेपर्यंत पत्ते खेळत होतो. हो की नाही हो?"

श्रीपाद सावंतला क्षणभर वाटलं की दूरवरून मंजुळ घंटानाद होत आहे. आगाशेनं बैलासारखी मान हलवली. खदखदा हसून म्हणाला,

"यात ऑफीशियल काही नसतं सावंतसाहेब! ही एक गुडविल पार्टी. नाहीतरी तुमच्यासारखी मोठी माणसं आमच्या घरात पायधूळ कशाला झाडतील हो?"

-----नंतरची पंधरा मिनिटे ब्रँच मॅनेजर आगाशे आणि त्याची मधाळ तत्पर बायको छानशी बडबड करीत होती आणि श्रीपाद सावंतच्या डोळयांपुढे रात्रीच्या सी. डी. चे लालगुलाबी तवंग येत होते. मग त्यानं हसल्यागत करून म्हटलं,

"मी तुम्हा दोघांचा आभारी आहे. पण तुम्ही आता मला थोडी उसंत द्या. माझं इथलं काम संपलंय. दुपारच्या नंतर निघायचंय. राणेला आवराआवर करायला सांगायचंय. तुमचा नाश्ता मी घेतोय. डबा केअरटेकरशी ठेवून जाईन. थँक्स वन्स अगेन!"

त्याची घाई बघून आगाशे उठला. त्यानं हस्तांदोलन केलं आणि वळला. नंतर कालींदीनं रोखून बघत हात पुढं केला. श्रीपाद सावंतनं हातात हात दिल्यावर तिनं तो हलकासा दाबला आणि घशातल्या घशात गुणगुणली,

"सांभाळून घ्या साहेब! मी केव्हां ओळख विसरत नसते. योग्य वेळी भरपूर परतफेड करते. येते! इटस् अ पार्ट ऑफ लाईफ!"

आणि गर्रकन वळून अंगाचा हिंदोळा करीत ती नवऱ्याबरोबर बाहेर पडली. सेंटचा मादक वास मागं ठेवून.

उघडया दारातून ती दोघं बाहेर पडताना, तिला नवऱ्याबरोबर स्कूटरवरून जाताना तो बघत उभा राहीला. तिच्या मऊसूत ऊष्ण सायीसारख्या पंजाची झिंग अजून उतरली नव्हती. बिछान्यावर बसला. गळल्यागत झालं. सेंटचा वास दरवळत होता. अठ्ठाविसाव्या मजल्यावरून लिफ्टनं झप झप झप झप खाली यावं असं वाटलं. ------तिनं जे काही केलं त्याची नवऱ्याला कल्पना असेल का?-------की------

-----नवऱ्याचे उपद्व्याप लपविण्यासाठी स्वतःची होळी करून घेत असेल? हे नवऱ्याच्या संमतीनं होत असेल तर तिच्यात आणि सी. डी. वरच्या तारुण्यात फरक तो काय राहीला? यात सशक्त विवेकी काय उरलं? किंबहुना सी. डी. तल्या पोरी अधिक प्रामाणिक आहेत.

------आगाशेनं बँकेच्या जनरल मॅनेजरला रात्रभर घरी पत्ते खेळायला ठेवलंय. म्हणजेच जनरल मॅनेजर श्रीनिवासन त्याला अगदी जवळचा आहे! किंबहुना आपण देत असलेली ही व्हिजीट श्रीनिवासनने अगोदरच आगाशेला फोनवर कळवली असेल! त्याचा एवढा घरोबा आहे.

पुढच्या पत्त्यांच्या डावाची तारीख नक्की केली असेल! तेव्हां आपला हा रिपोर्ट नुसता आयवॉश आहे! सुरळी करून घालण्यासारखा.

कालींदी एक वाक्य त्याच्यासाठी हलकंच ठवून गेली. तळहातावर पीस ठेवून हलकीच फुंकर मारल्यासारखी. इटस् अ पार्ट ऑफ लाईफ! सेंटची मादक दरवळ आणि तिचं ते कोणाचंही हृदय दोन बोटांनी हलकंच उघडीत नेणारं वाक्य! गर्रकन वळून अंगाचा हिंदोळा करताना दिलेलं सूचक आव्हान!

आगाशेसारखे पुरुष जन्मावे लागतात.

बायकोला समोर बसवून स्वतःच्या करीयरसाठी मग घरातली ग्रँड रिडक्शन सेल प्रामाणिकपणे तिला पटवून, तडजोड, करून घ्यावी लागते.

------तिलाही ते मनापासून पटावं लागतं.

------आणि आपल्यासारखेही पुरुष जन्म घेतात. सारेजण एका ओळीत सरळ जगत असतात.

आपण लेखक झालो आणि नको तितके इतरांच्या आयुष्यात डोकावू लागलो. त्यामुळे दुःखाचे पापुद्रे दिवसेदिवस उलगडीत बसलो आहोत. इज इट अ मेंटल बँकरप्सि ऑर-----

--------इज इट ऍन इंटलेक्च्यूअल पोएट्री?

●

ऑफिसला येवून आगाशेचा रिपोर्ट हेडऑफीसला पाठवला. टेबलावर दुसरं एक एन्व्हलप पडलं होतं ते उघडलं. वाचलं. तुकडे तुकडे करून डस्टबिनमध्ये टाकलं. सिगरेट पेटवली.

कोणीतरी तिरक्या अक्षरात निनावी पत्र लिहिलेलं होतं.

*' महाशय,*

*गेल्या वर्षी तुम्ही लिहिलेल्या पुस्तकाची खपाची चौकशी केली ती अशी ----*

*पुस्तक बाहेर पडल्यावर तीस टक्के सूट. दोन तीन महिन्यांनी पन्नास टक्के सूट. गेल्या महिन्यात ती सूट सत्तर टक्क्यांवर पोचलेली आहे! कालच ते फूटपाथवर लोळत पडलेले दिसले बरें! अगदी डुकराच्या पिलासारखें!'*

*सारांश -----*

*आपल्याला आयुष्यात काहीच धड जमलेले दिसत नाही.*

*डुकराला त्याचा संसार तरी जमत असावा. नाही का?*

*असो! आपला एक शुभ चिंतक*

घरी आला. ट्यूबच्या प्रकाशात हॉल पांढरा स्वच्छ चौकोनी वाटत होता. आतलं फर्निचर टक्क जागं होतं. आता आईचं वय सत्तरीपलीकडे पोचलंय. पण प्रकृती खुटखुटीत. मोलकरीण धुण्याभांड्याला ठेवलेली होती. बाकी सर्वथा आई आणि आईच. तिच्या हाताला चव होती. फिरतीवर असताना पंधरा वाट्यांच्या जेवणाला आईच्या जेवणाची सर नव्हती. स्वतःच्या तब्येतीची उत्तम काळजी आणि श्रीपाद सावंतवर जागरूक डोळे. ते डोळे आईचे होते. डोक्यातले केस नेमके किती पांढरे झालेत ते ती सांगायची.

केव्हातरी संध्याकाळीशी ती उदास व्हायची. घुटके गिळीत म्हणायची,

"वनवास वनवास वो बाय कपाळावर लिहिलेत तुमच्या! रामाचे वनवास चौदा वर्सात संपले. पण तुमचे उर्मीलेसारखे! तुमची बायको तिकडं दिल्लीला झेंडी लावतेय. झाशीची राणी झालीय. इंदिरा गांधी झालीय. पण घरात होम पेटताच ठेवून गेलीय बाय माझी. स्त्रीधर्म करायचाच नव्हता तर सावंतांच्या घराण्यात आलीच कशाला वो?"

-----असे अनेक प्रकारचे प्रश्न उदास संध्याकाळीशी पडत आणि ती स्वतःशी पुटपुटत खिडकीबाहेर बघत बसे. तो ऐकत आहे याची खात्री करून चुटपुटे.

------आईशिवाय आयुष्यात इतकं डोकावलेलं त्याला चाललं नसतं. पण आईपुढे हद्द नव्हती.

"चालायचंच आये. मुंबईला शाम शेवटच्या वर्षाला आहे. एकदा इंजीनियर झाला; चांगलीशी नोकरी लागली की मी संन्यास घेणाराय बघ!"

"बाय माझे! संन्यास? तो वो का?"

"काय राहीलंय करण्यासारखं? आणखी पाच सात पुस्तकं लिहीन. पुढे काय?"

-----आई विषण्ण होई. खाटेवर पाय दुमडून बसे.

"मग माझ्यानंतर काय वो?"

"तुला काय होतंय? अजून शंभरी गाठायचीय तुला!"

-----खुदकन हसायची. खूप जगायचं म्हटलं की तिला फार बरं वाटायचं. श्रीपाद सावंतला या गोष्टीचं नवल वाटायचं. या स्त्रीच्या पोटी आपण असे कसे जन्मलो? आपल्याला अधूरं अपुरं का वाटतं? जगण्याची तीव्र इच्छा आपल्यात का नाही?

नर्मदा.

केवळ नर्मदेनं आपल्या साध्या सरळ आयुष्याची उधळण करून टाकली म्हणून? एकटेपणा असह्य होत आहे म्हणून? उसासून जायचा.

"आये! मी सुट्टी घेतो. आपण पंढरपूर, अष्टविनायक, बद्रीनाथ, हृषीकेश करु. पुण्य मिळेल! तुला पण घरी बसून कंटाळा येत असेल! तुला माझ्या गाडीतून फिरवतो. चल!"

"छया! माझी करमणूक करायला खूप माणसं हैत इथं! आणि पंढरपूरला काय ठेवलंय वो? देव चराचरात भरलाय! हा वरचा सूर्यनारायण तोच आपला देव!"

"तुला पुण्य कमवायचं नाही?"

"पुण्य काय नी पाप काय! कुडीत मन नी मनात कुडी. देव देवताना पण कुडी होती नी त्यांनी तरी थोडी लफडी केलीत? कोणाचं रुप घेऊन कोणाची बायको पळवणारे आमचे देव! त्यापेक्षा हा सूर्यनारायण दिसतोय त्यालाच देव मानतो. बाकी सारं झूट. गोष्टी!"

"मग मूर्तीतल्या देवांचं काय?"

"कसल्या मूर्ती? शिवाजी राजा कसा दिसायचा हे बघाया त्याची मूर्ती हवी. जे नष्ट झालं ते दिसावं येवढाच हेतू. देव मूर्तीत थोडाच असतोय? मोगलांनी देवाच्या मूर्ती फोडल्या तेव्हा आमच्या देवांनी त्यांचे हात झडून का टाकले नाहीत वो? मूर्ती साधन आहे. देव असलाच तर तुमच्या आमच्या करतुदीत असावा. बास!"

---- या अशा विचारांच्या स्त्रीला त्या काळातला समाज किती सहन करणार? हिंदू संस्कारातले बरेचसे न पटणारे विचार ती बायकात बोलून दाखवी आणि घरच्यांचा रोष ओढून घेई. तो गमतीनं म्हणायचा,

"तू अशी उद्दाम वागलीस आणि वाईट झालीस. तुझी सून वीस बावीस वर्षांपूर्वी घर सोडून राजकारणात गेली! तुझीच सुधारलेली आवृत्ती आहे ती!"

"असेल. पन मी स्त्री धर्म सोडला नाही! न्हवऱ्याला नी पोटच्या पोराला सोडून दुनिया घेनाऱ्या बाईला कोन किंमत देत नाही वो! इंदिराबायनं पन दोन घसघशीत मुलांना जन्म देवून राजकारन केलंन. तुमची बायको लय हेकट! काडीमोड पन देत नाही!"

"काडीमोड? या वयात?"

"मागेच द्याया हवा होता. तुम्हाला वनवास ------"

"माझं उत्तम चाललेलं आहे. तू काळजी करू नकोस!"

"शामचा इचार केलात कधी? त्या पोराला आयशीचं सूख मिळालंय? तुमच्या ह्या वयात तुम्हाला आयशीच्या हातचं जेवण लागतंय. त्या अश्राप पोराला काय मिळालं? लोकांची कुजकट बोलणी. आता इतका शिकलाय. मोठा झालाय. दिवस थांबत नैत वो! आयशीचा राग मनात ठेवून पोरगा वाढतोय हे त्या राजकारनीला समाजतंय काय?"

आईचं म्हणणं पटायचं. शामच्या पौगंडावस्थेत त्याच्या मनात आईविषयी कुठल्या भावना उगवत असतील ते कळत होतं. याचे परिणाम आता नाही, पण पुढील आयुष्यात दिसू लागतील. आपल्याला बापाचं तोंड बघायला मिळालं नाही. पण आईचं प्रेम खूप मिळालं. शामचं गणित उलटं झालेलं आहे. त्याची आई पाहुणीसारखी मोजक्या प्रसंगी येते. गोड गोड बोलत घडयाळ बघते. मोबाईल वाजत असतो. त्यावेळी तिच्या नितळ सुंदर तृप्त चेहऱ्यावर गुर्मिचं वलय असतं. शब्द हुकमी असतात. बाहेर लाल दिव्यांची गाडी उभी असते. पुढे मागे पोलीस व्हॅन. बाई येणार हे कळल्यामुळे सोसायटी भोवती माणसं उभी असतात. सेलिब्रेटी स्टेटस हा अहंभाव गोंजारण्याचं सूख निराळं असतं.

----- नर्मदा ज्या ज्या वेळी शामला भेटायला सोसायटीत किंवा घरी येते त्या वेळी पोलीस फोर्स बरोबर तिचा बॉडीगार्ड काशिनाथ सूर्वे बरोबर नसतो हे श्रीपाद सावंतने नोंद करून ठेवलेलं आहे. ती घरात आहे तेवढयात निमित्त काढून खाली जाऊन चौकशी केलेली आहे. हा योगायोग

की सूर्वेचं सावट सावंतांच्या घरावर पडू नये ही योजना, हे कळत नव्हतं. पण नोंद नक्की होती. वेदनेसारखी. ठुसठुसणारी. अव्यक्त. भोवती बोट फिरवीत राहीलं तर संवेदना देणारी ००००

----- हातपाय धुतले. आईनं तव्यावर बांगडे तळत ठेवलेले. त्याचा घमघमाट मस्तकात, पोटात डोंब उठवणारा. पोटाची भूक. मनाची भूक. ताटात गरम गरम मऊसुत पोळया, तळलेले बांगडे, कापलेला कांदा, कालवण, सफरचंदाच्या फोडी. जेवणाला पध्दत नसली तरी स्वाद, चव आणि माया पोटभर होती. तो जेवत असताना आईनं स्वतःचं ताट वाढून घेतलं. दोन पोळया, बांगडा आणि फळाच्या दोन फोडी. जेवणापूर्वी घास कपाळाला लावून ती नेहमीसारखी पुटपुटली,

"देवा! जेवाया ये!"

आणि तोंडात घास घेतला. आईची ही सवय तो रोज लहानपणापासून बघत होता. ती बोलली,

"आज रात्री आठ वाजता टी. वी. वर तुमच्या राजकारणीची मुलाकात आहे म्हणतात! पेपरात आलंय तसं!"

"असं? बघू या."

"शेजारच्या आयाबाया आपलं कायबाय बोलतात."

"तू कशाला लावून घेतेस आये? या कानानं ऐकायचं नी दुसऱ्या कानानं सोडून द्यायचं. शिवाय तुझा तो हळवा हलक्या कानाचा पिंडपण नाही. ही तुझी सून थोडा वेळ इथे आली तर याच तुझ्या आयाबाया तिला भेटायला तळमळतात आणि पोरांचे अर्ज देवून नोकऱ्याना लावा म्हणून तिचे पाय धरतात ना आये?"

"तेच! म्हंतात, एखाद्या बाईनं बंगले बांधले असते. सरकारी सवलती कोटा असतो ना?"

"तुला सवलती घेऊन बंगल्यात रहाणं आवडेल?"

"-----छ्या! कायतरीच काय? ही तुमची तीन रूमची बँकेची जागा माझं वतन आहे! सुनेच्या राजवाड्यात माझं मन रमेल होय? पण आपलं सांगतो. आयाबाया बोलतात ते!"

----तो गप्पपणे जेवू लागला. आईची टकळी सुरु झाली की तिला थांबवणं कठीण असतं. सगळं असंबद्ध बोलणं. वाटेतून उपवाटा फुटतात आणि मूळ विषय दगडावर बसून म्हातारीचं शांतपणे ऐकत. ही तऱ्हा!

"तुम्ही पुस्तकं लिहीलीव. पण टी.व्ही.वर तुम्हाला कोणी नाही बोलावलं बा!"

"हे बाकी खरं हां! लक्षात आलं नव्हतं!"

"लिख लिख लिहीताव, पण तुम्हाला बक्षीसपण नाही मिळालं बा! सरकारी बक्षीसं?"

"हे पण बरोबर! तुझ्या सुनेला सांगना सरकारशी वशीला लावायला! लगेच मुख्यमंत्र्यांकडून माझ्या पुस्तकाला राज्यपुरस्कार मिळेल!"

----- दोघंही मनापासून हसली.

जेवण झाल्यावर तो खाली बिल्डींगच्या कंपाऊंडमध्ये गेला. सिगरेट पेटवली. चार दोन माणसांशी मोघम बोलला. गॅलरीत आई असताना धूम्रपान करणं त्याला पटत नव्हतं. आईलाही ते कळत होतं. ही एकमेकाला समजलेली, जाणून घेतलेली छोटीशी गोष्ट होती. झोपताना ती दोन चमचे ब्रँडी घ्यायची. तब्येत खुटखुटीत. त्याला कौतुक वाटायचं.

आठ वाजले. पंखा चालू करून श्रीपाद सावंतनं टी.व्ही. लावला. पंधरवड्यातून एकदातरी कोणातरी कारणामुळे नर्मदा पेपरात दिसायची. त्यात वेगळेपण शिल्लक राहीलेलं नव्हतं. आई खाटेवर पाय दुमडून बसली. चष्मा पुसून कानाला लावला. तोंडातल्या तोंडात पुटपुटू लागली. त्यानं विचारलं नाही. लगेच बडबड सुरु झाली असती!

---मुलाखत घेणारी एक सुंदर स्मार्ट हसरी तरुणी होती. पंचवीशीची. तिनं श्रोत्यांना, प्रेक्षकांना नमस्कार केला. तिचं नाव आलं आणि गेलं. म्हणाली,

"आज आपल्या स्ट्यूडीयोमध्ये आपल्या सर्वांच्या लाडक्या आमदारबाई सौ. नर्मदा सावंत आल्या आहेत. मी प्रथम त्यांचे स्वागत आणि आभार मानते. स्वतःला चोवीस तास कामात व्यग्र ठेवणारी, तीन वेळा आमदार म्हणून निवडून येणारी एक प्रभावी स्त्री म्हणून त्यांची ख्याती आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत स्त्री हे एकच माध्यम डोळयांपुढे ठेवलेलं आहे. इतर राजकीय वर्तुळात किंवा व्यक्तींमध्ये जो अहम् भाव दिसतो तो त्यांनी अद्याप दाखविलेला नाही. स्पष्टवक्तेपणा म्हणजे अहम् नव्हे! त्यांच्यावर या ना त्या कारणाने प्राणघातक हल्ले झाले आहेत ते नियतीला मान्य नव्हते आणि परिणामी व्यक्तिमत्वाला अधिक प्रखर केलेलं आहे. आज या चॅनेलवर आपण ताईंशी अगदी मोकळेपणाने गप्पा मारणार आहोत."

नर्मदानं सगळयांना कॅमेऱ्याकडे बघून नमस्कार केला. स्मितहास्य. ठोस शरीरसंपदा. कपाळावर ढळढळीत कुंकू आणि छातीवर मंगळसूत्र. नजरेत आत्मविश्वास. देखणा. तिचं सौ. नर्मदा सावंत नाव आलं आणि गेलं. आमदार, जिल्हा रत्नागिरी, हे पण येवून गेलं.

( श्रीपाद नावाची कुठं गरज वाटली नाही )

"नर्मदाताई, या तालुक्यात आपण सतत तीन वेळा फार मोठ्या मार्जीनने आमदार म्हणून निवडून आल्या आहात. याचं कारण लोकांचा तुमच्यावर असलेला दृढ विश्वास. प्रेम. तुमचं मूळ व्रत स्त्रीवर्ग आहे. कारण?"

"कारण स्वच्छ आहे. घटनेनं या देशात १९४९ मध्येच स्त्रीला समान हक्क दिलेला आहे. पण आजपावत प्रत्यक्षात स्त्री किती स्वतंत्र झाली आहे हे आपण जाणतोच! मला या हक्कांसाठी प्रयत्न करायचे आहेत. सगळयांना खूप काही वाटतं पण प्रत्यक्षात काही घडत नाही."

"यात यश कितपत मिळेल असं तुम्हाला वाटतं?"

"यश मिळणं माझ्या हातात नाही. प्रयत्न करणं आहे. प्रत्येक गावात जाऊन मी स्त्रीला जागी करीत आहे. काही गावात तर स्त्रीला अजून अक्षरओळखही नाही! ही स्थिती. मग मी शहरातल्या सुशीक्षित स्त्रीयांची महिला मंडळं निर्माण केली. मला कळलं. आपल्या स्त्रीला विश्वास, उभारी, देण्याची फार गरज आहे. बहुतेक शहरी स्त्रीला तिचं मूळ गाव आहेच. ती खूप कर्तृत्ववान आहे. मी अशा संघटनाना मदतीचा हात पुढे केला."

"यात काही अडचणी?"

"आल्या. महिला मंडळं स्थापन व्हायला लागल्यावर पुरुषवर्ग अस्वस्थ झालेला आढळून आला. प्रथम चेष्टा, नंतर चुचकारणं, कामाच्या व्यापाचा बाऊ करणं इत्यादी पुरुषी चाली लक्षात येवू लागल्या! मी महिलांना सावध केलं. धीर दिला. पुरुषवर्ग आपला शत्रू किंवा प्रतिस्पर्धी मानू नका. त्यांच्यावर विश्वास दाखवा. प्रसंगी कमीपणा घेऊन मार्गदर्शन मागा! मदत घ्या. पुरुषांचा अहंभाव दुखवू नका. रक्षाबंधन, दसरा, गणेशोत्सव सारख्या प्रसंगी पुरुषवर्गाला प्राधान्य देवून सहकार्य घ्या. कामं सुरक्षितपणे पार पडताना मला दिसत आहेत."

( वा! काय मधाळ बोलतेय बाई! आपल्या आईच्या मनात आता नेमकं काय चाललं असेल?)

"कोकणरेल्वे आली, कोकणाचं कॅलीफोर्नीया होणार म्हणे! परंतु प्रगती तेवढी उत्तेजनात्मक वाटत नाही. का?"

"उत्तेजनात्मक का नाही? पण पक्षांची धोरणं बदलली, अदलाबदल झाली की व्यवहार खोळंबतात. मग आरोप प्रत्यारोप! हे नाट्य गेली पंचावन्न वर्षे चाललेलं आहे. प्रामाणिकपणाची उणीव, घराणेशाहीला प्राधान्य हीच आपली जडणघडण होत चाललेली आहे बघा ना! मग खोळंबा होतो. मनातली स्वप्नं मनातच रहातात. जयप्रकाशजींचा भारत अजून घडायचा आहे!"

"आता आपण तुमच्या मूळ ध्येयाकडे वाळू या का ताई? आपण स्त्रीमधील कर्तृत्वाविषयी थोडं बोलू."

"महाराष्ट्राच्या जडणघडणीत स्त्रीयांचं योगदान मोठं आहे. स्त्रीशिक्षणाला १८५० पासून सुरुवात झाली. म्हणजे शे दीडशे वर्षे होत आलीच की! सावित्रीबाईंना ज्योतीबांनी दिलेला धीर आजचा पुरुषपण देत नाही. ही आपली शोकांतिका आहे. आनंदीबाई जोशी, लक्ष्मीबाई राजवाडे गंगुबाई खेडकर अशा काहीएक संस्कृतीतून उगवलेल्या स्त्रीयांनी समाजासाठी शिक्षणाचा उपयोग झाला पाहीजे म्हटलं. पंडिता रमाबाई, रमाबाई रानडेंचं कार्य आपल्याला माहित आहे. वकीली, डॉक्टरकी, शिक्षीका इत्यादी क्षेत्रात स्त्रीनं पाऊल टाकलं."

"हे बाकी खरंच! ताराबाई मोडक, गोदावरी परुळेकरांपासून ते अगदी मेघा पाटकरांपर्यंत तळागाळातल्या गरजू स्त्रीयांकडे मानवी हक्कांसाठी लढा दिलेला आपण बघतोय ताई!"

"तेच! राजकारण सोडून कलेच्या क्षेत्रात स्त्रीयांनी कामगिरी केली नाही का? हिराबाई बडोदेकर, केशरबाई केरकर इत्यादि गायिकांनी गाण्याला प्रतिष्ठा दिलीय. शोभा गुर्टू, प्रभा अत्रे ते अगदी लतादिदी आशाताईंपर्यंत स्त्रीने जगभर प्रसिध्दी मिळवलेली आहे! स्त्री काय करू शकत नाही बरं?"

"अगदी बरोबर ताई. चित्रपटक्षेत्र घ्याना! हंसा वाडकर, स्मीता पाटील ते माधुरी दिक्षीतपर्यंत महाराष्ट्रातली तारका रुपेरी पडद्यावर चमकते आहे. नाट्यक्षेत्रात ज्योत्स्ना भोळे, भक्ती बर्वे, विजया मेहता आहेत!"

"महाराष्ट्रातल्या स्त्रीयांनी मराठी साहित्यात मोलाची भर टाकलेली आहे. दुर्गाबाई भागवत, इरावती कर्वे, कमल देसाई ते अगदी सानीयापर्यंत दर्जेदार लेखन आमच्या लेखिकांनी केलेलं आहे!"

"इतकं असूनही सरासरी ग्रामीण स्त्री किंवा अगदी कचेरीत काम करणारी स्त्री संसारापलीकडे झेप घ्यायला कमी पडते असं तुम्हाला वाटतं का नर्मदाताई?"

"त्यासाठी त्याग करावा लागतो. रोष पत्करावा लागतो. अगदी सामान्य सरळमार्गी माणूसपण प्रचंड उलथापालथ करू शकतो पण त्यासाठी त्याच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या तेवढ्याच तीव्र घटना घडाव्या लागतात---------"

"ज्या आपणा बहुतेकांच्या आयुष्यात घडत नाहीत! बरोबर? किंवा घडल्याच तर आपण लगेच नमतं घेऊन पुन्हा सरळमार्गी होतो. बरोबर?"

-------नर्मदा हसली. क्लोजअपमध्ये छान दिसली. कॅमेरामन तिचे ठळक अँगल्स अगदी शिताफीने घेत होता जे केवळ श्रीपाद सावंतलाच कळत होतं. ( हेल विथ दीज मेन! ) तिच्या खालच्या दातातून दाढ काढलेली आहे हे त्याला कळलं. आईजवळ ते तो बोलला नाही.

मुलाखत घेणारी तरुणी चाणाक्ष होती. प्रेक्षकांना नेमकं काय हवंय ते तिला माहीत होतं किंवा तसं सांगीतलं गेलं होतं. म्हणूनच गोड हसून तिनं विचारलं,

"नर्मदाताई आता थोडं खाजगी विचारू?"

"खुश्शाल!"

"राजकारणात तुम्ही गेली वीस वर्षे आहात. तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांकडून किंवा मंत्रीवर्गाकडून मानसिक ताणतणाव कधी अनुभवाला आला का?"

----नर्मदा दिलखुलास हसली. क्लोजअपमध्ये अधिक खुलून दिसली. म्हणाली,

"चीनी भाषेत एक म्हण आहे. तुम्ही सरळ चालत असाल तर तुमची सावली वेडीवाकडी पडते याची काळजी करू नका. माझा इतिहास सर्वश्रुत आहे. वीसबावीस वर्षांपूर्वी भरबाजारात मी एका गुंडाला चपलेनं झोडला होता. तिथे पुरुषवर्गानं बघ्याचं काम उत्तम केलं. पण त्या अपघातामुळे माझा राजकारणात प्रवेश झाला. प्रथम मी समाजकार्य केलं. मग नगरसेविका झाले. पार्टीचं तिकीट मिळालं. वगैरे. माझ्या या स्वभावामुळे माझ्या संसाराला, सासूबाई, नवरा आणि

माझा छोटा मुलगा या छोट्या कुटुंबाला त्रास होऊ नये म्हणून मी घराच्या बाहेर पाऊल टाकलं. टाकलं ते टाकलंच! चार भिंतीत असताना परपुरुषांचे बाजारू स्पर्श भोगीत राहीले असते तर आज मला दोन मुलं आणखी झाली असती आणि मी चांगली गृहीणी झाले असते. मी बंड केलं. बाहेर पडले. त्यावेळची मी पदवीधर. त्यामुळे आत्मविश्वास होता."

"तुमच्या देखणेपणाचं, ठोस व्यक्तिमत्वाचं रहस्य काय?"

"ही मुलाखत स्त्रीयांच्या चॅनेलसाठी असली तरी सर्वजण ती पहात असतील याचं भान मला आहे. माझी उत्तरं कशी देवू सांगा!"

मुलाखतकार मस्त हसली.

"ताई, तुम्ही बिनधास्त म्हणून प्रसिध्द आहात. तुम्ही मुरलेल्या वक्त्या आहात. मी सांगायला हवं काय?"

( वा! पुरुषांसाठी मन चाळवणारं काहीतरी ' बिनधास्त ' सांगणार वाटतं ही पुढारीण?)

"मी एक सर्वसामान्य दिसणारी स्त्री आहे. हे प्रथम लक्षात घ्या. या दिवसापर्यंत मी चेहऱ्याला कुठलंही क्रीम लावलेलं नाही! घाम येतो म्हणून पावडर जरूर वापरते. पण ती गरज म्हणून! तुम्ही मुलाखत घेत आहात. छान दिसताय. स्टूडीयोत येण्यापूर्वी ब्यूटीपार्लरमध्ये तासभर बसून आलाही असाल. नाही का?"

----- दोघीही हसल्या.

"तुम्ही मुलाखतकार! छान दिसायलाच हव्यात! माझं क्षेत्र वेगळं आहे. देखणेपण हा शब्द माझ्या बाबतीत मला तितकासा पटत नाही. राहीलं व्यक्तीमत्व. ते ठीक असावं. कारण मी आरोग्याकडे लक्ष घालते. कामाच्या व्यापात झोप कमी मिळते. परंतु स्त्रीला व्यायामाची गरज आहे. हे मला माझ्या आईने लहानपणापासून मनावर बिंबवलेलं आहे. मी शाळेत बऱ्यापैकी हूड होते.

टॉमबॉयसारखी! कळत नव्हतं तेव्हां चक्क मुलांमध्ये मारामाऱ्या करायची! माझ्या मोठया भावाला सतत चिंता असायची. ही पोरगी काहीतरी उपद्व्याप करील. तो स्वतः कराटे खेळायचा. आणि मला घरी शिकवायचा. स्वसंरक्षणासाठी काठयांचा खेळ करून दाखवायचा ----------

"आणि त्याचा तुम्हाला उपयोगही झाला ताई!"

"अगदी बरोबर. मी नियमीतपणे योगासनं करते. उष्ट्रासन, उग्रासन, पादहस्तासन इत्यादि. त्याचे फायदे शरीर आणि मन निकोप ठेवण्यासाठी होतात. मी वेळोवेळी या आसनांचं महत्व स्त्रियांना सांगीत असते. एकदा अंगी सवय करून घेतली की काही कठीण नाही. वेळही काढता येतो. अर्थात एवढं करूनही मी तुमच्यासारखी स्लीम झाले नाही! मला वाटतं, घट्ट आणि लठ्ठ हे आमचं अनुवांशिक गणित असावं! माझी आई बऱ्यापैकी लठ्ठ आहे!"

----- दोघी पुन्हा हसतात.

( या तुझ्या लठ्ठपणातच ' सेक्सअपील ' आहे बाई! )

-----श्रीपाद सावंत पुढच्या प्रश्नानं चाट पडला.

"तुमच्या व्यक्तीमत्वाला तुम्ही लठ्ठपणा हे गालबोट आहे असं भले बोललात ताई, तरी मला वाटतं त्यामुळे तुमच्यात एक प्रकारचं आकर्षण निर्माण झालेलं आहे. याचा तुम्हाला केव्हां त्रास होतो का?"

"वडाच्या झाडाचं उदाहरण देते. त्याची छाया विशाल आहे. आकार बलदंड आहे. तरीही हा औषधी वृक्ष आहे. आयुर्वेदात स्त्रीयांच्या अनेक विकारांवर वडाच्या झाडाचा उपयोग दिलेला आहे. त्याच्या पारंब्या त्याला मजबूती देतात. माझ्या कार्यामुळे स्त्रीच्या जीवनशैलीत थोडा फरक पडला तरी मला समाधान मिळेल!"

"हे उत्तर फार मोघम वाटतं ताई!"

"स्पष्ट करते. मीनाकुमारी नेहमी पूर्ण अंग झाकूनही सेक्सी दिसायची. याचं कारण तिचं सौष्ठव. तिनं चित्रपटसृष्टीत मानाचं स्थान पटकावयाला स्वतःच्या शरीराचं उघडं दर्शन केलं नाही! आजची तरुणी पैसा प्रसिद्धीसाठी, पुरुषाला चेकाळून ओरडण्यासाठी जो काही अभिनय म्हणून करते तो मला किळसवाणा वाटतो."

("ब्रेव्हो!")

----समोरची तरुणी खुद्कन हसली.नजर खाली करून तिनं बोटं निरखल्यागत केलं. मग समोर नर्मदेच्या डोळयांत बघून डोळे मिचकावीत पुटपुटली,

"तुम्ही फार चाणाक्ष आहात ताई! एकीकडे स्त्रीला समान हक्क मिळाला पाहीजे म्हणताय आणि दुसरीकडे तिनं अंगावर काय आणि किती घालावं यावर बंधनही घालताय! तमाशातल्या स्त्रीया नऊवारी घट्ट संपूर्ण शरीर झाकणारे वस्त्र घालूनही सौष्ठवाची लयलूट करीतच असतात. पाश्चात्य संस्कृतीचा नया जमाना आलेला आहे ताई! संगीताला वेगळं वळण दिलेलं आहे. त्यामुळे बरं वाईट काय हा देखील चर्चेचा विषय होत आहे! प्रश्न आहे तो सौंदर्य या कल्पनेचा!"

"स्त्रीच्या सौंदर्याची स्तुती पुरुषानेच करायची असते हे मला माहीत नाही का? शिवाय स्त्रीला उपजत एक सहावं अतींद्रिय मिळाल्यामुळे पुरुषाची नजर दहा फूट अंतरावरूनही तिला कळते. सौंदर्याची व्याख्या बदलते आहे. कबूल. पण त्यात बटबटीतपणा आला की त्यातला अर्थ निघून जातो. खजूराहोची लेणी बघून सौंदर्याची, सौष्ठवाची नजर असणं वेगळं आणि वासनेची नजर वेगळी. हा गूण वैयक्तिक, माणसावर, अवलंबून आहे."

"पण एकंदर पुरुषजातीवरच हे लेबल लावणं योग्य का?"

"लेणी ज्यांनी घडवली ते पुरुषच होते ना? पण त्यांना सौंदर्यदृष्टी होती. मी मगाचच बोलले की बावीस वर्षांपूर्वी बाजारात एका गुंडाला तुडवला. कारण त्याच्या नजरेत वासना होती. मी

चांगली अंगावर पूर्ण साडी आणि ब्लाउजमध्येच बाजारात गेले होते! अर्धीमुर्धी वस्त्रं घालून गेले नव्हते!”

“माझा प्रश्न अजून उरलाय. पुढील कारकीर्दीत तुम्हाला अशा अनुभवांना केव्हां सामोरं जावं लागलं का?”

-------नर्मदाने कॅमेऱ्याकडे टक लावून पाहीलं.

“त्या दृष्टीनं माझ्या नजरेत रोखून बघणारा पुरुष मला अजून भेटायचा आहे. माझ्यावर हल्ले झालेत. यंत्रणेला मी सतत सांगीत आलेय की मला पोलीस संरक्षणाची गरज नाही. अगदी स्त्रीपोलीसपण नकोत. खरं सांगू? जर एखादी घटना नियतीने लिहूनच ठेवलेली असेल तर तिथे मानवी संरक्षणाला काडीचा अर्थ नसतो. शिवाय प्रायव्हसी, हा प्रत्येक मानवाचा हक्क आहे! या पोलीस पहाऱ्यांमुळे आपण सतत नजरेखाली आहोत या विचाराने माणूस बेचैन रहातो! मी सांगून पाहीलं. मग नाद सोडून दिला.”

“व्यवस्थेला त्याची गरज का वाटावी?”

“माझे शत्रू मीच तयार केलेत. राजकारण वर वर दिसतं तितकं सुकुमार नाही! त्यातले अंतर्गत प्रवाह केवळ आम्हालाच कळत असतात! असो! शत्रूंना माझं कार्य थांबवायचं आहे. तोंडपुजेपणाचा उबग येतो. कृतघ्नपणाचा अनुभव येतो. पण हे तर गृहीतच धरायला हवं. नर्मदा सावंत ही बाई ' मारू ' दिसते म्हणून कोणी मदत करीत नाही!”

“तुमच्या कुटुंबाविषयी थोडसं!”

“चार चौघांपेक्षा वेगळं काही नाही. बऱ्याच ठिकाणी ते प्रसिद्धही झालंय. माझा मुलगा इंजिनीयरींगच्या शेवटच्या वर्षाला आहे. हुशार आहे. माझे पती बँकेत अधिकारी आहेत. सासूबाई आधुनिक विचारसरणीच्या आहेत. मी माझ्या कुटुंबियांना मधून मधून भेटते. बरं वाटतं. माझी

गावात किंवा शहरात कोठेही मालमत्ता नाही. एवढंच काय, माझे कुटुंबिय बँकेच्या क्वार्टर्समध्ये रहातात!"

"पण तुम्हाला हक्कानं मिळणाऱ्या सवलती -----"

"आम्ही सावंत स्वतंत्र वृत्तीची माणसं आहोत! त्यामुळेच मी कोणावरही बळजबरी करू शकत नाही."

"तुमचे पती नावाजलेले लेखक आहेत. पण त्यांच्या एखाद्या पुस्तक प्रकाशनाला तुम्ही हजर राहीला नाहीत! हा दुरावा------ का?"

-------यावर नर्मदा दिलखुलास हसली.

"त्यांनी मला बोलावलं नाही! मी गेले नाही! कदाचित मला साहित्यातलं काय कळतंय असं त्यांना वाटलं असावं!"

"त्यांचं वाटणं बरोबर आहे का ताई?"

"सवडीनुसार मी वाचते. मला वाटतं माझे पती बरचसं आत्मकेंद्रीत लेखन करतात. त्यांनी या कवचातून बाहेर पडायला हवंय!"

"ते दर्जेदार लिहितात असं वाटतं का?"

"तेवढा अधिकार मी घेणार नाही. पण ते चांगले लिहू शकतील असा विश्वास वाटतो!"

( आता आभार मानायचे का? )

"या संदर्भात तुमची कधी बोलाचाली झालीय का?"

"लेखनावर मुद्दाम अशी चर्चा केलेली नाही. करू!"

"तुम्ही राजकारणात पडलेलं तुमच्या पतीना आवडलं होतं का?"

"मी अपघातानं राजकारणात पडले, तुम्हाला माहीतच आहे! यात फायदे तोटे झालेच! काही मिळवण्यासाठी काही घालवावं लागतं! थोडक्यात, मी संसारसुख दिलं, घेतलं नाही म्हणूया!"

"ठीक. तुमच्या मुलाविषयी सांगा."

"अतिशय हुशार आहे तो! त्याच्यावर माझ्या सासूबाईंचे आणि पतींचे चांगले संस्कार झाले आहेत! मी मान्य करते. आई म्हणून मी माझ्या मुलाकडे लक्ष देवू शकले नाही. ही समाजकार्यकर्त्यांची ठरलेली शोकांतिका आहे असं समजू या! पण त्याच्या प्रत्येक वाढदिवशी, गुणगौरवप्रसंगी, सणासुदीला मी हजर रहाते! यापलीकडे आई म्हणून मी त्याच्यासाठी वेळ देवू शकले नाही."

"याची रुखरुख वाटते का?"

"या वाटण्याला काही अर्थ नाही. त्या दृष्टीने मी कुटुंबियांशी चर्चा केली. त्यांच्या मते मुलगा त्यांच्या नजरेखाली अधिक सुरक्षित आनंदी राहील असं ठरलं. मी मग दूर झाले. मी कुटुंबासाठी नसून गर्दीतली झाले. ते व्रत मी सोडलं नाही."

( अरे वा! आणि मुलगा जवळ ठेवल्यावर आपलं व्यक्तीस्वातंत्र्य जाईल त्याचं काय हो बाई? )

"तुमच्या सासूबाई कशा आहेत?"

"अत्यंत तडफदार बाई आहेत! त्रेचाळीस साली त्यांना वैधव्य आलं आणि माझे पती लहान असताना त्यांनी गाव सोडून शहराचा रस्ता धरला. एकटीनं! त्या काळात हे फार मोठं धैर्य होतं. समाजाचा विरोध झाला. अपमान झाले. पण त्यांनी तोंड देऊन माझ्या पतीचं शिक्षण पाहीलं. हे केवळ शहरात शक्य होतं. ही गोष्ट नक्कीच कौतुकास्पद होती."

"म्हणजे बरेचसे गुण तुमच्यातले की ताई!"

“तसं म्हणायला हरकत नसावी. शिवाय त्यांचा अंधश्रद्धेवर मुळीच विश्वास नाही. एक लोकगीत आहे --- देखल्या देवाला, लोक घाली दंडवत. पाठ फिरता म्हणती, कोणाचं काय नातं?”

“तुमचा देवावर विश्वास आहे का?”

“असं म्हणतात की तुम्हाला जेवढया प्रमाणात देव हवा असतो तेवढयाच प्रमाणात तो तुम्हाला मिळतो. पण मी माझ्या सासूबाईंइतकी ' मटीरीयल स्त्री ' नाही. मी ईश्वराच्या कोपाला घाबरते. रोज रात्री झोपताना रामरक्षा म्हणते. माझी गावची कुलस्वामीनी, ग्रामदेवता, महादेवाच्या देवळाचा कळस डोळयांपुढे आणायचा प्रयत्न करते. माझ्या कुटुंबियांना आजपर्यंत सुरक्षित ठेवल्याबद्दल या दैवतांचे आभार मानते.”

“तुमच्या प्रार्थनामुळे कुटुंबिय सुरक्षित आहेत असं तुम्हाला वाटतं का?”

“मी त्यांना देवानं सुरक्षित ठेवलं म्हणून देवाचे आभार मानते असं म्हणालेय!”

“उपास तापास, हाच पती सात जन्मी दे, वगैरे?”

---- नर्मदा मान तिरकी करून हसली. डाव्या गालावरची खळी दिसली.

“कोणता नवरा माझ्यासारख्या तेज स्त्रीशी लग्न करून सुखी होईल? मी हा त्यांच्यावर अन्याय का करावा? एकाला मी हवी होते ती त्या काळात परिस्थितीमुळे मिळू शकले नाही. मनाचे विचार बदलले. दूर झाले!”

“तुमच्या या अधिकाराचा उपयोग कुटुंबियांनी ------”

“मुळीच घेतला नाही! आणि त्याचा मला अभिमान आहे! नकळत माझ्या घरच्यांनी माझी मान ताठ ठेवायला मदत केलेली आहे!”

“मग तेव्हां --- एकटेपण कसं घालवलंत ताई?”

"' एकटेपण ' हा शब्द विस्तृत करावा तेवढा आहे. गर्दीत राहूनही माणूस एकटं पडू शकतं. मी कोणी संन्याशिनी नाही. एक आई, पत्नी आहे. संसारसुख थोडं फार भोगलेलं आहे. एक शतांश का होईना गौतमबुद्धासारखी जगले आहे. पण मी माणूस आहे. शरीराच्या तक्रारी माझ्याबरोबर प्रवास करीत असतात. त्यामुळे काही वेळा मी फार आक्रस्ताळेपणा केलेला आहे! उद्धट वाटले आहे. कुचराई झाली म्हणून पोलीस अधिकाऱ्यांना फैलावर घेतलं आहे! डोकं शांत झाल्यावर त्यांची माफी मागीतली पण घाव घातले गेले आहेत. माणसं दुखावलीत. शत्रू निर्माण केलेत. पण सामान्य माणसांची, स्त्रीयांची झाले. माझा तथाकथित मोठेपणा असलाच तर तो आहे. माझ्यातले गुणदोष स्वीकारून माणसांनी मला जवळ केलं, निवडून दिलं, मग मी त्यांच्या समस्यांना वाचा फोडली! यंत्रणेला हलवणारं कोणीतरी लागतं. त्यात गैरसमज होतात. इलाज नाही."

"घामट भांडखोर आमदारीण म्हणतात तुम्हाला!"

"हं! माझ्यावर एक डॉक्युमेंटरी काढा आता!"

------- दोघीही हसल्या.

"ताई, राजकारणात विरोधकांना शत्रू मानीत नाहीत. पण शत्रू हा शब्द तुम्ही पुन्हा पुन्हा वापरीत आहात! एवढं वैमनस्य?"

---- नर्मदेचा चेहरा रागानं क्षणभर फुलला. कॅमेऱ्यानं तो नेमका टिपला. क्लोजअप घेतला. तिच्या नाकपुडया थरथरत होत्या. डोळयात अंगार फुलले होते. तिचं हे रूप वेगळं होतं.

----"शत्रूच! मी त्यांचं नाव घेत नाही. पण शत्रूच. कारण त्यांनी नेहमी माझ्याकडे एक प्रतिस्पर्धी किंवा विरुध्द पार्टीचा सभासद म्हणून पाहिलेलंच नाही! मी गर्भ धरणारी एक मादी म्हणून पाहीलीय! हे मुखवटे घालून समाजात उजळ माथ्याने फिरणारे लांडगेच! माझे शत्रू!"

मुलाखतकार गप्प बसली. नर्मदा पुढं बोलली,

"मी आहे ही अशी आहे. मी मगाच म्हणाले की माझ्याकडे त्या दृष्टीनं सरळ बघणारा पुरुष मला भेटायचाय. पण हे लांडगे छुपे असतात. त्यांना पुराव्यानिशी धरता येत नाही. त्यांची कीव करावीशी वाटते."

"म्हणजे हा मनस्ताप आहेच तर!"

"मी त्यांना भीक घालीत नाही. माझ्या स्त्रीला खंबीरपणे उभी करणं हेच माझं ध्येय. पण तिनं मला सहकार्य करायला हवं. याचा अर्थ तिनं संसार सोडावा असं मी म्हणणार नाही. मला तिची कुचंबणा कळते. म्हणूनच माझं कार्य कठीण आहे. पण पाश्चात्य संस्कृतीची नक्कल करून घटस्फोट घेणं, नवरे बदलणं, बॉयफ्रेंड्स ठेवणं इत्यादी भडक कथानकांच्या मराठी मालीका बघून ही नर्मदा सावंत कालबाह्य होईल की काय अशी शंकाही येते. अर्थात मला त्याची काळजी नाही म्हणा!"

( फार बोललात बाई! काशीनाथ सूर्वे कुठं गेले? )

------मुलाखत घेणारी तरुणी गोड गोड हसली. नर्मदेच्या व्यक्तिमत्वावर स्तुतीसुमनं उधळली आणि कार्यक्रम संपला. श्रीपाद सावंतनं टी. व्ही. बंद करून हसून म्हटलं,

"आये! बघ तुझा उदो उदो चालला होता टी. व्ही. वर! आता थोड्या वेळानं किंवा उद्या सकाळी तुझ्या मैत्रीणी येवून तुझं अभिनंदन करतील बघ!"

-----आईला बरं वाटलं असावं. नसावंही. पाय वर करून ती खाटेवर बसली होती. एवढीशी. टिटवीसारखी.

"राजकारणी बोलाया शिकलीय वो! चलती तिथं पलती! सांडली साकर, मुंग्या जातात घेउनी, सुखाला सर्वेजन, दुक्काला कोणी नायी!"

"म्हणजे?"

“जवानी आहे तोवर पिंगा चाललाय. आणखी दहा वर्षांनी दुष्मनाची कुत्रीपण बघणार नाहीत तेव्हा गमजा उतरतील बघा!”

-----त्यानं पेपर वाचायला घेतला. आईचे शब्द जहाल पण खरे होते. नर्मदा सारखा ' शत्रू ' शब्द वापरीत होती. तिला माहीतच असणार की हा कार्यक्रम आपण बघणार आहोत. हा ' शत्रू ' आपण तर नव्हे? ती ज्या ज्या वेळी घरी आली तेव्हा तिनं आपल्या डोक्यातला हा शत्रू सारखा संशयानं ग्रासलेला आहे हे ओळखलेलं आहे का? तिच्या येण्यानं भिंतींना केव्हा आपलेपणा वाटलेला नाही. उलट ती गेल्यावर घराचा दरवाजा मोकळा वाटलेला आहे. हवेतला दबाव कमी झालेला आहे.

जो शामनं लहानपणापसून भोगला आहे. ही आपली आई, हे त्याला समजून घ्यावं लागलेलं आहे. अगदी लहानपणी ती घरी रहावी म्हणून त्यानं रडून हट्ट केला त्यावेळी त्याची पपी घेऊन तो गाढ झोपला आहे हे पाहील्यावर लाल दिव्यांच्या गाडीतून प्रयाण केलेलं आहे.

आपली आई ही कशी, डोक्यावर लाल दिवा झळाळीत जाणारी हे कळल्यावर अगदी लहानपणापासून शामनं सूज्ञपणा दाखवून केव्हां हट्ट केलेला नाही. हे असं वर्षानुवर्षे चाललेलं आहे. या श्रीपाद सावंतनं शामला केव्हां खांद्यावर घेतलं नाही. हवेत उंच उडवलं नाही. त्याच्या मध्यरात्रीच्या रडण्यानं त्याला लो लो लो लो करीत खोलीत फेऱ्या घातल्या नाहीत. काही नाही. हे काम आपल्या आईनं केलं ००००

पण त्याचं शामवर बारीक लक्ष असायचं.

------लहान मुलं देवाची फुलं.

------त्यांच्या निरागस हास्यात ईश्वराचा संकेत असतो.

--------शाम प्रमाणापेक्षा तल्लख निघाला आहे.

प्रत्येक वर्षी प्रशस्तीपत्रकं घेत गेला. तो आता इंजीनियरींगच्या शेवटच्या वर्षाला आहे. आईच्या स्पर्शाला मुकलेला आणि प्रतिकूल स्थितीत वाढलेला शाम एक हुषार विद्यार्थी म्हणून सगळयांनाच त्याचा अभिमान आहे. आपलं गणित चुकत आलंय. त्या त्या दिवसाच्या आरशात दिसणाऱ्या जगाचे आपण मालक उरलोत. एवढंच.

# बापपण

प्रत्येक बापाच्या आयुष्यात त्याच्या तरण्याबांड मुलाकडे एखादा कौतुकाचा कटाक्ष टाकण्याचा क्षण येत असतोच असतो.

शामबरोबर आपण बाकड्यावर बसलो. तिखट चण्याच्या दोन पुड्या घेतल्या. (चण्याची पुडी आयुष्याची साथीदारीण झालेली आहे. लग्न झाल्याझाल्या एकदा चौपाटीवर चण्याची पुडी घेऊन आपण नर्मदेबरोबर वाळूत बसलो होतो. ती म्हणाली होती, चणे खाणं दारिद्र्याची लक्षणं! )

शाम थोडसं हसून म्हणाला,

"हाऊ वंडरफूल! आपण असे कधी ----निवांतपणे बसलेलो मला आठवत नाही बाबा! अगदी लहानपणापासून सुद्धां!"

"खरायं.तशी वेळ मिळाली नाही."

-------एक चणा तोंडात टाकून तो पुटपुटला,

"हं. तशी वेळ मिळाली नाही. सॉफ्टवेअर इंजिनीयरची पदवी घेऊन मी घरी आलो. आईचा अभिनंदनाचा फोन आला. दिल्लीला अधिवेशन चालू आहे. ते संपताच ती येईल. तूर्त वेळ नाही."

त्याच्या डोळयांत संध्याकाळचं उदास उन उतरलं होतं. पण थोडा वेळच. आपल्या डोळयांत बघत म्हणाला,

"आजीनं पटापटा मुके घेतले. तिच्या डोळयांत पाणी आलं.यू सी, ओरीजिनल गोष्टीची चव वेगळी असते बाबा! खूप बरं वाटलं."

आईनं मुके घेतले. आपण पाठ थोपटली. खूप काही वाटलं. त्याला कडकडून मिठी मारावी. आईसारखेच मुके घ्यावेत. त्याच्या उंच बळकट अंगावरून हात फिरवावेत. त्याचं तोंड गोंजारावं.

पण यातलं काही झालं नाही. तो आजीच्या आणि आपल्या पाया पडला. आपण सोसायटीत मिठाई वाटली. वगैरे. दोन चार दिवसांनी कौतुकाची उत्साहाची तापसर ओसरली. मित्रांच्या गाठीभेटी, सोपस्कार झाल्यावर या संध्याकाळी शामबरोबर फिरायला बाहेर पडलो. गार्डनच्या बाकडयावर बसलो. तो अचानकपणे बोलू लागला,

"बाबा, ही संध्याकाळ वेगळी नाही. प्रकृतीनुसार तिचा प्रकाश इथल्या माणसांवर पडतोय. हुरहूर, दुःख, उदासी, चैतन्य, प्रेम. काहीही! या गार्डनमध्ये पाचपासून पंच्याऐंशीपर्यंत माणसं सुरक्षितपणे हालचाल करताहेत. बाहेर बेभान वेगानं ब्रेक्स मारणारं जग आहे. अगदी वेगळं!"

"वा! छान बोलतोस की!"

"लेखकाचा मुलगा आहे मी!"

"माझं एखादं तरी पुस्तक वाचलंस का?"

------किंचित खांदे उडवून तो थोडसं हसला.

"वेल! नो. आईनं मला इंग्रजी माध्यमातूनच शिकायची सक्ती केली. यू नो इट बाबा. त्यामुळे --------"

"आपण तो विषय बदलू."

"फाईन!"

विषय बदलला म्हणून त्याचा चेहरा सैल झाल्यागत वाटला. खरंच, या मुलाला आपण कधी कुस्करलं नाही. हवेत उंच उडवलं नाही. चावलं नाही. दूरच्या काकामामाकडे बघावं तसा आपल्याकडे बघत हा मुलगा आज इंजीनियर झाला आहे! यानं ठो ठो रडून कधी आपल्याशी हट्ट केला नाही. अगदी बालपणापासून याची नजर त्याच्या आईचा शोध घ्यायची. पण ती नजरही सावरली.

तो अकाली शहाणा, हुषार, झाला. रात्री झोपताना अंगठा तोंडात घालून आजीच्या पदराचं टोक चिमटीत धरून झोपायचा. कदाचित त्यावेळी स्वप्नात आईवडीलांना बघत असावा.

खरंतर आपली आई हीच त्याची खरी आई आहे.

“मला यापुढं एम. एस. करायचंय. यू. के. त.”

आपण त्याच्याकडे आश्चर्यानं पाहीलं.

“हे तू अगोदर कधी बोलला नाहीस शाम!”

तो सहजच उत्तरला,

“काय बोलायचं? कशाला बोलायचं? कधी बोलायचं? मी जी. आर. ई. परीक्षा देतोय. नक्की पास होईन. स्कॉलरशीप घेईन. पुढचं शिक्षण घ्यायचा माझा विचार आहे. मी आईशी या विषयावर फोनवर बोललोय. ती म्हणाली, गो अहेड!”

“माझ्याशी या विषयावर कधी बोलला नाहीस पण!”

“तुमच्याने एवढा खर्च होणार नाही। बारा लाख रुपये फी आहे. होस्टेल, लायब्ररी, कॉलेजची फी वगैरे. आईला विचारलं. म्हणाली बँकेतून काढता येतील. काळजी नको. मी आहे.”

आपण गप्प बसलो. शामने व्यवहाराच्या गोष्टी त्याच्या आईशी बोलून पूर्ण केल्या होत्या.

आजची तरुण पिढी फार कॅलक्युलेटीव्ह आहे. दोष त्यांचा कसा? आम्ही बरेचसे कमी पडलो असावेत. शामची जन्मकथा आपल्याला माहीत आहे. आपणच जनक! रागापोटी, सूडापोटी, अनावश्यक क्रूरतेत घेतलेल्या वैयक्तिक उपभोगाचं हे बीज पेरलेलं आहे. जननीला त्यावेळी कसला आनंद नव्हता की ओढ आणि प्रेम. परंतु जमीन सुपिक, त्यामुळे फलधारणा लगेचची. तिनं तिचं काम चोख केलं. शरीरात नऊ महीने पालनपोषण रक्त श्वास अन्न देवून गर्भ वाढविलाय. या प्रचंड

महाकाय पृथ्वीवर त्याला जगायला स्वातंत्र्य दिलं. तो जीवही तिचाच. रक्तपाणी तिचंच. जिद्द तिचीच! आपलं कार्य निमित्तमात्र. गर्भात असतानाच शामला, आपल्याला पृथ्वीवर असं असं वाढायचंय, वागायचंय हे कळालं असावं. अभिमन्यूला ज्ञान मिळालं तसं. हुंकार तिथंच झाला. सावंत घराण्याचा उध्दार झाला.

त्यामुळे शामकांत श्रीपाद सावंत बी. ई. ( ऑनर्स ) या व्यक्तीला तिच्या मर्यादा बालपणापासूनच कळल्या. सुखदुःख वाटलं नाही. बापाचा रोल कळला. आईचा रोल कळला. आजी आई झाली. प्रश्न पडतो. आपण आपल्या एकुलत्या एक मुलाशी इतके तटस्थ का वागत आलोत? ही कसली प्रक्रीया? हा कोणावरचा राग कोणावर काढलेला? वर्षे कशी भरभरा गेली. आपण पन्नाशी ओलांडलीही आणि आपले चिरंजीव पुढच्या परीक्षा देवून, यू. के. त, एम. एस. करायच्या बाता करतायत! ग्रेट! पुत्र व्हावा ऐसा गुंडा! आपली घडण आजीनं केली याची जाणीव त्यानं ठेवली तरी पुरे. आई जनकल्याण करतेय. त्या झगझगाटातून आपल्याला वेळीच दूर ठेवलं म्हणून बापाचं आणि आजीचं ऋण मानलं तरी पुरे.

पण आता बापाचं थिटेपण कळलं. बारा लाखाचं बजेट झगझगाटातल्या आपल्या आईला कळवलं. बापाला सांगायची काय गरज? महिन्याच्या शेवटच्या आठवडयात एक तारखेची वाट बघणारा माणूस बारा लाखाचं कर्ज ऐकल्यावर फेफरं येवून पडेल! अशी कुवत उच्च शिक्षण कशी पेलवणार?

------ ओघाओघात चणे खाताना कुवत कळली. ती पुरे. पन्नाशीपुढची आपली सत्यस्थिती मुलानं सांगितली ००० शरीराच्या आत कॅन्सर असलाच तर त्याची वस्ती कळणार नाही. एखाद्या तज्ञ इंजिनियरसारखा तो निर्विकार कुशलपणे शरीरात आपलं काम करीत असेल. शरीर पूर्ण काबीज झालेलं आहे याची खात्री झाल्यावर तो बाहेर सिग्नल्स पाठवील! ०० मी गेली काही वर्षे इथे कार्यरत आहे! येतोय! सिगरेटस् थांबवा नाहीतर मनसोक्त ओढून तरी घ्या. तुमच्या मनोबळावर सारं अवलंबून आहे. डायबेटीस, हायपरटेन्शन इ० नावाचे परके पक्षी आकाशातून

उतरायला लागलेत. शरीराभोवती, आत वस्तीला यायचं म्हणताहेत. मेडीकल बिलं वाढू लागलीत. शरीर संपदा हा भाग्ययोग आहे. पन्नाशीअगोदरच काही मित्र हार्टअटॅकनं गेले. आरोग्याची त्यांना कोण काळजी! एकजण तर मॉर्निंग वॉकला गेला तिथेच कोसळला! भले! काहीजण पॅरालीसिसनं लोळागोळा होऊन चिकट लिबलिबीत जगत आहेत. त्याचप्रमाणे, सत्तरीनंतरही व्हिस्की, सिगरेट्स सहली करून गाडया चालवणारे मित्र आहेत!

तेव्हां, हा भाग्ययोग आहे. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात गेलं तरी व्याधींची साथ आहे.

------ आणि इथे सुपुत्र म्हणतोय की यू. के. मध्ये एम. एस. करायचंय. आईतर्फे भक्कम फीची सोय होणार आहे. बाबा, चणे खाण्यापुरती तुमची कंपनी बरी आहे. लहानपणापासून असे एकांतात आपण कधी बसलेलो आठवत नाही०० कुठंतरी शुकशुकाट वाटू लागला. माणसं अशी आपल्या काठाला धरून तरंगत असतात. पाण्यात डुचमळली तर पकड घट्ट करून आपला आधार घेतात. आणि वेळ आली की आपल्याला सोडून अलगद निघून जातात. कासवानं पाण्यात सावकाशपणे जाताना पांढरं पोट दाखवावं तसं. उगाचच वाटत रहातं की जाताना त्यांनी निदान हात हलवून, मान तुकवून, निघालो म्हणावं. तेही नाही! आपण रिकामे किनारे होऊन बघत रहातो. वरचं उन असह्य वाटू लागलं की जीव तगमगतो. तडफडतो.

या मुलाला इतकी वर्षे तळहाताच्या फोडासारखा वाढवला. शिकवला. मग यानं असं अलग का वागावं?

“शाम, आयुष्यातले मोठे निर्णय घेण्याआधी मोठयांचा सल्ला घ्यावा.”

“आईला कल्पना होती की!”

( म्हणजे बाप म्हणून मी कोणी नाही? आजीनं तुला उरापोटावर वाढवलं, लहानपणी हगणंमुतणं काढलं, आजारपणात डोळयांची निरांजन करून पहाटेपर्यंत जाग घेतली, तुझ्या

शाळातल्या प्रवेशासाठी मी तासनतास रांगेत उभा राहीलो, डॉक्टरांकडे धावपळ केली. ही माणसं तुझी कोणीच नव्हेत? पायात बळ आलं तेव्हा आईच आठवली का? )

“आम्हाला अशा गोष्टी कळत नाहीत आणि आम्हाला त्या सांगणं इतकी गरज नाही अशी शिकवण तुला तुझ्या आईने दिलेली दिसतेय!”

“तसंच काही नाही बाबा.”

“आपल्या देशात खूप शिकण्यासारखं आहे. तुझी आई या देशाची एक कार्यकर्ती आहे. तिचा सल्ला काय?”

“सल्ला तोच. परदेशी उच्च शिक्षण घेणं महत्वाचं. पण अभ्यास पूर्ण झाला की मायदेशी परत ये! पैशाची पर्वा करू नकोस. मी आहे ना! इथे आल्यावर राजकारणात प्रवेश कर. मी आहे.”

“तू काय ठरवलंस?”

-----शाम जराजरासं हसला. भिरभिरत बघत पुटपुटला,

“खरं सांगू बाबा! या ' मी आहे ना ' ' मी आहे ना ' ढोलताशांचा वीट आलाय मला! अगदी लहानपणापासून हे दोन शब्द माझा पिच्छा सोडीत नाहीत! उच्छाद मांडलाय या शब्दांनी! पण मी शांत आहे. बघतो आहे. मला घराबाहेर, मित्रांच्यात हॉस्टेल्समध्ये राहून खूप काही कळालंय. जगायला शीक. ही रक्ताची नातीगोती वगैरे एका लेव्हलपर्यंत ठीक. पण पुढे तू आणि तुझं स्वतःचं आयुष्य आहे. माणसासारखा कृतघ्न प्राणी नाही आणि मी माणूस आहे. माझं आईवर प्रेम आहे. पण तेही एका लेव्हलपर्यंतच. कारण ही तिनंच मला दिलेली ट्रीटमेंट आहे! माझा कोणावरही राग नाही. जो तो ज्याच्या त्याच्या ठिकाणी अगदी परफेक्ट आहे. तेव्हां आईचा, ' मी आहे ना ' मला अस्वस्थ करीत असला तरी तोच माझ्या उपयोगी पडणार आहे! आता उरलात तुम्ही! बँकेतून रिटायर्ड होताना दहा लाखाची थैली घेऊन येणाऱ्या माणसाकडून कसली अपेक्षा करायची?

उरली आजी. तिचं प्रेम दूरदर्शी आहे. तशी चलाख बाई! पण खऱ्या अर्थानं अशी चलाख माणसंच या जगात जगायला योग्य असतात!"

-----आपण अवाक् होऊन आपल्या मुलाकडे बघत राहीलो.

(आपल्या म्हाताऱ्या आईविषयी या कालच्या अंगठ्याएवढ्या पोरानं ' तशी चलाख बाई ' अशी पुस्ती जोडली! तिच्यावर प्रेम असेल, पण तिच्याविषयी मतही स्पष्ट आहे! आपण आपल्या आईला परखड, थोडीशी विक्षिप्त समजत आलो आहोत. तिचा हा नातू तिला ' तशी चलाख बाई ' संबोधत आहे! याचा अर्थ काय? )

"शाम स्पष्ट बोल. आजीविषयी तुला नेमकं काय म्हणायचंय?"

तो जरासा हसला.

"तिला वेळ मारून न्यायचं कसब आहे बाबा! तिचं तरी काय चुकलं? गाव, समाज घरदार सोडून आलेली स्त्री. प्रथम तुम्हाला मोठं करण्यात तिचं तरुणपण गेलं आणि नंतर मला मोठं करण्यात! बोलघेवडी, दिसायला बरी होती म्हणून परक्या माणसात ती ऍडजस्ट होऊ शकली. माणसं तिला नेहमी मदतीला तयार असत. मूडमध्ये असली की माझ्या लहानपणी ती मला कायकाय गोष्टी सांगायची! त्यावेळी नवल वाटायचं ----- आता वाटतं तिचं त्यावेळचं वागणं योग्य होतं."

"म्हणजे काय?"

तो पुन्हा जरासा हसला. ती त्याची लकब होती.

"मी पाचसात वर्षांचा असताना आजीचं वय पन्नाशीचं होतं की. पण त्या वयातही तिच्यावरून घाणेकर आळीत भांडणं व्हायची. मला आठवतयं!"

---------आपल्याला परमावधीचं आश्चर्य वाटलं.

“आणि मला हे कधीच कसं कळलं नाही?”

“नुसतं घरी येण्याजाण्यापलीकडे तुम्ही काय केलंत बाबा? पगार आजीच्या हातावर ठेवला की काम झालं एवढंच तुम्हाला माहित होतं, . घराशी संवाद करायला तुम्हाला वेळ कुठे होता? तुमचं ऑफिस, तुमचं लेखन याच धुंदीत तुम्ही असायचेत.”

“बरं. पण काय झालं?”

“हेच! घाणेकर वकीलांच्या बायकोला वाटायचं की ते श्रीपाद सावंतांच्या घराला आर्थिक मदत करतात! ते केव्हांतरी संध्याकाळचे घरी येतात. चहा पितात. गप्पा मारतात. निघून जातात! त्यांच्या बायकोला संशय यायचा. एकदा मोठं भांडण झाल्याचं पण आठवतंय.”

“आणि हे पण आईनं मला सांगीतलं नाही?”

“तुम्ही कदाचित दूरवर गेला असाल.”

“घाणेकर वकील घरी आलेले तुला आठवतात?”

“केव्हाच नाही. रिकामटेकड्या बायकांचे विचार असावेत बाबा! मला वाटतं आजी या गोष्टी एन्जॉय करायची!”

“तू तंत्रज्ञ आहेस शाम. अशा बिनबुडांच्या अफवांवर तू विश्वास किती ठेवशील?”

“मुळीच नाही. आजी मजेशीर गोष्टी सांगायची. स्वतः हसायची. हसवायची!”

( आपल्या आईची ढासळती मनोवृत्ती. दुसरं काय? )

“ऐकणारा तूच होतास घरी! शेजारच्या बायका यायच्या का?”

“फार कमी. आजीचं एकटं रहाणं त्यांना खटकायचं.”

“ऐक शाम. आता तू लहान नाहीस. एकटया स्त्रीकडे पुरुषवर्ग कशा दृष्टीने बघतो हे तुला सांगायला हवं का?”

“मला माहीत आहे.”

-----आपल्याला वाटलं की आपण उगाचच आपल्या आईची बाजू घेऊन वकीलपत्र चालवलेलं आहे. नातवाला गमतीच्या गोष्टी सांगून ती स्वतःचं समाधान करून घेत असेल. या गोष्टींचा शोध घेणं म्हणजे आपला हा जाणता मुलगा नव्हे. हा शोध आपला एकटयाचा आहे. विषय बदलला,

“ग्रॅज्यूएशननंतर पुढच्या शिक्षणासाठी परदेशी जाणं वगैरे गोष्टींचं प्लॅनिंग तुझं कॉलेजचं शिक्षण चालू असताना तुझ्या आईशी झालेलं आहे. मी आणि आजी यांना सांगण्याची गरज वाटली नाही असंच समजायचं का?”

“वेल ---- हो.”

“ठीक. मगाच बोललास की ' मी आहे ना, मी आहे ना ' या पालुपदांची तुला उबग आलीय. माणूस कृतघ्न प्राणी आहे, वगैरे. नीट विचार केलास तर रक्ताच्या नात्याशी फारशी ओढ नाही. असंच ना?”

“हो.”

-----आपण चटकन आपल्या शेजारच्या मुलाकडे पाहीलं. हे कसलं नातं? आणि नातं म्हणजे एवढीच जवळीक असेल तर या श्रध्दांचा, विश्वासाचा अर्थ तो काय? एका बाकडयावर बसून दोन शेजारी चणे खात आहेत. एवढंच. आपण चिडलो.

“आर यू इन युवर सेन्सेस?”

“हो.”

“ही स्वार्थाची परीसीमा होतेय शाम!”

“हो.”

----तगमग झाली. संध्याकाळच्या सुखद वाऱ्यात घाम फुटला. रुमालानं पुसला. शेजारी आसपास माणसं कशी आनंदात खिदळत होती. पण आपण शेजारी बसलेल्या तरुण मुलापासून योजने लांब गेलो. इथे माघार कोणी घ्यायची हा सूक्ष्म परंतु जहाल प्रश्न उरला. आपली संतती इतकी स्पष्टवक्ती उपजेल अशी सुतराम कल्पना नव्हती. इच्छा नव्हती. खपकन खपली पडली.

“तुम्ही लेखन करताय बाबा. मी असा का घडलो यावर तुम्ही विचार करावा.”

“हद्द झालीय! काही अघटीत घडलेलं नाही. तुझ्यापेक्षा बकाल स्थितीत मुलं वाढतात आणि उच्च शिक्षण घेतात. पण ती इतकी स्वार्थी, विचित्र, दुष्ट उपजली नाहीत.”

“आपण निघू या. रात्र होतेय.”

निघालो.

त्या रात्री झोप लागली नाही. आपल्या आईनं बापलेकातला अबोला चटकन ओळखला. तिनं शामला विचारलं. पुन्हा तेच प्रश्न. शब्द. उत्तरं. परिणाम एकच. आपल्या आईला आणि आपल्याला सत्य अगदी प्रामाणिकपणे कळलं. शामकडे कमालीचा संयम, धोरण होतं. श्रीपाद सावंतचा मुलगा असून नसून सारखा होता. काही अघटीत घडलं नव्हतं. बाहेर वाच्यता केली नाही तर सावंतांचं घर एक आदर्श कुटुंब होतं. जे कळलं, घडलं त्याचा बाऊ करणं योग्य नाही. आपण खूप तळमळलो. अचानक भारी एकटे झालो.

आपल्या आईनं स्वतःला सावरलं. शाम बाहेर गेल्यावर एकच वाक्य बोलली,

“सुखदुख मानू नये. देव असलाच तर न्याय देल. दिल्लीवाल्या जिजाबायला उमजू दे की असापण शिवबा जलमतोय!”

"ही तिचीच शिकवणी आहे आये!"

"पोरगं हातचं निघून गेलं की पश्चित्ताप व्हैल."

आईचं खरं होतं. अचंबा वाटला. ती पटकन सावरू शकली. आपण मात्र कोलमडलो. सपाट झालो. अनर्थ होत होता. इतकी वर्षे खतपाणी घातलेलं झाड उंच भरदार वाढलं पण त्यानं सावली स्वतःत गिळून टाकलेली आहे! बाहेर खूप ऊन पडलंय याची त्याला चिंता नाही. रस्ते खूप दूरवर गेले आहेत. टेकड्यांपलीकडे.

मुलाची ठोस उत्तरं. मी जगतोय. तुम्हीही जगा. तुम्ही वाढवला. उपकार केले नाहीत. जन्माला घालण्यासाठी शारिरीक आनंद घेतलात. त्यावेळी मी चोवीस वर्षानंतर यू. के. ला जाऊन एम. एस. करीन हे तुमच्या स्वप्नातही नव्हतं. मी विचारलं नव्हतं. तेव्हां, जे मिळवलं ते सर्वस्वी माझं कर्तृत्व आहे. लहानपणी टेकू दिलात. तो सगळयांनाच मिळतो. ' मी आहे ना ' या शब्दात अहंभाव आहे. तो जगासाठी ठीक, पण पोटच्या पोरालापण सांगावासा वाटतो, यात मानसिक उथळता दिसते. आईला हे सांगून उगाच का दुखावावी? तिचा आर्थिक आधार आहे ००००० अशी आईपण मिळावी लागते.

(लोकं आसपास गोंडा घोळताहेत. कारण एकतर कामही होतं आणि घरंगळणाऱ्या नजरांना सूखही मिळतं. स्त्रीदाक्षिण्य, या नावाखाली पुरुषवर्ग पुढं पुढं होवून कामं करून देतो. बाई कर्तृत्ववान आहे. तिच्या एका स्मितासाठी आणि पान्हाळलेल्या नजरेसाठी उपाशी रहाणारे आंबटशौकी राजकारणी कमी नाहीत.)

००००० पण ' मी आहे ना ' आपली आई आहे.

-----कशी का असेना, तिनं आपल्याला नेहमी मदत केलेली आहे. तिचा आवाज आहे. लहानपणी, मित्रांनी शाळेत त्रास दिला तेव्हां शाम सावंत कोण, ही मुख्याध्यापकांना आठवण

करून दिल्यावर पोरं सुतासारखी नरम झाली. नावाची नुसती झलक. आदर शाळेच्या दप्तरातून हळूहळू झिरपू लागला होता!

---हा चमत्कार श्रीपाद सावंत या व्यक्तिला शक्य नव्हता. कारण तो कोणीच नव्हता. किमया नर्मदा सावंत या नावाची होती. आईनं तिचं कर्तव्य पार पाडलेलं आहे. काही सणांना, आपल्या वाढदिवसांना ती लाल दिव्याच्या गाडीतून येवून हजर राहीलेली आहे. सगळयांशी घामट चेहऱ्यानं बोललेली आहे. आजीशी. बाबांशीही. आपल्या आर्थिक, शैक्षणिक अडचणी बाहेरच्या बाहेर सुटलेल्या आहेत ०००

---श्रीपाद सावंत घराबाहेर पडला. तरतरा चालू लागला. गर्दीनं त्याला स्वाहा केलं. सिगरेट पेटवली. रस्त्याच्या कडेला कठड्यावर बसून भसभसा झुरके घेऊ लागला.

---नर्मदेला तिची चूक कळत नाही. शाम हुषार आहे. पण तिच्या अहंभावाचा त्याला तिटकारा येतोय हे तिला माहीत नाही. तो जराजरासा हसतो. हे हसणं सावध आहे. एका धूर्त आपमतलबी तरुणाचं आहे हे तिला माहीत नाही!

जे आपल्याला आता, चोवीस वर्षांनी कळलंय! आपण एका सुखद भ्रमात राहीलो. अशी माणसं बँकेत अफरातफर करणाऱ्या सफेद कपड्यातल्या अधिकाऱ्यांपेक्षा घातक असतात. त्यांना उभं फोडलं तरी आतलं कळायचं नाही. दुष्ट. श्रीपाद सावंतला निष्क्रीय उदास वाटू लागलं. मुलगा हा असा तर त्याची आई किती पाताळयंत्री असू शकेल! त्यात राजकारणी! सगळयांनी महान करून ठेवलेली! देवी नर्मदाबाई!

सकाळपासून कपाळाच्या आत एकसूरी ठोका पडत होता. क्षणभर एक भयानक विचार मनात आला आणि गेला.

----या स्त्रीनं इतकी वर्षे दूर राहून शेवटी आपल्या इतक्या जवळ वाढवलेल्या मुलाला जिंकून नेलाच! काय मिळवलं आपण? ००० हिलाच आपण ठार मारली तर? एरव्ही तेरव्ही आपल्याला जगायचं नाही. इतरांना सिक्यूरिटीचा प्रश्न असेल.

नीट योजनाबध्द आखणी केली तर तिला भेटणं फार कठीण नाही. हिचाच खात्मा केला तर? तर? त्याचं डोकं ठणकू लागलं. सिगरेटचा धूर कोंडल्यामुळे ओकारी येईलसं झालं. मग दरदरून घाम फुटला. रस्त्यावरून जाणारी गर्दी पावसातल्या पाण्यागत धूसर झाली.

आपण हा विचारच कसा करू शकलो? एखाद्या हिंदी सिनेमात दाखवतात तसा? आपण एखाद्या माणसाला इतक्या शांतपणे, स्वच्छपणे मारू शकू? आखलेल्या ओळी ओलांडण्याची कुवत आहे?

----निराशेच्या दाट सावटात चार दिवस असेच निघून गेले. रात्री भयानक, असंबध्द स्वप्नं पडू लागली ०००० शाम गाडी बेफाम वेगाने चालवीत आहे. रस्त्याच्या कडेला गाडी घासते. शामला सालड्यांसारखा ओढून काढावा लागतो ०००० नर्मदा हेलीकॉप्टरमधून जनतेला टाटा करताना हवेत तोल जाऊन कोसळत आहे. तिच्या डोळयांत मरणप्राय भीती उभी राहीलेली आहे ०००० आपण एका उंच कड्यावरुन खाली फेकलो जात आहोत. खालची जमीन प्रचंड वेगाने आपल्याकडे खेचली जात आहे! एका मोठ्या नळकांड्यातून आपण धावत आहोत. वगैरे. नष्टतेकडे खेचणारी स्वप्नं. आभाळ टांगल्यासारखी.

----खाडकन जाग येते आणि कळतं की आपण सुरक्षित आहोत. घामानं उशी ओली झालेली आहे. छाती विलक्षण धडधड करीत आहे! चार दिवस कसे सरले कळत नाही. घरात आई आणि शाम नव्हता. खाटेवर पडून श्रीपाद सावंत वर गरगरणारा पंखा बघत पडला होता. डोक्यात विचारांचा घणाघात चालला होता. चार दिवस सिक लीव्हवर राहून नुसता ओंडक्यासारखा पडून राहीला. आईनं डॉक्टरकडे जाऊन गोळया आणि सिरप आणलं ते घशाखाली ओतलं. दाढी वाढली. एकांतात आईनं शेकडो प्रकारे समजावलं. मनाला लावून घेऊ नका. आजकालची तरुण

मुलं उद्दाम असतात पण त्यांच्या पोटात प्रेम नसतं असं नाही. सगळं ठीक होईल. त्याचा त्यालाच पश्चात्ताप होईल आणि क्षमा मागील बघा! सावंतांचा वंश तसा माणूसघाण्याच. तुमचा बाप पण पोलीसखात्यात भडकू माणूस म्हणूनच झेंडा हलवीत होता! तुमचा प्रकार तोच. पण वेगळा. अबोल. एकलकोंडा. खाण तशी माती. तोंडाला घाण येईस्तो तुम्ही सावंत लोक बोलणारे नव्हेत! तेव्हां श्याम्यानं अशी काय भटांच्या पोरांसारखी पोपटपंची करावी! हो ला हो. नाही ला नाही ही तुमची रीत! निराशा झटकून उठा बघू!

---- आईचं भाबडं तत्वज्ञान यावेळी पटलं नाही ००००

विहिरीत पडलेल्या कुत्र्यासारखा तो खोलीभर फिरू लागला. शामनं शकलं उडवली होती. पार दूरवर भिरकावून दिल्यागत झालं. वर गरगरणाऱ्या पंख्याचं अचानकपणे आकर्षण वाढलं. दाढ गच्च आवळून त्यानं दार खिडक्या बंद केली. शामला आणि आईला परतायला बराच वेळ होता. पंखा बंद केला. खाटेखालच्या टपात ठेवलेली पातळ चादर घेतली आणि तिचा पीळ भरला. स्टूलावर चढला. पंख्याच्या दांडयाला पीळ बांधला. डोळे मिटून थरथरत्या हातांनी गळयाभोवती पीळाचा फास लावला. रागानं स्टूलाला लाथ मारली आणि पंख्याला लटकू लागला. लोंबकळला. गळाला लागलेल्या माश्यागत तडफडू लागला. गुदमरून माणूस जास्तीत जास्त दोनचार मिनिटं राहू शकतो. मग फुफ्फुसं नरम पडतात. आणि नंतर शुध्द हरपत जाते.

काही सेकंदातच शरीराच्या वजनानं श्रीपाद सावंतच्या मानेवर खूपच ताण पडला आणि जीव कोंडला. शरीराची आग आग झाली. गळयात डोंब उठला. पायाच्या अंगठयापासून वर वर मुंगळयांची फौज चढू लागली आहे असं झालं. जीभ बाहेर पडेलशी झाली. जे काही घडलं ते नाटयमय. घाईघाईत. यातनामय. मरणप्राय.

पहिल्यांदा डोळयांभोवती लालभडक विवरं फिरू लागली. उष्ण रस अंगातून वाहू लागला. तो अंगातून घळघळा बाहेर येइलसं वाटलं. डोळयांपुढून चित्रविचित्र निळे जांभळे साप धावू लागले! ठपक्याठपक्यानं अंत जवळ येत आहे! हवालदिल, बेसहारा मुलासारखी स्थिती झालीय. सगळं

जगच विरुध्द गेलंय आणि एकटा परमेश्वर बाकी उरलाय. इथे आयुष्य तळमळत पाया पडू लागलेलं आहे. येशूसमोर पसरलेले शेकडो तळहात आकाशात विलाप करु लागले आहेत! ००००

किती वेळ गेला कळलं नाही. श्रीपाद सावंतनं घाबरून, चिडून मोकळे हात डोक्याकडे नेले. गळफासातून मान सोडवण्यासाठी स्वतःचं शरीर उचललं. मान मोकळी झाल्यावर तो प्रथम स्टूलावर आणि नंतर फरशीवर धाड्कन कोसळला. शरीराला सतरा ठिकाणी मार लागला. पण त्याला कळलं नाही. तोंडातून फेस येवून तो फरशीवर निपचित झाला.

अर्धा तास त्याच स्थितीत राहील्यावर उठला काळी भोवळ आली होती. आत्महत्त्येचा प्रयत्न हा गुन्हा आहे! असा प्रयत्न करणाऱ्यावर डॉक्टर्स सिडेटीव्हचा डोस देवून सुईसाईड वॉच ठेवतात. कारण अशी माणसं पुनरावृत्ती करतील! काहींच्या तऱ्हा वेगळ्या असतात. स्प्लिट पर्सनॅलिटी किंवा अलटर्स डिसऑर्डर घेतलेल्या माणसांना मनोरुग्ण म्हणून विजेचे झटके देतात! वगैरे.

मानेवर प्रचंड जळजळाट झाला. मानेवर घशात आत रक्त साकळलं होतं. शरीरात डोंब. जे काही झालं ते दोन मिनिटांतच, पण प्राणघातक. नाटयमय. शरीरभार काही सेकंद घेतल्यानं हातपाय झाडून हिसक्यांनी मानेवर लाल पट्टे आणि मोठे व्रण उठले. डोळे वाटीएवढे झाले.

श्रीपाद सावंत मरणाचा घाबरला.

आता? कोणत्या तोंडानं डॉक्टरचा उपचार घ्यायचा? डॉक्टर संशयानं तपाशील. कदाचित हात झाडून मोकळा होईल आणि सरळ पोलीस केस म्हणून फोन करेल! नेम नाही. श्रीपाद सावंत अशक्तपणे उठला. वॉशबेसिनमध्ये चेहरा गार पाण्यानं धुवून स्वतःला बेसीनच्या आरशात पाहीलं. चेहऱ्याचं भेदरं झालेलं होतं. दाढी वाढलेली, डोळयांखाली वर्तुळं आलेली, नाकावरचं हाड वर आलेलं, गालफडं बसलेली. त्यात मानेवरचे गळफासाचे व्रण! क्षणभर त्याचा विश्वासच बसेना. आपण इतके विद्रुप दिसू शकतो याची त्याला कल्पना नव्हती. वेड लागेलसं

झालं. आता घाई होती. सुचेल ते उपचार केले पाहीजेत. डेटॉल लावल्यावर मरणाचं झोंबलं. कोणी स्टोव्ह घशात पेटवलाय असं वाटलं. मग बर्नाल लावलं. मग गळयाला मफलर गुंडाळून खाटेवर अंग झोकलं. पंखा चालू केला ०००० चितेवरची राख उडायला लागली ००००

०० आपण काही वेळापूर्वी काय करून बसलो?

----वरचा पंखा हवा सोडीत चक्रावला आहे. खटखट आवाज करीत विचारीत आहे.

०० श्रीपदा! बाबारे, आत्महत्त्या अशी करतात का?

----लटकण्य़ाआधी पाठीमागचे हात गच्च बांधून मगच पायाखालचा स्टूल लकटला असतास तर एव्हाना मुक्त झाला असतास! जे काही केलंस ते अर्धवट, घाईघाईनं ताटातलं जेवण बकाबका उरकल्यासारखं. हाफ हार्टेड. प्रतिक्षिप्त क्रीयांनी, हातांनी त्यांचं काम चोख केलं आणि त्यांनी गळफासातून तुझी मान सोडवलेली आहे! तुला विचार करायला पण त्यांनी वेळ दिला नाही. पण आतां कर्माची रेषा उभी राहीलीय. तुझा हेतू डॉक्टरला कळणार आहे. थोड्या वेळानं गळयाला बऱ्यापैकी सूज येईल. शरीराच्या वजनानं व्रण खोलवर उठलेत आणि रक्त साकळलंय. मफलर लावून ऑफिसात किती दिवस वावरणार बापा? तुझी कृती भ्याडपणाची आहे. जेव्हां हातांनी तुझी सुटका केली तेव्हांच तुझी वेदनांपलीकडे जाण्याची तयारी नव्हती. स्वतःची कुवत आधी ओळखायला नको? त्यापेक्षां झोपेच्या गोळया घ्यायच्यास! आता येणाऱ्या दोन दिवसांनी अन्ननलीका किंवा श्वासनलीकेचा त्रास सुरु झाला की साडेसाती खऱ्या अर्थाने हात धुवून मागे लागेल. झक मारून डॉक्टरकडे जावं लागेल. स्कॅन केल्यावर सिगरेट्सनी तो मार्ग कोणत्या स्थितीत ठेवलाय याचा शोधपण लागेल! म्हणजे ही दुसरी अनपेक्षित साडेसाती! पुढं काय काय होईल ते सांगता येणार नाही.

ही एक छोटीशी कृती. पण तिनं मनात आक्रोश केलाय. विस्तीर्णपणे भविष्यातल्या अडचणी, मानहानी अवहेलना आताच डोळयांपुढे सारवटून दाखवायला सुरुवात केलीय!

श्रीपाद सावंत हवालदील झाला. मुळू मुळू रडू लागला. पंधरा मिनिटं रडून झाल्यावर त्याला हलकं वाटलं. आईची तीव्रतेनं आठवण आली. ती देहाची पुरचुंडी झाली तरी जगत राहीलीय. आपण नुसता प्रयत्न करतो. एकदा ऑफिसमधून खिडकीतून उडी मारायचा प्रयत्न केला तेव्हां मार्तुंडकरसरसाहेबांनी पट्ट्याला खेचून आत ओढलं म्हणून वाचलो. हे साहेब आता ऐंशीपुढचं क्षीण वासनांनी धुगधुगणारं आयुष्य चिवटपणे जगत असतील. आणि या एकांतात आपण मात्र मृत्यूची चाहूल लागताच घाबरून पिचून गेलो आहोत!

----- काय झालं असतं?

आई आणि शाम परतले असते. दार उघडत नाही म्हणून प्रथम शंकेनं, नंतर काळजीनं शेजाऱ्यांची मदत घेऊन तोडलं असतं. आपलं निष्प्राण शरीर पंख्याला लोंबकळताना बघून आईनं दुःखानं हंबरडा फोडला असता.

शाम चमत्कारिकपणे खांदे उडवून, बापानं पोलीसांचं लचांड मागे लावलंय म्हणून गॅलरीत जाऊन चरफडला असता. नर्मदेला फोन लागला असता. काही नातेवाईकांनाही फोन गेले असते. नर्मदा आली असती. ( न येवून चालणार नसतं. बातमी पसरून प्रेस रिपोर्टर्स फोटोग्राफर्स आले असते. नर्मदेला जनमानसात स्थान आहे. ते सांभाळणं अति महत्वाचं आहे. ती प्रतिमा डागळून चालायची नाही. )

नवऱ्यानं आत्महत्त्या केलीय. पेपरात बातमी चमकणार. नर्मदादेवींचा आणि त्यांच्या मुलाचा गंभीर चेहरा फोटोग्राफर्स कचाकच खेचणार. आई मात्र जीव तुटल्यागत रडेल. पण धाय मोकलून रडण्याचे दिवस पार मागे सरलेत. हे शामला माहीत आहे. आजच्या सुशीक्षित विचारसरणीला हा गावढळपणा मान्य नाही. इथे मरणही सॉफिस्टिकेटेड झालेलं आहे. प्लास्टिकच्या फ्लॉवरपॉट सारखं. टेलीव्हीजनवर नर्मदादेवी चार शब्द माफक बोलल्या असत्या ००००० खूप खूप चांगले होते श्रीपाद सावंत. विचारवंत होते म्हणून लेखन सुरु केलं. त्यांनी म्हणूनच इतका विरह सहन

करून माझ्या मुलाला उच्च शिक्षणापर्यंत आणलंय. यात त्यांच्या आईचाही सिंहाचा वाटा आहे. एक आदर्श पिता, पती म्हणून ते माझ्या हृदयात कायमचे घर बांधून बसले आहेत ०००० बऱ्याच मंत्र्यांचे, संत्र्यांचे संदेश आले असते. केवळ बाईंशी स्नेहसंबंध असावेत म्हणून. इति.

मग त्या वळल्या असत्या. शामही वळला असता. तेवढ्यात त्यानं आईशी एम. एस. च्या पुढच्या तयारीविषयी विचारलं असतं. तिनं ते त्याच्या पाठीवर हात ठेवून, मी आहे ना! म्हणून सांगितलं असतं. लाईफ इज अ प्रोसेस. थांबला तो संपला. खरं दुःख आईला झालं असतं. पण तेही काही काळापुरतं. खरी काळजी पुढचीच. या म्हातारपणात आता आपले पुढचे दिवस कसे जातील? कारण शाम्यानं रंग दाखवायला सुरुवात केलीय. नवऱ्याचा खून झाला. पोरानं आत्महत्त्या केली. सुनेनं दिल्ली गाठलीय आणि नातवानं, खांद्यावर लाडानं बसवला तर कानातच मुतायला सुरुवात केलीय! सावंतांचा असा अद्वितीय इतिहास!

आपलं काय? नवऱ्याची मिलीटरी पोलिसची पेन्शन आहे. मुलानं बँकेत कदाचित आपल्या नावावर पैसे ठेवले असतील. पण सूनबाई आणि नातू तो पैसा कधी काढून नेतील ते कळायचंही नाही! गावातल्या त्या बायजाबाईचं काय झालं? मिलीटरीतल्या नवय्राची पेनशन अचानकपणे वाढली आणि बँकेत नजरेत खुपण्याएवढी रक्कम जमा झाली. म्हातारी सोन्याचं अंडं देणारी कोंबडी म्हणून तिला फुलात जपायला माणसं पुढं झाली. तिच्या नातीला बँकेचे कामकाज माहीत त्यामुळे दरमहीन्याला म्हातारीचे अंगठे घेऊन बँकेतून निस्ती लयलूट सुरू झाली! डोळे अर्धे बंद करून पाण्यातली मगर पेनशन गिळीत बसली! जणू बाहेरची माणसे येडी नि खुळीच जन्माला आली आहेत! शिकली सवरलेली पांढरपेशी माणसेच अशी गुंडगिरी करून जन्माचं काय सार्थक करून घेतात ते त्यांच त्यांनाच माहीत! म्हातारपण शाप आहे. चारी दिशा प्रतिकार थंडावतो. अवयव पडायला सुरूवात होते. पैशाच्या बळावर फार चालत नाही. उरतं ते सत्य. आपलं काय? हा प्रश्न बिनचेहऱ्याचा पण खरा आहे! ०००

----दार वाजू लागलं म्हणून श्रीपाद सावंत अशक्तपणे खाटेवरून उठला. कडी काढून पटकन खाटेवर पडला आणि डोक्यावर चादर ओढून घेतली. घरात आई आणि शाम आले. माणसं आली म्हणून हालचाल. चपला काढल्याचा, पिशव्या ठेवल्याचा, जिने चढताना लागलेल्या धापांचा आवाज. एवढंच. एक शब्द म्हणून नाही. काय हे आपलं आयुष्य? घराच्या नुसत्या भिंती उभ्या आहेत. या चौकटीत तीन माणसं श्वास घेत आहेत. हा एकांत असह्य होऊन भिंतींनीच किंचाळावं!

----जेवायला म्हणून खाटेशी आईनं ताट आणलं तेव्हां तिनं गळयाचा व्रण पाहिला आणि डोळे विस्फारले. तिच्या तोंडून शब्द फुटेनात.तिनं हातातलं ताट स्टूलवर ठेवलं. शाम देखील दगडासारखा निश्चल झाला. दोघांच्याही लक्षात गोष्ट आली. फार फार कळाली.

"बाबा! काय केलंत हे?"

"००००००००००००००!"

"आता माज्या कर्मा! हे वो काय? गळयाला -------"

"बाबा! गळफासाच्या खुणा तर नाहीत?"

"००००००००००००!"

"बघ बावा शाम्या रे! बापसानं किती जिवाला लावून घेतलांय ते बघ!"

चट्कन उठून शाम गॅलरीत गेला."शिट"म्हणाला. त्याला एकंदर स्थितीची दया कणव नाहीच पण तिटकारा आला होता. आईनं गळयाच्या व्रणावरून हळुवार बोटं फिरवली. तिचं मन कळवळलं. सुरकुतलेल्या गालावरून आसवं वाहू लागली.

"शाम्या, बावा डागदरला तरी बोलाव!"

"आणि डॉक्टरला काय सांगायचं? वडिलांनी असा असा प्रयत्न केला म्हणून? तो म्हणेल, ही पोलीस केस आहे. त्यांना सरकारी हॉस्पिटलात ऍडमिट करा. अटेम्प्टेड सुईसाइड म्हणून आय. पी. सी. सेक्शन लावून तुरुंगात टाकतील! पोलीस डिपार्टमेंटचं आणि माझ्या आईचं बिनसलेलं नातं जगजाहीर आहे. तेच प्रेस स्टेटमेंट देऊन, ' मिस्टर श्रीपाद सावंत यांचा आत्महत्त्येचा निष्फळ प्रयत्न. ' म्हणून खमंग बातमी उद्या पेपरात देतील! आणि मग पुढचा पंधरवडा प्रत्येक न्यूजपेपर आपापलं स्वतंत्र डोकं वापरून खप वाढवील! त्यामुळे नसत्या नातेवाईकांचा उपद्रव सुरु होईल. बाबांनी या गोष्टीचा विचार केला काय? मिडीयावाले दार ठोठावत रहातील."

(पोरगं बोलत होतं त्यात एक शब्दपण चुकीचा नव्हता. तडफडत जिवंत राहून आपण आपल्यापेक्षा इतरांनाच जास्त ताप दिलेला आहे. सगळी गिचमिड झालेली आहे. आज चार भितींपलीकडे बातमी गेलेली नाही. पण गेलीच तर अनर्थ होणार आहे. जिवंतपणी मरणयात्रा सुरु होणार आहे. तसे थोडेफार वाचकांचे लेखक श्रीपाद सावंत, ज्यांनी त्यांच्या पुस्तकांत आयुष्याच्या फुटणाऱ्या वाटांवर चिंतन केलेलं आहे, मृत्यूवर तटस्थपणे विवेचन केलं आहे, त्यांनी स्वतःच आत्महत्त्येचा प्रयत्न केला म्हणून कदाचित आपल्याविषयी स्वतंत्र बातमी येऊ शकेल! नेम नाही. मिडीयावाले क्रेझी असतात. मग एखादा भावनाशील वाचक ' कलंदर वृत्तीचा एक अज्ञात माणूस ' म्हणून स्तंभलेख लिहील ०० एखादा फोटो छापून मरणोत्तर मोठेपण मिळेल. पण तूर्त आपण जिवंत आहोत. घोळ झालाय आणि पोरगं नेमकं त्यालाच चिडलेलं आहे! )

गॅलरीत उभा राहून शाम तडतड बोलत होता आणि त्याचे शब्द भिंतीवर आदळत होते. ओरखडे पाडीत होते. आई चिडली,

"आसं काय बोलतोस कार्ट्या? पोरगा हैस का वैरी? बापसाला असाच ठेवायचा व्है? काळीज आहे का नाही तुला?"

----- शाम चट्कन आत आला. आजीपुढे गुढगे टेकून त्यानं जमिनीवर डोकं टेकलं. सदगदीत स्वरात पुटपुटला,

"चुकत असेन तर थोबाड मला आजी! पण असं बोलू नकोस ग! मला सांग, बाबांसारखा एक विचारवंत असा निर्णय घेतो --- हे योग्य आहे का? मी म्हणतो कारण तरी काय असं घडलंय? बँकेची चांगली नोकरी आहे. मी त्यांचा मुलगा उच्च शिक्षणासाठी परदेशी जात आहे. माझ्या आईचं पाठबळ आहे. अशा स्थितीतल्या माणसाला जीवनाचा कंटाळा का यावा? मला तर काहीच कळत नाही गो!"

---- श्रीपाद सावंतने घरात शिरणाऱ्या किरमिजी प्रकाशाकडे बघत अशक्तपणे म्हटलं,

"मी ठीक होईन. तुम्ही काळजी करू नका. एरव्ही तेरव्ही सिकलीव्हवर आहेच. आणखी पंधरा दिवस वाढवीन. तोवर जखम बरी होईल. गळयाला सर्व्हीकल कॉलर लावून ऑफीसला जाईन. स्पॉण्डीलॉसीसचा त्रास आहे म्हणून सांगीन. काळजी नको."

आई नंतर तासभर बडबडत होती. अश्रू ढाळीत बोलली,

"मीच करंटी वो! गावशीव सोडलं. देवधर्म सोडला. कुलस्वामिनीच घरातलं दर्शन घेतलं नै. म्हणूनच हे विपरीत विचार सुचत चाललेत वो सावंतांच्या खानदानीला!"

----- शाम खिन्नसा हसला. हळूच विचारलं,

"आईला कळवायला हवं का?"

श्रीपाद सावंत ओरडला,

"तिला कळवलंस तर मी तुझं तोंड बघणार नाही!"

"एवढं चिडायला काय झालं बाबा?"

"मी मेलो तर कळव. तूर्त नको."

"पण का?"

"कळवून काय होणार आहे शाम? तिचे शहाणपणाचे डोस ऐकायला मला बरं वाटणार नाही."

"ठीक आहे. नाही कळवणार. झालं?"

---- त्या रात्री घर फार उशिरा झोपलं. म्हातारीला काळजी लागली होती. शामला संभ्रम. पहाटे दोनला जाग आली. आई कीचनमध्ये पडली होती. तिच्या घोरण्याची बारीक लकेर ऐकू येत होती. बाहेर मध्यरात्रीचा गारवा पसरलेला. सारं चिडचीप. एखाद दुसरं वाहन बेभान जाणारं. रस्त्याच्या किनाऱ्यावर सोडीयम व्हेपरचे दिवे माना मोडलेल्या खांबांना लटकणारे. पिवळाजर्द प्रकाश टाकणारे. गरीबसे. रात्र सोसणारे.

----- बाप झोपलेला नाही हे शामला कळलं. गुणगुणला,

"बाबा! मी थोडं बोलू?"

"काय"?

"बोललो तर ऐकाल ना?"

"बोल"

"बाबा, मृत्यू अज्ञात आहे. ज्ञातानं शोध घ्यायचा. तुमच्या लेखनातून तो प्रयत्न तुम्ही केलाय. पण स्वतः मात्र मृत्यूला शरण गेलात! शरण नव्हे, भय साठलंय तुमच्या मनात! या भयापोटीच तुम्ही स्वतःला वाचवलंय. याचा अर्थ तुम्हाला जीवनाची ओढ आहे. मग असं स्वतःला खुटून टाकावसं का वाटावं?"

"माझी पुस्तकं केव्हां वाचलीस?"

"परीक्षणं वाचलीत पेपरमध्ये."

( बरं झालं. पुस्तकं वाचली असती तर याला बरेच अर्थ लक्षात आले असते! )

"काय राहिलंय जगण्यासाठी शाम?"

"तुम्ही स्वतः राहीलाय!"

"त्याला अर्थ काय?"

"म्हणजे? मी अभ्यासासाठी परदेशी चाललोय ते तुम्हाला आणि आजीला सांगितलं नाही, एवढचं कारण का? मला पटेल असं काही तरी बोला! तुम्हाला खूप डिप्रेशन आलेलं आहे. खरंतर तुम्ही सुदृढ सुखवस्तू आहात. कोणालाही हेवा वाटावा अशी तुमची सक्सेस स्टोरी आहे बाबा!"

"सक्सेस स्टोरी? कसली?"

"कळलं. तुम्हाला प्रचंड नैराश्य आलंय. कारण आईचा दुरावा. पण तो तर मी पण लहानपणापासून घेतलाय ना? मलापण जीवनाचा कंटाळा यायचा. पण मी तुमच्याएवढा निकरावर आलो नाही. तुमचं एकटेपण मी समजू शकतो. राग कळू शकतो. तरीही ----- तुम्ही थोडेसे बिनधास्तपणे जगायला शिकलात तर --- जगणं इतकं दारूण होणार नाही! मी काय बोलतोय ते कळतंय ना? मुष्कील असं काही नाही!"

"मला कशातही रस वाटत नाही."

"उद्या आपण एका मानस शास्त्रज्ञाकडे जाऊ. माझ्या मित्राचे वडील आहेत."

"मला माझा जाहीरनामा करायचा नाही! आता तू बोललास तोच पुरे. तुझ्या आईविषयीचं तुझं मन मला आधीच कळलंय. आतां बापाच्या मानसिक विकलांग स्थितीचा तू अभ्यास करावा असं

मला वाटत नाही शाम! मला यापुढे माझ्या पध्दतीने जगू दे. तुझ्या आईला यातला शब्दही कळता कामा नये.”

“बरं.”

“आता झोप. मी पुन्हा प्रयत्न करणार नाही. मला वेड लागलेलं नाही! काळजी करू नकोस. आणि आमच्याविषयी फार विचारपण करू नकोस. माझं जे काही थोडं फार सेव्हिंग आहे त्याची वाटणी मी लेखी लिहून ठेवलेली आहे. अर्धी माझ्या म्हाताऱ्या आईसाठी आणि अर्धी तुझ्यासाठी. तुला आवडो न आवडो.”

“तुम्ही शांत व्हावं बाबा! जगाचा अंत जवळ आलेला नाही. सुट्टी वाढवा. आजीला घेऊन तीर्थयात्रेला जा. मला सुट्टी नाही. नाहीतर मी पण तुम्हाला कंपनी दिली असती.”

---- काही वेळ असाच गेला. या निमित्तानं का होईना पण शाम जवळ झोपून बोलला. बरं वाटलं. मुलाचे शब्द मैत्रीचे वाटू लागले. आता संबंध अगदीच बाकडयावर बसून चणे खाण्यापुरते नव्हते. शब्दांची, सूरांची जवळीक आली होती. अनपेक्षितपणे शाम बोलला,

“बाबा, मला वाटतं आपण समदुःखी आहोत.”

“म्हणजे?”

“तुम्हाला तसं वाटत नाही?”

“स्पष्ट कर!”

“म्हणजे बघाना! तुम्हाला पत्नीचं सूख मिळालं नाही आणि मला आईचं. तुमच्यासारखेच मीपण हॉस्टेलच्या रुममध्ये पंख्याकडे बघत विचार केले आहेत. मग मी निबर झालो. मित्रांशी दुःख मोकळं केलं. त्यांचा सल्ला पटला. बी सेल्फीश! माकडीणीची गोष्ट माहीत आहे ना? पाणी नाकाशी आल्यावर तिनं स्वतःच्या पोराला पायाखाली घालून पाण्यात दाबलं आणि स्वतःची

उंची वाढवून श्वास घेतला! हे सत्य आहे. साधूसंतांनी गावून लिहून दाखविलेली फिलॉसॉफी नाही! एकदा हा विचार पक्का मनात बसला की आयुष्यातले बरेच रस्ते  पटापट मोकळे दिसू लागतात! सगळंच अर्थपूर्ण दिसू लागतं."

"केवळ स्वतःसाठी आयुष्य असतं का शाम?"

"मग आईनं काय केलंय? तिनं मला काय शिकवलंय?"

"हा प्रश्न एकदा तू तिला विचारायला हवा होतास!"

"खूप वेळा विचारला. म्हणाली, ती एक अस्वस्थ स्त्री आहे. संसारात पडून तिनं तगमगच अति घेतलीय. तिला राज्य करायचं होतं. कुठल्या चौकटीत बंदीस्त रहायचं नाही. दुसऱ्याला पटवून देण्याची तिच्याजवळ उत्तम भाषा आहे. खरंतर मी स्वतःला भाग्यवान समजतोय! माझे आईवडील विचारवंत आहेत! पण घडी विस्कटलीय. त्याचे परिणाम सगळेजण भोगतोय. तुम्हाला मैत्रीचा हात देणारा कोणीतरी साथीदार हवाय. ती स्त्रीच हवी अशातला भाग नाही. पण तुमचा इतका कोणी मित्रही नाही बाबा! आजीला तिच्या मर्यादा आहेत. ती एकांगी वृत्तीची बाई आहे. तापटपणा म्हणजे समंजसपणा नव्हे."

"शाम! अकाली प्रौढ झालास तू!"

-----शाम अंधारात जरासा हसला असेल. पण ते दिसलं नाही.

"बाबा, आपण सारेजण जीवनाच्या छोट्याश्या भागाला चिकटून बसतो. नदीचं खरं रूप तिचं सुंदर चित्र खोलीत लटकवून बघण्यात नाही. प्रत्यक्ष नदीकिनारी जावून तिची हालचाल आणि तिनं आसपास निर्माण केलेल्या सुंदरतेत आहे. दुसऱ्यांच्या जीवनाकडे पाहील्यावर, ईश्वराने आपल्याला खूपच सुंदर, सुबक जगण्यासाठी मुभा दिलीय असं तुम्हाला का वाटत नाही? नदीच्या पाण्यावर पडलेलं सकाळचं उन विलक्षण कोवळं असतं. नाही का?"

"छान बोलतो आहेस शाम!"

"मला माझ्या आईचं काहीवेळां पटतं. पण ती अस्वस्थ आहे. तुम्ही असंतुष्ट! दोघात थोडासा फरक आहे. असंतुष्ठतेत सृजनशीलता पूर्ण करण्याची ओढ असते. आणि सृजनशील अवस्था म्हणजे ईश्वर आहे असं तुम्हीच कुठेतरी लिहून ठेवलयं! ईश्वर दगडात नाही की मंदिरात. तो आहे तुमच्यात नी माझ्यात!"

"पण या ईश्वराने स्वार्थी हो, असं सांगितलेलं नाही शाम!"

-----तो गप्प बसला. अंधारातून मग हळुवार शब्द फुटले.

"तुमचंच मत मी पुन्हा सांगतोय बाबा. आपण कुठेतरी अपूर्ण आहोत या अवस्थतेत पूर्णत्व शोधण्याचा प्रयत्न करताना ईश्वराचा शोध लागतो. त्याने स्वार्थ ही संज्ञा विचारात घेतलेली नसते बाबा! मुळात प्रश्न आहे तो ईश्वर आहे की नाही याचा! मला वाटतं, तो नसावा या विचाराचं पाठबळ केलं आणि आपलं मन तयार केलं तर भीती निघून जाईल. मृत्यू देखील आपल्या छोट्याशा आयुष्याचा एक विभागच आहे. त्याला त्याच्या गतीनं येवू द्यावं. त्याचं आक्रमण ओढून घेऊ नये. तो अविचार होईल. नाही का?"

----श्रीपाद सावंतचं मन भरून आलं. त्यानं अंधारात शामच्या केसात बोटं फिरवली. शामनं किंचित थरारल्यागत केलं. बापाकडून ही अपेक्षा त्याने केली नव्हती. डोळयांत टचकन पाणी येवून गालावरून पडलं.

बापाच्या बोटांना पाण्याचा ओझरता स्पर्श झाला. बाप म्हणाला,

"दुःख वाटून घेऊ नकोस शाम. तुझे विचार परिपक्व आहेत. खरंच, मला वाटत होतं की तू अजून लहानच आहेस! पण नाही. बाप म्हणून मी नक्कीच थिटा पडलो आहे आणि त्याची

मला कल्पना आहे. खूप शीक. फक्त आपली माती विसरू नकोस. इतक्या वर्षात इतकं मन मोकळं करायची अशी संधी आली नव्हती म्हण."

"इच्छा नव्हती म्हणा. आईवरचा राग तुम्ही माझ्यावर काढीत होता. मी पारितोषिकं घेतोय, लोक कौतुक करतात याचं तुम्हाला समाधान असेल, कौतुक असेल; पण प्रेम नव्हतं."

"ठीक, तसं म्हणू शकतोस."

"सत्य आहे ते! आज ना उद्या ते सांगायची वेळ येणारच होती. आपण झोपू या. उद्या मला युनिव्हर्सिटीत जायचं आहे. डॉक्टरांची ट्रीटमेंट घ्यायची का?"

"नको."

"ट्रीटमेंट घ्यायची असेल तर त्या दृष्टीनं सावध रहायला हवं. घरच्या ट्रीटमेंटनं व्रण बरे व्हायला खूप वेळ लागेल बाबा!"

"लागू दे. तू काळजी करू नकोस."

----सकाळ झाली. शेजारी शाम नव्हता.

----पण घशाच्या आत कोणीतरी दरड रचल्यागत वाटू लागलं.

-----संध्याकाळचा चहा घेताना दारावर हलकीच टकटक झाली. श्रीपाद सावंतने गळयाभोवती मफलर गुंडाळला. घशाला आतून सूज आल्यासारखी वाटत होती. आवाजात नक्कीच बदल झाला असणार. त्याने आईला खुणवलं.

दारात ऑफिसचा रेकॉर्ड क्लार्क रघुनाथ राणे उभा! उंच किरकोळ. सावळा. स्वच्छ स्वच्छ टिनोपॉल. याला झटकून दोरावर वाळीत टाकला तर परिसर झगझगीत होईल! आई त्याच्याकडे अविश्वासानं बघतच उभी राहीली. या मुंबईत इतका भयानक स्वच्छ कपड्यातला माणूस ती

पहिल्यांदाच बघत होती. शुभ्र शर्ट पँट. कडक इस्त्रीतलं. पायात काळं पॉलीश केलेली चकचकीत चप्पल. उजवीकडे नीट पाडलेला केसाचा भांग. चोपडलेले केस. गुळगुळीत दाढी. कपाळावर गंधाचा बारीक ठिपका. चेहऱ्यावर थोडासा उत्सुक भाव. मोठे डोळे स्थीर बघणारे. आईला वाटलं, परग्रहावरून कोणी उंबरठ्याबाहेर उतरलंय की काय?

राणेला दारात अनपेक्षितपणे उभा बघून श्रीपाद सावंतला उकीरड्यात बसल्यागत झालं आणि दडपण आलं. मफलरमुळं गळा झोंबत होता. या बकाल घरात हा अतीथी येणारही नाही असं क्षणभर वाटलं. अगदी नको तो माणूस या स्थितीत आला होता. अनिच्छेनं तो बोलला,

“या राणे! कसं काय य़ेणं केलं?”

( आवाजात चिरकेपणा आला आहे का? )

----- आई मंत्रावल्यागत बाजूला झाली. रघुनाथ राणेनं चपला दाराबाहेर काढल्या. त्या एका ओळीत उभ्या ठेवल्या आहेत याची खात्री करून घेतली. मग आत आला. थोडसं हसला. आईकडे बघून हात जोडले. म्हणाला,

“साहेबांनी तब्येत बरी नाही म्हणून ऑफिसला फोन करून रजा वाढवली. थोडी काळजी लागली. विचार केला. एकदा जाऊन यावं. प्रथमच येतोय. अगोदर सांगायला हवं होतं. चूक झाली.”

“नाही राणे. बसा. डॉक्टरनं सांगितलं पंधरा दिवस रजा वाढवा. थ्रोट इन्फेक्शन. पूर्ण बरा झालो नाही.”

----- आई आत गेली. राणे खुर्चीत बसला. बसण्यापूर्वी पँटच्या इस्त्रीला चिमटीत धरून ठेवलं. मगच बसला. मग त्यानं एका नजरेत खोलीभर पाहीलं. थोडसं हसला. श्रीपाद सावंत ओशटपणे गुणगुणला,

"आजारपणामुळे घराकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही राणे! आता आईचं वय झालंय. मोलकरणीच्या जीवावर सोडलेलं घर आहे तसं स्वीकारायचं!"

"चालायचंच! तब्येत कशी आहे साहेब?"

"रिकव्हर व्हायला वेळ लागेल. साधा ताप म्हणून सुरुवात झाली. त्यात हे नवीन कॉम्प्लीकेशन!"

"गळयाला काही झालंय का?"

----- मफलर घट्ट करीत श्रीपाद सावंत थोडंस चिरचिरल्यागत म्हणाला,

"हेच! स्पॉण्डीलॉसीस म्हणे! यापुढे गळयात सर्व्हिकल कॉलर घालून काही महिने ऑफीसला यावं लागेल! इलाज नाही. कॉलरमुळे टांग्याला जोडलेल्या घोडयासारखं वागावं लागेल राणे! इकडे तिकडे बघायची बंदी!"

----- रघुनाथ राणे स्थिर डोळयांनी गळयाकडे बघत बसला. त्याची डोळयाची बुब्बुळं मोठी, आवळयाएवढी आहेत असं वाटलं. अशा डोळयांची माणसं भाबडी असतात. कोण कुठला हा ज्युनियर माणूस. पण प्रेमापोटी आलाय. ऑफीसच्या इतरांना काही पडली नाही. राणे आलाय आणि स्थिती कठीण करून बसलाय! आईनं चहा करून आणला. टेबलावर ठेवला. तिच्याकडे थंडपणे बघत श्रीपाद सावंतने म्हटलं,

"आये! पावसकरांनी औषधं घेऊन जायला सांगीतलंय ना? दवाखाना उघडला असेल. घेऊन येतेस?"

---- आईला संदेश कळाला. ती परत आत गेली.

"साहेब, पावसकरांचा दवाखाना कुठं आहे ते सांगा. मी घेऊन येतो तुमची औषधं. आई खूप थकलेल्या दिसत आहेत!"

श्रीपाद सावंत चट्कन उठून म्हणाला,

"आपण असं करू राणे. दोघेही बाहेर पडू. संध्याकाळच्या उनात थोडं फिरलं की बरं वाटेल. येताना मी पावसकरांकडून औषधं पण घेऊन येईन. चला. मी कपडे करतो!"

राणे गप्प बसला. कपडे करून झाल्यावर दोघे बाहेर पडले. श्रीपाद सावंतच्या डोळयात चक्रं फिरत होती. एक अनावश्यक माणूस सोबत चालत आहे. याच्या मनात आपल्याविषयी बराच आदर वगैरे आहे. आजकाल तेपण दुर्मिळ होत चाललेलं आहे म्हणा! ०० मोकळया हवेत बरं वाटलं. रस्त्यावरून माणसं घाईत चालत होती. कोणी ओळखीचे हात वर करीत होते. बघत होते. गळयातला मफलर सगळयांच्या डोळयांत भरत होता. कोणी विचारण्याच्या आतच श्रीपाद सावंत पुढे चालत होता. यावेळी राणेची सोबत आवश्यक वाटत होती.

------ माणसं फार व्यवहारी झालीत. वेळेच्या बंधनात अडकलीत. सारखी धावत आहेत. जिकडं तिकडं उशीर होतोय. चौकशीला उसंत नाही. त्यातच राणेसारखा माणूस भेटायला येतोय. हा बरीच वर्षे एकत्र काढल्याचा परिणाम. दोन चार वर्षांनी दोघेही निवृत्त होऊ. वेगळे पडू. दोन दिशांना जाऊ. मग भेट होईल ती अशीच. अचानक. ऑफीसचं नातं हा अंधूक दुवा. आणखी दोनचार वर्षात दोघातला कोणीतरी एक मरेल. उडत उडत बातमी ऐकेल. राणे भेटायला तरी आला. त्याच्या आजारपणात आपण भेटायला नक्कीच गेलो नसतो!

अरे! आपण तर कालच मरणार होतो!

रस्त्याला उतरण लागली. हायवे पार केल्यावर नगरपालीकेचं उद्यान लागलं. दोघे आत वळले. चालत असताना ऑफिसची माफक चौकशी चालली होती. राणेकडून अधिक माहीती काढणं मूर्खपणा होता. राणेला मर्यादा होत्या. एका बाकड्यावर बसले. संध्याकाळच्या उनात मुलं बागडत होती. रिकामटेकडे इथं तिथं बसले होते. दूर कोपऱ्यात दोघं दोघं बागेकडे पाठ करून आपलं विश्व चाचपडीत होती. त्यानं सहजपणे विषय काढला,

"राणे! मागच्यावेळी तुम्ही दिलेल्या माहीतीचा मला ऑफीसच्या कामांसाठी फार उपयोग झाला बरं का!"

"कोणती माहीती साहेब?"

"अहो असं काय करता? आठवतयं? बँकेला प्रॉपर्टीबद्दल एक गुप्त रिपोर्ट हवा होता. खरा वारस शोधणं होतं. तेव्हां तुम्ही मालवण नगरपालीकेकडून एक फार जुना मृत्यूचा दाखला मला आणून दिला होता! आठवतंय?"

राणेनं थोडसं हसून मान हलवली.

"त्याचं काय आहे साहेब! माझा भाचाच तिथे कामाला आहे!"

"तेच म्हणतोय मी. सरकारी खात्यातली कामं ओळखीशिवाय पुढं सरकतात का? बँकेनं थोडा का पत्रव्यवहार केला होता? पण तीस चाळीस वर्षांपूर्वीचा मृत्युपत्राचा दाखला काढणं म्हणजे उत्खलनच होतं राणे! केवळ तुमच्यामुळे हे शक्य झालं बघा!"

राणे कसनुसं हसला. भिरभीर बघत बसला. बँकेतल्या इतक्या वर्षांच्या नोकरीमध्ये राणेला इतक्या गोड शब्दात कोणीही बोललेलं नव्हतं. श्रीपाद सावंतने थोडा वेळ विचार केला आणि खिशातून सिगरेटचं पाकीट काढून पुढं केलं. आपण प्रमाणापेक्षा जास्त सलगी दाखवतोय हे त्याला कळत होतं. परंतु राणेकडून फाजील जवळीक होईल, काही त्रासदायक ठरेल यातलं काही होणार नाही हे पण माहीत होतं. त्यांची दोघांची इतक्या वर्षांची वाटचाल होती. सिगरेट शिलगावल्यावर त्यानं विचारलं,

"बाय द वे, तुमची आणखी कुठे ओळख आहे?"

"तुम्हाला कुठल्या खात्याची हवी ते सांगा साहेब!"

"पोलीस?"

राणेनं नाकातून धूर काढून म्हटलं,

"मालवणात काय किंवा कोकणात काय. पोलीस आणि मिलिटरीशिवाय माणूस कुठे भरती होतो का साहेब? आपल्यासारखे पांढरपेशी नोकरी करणारे फारच कमी!"

"म्हणजे तुमची ओळख आहे तर?"

"बरेच लोक आहेत. नात्यातले पण. काय काम होतं?"

श्रीपाद सावंतने दुखऱ्या मानेवरचा मफलर थोडा सैल केला. डोक्यात विचारांचं थैमान चालू होतं. छाती धडधडत होती. त्याने भरपूर धूर छाताडात घेतला. डोळे चुरचुरू लागले. पाणी आलं. मग राणेकडे बघत गुरगुरला,

"एक वैयक्तिक काम होतं. पण अतिशय गुप्त. तुमच्या घरी तुमच्या पत्नीलाही कळता कामा नये! मला एका सब इनिस्पेक्टरची माहिती हवीय. अगदी डीटेलमध्ये. जशीच्या तशी. तुमचं काम मला आणि केवळ मलाच, रिपोर्ट देण्याचं. त्यामुळे मला काय वाटेल यावर तुम्ही मुळीच विचार करायचा नाही. हे ऑफीसचं काम नाही. माझं, खाजगी काम आहे. तेव्हां मनावर दडपण येवून देऊ नका. हे काम करू शकाल की नाही एवढचं सांगा. तुमच्या व्यतिरिक्त हे काम मी दुसरं कोणालाच दिलं नसतं! कराल?"

राणे उठला. उद्यानाच्या बाहेर कचऱ्याच्या डब्यात सिगरेटचं थोटूक टाकलं. परत येवून पँटची ईस्त्री चिमटीत धरून सावधपणे बसला. म्हणाला,

"आज आयुष्याचं सार्थक झालेलं आहे साहेब! सुरुवातीपासून इतकी वर्षे आपण एकत्र आहोत! एकाच तालुक्याचे आहोत! आता रिटायर्ड व्हायला पण दोघांची तेवढीच वर्षे उरलीत. परंतु आजच्याएवढा विश्वास तुम्ही केव्हांच दाखवला नव्हता! मुळात तुम्ही फार चांगले आहात. पण

एकलकोंडे. माझ्याकडून काम होईल हा माझा शब्द आहे. तुम्हाला विश्वास असेल तरच सांगा. या कानाचं त्या कानाला कळायचं नाही. मी तुमच्यावर सोपवतोय."

"पोलीस खात्यात काशिनाथ सूर्वे म्हणून एक सब इनिस्पेक्टर आहे. त्याची संपूर्ण माहिती हवीय."

"सी. आय. डी.? होमगार्ड? सिटीपोलीस? रेल्वे पोलीस? ट्राफिक?"

"तो माझ्या मिसेसचा सुरुवातीपासून बॉडीगार्ड आहे. अंगरक्षक!"

----- राणे त्याची आवळयाएवढी मोठी बुब्बुळं स्थिर रोखून बघू लागला. एक मिनिटभर दोघेही शांत बसले. झाडावरची पानं गळायला लागली. खूप समजल्यागत राणेच्या चेहऱ्यावर बदल होऊ लागला. तेव्हां श्रीपाद सावंतने नजर टाळली. राणे अगदी मृदू आवाजात पुटपुटला,

"पाचसात दिवस वेळ द्या साहेब. गोष्ट जोखमीची आहे. तेवढ्याच विश्वासातल्या माणसाकडून ही माहीती मिळेल! सुरुवातीपासून एकच अंगरक्षक का रहातो हा प्रश्न आहे. पोलीस डिपार्टमेंटला तर बदल्यांचा ससेमीरा लागलेला असतो!"

"तसंच काही नसावं. तुम्हीच कसे सुरुवातीपासून माझ्याबरोबर काम करताय?"

----- राणेनं पुन्हा शांतपणे बघायला सुरुवात केली.

"ते पण खरंच! पण तुम्ही निश्चिंत असा साहेब! आपण कोकणी माणसं वचनाला पक्की. सरकार मायबाप आपल्याला अन्नपाणी देतंय. वरून जशी ऑर्डर येईल तसं वागायचं! मग ते मनाला पटो, न पटो."

"म्हणजे?"

“म्हणजे बघा की साहेब! एकाच डिपार्टमेंटला तेच तेच काम करून माणूस कंटाळू शकतो की नाही? पण मी कधी तक्रार केलीय का? संपूर्ण नोकरीत स्वेच्छेनं बदली मागण्याचा अधिकार देखील असतो. तो पण मी मागीतला नाही! कधी तसा अर्ज केलाय का?“

“नाही.”

“तेव्हां, आपली बँक ही आपली दुसरी आई आहे ही श्रध्दा मनात ठेवणारा मी माणूस आहे. कदाचित माझ्यासारखी दुसरी पण माणसं असूं शकतील. त्याचप्रमाणे हा कोणी, काशिनाथ सूर्वे माझ्यासारखाच ड्युटीला चिकटला असेल!”

“मला त्याची संपूर्ण माहीती हवी होती.”

“गुप्त माहीती आहे हे तुम्हीच म्हणताय साहेब! तेव्हां थोडा वेळ लागेल.”

------ श्रीपाद सावंत सिगरेट ओढीत बसला. त्याला नक्की कळत नव्हतं. इतक्या वर्षांचा हा एकट्याचा झगडा. शोध. तुंबलेले विचार एकट्याचे. पुस्तकं लिहिली ती दुर्बोध समजली गेली. मृत्युवरच्या अज्ञात संकल्पनेवरचा हा रिसर्च असा अर्थ जाणकारांनी घेतला. जे ओळखीचे होते त्यांना थोडासा अर्थ कळला. काही नात्यातले. मित्र. वगैरे.

पण ते एका परीघापलीकडे राहीले. तर्क करू लागले आपल्या सहचारीणीच्या कारकीर्दीपुढे आपण काळवंडून जात आहोत आणि रागापोटी तिची जीवनपद्धती समजून चारित्र्याचा शोध केवळ एकट्याने घेत आहोत तो थांबवावा अशी ही जवळची विद्वान माणसं सांगीत आहेत. मग आपल्यावर सोडून देत आहेत. पण या गाफील संध्याकाळी------ या क्षणी या शोधाला थोडा चरा तर पडलेला नाही?

आपण थकलोय. राणेसारख्या निरुपद्रवी विश्वासू माणसाची मदत मागीतली. ही गोष्ट अत्यंत गुप्त खाजगी आहे हे सांगून त्याच्या प्रामाणिक विचारांना आपण नको तेवढं उत्सुक केलेलं आहे!

हा धोका आहे!!

-----एकदम मोठ्यांदा हसून तो उठला. म्हणाला,

"तुम्ही तर फारच सीरियस झालात राणे! अहो, मी गंमत केलीय! हा विषय तुम्ही विसरून जा! सोडून द्या ही चौकशी!"

"म्हणजे?"

"खाजगी बिजगी काही नाही हो राणे! मी एक लेखक आहे. या काशीनाथ सूर्वेची केवळ माहिती हवी होती. मला माणसांची तपासणी निरीक्षणं करणं आवडतं. तो माझा छंद आहे. एखाद्या व्यक्तीचा इतका काळ बॉडीगार्ड रहाणं जोक नाही! तेव्हां या माणसाविषयी नुसती उत्सुकता होती. एवढंच!"

"खरं सांगू? या माणसाची इत्थंभूत माहीती वहिनीसाहेब, नर्मदादेवीबाईच देवू शकतील बघा साहेब! तुम्हाला त्या केव्हांतरी प्रसंगी भेटतातच! नाही का?"

"हं! हे बाकी खरं. लक्षात आलं नाही. एनी वे, तुम्ही निघा राणे आणि आताचं बोलणं विसरून जा. पूर्ण बरा झाल्यावर मी ऑफिसला येईन. पुन्हा येण्याची तसदी घेऊ नका. प्लीज! घरी आल्याबद्दल आभार!"

रघुनाथ राणे परतला. त्याचा चेहरा गोंधळला होता. आपलं नक्की काय कुठे चुकलं ते त्याला कळेना. श्रीपाद सावंतपण परतला. काळोख पसरायला लागला होता. रस्त्यावरची माणसं काळपट अनोळखी झाली होती. गारवा, वरचे सोडीयम व्हेपरचे झोत मारणारे दिवे. त्यांखालून पिवळट उजेडात दिसणारी माणसं. रिक्शा. वाहनं. उतार. चढ.

----वय वर्षे पंचावन्न झाली तरी कधीतरी आपण अगदीच लहान पोरांसारखे वागतो. मागचा पुढचा विचार करीत नाही.

------या वयात थोडा विसरभोळेपणा लक्षात येवू लागलाय.

----एखादी अति महत्वाची वस्तू, कागदपत्र आपण अगदी जपून, सुरक्षितपणे कपाटात ठेवून देतो. पण आठवड्याने ती कागदपत्रे नक्की कुठे ठेवलीत तेच आठवत नाही! मग शोधाशोध. वेळेचा अपव्यय. चरफड. स्वतःवर रागावणं. आणि वेळ निघून गेली की दोन दिवसांनी ती वस्तू अचानकपणे हाती येते! हा विसरभोळेपणा तापदायक असतो. वस्तू जमिनीवर पटकन आपटली जाते.

दोन दिवसांनी आई बाजारात गेल्यावर एकांत मिळाला. ------जाण्यापूर्वी, आपण पुन्हा काही वेडंवाकडं करणार नाही याचं तिनं वचन घेतलं!

-----मग एकांताचीच काळजी वाटू लागली००० श्रीपाद सावंतनं आईला परोपरी सांगीतलं -----आये, भूतबाधा वगैरे काही नाही! देवाला कळी लावायला नको की देवापुढे नवस धरायला नको! सगळं नॉर्मल आहे.

दारं खिडक्या लावून तो कपाटापुढे उभा राहीला. कपाटाला लावलेल्या मोठया आरशात स्वतःला बघू लागला. हळू हळू अंगावरचे कपडे उतरवले. पूर्ण.

शरीर वय दाखवू लागलेलं आहे. सिगरेट पेटवली. धुरात स्वतःची ओळख निरखू लागला ०० शरीर वरपासून खालपर्यंत कोणीतरी हातानं चेपल्यासारखे उतरलेलं आहे. छातीवरचे केस पांढरट झालेत. डोक्यावरचे केस भुरे विरळ झालेत. स्नायूंना शिथिलता आलीय. तरुणपणाचा पिळदारपणा थोडा ढबढबीत झालाय. पोट किंचित ओथंबलंय. खांदे उतरलेत ०० कोणीतरी म्हटलंय की वयाची एकसष्टी आली की आकडा उलटा करावा! अगदी सोळा वर्षाचं तरुण मन करून जगायला शिकलं पाहिजे! पण वयाची उतरण सुरु झालीय. हे अमान्य करून चालणार नाही!

आपण दोन दिवसांपूर्वी वरच्या पंख्याला लोंबकळत होतो. गळफासातून स्वतःला उचललं ही आपल्या आयुष्यातली पहिली सर्कस! मानेवरचे व्रण लपायला काही महीने, वर्ष पण जाईल.

दाढी वाढवायची म्हटलं तरी दोन तीन वर्षे जातील! सगळा व्यापच सुरु झालाय! या वयात शरीरातले टिश्यूज नरम झालेले असतात ० ताठरपणा झाकाळतोय की काय असं वाटू लागतं ००

----- आणि या काळात मध्येच नर्मदा भेटली तर --- हसेल! तिचं हसणं सूचक असेल. नजरेनचं आपल्याला ' बिच्चारा! ' करून टाकील! आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी! तो स्वतःवर भयानक चिडला. आरशातली नग्नता केवीलवाणी झाली.

भराभर कपडे चढवले. उपचार करायला हवेत. कोणाकोणाच्या चुचकाऱ्यांपुढे जगायचं? का? कशासाठी? प्रकाश खूप पसरलेला आहे आणि या प्रकाशझोताला स्फटिकाचे अंतर्भूत रंग मिसळलेले आहेत. आपण या रंगाचा शोध घेतो.

आणखी एका पुस्तकाचं लेखन करून झाल्यावर एका प्रकाशकानं स्वीकारलं याचं समाधान अर्थातच आहे. हा प्रकाशक काळा की गोरा माहीत नाही. नुसता पत्रव्यवहार. त्याला चेहरा नक्कीच नव्हता. कदाचित शांतता निनादणारा तो चेहरा असू शकेल. वा बाथरूमच्या खराट्यासारखा राठ असू शकेल. कल्पना नाही. पण ज्याअर्थी त्यानं ते स्वीकारलं त्याअर्थी आपलं लेखन त्याला आवडलं, समजलं. हेही कमी नाही.

एक गोष्ट खरी. लेखनात व्यग्रता वाटायची. घराच्या दगड विटा श्वास देवू लागायच्या. रहस्यमय दरवाजे आपोआप उघडून शब्द सैनिकासारखे हल्लाबोल करायचे. ते कागदावर जुळवताना वाक्यातला अर्धविराम, स्वल्पविराम, उद्गार चिन्हांचं वजन कळायचं. शब्द बेईमान होत आहेत असं वाटलं तर वाक्यं छाटली जायची. पुनर्लेखनातल्या त्रासापेक्षा प्रक्रीयेतला आनंद वेगळा होता.

शब्दांनी तरी किती वाकावं? अर्थवाही गुलाम व्हावं? आपण खांद्यावर ऊन घेऊन चाललोय. झाकलेल्या मनानं जगतोय. आज आहे उद्या नाही. आयुष्यात अवघी आळंदी उतरलीय. विचारांचा कल्लोळ होतोय ०००००

नर्मदा स्वतःच्या प्रेमात पडलेली आहे. अंगठा चोखतेय. आपल्या डोक्यात चित्रविचित्र कल्पना सुचतात ००००

----- वयाच्या सोळाव्या वर्षी पहिली सिगरेट ओढताना मनात उठलेली लैंगिक भावना ०००

---- रात्रीच्या चिखलात घोडयांच्या टापात साचून राहीलेलं चांदणं ००

----- हजार मैलांच्या प्रवासासाठी पहिलं टाकलेलं पाऊल००

-----पहिलटकरणीची आठव्या महिन्यातली पोटातली भीती ००

-----हिरव्याचार वेलीवर अकाली सुकणारी फुलं ००

-----पाळण्यात तान्हुल्यानं उमटवलेलं स्मित००

-----हिवाळयाच्या थंडीत तारेवर ठिपक्यांनी गोठलेले कावळे ००

-----कबरस्थानातून चालताना पायाच्या गवताखाली पुरलेल्या आयुष्यांवरचा विचार ००

-----ऐन समागमात डोकावणारी दुसरीच व्यक्ती ०००

------सत्तरीपुढच्या वृध्दत्वाची मरणविषयी मन गोठवणारी भीती००

-----विषयांना अंत नाही.

-----लिहित असताना आपलीच गोष्ट आसपास वावरतेय की काय वाटत रहातं ००

-----श्लील फुलांचे ताटवे पसरल्यागत होतं ००००

-----आईनस्टाईनचा मेंदू प्रयोगशाळेत आजपर्यंत जपून ठेवलेला आहे ००

-----श्रीपाद सावंतांची आत्महत्या सफल झाली असती तर त्यांचा कोणता अवयव जपून ठेवावासा वाटला असता?

-----गेली पंधरा वर्षे आपण लिहीत आहोत. पहिल्या पुस्तकावर बरेच अभिप्राय येतील ही अपेक्षा. निदान कोणी समीक्षक वास्तपुस्त करील. तेही नाही. एका वाचकाचं पत्र नाही. काही नाही.

नाही म्हणायला शेजारचे अण्णा एकदोन वाक्यंच बोलले होते. अण्णा. वय वर्षे शहात्तर. हाडाला पातळ कातडी चिकटलेला सांगाडा आणि डोक्याच्या पुढं एक फूट चालणारं तोंड. इतका विक्षिप्त माणूस आपण पाहिलेला नव्हता. तीन बाय तीनच्या खिडकीच्या चौकटीत स्वतःला चेपून हातात कुठलंतरी पुस्तक घेऊन अण्णा नेहमी दिसायचे.

नेहमी उकळतं कढत पाणी प्यायचे.वाटायचं, यांची आतडी पार उबाळून गेली असतील. रबरासारखी चिवट झाली असतील. लहान आतडं टेलीफोनच्या अंडरग्राउंड वायरीसारखं गुंडाळावं लागेल! हा माणूस जगतो कशाला, हाच प्रश्न पडे.

या अण्णांच्या हातात कोणीतरी आपलं एक पुस्तक दिलं असावं. कारण एकदा अचानकपणे त्यांनी किरकिऱ्या आवाजात विचारलं,

“ओ तुम्ही ---सावंत महाशय. मला सांगा. तुम्ही का लिहिता?”

पंधरा दिवसांनी श्रीपाद सावंत ऑफीसला रुजू झाला. त्याच्या अंगावरच्या पेहेरावाव्यतिरीक्त कुठेही काडीचा बदल झाला नव्हता. स्टाफनं माफक चौकशी केली. तेही तो साहेब होता म्हणून. नेहमीच्या शर्टावर आता काळा कोट चढला होता. मानेला सर्व्हीकल कॉलर. स्वतःच्या कर्मानं खिशाला खार देवून कायमचं ओझं मानेभोवती आवळलेलं. हा व्याप किती महिने ठेवावा लागणार देव जाणो! दाढी वाढवून मान लपवायची तर चार वर्षे लागतील भौ!

केबीनचं दार उघडून रघुनाथ राणे अवघडल्यागत उभा राहीला.पुटपुटला,

"साहेब! आज्ञेचं उल्लंघन होत आहे याची मला कल्पना आहे. जे काही माझ्या हातून घडलं त्यात हेतू शुद्ध होता म्हणून मोठ्या मनानं क्षमा करावी."

श्रीपाद सावंतनं मन वर करून पाहीलं.

"कसं"

"मनाशी विचार केला. लेखन करण्यासाठी तुम्ही ज्या अर्थी त्या सब इनिस्पेक्टर काशिनाथ सुर्वेविषयी एक व्यक्तिमत्व म्हणून उत्सुक होता तर माझ्यातर्फे मी काही -----"

"मी तुम्हाला तो विषय गार्डनमध्येच संपला म्हणून सांगीतलं होतं!"

"चूक झाली साहेब! चूक झाली. परंतु इतक्या माणसात तुम्हाला लेखक म्हणून एखादी व्यक्ती आकर्षित करते त्या अर्थी खारीचा वाटा म्हणून तुमच्या लेखनात काही मदत करता यावी असं मनात खूप खूप वाटत राहीलं! तुमची हरकत नसेल तर मी त्या माणसाविषयी संपूर्ण माहीती काढून आणलेली आहे आणि मी ती तुम्हाला देवू शकेन!"

-----कपाळाला आठी घालून श्रीपाद सावंत एक मिनिटभर खिडकीबाहेर बघत बसला. बाहेरच बघत बोलला,

“तुम्ही माझ्या आज्ञेचं उल्लंघन केलेलं आहे राणे! तरीही विषय मीच काढलाय म्हणून मी तुमच्यावर रागावू शकत नाही. अर्थात, या गोष्टीवर मला ऑफीसच्या वेळात तुमच्याशी बोलायचं नाही. ऑफीस सुटल्यावर संध्याकाळी सातला आपण कॅफे विश्रांतीमध्ये भेटू. चहा घेऊ. तेथे तुम्ही या.”

-----राणे मान लववून बाहेर गेला.

श्रीपाद सावंतची छाती धडधडू लागली. कॅफे विश्रांतीमध्ये तुरळक माणसं बसलेली होती. रघुनाथ राणे कपातल्या वाफाळलेल्या चहाकडे टवकारून बघत बसला होता. सुरुवात कोणी करायची कळत नव्हतं. वेळ जात होता.

“राणे! या हॉटेलचं बांधकाम बघायला आपण इथे बसलो नाही! तुम्हीच रस घेतलाय या गोष्टीत. आता स्पष्ट बोला.“

“साहेब, बातमी क्लेषदायी आहे.”

“काशीनाथ सूर्वे अपघातात मेला काय?”

-----रघुनाथ राणेनं चटकन वर पाहीलं. साहेबांच्या डोळयांत अंगार फुलले होते. सावध झाला. डोळे मिटून पुटपुटला,

“शिव शिव शिव! असं बोलू नये साहेब. या सूर्वेची कहाणी क्लेषदायी आहे असं मला म्हणायचं आहे. पण त्याचं कर्तुत्व वाखाणण्यासारखं आहे. तो एक पट्टीचा कमांडो आहे. अनाथ पोर. एका चांभाराला सापडलं. आपल्या तीन मुलात यालाही त्यानं वाढवलं. पोरगं जात्याच हुषार. चपळ. शाळेत हुतुतु खोखो उंच उडीत बक्षीसं घेत गेला. मॅट्रिकला चांगले मार्क घेऊन पास झाला. मला वाटतं हा मुलगा उच्च कुळातला असावा. पण चांभार म्हणून सगळया सवलती मिळाल्या. पोलीसात भरती झाला. तेथेही खेळात उत्तम. नजरेत आला. उत्तम फुटबॉल खेळायचा. टीमचा

कॅप्टन असायचा. मग त्यानं नेमबाजीत प्रावीण्य घेतलं. असा हा जवान महत्वांच्या व्यक्तींचा बॉडीगार्ड म्हणूनच योग्य. त्याचं एकंदर कर्तुत्व, शांत स्वभाव, नम्र भाषा आणि साहसी वृत्ती यामुळे तुमच्या सौ. नी त्याची अंगरक्षक म्हणून निवड केली. त्यांच्याबरोबर स्त्री कमांडोज पण असतात, पण काशीनाथ वर सगळयांचा विश्वास. वहीनींवर दोन चारदा प्राणघातक हल्ले झाले त्यावेळी काशीनाथने त्यांना चांगलं कव्हर केलंय. स्वतः जखमी झालाय साहेब!"

"लग्न झालंय त्याचं?"

"दोन मुलगे आहेत. पोरं बापासारखीच चुणचुणीत आहेत."

"त्याची बदली कशी झाली नाही?"

"त्याचं रेकॉर्ड उत्तम आहे साहेब. शिवाय बाईंच्या विश्वासातला माणूस. अशी माणसं सापडणं कठीण. बाई दौऱ्यावर असल्या तरी गुप्तहेर म्हणून हा आसपास वावरत असतो. बाईंचं कर्तुत्व वादळी असल्यामुळे त्यांचे राजकीय शत्रू बरेच आहेत. पण बाईंची पक्षावरची निष्ठा, निष्कलंक चारित्र्य, सडेतोड भाषा, या उणेअधिक गुणांमुळे त्यांना राज्यमंत्रीपद मिळालं तर नवल वाटायला नको!"

"या सूर्वेविषयी अधिक वैयक्तिक माहिती?"

----राणे थांबला. मोठ्या चवीनं त्यानं चहाचा घोट घेतला. रुमालाच्या घडीनं ओठ सावकाश पुसले. रुमालाचे चार कोपरे जुळवून घडी नीट केली. खिशात घातली आणि साहेबाकडे रोख बघून सौम्य हसला.

"वैयक्तिक. सूर्वे माणूस सज्जन आहे. त्याला रिझर्व कोटामधला ब्लॉक मिळालाय. त्याच्या पत्नीला म्युनिसिपल शाळेत नोकरी मिळालीय. मुलांचं शिक्षण फुकट आहे. ज्यांनी पालनपोषण

करून वाढवलंय त्या पालकांना त्याने घरी आणून ठेवलयं. ड्यूटी म्हणजे ड्यूटी! रात्र नाही दिवस नाही."

"रात्रीपण ड्यूटीवर असतो तर?"

"बॉडीगार्डचं कामच ते साहेब!"

श्रीपाद सावंतने सिगरेट पेटवली. चिडला.

"राणे! चेहऱ्यावरचा मुखवटा काढा आता. मी तुम्हाला त्या माणसाचा इतिहास मागीतला तो कोणी या देशाचा संरक्षणमंत्री आहे म्हणून नव्हे! तो माझ्या -------"

"कळलं. न कळण्याएवढा मी खुळा नाही साहेब! त्या दृष्टीनेही बरीच चौकशी केलीय. अफवा खूप आहेत. माणूस जेवढं मोठं तेवढया अफवा भडक. प्रसिध्द व्यक्तिंच्या खाजगी जीवनात डोकावणारे आंबटशौकी कमी नाहीत! परंतु या अफवा कुजबुजण्य़ापलीकडे काही नाहीत. म्हणजेच त्या खऱ्या नाहीत. मी त्याच्या पत्नीकडून चौकशी काढली. तिचा नवऱ्यावर खूप विश्वास आहे. शिवाय बाईसाहेब काशीनाथ सूर्वेपेक्षा पंधरा वर्षांनी मोठया आहेत! मी तुम्हाला अधिक सल्ला काय देणार? मी बोलतोय त्यावर विश्वास ठेवावा."

आपल्यापुढं कोणी देवदूत बसला आहे असं श्रीपाद सावंतला वाटलं. सिगरेटचा धूर छातीत गच्च भरला. डोळे किलकिले केले.

"सूर्वेची इतकी खाजगी माहीती तुम्हाला कशी मिळाली?"

"मी बँकेत क्लार्क असलो तरी माझा जनसंपर्क बरा आहे. गावाकडे थोडंफार सामाजिक कार्यपण करतो. मंत्रालयातल्या होम डिपार्टमेंटपासून कमिशनरसाहेबाच्या पी. ए. पासून मी उलट सुलट माहिती घेतलीय. सुर्वेला त्याचा पत्ताही नाही. मी तुमचं काम केलंय तुम्ही विश्वास ठेवावा."

----- सिगरेटचं पाकीट पुढं करून श्रीपाद सावंत गुरगुरला,

"थँक्स! यापुढे तुम्ही माझ्यासाठी त्रास घेऊ नये. हा विषयच तुम्ही पार विसरून जा राणे. प्लीज!"

----- राणे पुन्हा सौम्य हसला. नमस्कार करून उठला. हॉटेल बाहेर पडला. दहा मिनिटांनी श्रीपाद सावंतने हॉटेल सोडलं.

----- राणेवर किती विश्वास ठेवावा?

----- विश्वास का ठेवू नयें?

----- यापेक्षा आतल्या गोटात शिरणं कसं शक्य आहे?

----- राणे आपल्या वयाचा. इतक्या वर्षांचा हितचिंतक आहे.

----- आपला विश्वासघात करून त्याचा काय फायदा आहे?

----- की पुरुषांचं मनच सैरभैर असतं? स्त्री जिद्दीनं पेटून उठली की एकच ध्येय डोळयांपुढे ठेवते. शरीरधर्माला तिलांजली देते. हे कितपत खरं आहे?

------ आपल्या आईनं तिलांजली दिलेली नाही का?

तिच्याभोवती पण पुरुष पिंगा घालायचे.

तरीही तिने कर्तव्यापुढे भावना आवरल्या ना?

----मग नर्मदेला ते अशक्य का वाटावं? ती सतत पुरुषांच्या गराडयात असते हा तिचा दोष नाही. आपलं मन फार गुंता झालाय. आपण पार कोषात गेलो आहोत. पण नर्मदा एक फोर्स झालेली आहे. त्या फोर्सला भावना नसतील? ती एवढी महान संतीण नाही! हाडामासाची या जमान्यातली स्त्री आहे. तिला स्वतःच्या सौष्ठवाची नक्कीच जाणीव आहे. आणि प्रसन्नतेच्या मुखवट्याखाली तिनं तिचं कर्तुत्व मोठ्या खुबीनं उजळत ठेवलेलं आहे. माणूस कायमचा

मुखवट्यात राहू शकतो? आम जनतेला कौतुक आहे. आम जनतेत वावड्यापण उठत आहेत! नर्मदेचा मोनोपॉज सुरु झालेला आहे. तिला उदात्तीकरणाच्या ओझ्याखाली दडपल्यागत झालं असेल का? पंचेचाळीशीपुढे स्त्रीला आयुष्यात पोकळी वाटू लागते.

"तुम्ही छान दिसता!"या तीन शब्दांनी पण ती खुलू शकते.

----फक्त हे शब्द पुरुषाकडून यायला हवेत.

-----तिच्या तोंडावर अशी स्तुती करणारा एकही पुरुष धजावला नसेल?

-----नर्मदा येते. वर्षातून एखादवेळी. कोणत्याही महत्वाच्या कारणास्तव. शामच्या वाढदिवसाला. सणाला. दौऱ्यावर नसली तर अशीच, अचानक. वाटेवरून जाता जाता.

-----आता इतक्या वर्षांनी आपण तिला"तू छान दिसतेस"असं म्हटलं तर? तर?

चालता चालता श्रीपाद सावंत रस्त्यात मध्येच उभा राहीला. खिळा ठोकल्यासारखा. मुंग्यांच्या रांगेत मध्येच बोट उभं केलं तर रांग दुभंगते. पुढं जाऊन पुन्हा मार्गावर येते. पण मुंग्यांच्या गर्दीला त्रास होत असणार. तशीच रस्त्यावरली गर्दी रागानं पुढं सरकत होती. आपल्याला नक्की काय झालेलं आहे त्याला कळेना. उमजेना ०००

मनुष्य समाजप्रीय प्राणी असावाच का? प्राणी कळपात सुरक्षतेसाठी वावरतात हा नैसर्गिक गुणधर्म. हिमालयात तपस्चर्या करणारे संत, अंगावर वारुळ चढवणारा वालमिकी, तुकोबा, ज्ञानोबा, विनोबा या सगळयांच्या चरणी आपण मस्तक ठेवतो. सगळचं घट्ट मुठीसारखं.. अव्यक्त.. एवढ्याश्या अयुष्यात पुरावे कसे कुठे शोधायचे? परंपरागत चाललेले विचार गृहीत धरून पुढं सरकत रहायचं! एखादा माणूस पटकन समोर येतो.. ध्यानी-मनी नसताना. तो तीन वर्षांपूर्वी वरला असा आपला समज. कदाचित आपल्या विषयीही त्याचा तोच समज असेल. हे वास्तव.

पण ए.सी.पी. परुळेकरांचा तसा समझ नवता. कारण त्यांनी आपली पुस्तके वाचली होती. असेच रस्त्यात दिसले. गाडीत घेऊन त्यांच्या हॅटेलात आले. आपण बोललो,

“तुम्ही सुखी आहात ना? हा प्रश्न बऱ्याच वर्षांपूर्वी एका साधूच्या गडावर गेलो असताना एका  वृध्द गृहस्थांनी विचारला होता साहेब!”

“बरं. त्यावेळचं तुमचं उत्तर मला ऐकायचं नाही. पण आता बऱ्याच वर्षांनंतरही ते बदललं आहे का?”

“हाच प्रश्न मी तुम्हाला विचारला तर?”

“त्यावेळी मी ए. सी. पी. म्हणून नोकरीत होतो. आता सुस्थितीत माझं स्वतःचं हॉटेल चालवीत आहे. मी सल्ले दिले ते सर्वच यशस्वी झाले नाहीत. पण काहींना नक्कीच दिशा मिळाली. तुमच्या नावावर तीन पुस्तकं प्रसिध्द झाली. हेही थोडके नव्हे!”

“म्हणजेच इतरांच्या समाधानात तुम्हाला सुख मिळतं!”

“तसं म्हणू या. कारण स्वतःच्या आयुष्यात तक्रारीसाठी गाठोडी बांधलेली असतात श्रीयुत सावंत! ती बांधलेल्या स्थितीतच बरी!”

“सांगण्यासारखं आहे साहेब. मी गड सोडला तेव्हां त्या वृध्द गृहस्थांनी मला त्यांच्या मुलाचे पत्ते दिले आणि त्यांच्याविषयी कळविण्यास सांगीतले. गृहस्थ गडावर बरीच वर्षे स्वामींची सेवा करीत होते. त्यांची म्हातारी बायको मुलाकडे रहात होती.”

“पुढचं सांगण्याची गरज नाही सावंत. तुम्ही शोध घेतलात. मुलांनी कर्जे काढून वडिलांची संपत्ती उधळली. म्हाताऱ्या आईकडून तिला फसवून, बळजबरीने सह्या घेतल्या. आता कर्जाचे डोंगर उभे आहेत. आई चार दिवस इथे चार दिवस तिथे ढकलीत आहे. बरोबर?”

“तुमचा अंदाज शंभर टक्के खरा आहे. मी माझी ओळख सांगितली तेव्हां कुटुंबीयांनी माझ्याकडून वचन घेतले की मी सत्यस्थिती गडावरच्या गृहस्थांना सांगणार नाही!”

“ठीक ठीक. ती तुम्ही सांगीतली नाही. वृध्द गृहस्थ गडावर वारले. अगदी समाधानानं त्यांनी देह सोडला. ते इतकी वर्षे गडावर सेवा करीत होते तेव्हां त्यांची विचारपूस करायला कोणी येत नव्हतं. पण गडावर अंत्ययात्रेला सगळी मुलं आली. बायको पण आली. बरोबर?”

“असंच काहीतरी, साहेब.”

“थोडक्यात काय? अज्ञानात सुख मिळतं. सत्याचा हट्टानं पाठलाग करू नये सावंत. मी सांगीतलं म्हणून तुम्ही लिहू लागलात. म्हणून मी तुमची दोन पुस्तकं मन लावून वाचली बरं का! तुम्ही आत्मकेंद्री लेखन करता. तुमचे वृध्द गृहस्थ भ्रमात राहून मोठया समाधानानं वारले. याचाच अर्थ, मनुष्याला सकारात्मक विचारांनी आयुष्य काढता येऊ शकतं की! तुमचं लेखन तसं व्हावं!”

“कठीण वाटतं.”

“तुमचा मुलगा विलायतेला आहे. त्यानं प्रेमविवाह केला. तुमची सौ. आज एक तडफदार राज्यमंत्री पदावर आहे! तिच्यातला स्पार्क माझ्या केबीनमध्येच मला दिसला होता. तुमची आई या वयातही सुदृढ स्वावलंबी जगत आहे! तुम्ही सुखी माणसात नक्कीच बसता सावंत!”

----- श्रीपाद सावंत समोर बसलेल्या तृप्त, रिटायर ए. सी. पी. परुळेकरांच्या हॉटेलमधल्या केबीनमध्ये अस्वस्थ झाला.

“मी निघतो साहेब. केवळ योगायोगानं इतक्या वर्षांनी इथे भेट झाली. बोललो. बरं वाटलं. निघतो.”

----- परुळेकरांनी त्यांचा जाडजूड पंजा वर करून त्याला बसायची खूण केली. दोन कोल्ड ड्रिंक्सच्या बॉटल्स आल्या.

"निवृत्त होऊन वीस वर्षे झाली. पण इथे हॉटेलात बसून मला राज्यातल्या पूर्ण घडामोडी पोलीस डिपार्टमेंटस् कडून केवळ मैत्रीखातर कळत असतात बरं का!"

----- कोल्ड्रिंकचा घोट छातीत दुखत उतरत आहे असं श्रीपाद सावंतला वाटलं. परुळेकरांनी भेदकपणे बघत म्हटलं,

"तुमचा पुन्हा आत्महत्त्येचा प्रयत्न कानी आला!"

"खराय,"

"काय मिळवलंत? हेतू काय? नुकसान कोणाचं होणार होतं? पत्नीच्या चारित्र्याचा संशय घेण्याचा तुमचा हक्क, अधिकार काय? तुम्ही दुबळे पडलात मग तिनं स्वसंरक्षणासाठी ताठ उभं रहायला नको?"

"हवं."

"मग? आणि आता या वयातही ही पझेसिव्हनेसची ऍटीट्यूड हवीच का सावंत? हा तुमचा मानसिक दुबळेपणा आहे. तुमच्या लेखनात तो पुन्हा पुन्हा जाणवतो!"

"माझे विचार स्वतंत्र आहेत साहेब!"

"तुमचे विचार जगावेगळे नाहीत म्हणा. इंग्लंडमध्ये व्होलेंटरी युथनेशिप सोसायटी निर्माण झाली. अमेरिकेत १९३८ साली सोसायटी फॉर राईट टू डाय स्थापन झाली. धोंडो केशव कर्वेंनी १९३८ मध्ये या कायद्याची मागणी केली. १९५३ मध्ये र. धों. कर्वेंनी पुनरुच्चार केला. अगदी अलीकडे १९८१ मध्ये सोसायटी टू डाय विथ डिग्निटी या संस्थेला चर्चने विरोध केला! याचा अर्थ, माणसाला जीवनाचा अंत करायला मुभा नाही. दंड्सहितेच्या ३०९ कलमाखाली आत्महत्त्या करणे भारतात गुन्हा आहे सावंत!"

"दोनदा आत्महत्त्येचा प्रयत्न करणारा एक गुन्हेगार तुमच्या समोर बसला आहे साहेब!"

-----परुळेकरांच्या चेहऱ्यावर लाखमोलाचं स्मित आलं.

“हे बघा सावंत, आपल्या सगळयांच्या आयुष्यातून एक एक दिवस भुरुभुरु निघून चाललेला आहे बरं! लीव्ह हॅपिली! अँड लेट अदर्स ऑल्सो!”

“खरंय.”

“अलीकडे एक थॉट प्रोसेस भारतातपण येवू लागला आहे. एकमेकाचा दीर्घ सहवास सुखावह वाटेनासा झाला तर प्रत्येक स्त्रीपुरुषानं आपापल्या आवडीचा लाइफ पार्टनर शोधून त्याच्या बरोबर उरलेलं आयुष्य समाधानात घालवायला हरकत नसावी. इथे वयाचा, सेक्सचा प्रश्न येत नाही. चारित्र्याचा संशय नाही की असूया नाही.”

“माझ्यासारख्याला हा विचार पचणे कठीण आहे.”

“पण कुवत नसताना मक्तेदारी दाखविण्यात अर्थच काय सावंत?”

-----श्रीपाद सावंत उठला.परुळेकरही उठले. हॉटेलच्या फाटकापर्यंत आले. त्याच्या पाठीवर हात ठेवून पुटपुटले,

“ज्ञानी व्हा. सर्वकाही या जन्मीच फेडावं लागतं.”

“थँक्स.”

------रिक्षात बसला.

-------पाऊस अतोनात पडतोय.

तडतडाट. सरळ बोचऱ्या रेषेत. वारा आला तर तिरका. या पावसाला रिमझिमणे माहीत नाही. हळुवारपणा नाही. काव्य नाही. थोडासा मऊ म्हटलं तरी झिमझिमाट. त्याखाली नाही. रस्त्यावर वाहन नाही. काळेभोर आडवेतिडवे स्वच्छ रोड्स. बेशिस्तपणे काळे पाईप टाकून दिल्यावर पडतात तसे. त्यावर फुटणारे बर्फाचे तुकडे. गारा. भन्नाट वेडसर वारा. पावसाची बोचरी रेषा थोडीशी हलविणारा. सुरुची उभी उंच रसरशीत हिरवीचार झाडं. मुकाट बलदंड उभी. सोशीकशी. मौसम बेईमानसा ००००

-----सरकारी गेस्ट हाऊसच्या खिडकीतून बाहेरचा दिसणारा निसर्गाचा असा थयथयाट. गेस्ट हाऊस उंच टेकडीवर. लांबवर गेट. त्या गेटवर सिक्यूरिटी. गेस्ट हाऊसमध्ये समाजकल्याण राज्यमंत्री सौ. नर्मदा सावंत यांच्यासाठी राखीव ठेवलेलं. त्यांचा दबदबा मोठा. मंत्रीपदामुळे प्रसिध्दीचा झगझगाट वाढलेला. सुखद.

बाईंकडे बघून वाटत नाही की त्यांनी पन्नाशी ओलांडली आहे. रसरशीत. छानशा. प्रसन्न. देखण्या. आता पावसामुळे काळोख वाढतोय. मंद दिवे लागलेत. खिडकीत बसून त्या पावसाचं बाहेरचं तांडव बघत आहेत. हातात बियरचा तिसरा ग्लास. सोनेरी दाट रंगाची बियर. अंगात उबदारपणा आलाय. खानदानी. त्या काहीशा उत्तेजित झाल्यात. आता त्यांना वाटतंय की लहान मुलीसारखं बाहेरच्या धुवाधार पावसात जावं. या पावसाचा भोग घ्यावा! सरीवर सरी अंगात झिरपून टाकाव्यात. पण त्यांनी तो विचार झटकला. बाहेरची सिक्यूरिटी दूरवर असली तरी त्यांचं लक्ष केंद्रीत असणार. राज्याच्या समाजकल्याण मंत्री पावसात नाच ग घूमा करताहेत! कोणी सांगावं, उद्याच्या पेपरात त्यांचा ओलेता फोटोपण येईल! कित्येकांना संग्रही ठेवावासा वाटेल! हे!!

-------नर्मदाबाई स्वतःशीच हसल्या..

दिवाणखान्यात पाहीलं. मंद प्रकाशमय दिवाणखाना.

------श्रीपाद सावंतनं बियरचा पाचवा ग्लास संपवला.

------ऍशट्रेमध्ये सिगरेट्सचा खच पडलाय.

"किती सिगरेटस् ओढता?"

"लिमिट नाही. एखादं पाकीट होतं."

"तब्येतीकडे बघायला हवं. साठी ओलांडली! निवृत्ती झाली. मुलानं लग्न केलंय. बायको राज्यमंत्री झालीय! म्हातारी आई अजून तब्येत राखून आहे. अगदी टुकटुकीत! त्यांना म्हातारपण मान्यच करायचं नाही!"

हॉलला मोठ्या खिडक्या. मार्बलच्या. एका खिडकीच्या रुंद कठड्यावर एका मांडीवर शरीराचा भर देवून टेकलेल्या नर्मदेकडे निरखून बघत तो आरामखुर्चीत पसरला होता. बियरनं झूssम वाटत होतं. ही स्थिती काव्यात्मक. गुलमोहरी. तरंगती. बेधुंद. तरीही तोल सावरणारी. नर्मदेचं सौष्ठव तेच. तसंच. लोभस. पुष्ट. मांडी टेकलेला पाय लोंबकळून हलत होता. भरपूर केस. दाट. कमरेशी आलेले. केसांना कलप लावला असेल. गाऊन काहीसा पारदर्शक. बाहेरील पावसाच्या झालरीसारखा. त्यातून आतलं शिसवी शरीर बाहेर दिसणारं. उत्सुकसं. अखंड राज्याला राज्यमंत्री नर्मदाबाईंना या रुपात पहायला खूप खूप आवडलं असतं. परंतु त्या आज, आता, इतक्या वर्षांनी केवळ श्रीपाद सावंत एकटा या दिवाणखान्यात आपल्याबरोबर आहे या विश्वासानं खिडकीत अशा, उत्तानशा बसल्या होत्या. इथं मनाचा हिरवटपणा अधिक होता. वय पार पुसून गेलं होतं. वाळूचा किल्ला लाटेनं, पुसून टाकावा तसं. खूप काही बोलून झालं होतं. तेवढंच बोलायचं शिल्लक होतं.

"हे बघा, इतक्या मोठया कालखंडात आपण दोघंही तशी होरपळून निघालो आहोत. नाही का? भले कितीही वाटो, पण वय थांबलेलं नाही. प्रकृतीचं स्वतःचं मीटर चालू असतं. जेव्हां मनात एखादी घडी निर्माण होत असते त्याचवेळी त्याच वेगानं निसर्ग ती घडी विस्कटण्याची तयारी करीत असतो. उगम होतो तेव्हां अंत त्याच पध्दतीनं वाढत असतो. आता तुम्ही निवृत्त झालात. संसाराची आसक्ती ----."

"पण राजकारणात निवृत्ती नसते! तू तर अजून फुल स्विंगमध्ये आहेस!"

"अजूनही त्याचा आकस आहे तर? राजकारणात खाजगी आयुष्य उरत नाही. अति सुरक्षिततेच्या वेढयामध्ये गुदमरायला होतं!"

"मला ---- माझं नक्की काय होतंय ते कळत नाही."

----- नर्मदा खिडकीतून उठली. तोल सावरल्यासारखा करीत त्याच्यासमोर खुर्चीत धपकन बसली. बियरनं छानशी मजा आणली होती. मिश्किलपणे पुटपुटली,

"इतकी वर्षे लोकांच्या समस्या सोडवीत आहे. पण नवऱ्याच्या समस्या मात्र सोडवू शकले नाही मी!"

"त्याची गरज नाही. लीव्ह मी अलोन! खरं तर मी येणार नव्हतो. पण म्हटलं --- एकदा तरी भेटावं - शेवटचं. असं एकांतात. एकांत असतो ना इथे?"

"असतो."

"खूपसं बोलून झालेलं आहे म्हणा. पण विचार केला. या भेटीत काय ते सोक्षमोक्ष होऊन जाऊ दे! मी तरी स्वतःत किती घुसमटून वर्षे ढकलायची?"

"शामनं आंतरजातीय विवाह केला त्याची घुसमट तुम्हाला लागलीय का?"

“शामवर मी आणि माझ्या आईनं खूप चांगले संस्कार केले होते. पण तो इंजिनियरींग कॉलेजला होस्टेलला गेला आणि आमचा त्याच्यावरचा कंट्रोल गेला! तू त्याला वेळोवेळी फूस लावलीस. लाडावून ठेवलास! आमच्या परोक्ष त्याला पैसे पुरवलेस. मुक्त केलंस आमचा त्याच्यावर हक्क नव्हता का? तो माझा मुलगा नाही का?”

“एका आईचं कर्तव्य मी केलंय. मला तुमच्या मर्यादा माहीत आहेत. होत्या. तुम्हाला न दुखवता जर मी त्याचं करीयर पाहीलं तर बिघडलं कुठे? शिवाय मी एक राज्यमंत्री म्हणून राजकीय पदाचा कधीच वापर केलेला नाही!”

“मान्य करतो. त्याला परदेशी पाठवून एम. एस. करायचं आर्थिक बळ माझ्यात नव्हतं. पण या गोष्टीचा सुगावा शेवटपर्यंत आम्हाला न लावून देण्यात तू काय साधलंस? मुलांचं मन अति संवेदनाशील असतं. शामला हा प्रश्न पडला असेल तेव्हां तू त्याला तेवढयाच प्रमाणात समजूत घातलेली आहेस! त्यामुळे त्याची मानसिक जडण घडण बिघडेल असं तुला आई म्हणून वाटलं नाही?”

---- नर्मदेनं ग्लास ओठाला लावला आणि नुसती हसली. श्रीपाद सावंतला ते अपमानास्पद वाटलं. चिडून बोलला,

“हेच! तुला स्वतःचा ' अहम ' झालाय नर्मदे! माणूस जेव्हां स्वतःला परमेश्वरच समजू लागतो तेव्हां त्याच्या ऱ्हासाची सुरुवात झालेली असते! तुला वाटतंय की मी मुलगा जिंकलाय. पण मी सांगतो. तू त्याला स्वार्थी केलेलं आहेस! आत्मकेंद्री केलंस! त्याचं व्यक्तिमत्व तुझ्यामुळे पार बदलून गेलेलं आहे. त्याचं तुझ्यावर आणि माझ्यावर मुळीच प्रेम नाही!”

“त्यानं तुम्हाला न विचारता परजातीय मुलीशी लग्न केलं म्हणून तुम्हाला असं वाटतं का?“

“तुला त्याची संमती नव्हती?“

"होती. तुम्ही दिली असतीत?"

"नीट विचार कर. प्रेमविवाहाला माझा विरोध नव्हता. पण आपला समाज काय म्हणेल, आपला इतिहास काय हे त्याला कॉन्फिडन्समध्ये घेऊन कदाचित त्याचं मन वळवता आलं असतं. पण तुझ्याकडून हिरवा कंदील मिळाल्यामुळे आमचा नाईलाज झाला! लग्न पण करून बसला शाम!"

"समाजाची आपण केव्हां पर्वा केलेली आहे ते सांगा? त्या काळात तुमच्या आईनं धाडशी विधानं केली होती. आठवतं? कोणाच्यातरी लग्नामध्ये, नवग्रहासाठी दिवंगत वडिलांचा फोटो ठेवून आईनं मुलाचं लग्न लावायला काय हरकत आहे, म्हणाली. पण समाजानं ते मान्य केलं का? नाही. नवग्रहाला दुसरं जोडपं बसवलं गेलं आणि विधी पार पडला. आईने कोणाच्या कोण माणसांचा आधार घेतला आणि तुम्हाला घेऊन गाव सोडलं. समाजाला ते आवडलं? आईच्या पुरोगामी विचारांना गावाकडे प्रतिकारच झालेला आहे. त्यमुळे अगदी आपल्या लग्नाला जे गावकरी आले ते नुसता आशीर्वाद देऊन न जेवता निघून गेले! आठवतंय? पण त्यामुळे कोणाचं काही अडून बसलेलं आहे का?"

"शाम हातचा निघून चाललेला आहे नर्मदा!"

"शामचं नऊ महिने आयुष्य मी माझ्यात वाढवलंय!"

"ते उद्ध्वस्त तू केलेलं आहेस!"

"कसलं काय घेऊन बसलात! तुम्ही विचारताय की आपला इतिहास काय. मी इतिहास घडवला असं तुम्हाला वाटत नाही? कोकणातली मराठा समाजातली एक स्त्री आज राज्यमंत्री झालीय! हाच तुमचा समाज मागचा राग विसरून अडीअडचणींना, नोकऱ्यांसाठी माझ्या मागे लागलेला आहे त्याचं काय? तेव्हां, समाजानं आपल्याला बहिष्कृत केलंय ही भीती तुम्हाला वाटत असेल तर ती खोटी आहे. मी आहे ना!"

----- श्रीपाद सावंत रागानं उठला. तरंगल्यागत वाटत होतं. बाहेर तडतडाट होत होता. तो जवळ जवळ ओरडला,

"हेच! शाम पण हेच बोलला होता एकदा. हे तुझं 'मी आहे ना, मी आहे ना' चं पालुपद त्याला आवडत नाही. राजकारणाचा तुला माज आलेला आहे. स्टॉप इट!"

------ नर्मदा शांत बसली होती. त्याच्या येरझाऱ्या बघताना तिच्यातली उर्मट स्त्री क्षणभर डिवचली गेली. म्हणाली,

"आपलं नातं अल्पायुषी आहे. पण स्वतःवर ताबा ठेवायला शिका. इतक्या वर्षांनी आपण आज एकत्र येत आहोत. पुन्हा येवूच याची तशी खात्री नाही. चार सुख दुःखाच्या गोष्टी बोलाव्यात एवढाच हेतू मनात ठेवून ही मिटींग मी अरेंज केलीय. बाहेरचा एकही कॉल आजची पूर्ण रात्र येणार नाही याची काळजी घेतलेली आहे."

"ओह थँक्स! आभारी आहे मी!"

----- काही वेळ शांततेत गेला. बाहेर पावसानं गाज धरली होती. गच्चीतल्या कोसळत्या पावसाचा नाद लय धरून आभाळ काळवंडून गेलं होतं. बाहेरचा परिसर माजोरी पावसाखाली भिजून गेला होता. गेस्ट हाउसचे मोठे गोल पिवळे दिवे धूसर झाले होते. आणि सिक्युरिटीची माणसं गेस्टहाउस पासून अंतरावर गेटच्या छावणीत सिगरेटी फुंकीत बसली होती.

त्यांच्या मते जे घडत होतं ते गौप्यमय होतं. अजब घडत होतं. जवळ जवळ पंचवीस तीस वर्षांनी राज्यमंत्री नर्मदाबाईनी नवऱ्याबरोबर एकांतात म्हणून प्रथमच हा गेस्ट हाउस एका रात्रीसाठी बुक केला होता! हे असं प्रथमच घडत होतं.

----- किंबहुना श्रीपाद सावंत ही व्यक्ती सिक्युरिटीला पहिल्यांदाच ओझरती पहायला मिळत होती. किस पेडकी पत्ती होती.

“समाजाचं काय घेऊन बसलात तुम्ही! माणसं विकत घेता येतात हा माझा राजकारणातला अनुभव आहे. शामला राजकारणात रस असता तर आज मी त्याला कोणत्याही युवक प्रतिनिधी म्हणून पदावर घेतलं असतं. पण त्याला परदेशी जाऊन पुढं शिकायचं होतं. म्हटलं जा. पण शिकून परत मायदेशी ये!”

“आला? एम. एस. करून आला तो?”

“नाही”

“का बरं? आईची इच्छा त्याला का पूर्ण करता आली नाही?”

“त्याचं म्हणणं या देशात त्याच्या योग्यतेची नोकरी मिळायची नाही.”

------तो खिंकाळला,

“वारे! आई या प्रचंड देशाच्या एका विभागाची राज्यमंत्री आणि तिचे चिरंजीव मात्र या देशाकडे तुच्छतेनं बघतायत! असंच समजायचं ना? आईची शिकवण ती अशी!”

-----नर्मदेनं ग्लासातला मोठा घोट घेतला.

“याला कारण तो अत्यंत प्रॅक्टीकल माणूस आहे.”

“प्रॅक्टीकल? म्हणजे जास्तीत जास्त पैसा. नाही का?”

“त्यात काय चुकलं?”

“चुकत काही नाही बरं! पण मग देशाच्या उन्नतीचं काय? सगळे हुषार तंत्रज्ञ परदेशात वापरले जाताहेत त्याचं काय?”

“प्रॅक्टीकली बघा. कोण स्मार्ट? पाचसात वर्षे परदेशात सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून भरपूर पैसा कमाऊन वयाच्या चाळीशीपूर्वीच आपल्या भारतात येवून स्वतःची इंडस्ट्री उभी करणारा की ------भारतात पाचसात वर्षे कमी पगारात नोकरी करून कंपनीतर्फे हकालपट्टी करून बेकार रहाणारा?”

“एक मंत्रीणबाई हा प्रश्न मला विचारतेय?”

“वेल! तुम्हाला काय वाटतं शामचं वागणं मला आवडलं? जागतीक मंदीची झळ सगळीकडेच जाणवू लागलीय म्हणा! पण तो माझा मुलगा आहे!------”

“म्हणजे स्वार्थी. आत्मकेंद्री. असंच ना?”

“खूप चिडले मी त्याच्यावर. त्याला फोनवर झाडला. एकदा यू. के. ला गेले असताना प्रत्यक्ष भेटून कान उघाडणी केली केली. पण पालथ्या घड्यावर पाणी. ऐकेनाच. मग विचार केला. आमच्या मंत्रीमंडळातली काही मुलं अशीच उच्च शिक्षणासाठी परदेशी जाऊन सेटल होतात ----”

“मग शाम गेला त्यात काय बिघडलं. नाही का?”

“तसंच.”

“ओह रियली? हे अपेक्षित होतं. मुलाला फाजील चढवलं की तो हाताबाहेर जाणारच!”

“पैशाशिवाय माणसाच्या अस्तित्वाला किंमत आहे सावंत? अशा माणसासाठी एक दिवस असाच उगवतो. काम साधं असतं. त्यानं काढलेल्या कर्जावर गॅरंटर म्हणून बँकेला त्याच्या ओळखीची माणसं आणि त्यांच्या सह्या हव्या असतात. माणसाच्या खाक्कन लक्षात येतं की या जगात त्याच्या नातेसंबंधात गॅरंटर म्हणून कोणी सही करणारा नाही. कारण नातीगोती दूर गेलेली असतात. विश्वासातले मित्र नाहीत. इतकी इतकी माणसं आहेत पण त्याचं कोणी नाही! चौकात तो एकटा उभा आहे आणि सात रस्ते सुन्नाट पसरलेले आहेत!”

“कळलं. निदान शामची मतं तरी आम्हाला कळवायची!”

“त्यानं काय झालं असतं?”

“तिकडची एन. आर. आय. पोरगी पटवली आणि लग्नासाठी हट्ट धरून बसला. नशीब ती भारतीय आहे. गोरी कातडी नाही.”

नर्मदा मधाळ हसली. म्हणाली,

"आणि या लग्नाला तर आपला समाज झाडून हजर होता की सावंत! कुठे गेला त्यांचा राग? आकस? उलट माझी पत्रिका मिळाली हे त्यांना सर्टीफिकेट मिळाल्यागत वाटलं! हे कशामुळे झालं? माझ्यामुळे!"

"होना! तुझ्यामुळेच!"

"सगळं मंत्रीमंडळ उपस्थित होतं. शूटिंग, प्रेस, टी. व्ही. ---------"

"तर? शामचं लग्न श्रीपाद सावंत या कोणी फडतूस सिटीमॅनेजरच्या मुलाचं म्हणून झालं असतं तर एवढा जनसमुदाय आला नसता. जर त्याची बायको एक साधी गृहीणी असती तर माझ्या आईचा इतिहास माहीत असल्यामुळे समाज फारसा फिरकला नसता. शिवाय शाम परदेशी गेलाच नसता आणि एम. एस. वगैरे बाजूला राहीलं असतं. नाही का? त्यामुळे या एन. आर. आय. मुलीची भेट झाली नसती. समजा त्याला भारतातली दुसरी एखादी परजातीय मुलगी आवडली असती तर घरात खळखळ होते म्हणून त्यानं रजिस्टर लग्न केलं असतं!"

----- प्रथमच नर्मदा मोठयानं हसली तिच्या डोळयांत विजयाची चमक दिसली. ग्लासाकडे बघत पुटपुटली,

"जीवनामध्ये एखादा निर्णय वेळीच घेतला नाही तर किती उलथापालथ होते पाहीलंत?"

"हो तर! लाइफ इज शॉर्ट. वयाच्या साठाव्या वर्षी, आपण ऐन पंचविशीत, अमुक अमुक ध्येयानं पछाडून जायला हवं होतं, मग आपण आज कुठल्याकुठे पोचलो असतो, हे शहाणपण आठवून झुरण्यात मूर्खपणा आहे. लाइफ इज शॉर्ट!"

“उपरोधात्मक बोललात तरी ते सत्य आहे. पन्नाशीच्या आत एखादा जगप्रसिध्द होतो आणि याच वयात अब्जावधी माणसं जगत पण असतात! आता दोघांचेही सावलीत बसण्याचे दिवस आहेत.”

“काय मिळवलस तू? आई म्हणून. बायको म्हणून!”

“----- हे दारू ----नशापाणी किती वर्षे चाललेलं आहे?”

“मी किती पितो याची काळजी कोणाला आहे?”

------ नर्मदा थोडी गंभीर झाली. म्हणाली,

“मी फक्त बियर घेते. फ्रेश वाटतं! तुमच्यासारख्या मद्यपी माणसासाठी गालीबनं छान शेर लिहिलाय -

जाहिद, शराब पिने दे मस्जिदमे बैठकर या वो जगह बता दे जहांपर खुदा न हो!”

---- श्रीपाद सावंतनं टाळी वाजवली.

“वा! पांढऱ्या टोप्यांची बैठक बसलेली असताना हा शेर म्हटल्यावर पाठीवर थाप पडत असेल!”

नर्मदेनं मानेला झटका देवून त्याच्या तिरकस बोलण्याकडे दुर्लक्ष केलं.

“तुमचे विचार मनावर घेण्याचं माझं वय उलटून गेलं आहे. राजकारणातील वर्तुळात असे शेर उपयोगी पडतात. जनतेलाही असं ऐकायला बरं वाटतं. तुम्ही फार दुबळया मनाचे आहात. जराशा अपयशानं तुम्ही खचून जाता आणि निराश होता. शेवटच्या टोकाला पोचता.”

“हे कोणी मानसशास्त्रज्ञाने सांगीतलेलं दिसतंय!”

“राजकारणात खूप कटकटी असतात. कोल्ड वार. मागून छुपे हल्ले. गैरसमज. मनात खूपकाही आहे. जयप्रकाशजींची मनातली समाजव्यवस्था अजून लागू पडलेली नाही. करप्शन प्रचंड प्रमाणात आहे. सगळी यंत्रणाच बिघडलीय, आवर कुठं कुठं घालायचा? माझ्याकडे समाजकल्याण खातं दिलंय. जेवढं खोल जावं तेवढं विदारक दृष्य बघायला मिळतं. मग मी चिडते. तोल जातो. रागावल्यामुळे वाईटपणा येतो. त्याला इलाज नाही. मी माझ्या मुलालापण अटोक्यात आणू शकले नाही तर समाजरचनेचं काय? माणसांच्या मर्यादा कळतात.”

----- श्रीपाद सावंतनं पाहीलं. नर्मदेचा ताठा उतरत चालला होता. बियरचा परिणाम हळूहळू होत होता. तिच्यातली आई जागू पहात होती. बियरनं त्यालाही झंकारलं होतं. पण तो दोन पायांवर नीट उभा राहून लक्ष देत होता.

---- समोरच्या गांधीजींच्या मोठया तस्बीरीकडे बघत ती पुटपुटली,

“सगळयाच गोष्टी मनासारख्या मिळाल्या तर आयुष्य कसलं? काही मिळवण्यासाठी काही मोजावही लागतं. सर्व समाजसेवकांची हीच कैफियत आहे. त्यांना संसारसुख फारसं नाही. यश नाही. स्वतःच्या धुंदीत, घरदार दूर गेलेलं आहे हे उशिरा कळतं. सगळं सुरळीत चाललेलं असताना भविष्य विस्कळीत असेलही!”

“नशीब”

“हं. नशीब. पण मी आपल्या आईच्या धैर्याचं कौतुक करते. तो काळ, कडवा कर्मठ समाज आणि स्त्रीची स्थिती. अशा काळात त्यांनी जे गटस् दाखवले त्याला तोड नाही. पण त्या अज्ञात राहील्या. आनंदीबाई जोशी, रानडेंचा तो काळ, पण तुमच्या आईनं समाज ढवळण्याचं व्रत घेतलेलं नव्हतं. त्यांनी फक्त तुम्हाला वाढवलं. शिकवलं. बाई पुरोगामी. प्रत्येक आयुष्य नियतीच्या मनात अगोदरच ठरलेलं असतं म्हणू या. मी बंड करून घराबाहेर पडले. इथपर्यंत पोचले. यशस्वी झाले.”

“तू अपघाताने राजकारणात पडलेली आहेस.”

"चांगल्या आणि वाईट. दोन्ही गोष्टींना सुरुवात व्हायची असेल तर निमत्तच लागतं सावंत! तुम्ही लेखक कसे झालात?"

"तू समाधानी आहेस?"

नर्मदेनं काही वेळ विचार केला. ग्लासाकडे बघत बसली. म्हणाली,

"मी आनंदी आणि समाधानी आहे. स्वतःला भाग्यवान समजते. जिथे माझ्या हुकमतीला मान मिळतो असंच विश्व मला हवं होतं ते मिळालं. तुमची पुस्तकं मला संभ्रमात पाडतात."

"ग्रेट!"

"खरंतर आजच्या या मिटींगमध्ये मला तुमचं मन अगदी स्वच्छपणे समजून घ्यायचं आहे. तुम्ही गूढ संदिग्ध विचारवंत वाटता. तुम्ही मृत्यूकडे चिकित्सकपणे बघता. त्याच्याविषयी भीती आणि आकर्षणही आहे."

"हे का लागलं असं तुला वाटतं?"

"मी घर सोडल्यामुळे असेल तर मला मान्य आहे. पण माझी माती वेगळी आहे सावंत! एखाद्या सिध्दहस्त ललित कथाकारानं किंवा कादंबरीकारानं लहान मुलाच्या उत्सुकतेनं समोरचा निसर्ग बघावा त्याच दृष्टीनं जिज्ञासेनं अभ्यास करावा आणि स्वतःला प्रश्न विचारावेत तशा पध्दतीने तुम्ही मृत्यूकडे बघता. तो एक गहन विषय आहे. मला वाटतं साहित्यसंस्कृती मंडळानं तुमच्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलंय! ते माझ्या शब्दांची वाट बघत आहेत!"

-----श्रीपाद सावंत सावध होऊन चरफडला. परत खुर्चीत बसून बोलला.

"इतकं चांगलं बोललीस. पण स्वभावानुसार शेवटी घाण केलीसच! आय से, तुझ्या ओळखीची, उपकारांची मला मुळीच गरज नाही नर्मदे! मी लेखन करू लागलो आणि मला मोठे प्रकाशक

मिळाले ते तुझ्या ओळखीवर नाही! सॉरी! शिवाय मला तथाकथित पारितोषिकांची मुळीच गरज नाही!”

----ग्लास नाकाला लावून नर्मदा टक लावून नवऱ्याकडे बघत बसली होती. चेहऱ्यावर ओलसर, दृढ स्मित होतं. तिची बसण्याची ढब, बैठक, गढूळ नजर, ग्लास, सारं काही ' सेक्सी ' वाटत होतं. त्याला ते आतल्या आत जाणवत होतं.

“ठीक ठीक. मी तुम्हाला लेखक म्हणून मानते. आदर करते. पण तुमच्यातला हा पैलू मी जवळ असताना मला कधी दिसला नव्हता!”

“निराश, बेचैन स्थितीत मी लेखन सुरु केलं.”

“सगळेच कलावंत कलंदर असतात. पण व्यवहारी नसतात. स्वतःच्या कैफामध्ये जगत असतात. खरी ज्वलंत कला उपाशी पोटी प्रज्वलीत होते म्हणतात! हा उपास मानसिक असू शकतो. मी तुम्हाला सोडलं आणि हा उपास सुरु झाला असावा. मी मातृत्व घेतलं. तुम्हाला आणि आईला, शामला वाढवण्याचा त्रास दिला. हा मी तुम्हांवर केलेला अन्याय आहे. कदाचित त्याचीच फळं मी आता भोगत आहे. शाम बेफिकीर झालाय. त्यानं पूर्णपणे पाश्चात्य जीवनपध्दती स्वीकारलीय!”

-------श्रीपाद सावंत कुत्सित हसला.

“म्हणे पाश्चात्य जीवनपद्धती! म्हणजे नेमकं काय? सोळा वर्षानंतर आईबापापासून स्वतंत्र वेगळं व्हायचं. बारीक सारीक नोकऱ्या करून रेंटल रूममध्ये मैत्रिणीबरोबर शय्यासोबत करायची. मुलींनी शाळेत जाताना दप्तरातून पिल्स किंवा कंडोम्स बरोबर घेऊन जायची. उभ्या आयुष्यात चार चार बायकांशी लग्न करायची आणि घटस्फोटपण घ्यायचे! निर्लज्जपणे समारंभात एकमेकांना मिठ्या मारायच्या. दर रविवारी चर्चमध्ये जाऊन कन्फेशन दिलं की पाप धुवून निघालं! आठवड्यानं फोन करून आईबापाला”आय लव्ह यू”हे तीन शब्द बोललं की कर्तव्य संपलं!

ती मेलेली कळली की छातीवर दोनदा बोटं टेकवून स्मरण करायचं! झाली पाश्चात्य जीवनपद्धती. नाही का?”

“हा तुमचा ऐकीव आणि विकृत विचार आहे. थोडं तथ्य असेलही, पण तेथेही संस्कृती आहेच! शिवाय शामचं लग्न होऊन दोन वर्षं झाली की! दे आर हॅपी!”

“पण दोघांनाही मूल नकोय!”

------नर्मदा शांतपणे बियर सिप करू लागली.

“त्यांना त्यांचं आयुष्य जगू द्या! सावंतांचा वंश खुंटेल वगैरे गोष्टींचा घोर लावून घेऊ नका. मी राजकारणात राहून या गोष्टींवर खूप अनुभव घेतलाय. माणसं फार स्वार्थी आहेत! पिढ्या बदलत आहेत. विचार बदलत आहेत. देवानं इतकी वर्षे सुदृढ ठेवलयं त्याचे उपकार मानून जगायला शिका. तुमचं नैराश्य पार निघून जाईल.”

श्रीपाद सावंतला क्षणभर उमाळा आला.

“नैराश्य माझा पिच्छा सोडीत नाही.”

“आणि मग आत्महत्त्येसारखा पळपुटा प्रयत्न करायचा. नाही का मिस्टर सावंत?”

----- त्यानं बेफिकीरपणे गळयावरून हात फिरवला. आता गळयाजवळची सैल कातडी बोटांना स्पष्ट लागायची. चिमटीतपण यायची. खूप झालं. निवृत्त झाल्यावर मफलर लावणं सोडून दिलं. मानेवर काहीशा खुणा कायमच्या उरल्या. पण काळजी करणं सोडून दिलं. ज्यांनी विचारलं त्यांना मनात येईल त्या थापा मारल्या. कोणी अधिक खोलात शिरलं नाही.

----- नर्मदा उठली. कीचनकडे वळत म्हणाली,

"मी आज तुमच्या आवडीचं जेवण केलेलं आहे. स्वतः तळलेले बांगडे आणि तांदळाची भाकरी. बऱ्याच वर्षांनी जेवण करतेय. तुम्हाला आवडेल."

"बियरचं काहीच वाटत नाही. व्हिस्की हवीय."

"त्याची सोय होणार नाही. स्वतःला झिंगवून आऊट होण्याचं तुमचं वय उलटून गेलेलं आहे. गेले ते दिवस!"

----- खुर्चीत बसून तो तिच्या संथपणे होणाऱ्या हिंदोळयाकडे बघत राहीला. मनात वासनेची थोडीशी उबळ आली. मग रागाची. मत्सराची. गप्प बसला. टी. व्ही. ऑन केला. बाहेर पाऊस कोसळत होता. आज त्याला सगळं काही झोडपून टाकायचं होतं. गेस्ट हाउस, रस्ते, झाडं, दिवे ०० वगैरे.

---- तिच्या हाताला अजून चव होती.

---- ती अजूनही सेक्सी दिसत होती.

---- तो चांगला लेखक आहे म्हणण्याचं तिचं मन मोठं होतं. पण ' तू आज खूप छान दिसतेस ' म्हणणं त्याला जमलं नाही.

----- का, ते त्यालाच कळेनासं झालं.

---- जेवण शांतपणे पार पडलं. एकमेकाकडे बघत. मधूनच टी. व्ही. कडे बघत. बाहेर पावसाची गाज. ती सहजपणे बोलली,

"रात्रभर गप्पा मारू."

---- बाहेर व्हरांडयात जाण्याची सोय नव्हती. आता पाऊस ताशा वाजवीत होता. तो उठला. येराझाऱ्या घालू लागला. सिगरेट पेटवली. चट्कन वळून विचारलं,

"इतका वेळ गेला. आता स्पष्ट सांग नर्मदे. इतकी वर्षे एकटीनं कशी काढलीस?"

"वेल! मी समाजकार्याला ----"

"तू खाजगी आयुष्यात एकटेपण कसं घालवलंस?"

---- माफक हसली. पुन्हा खिडकीत बसली. बाहेरचा काळपट तडततडाट ऐकत राहीली. मोठया तन्मयतेनं. त्यातला सूर शोधीत. थोडा वेळ गेला.

"तुम्हा लेखकांना म्हणे चांदण्यांचा आवाज ऐकू येतो! तुम्ही चांदणं ओंजळीत घेता! खरं आहे?"

"माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस!"

"कसला प्रश्न?"

"तुला माहित आहे तो!"

"धर्म अधर्म म्हणजे काय मिस्टर सावंत? या देशाची नीतिमूल्यं दुसऱ्या देशात हास्यास्पद ठरतात! मी देशोदेशी फिरलेय. चक्रावलेय. आयुष्यात आनंद ही एक छोटीशी गोष्ट राहीलीय. प्रत्येकानं समजूतदारपणे गृहीत धरायची. इथे कोट्याधीशांच्या घरात दुःखपण आहे आणि फूटपाथवरचा माणूस समाधानी आहे!"

---- श्रीपाद सावंत तगमगला.

"हुषार आहेस. विषयांतर बरं केलंस."

"स्त्रीकडे दुय्यम दर्जाचं माणूस, एक भोगदासी, वासनांची पूर्ती करण्याचं साधन ही दृष्टी अजूनही निवळलेली नाही. काही अंशी स्त्रियांचही चुकतं. मी त्यांची बाजू घेऊन इथे भांडत नाही.

महिला संघटनांवर पण मी आग पाखडून बोलते. टाळी एका हातानं कधी वाजत नाही याची मला जाणीव आहे. पण पुरुषांची ------"

"माझा प्रश्न, तरुणपण एकटीनं कसं घालवलंस?"

"तरुणपणी इतर गोष्टीत मन गुंतवता येत नाही का?"

"त्या स्टेजमध्ये मन शांत ठेवता येतं का?"

"का नाही? तुम्ही नाही ठेवलंत?"

---- तो गप्प बसला. तिचा हा प्रश्न डोळ्यांपुढे पट्कन वाढलेली नखं धरल्यासारखा वाटला. समोर आरसा नव्हता. नाहीतर आरशात बघण्याचा धीर झाला नसता.

----- तिनं त्याच्याकडे थंड नजरेनं बघत विचारलं,

"तुमच्या आईनं एकटीनं तरुणपण नाही का घालवलं?"

"तिची गोष्ट वेगळी होती."

"कशी? काळ बदलला असला तरी प्रश्न तारुण्याचा आहे. शिवाय तिला तर एकांत खूप होता. माझ्यासारखी ती सतत माणसांच्या गराड्यात नव्हती! एकांतात मनात वेडेविद्रे विचार येवू शकतात."

"तिला पण मी हा प्रश्न विचारला होता."

"आणि तिच्या उत्तरांनी तुमचं समाधान झालं?

"नर्मदे! ती माझी आई आहे. तिनं दिलेल्या उत्तरांवर मी समाधानी आहे. पण तू माझी पत्नी आहेस!"

“अरे वा! पत्नीला नवरा असा प्रश्न विचारू शकतो?

-----श्रीपाद सावंतनं दुसरी सिगरेट पेटवली. झटकन पुढं होऊन तिनं ती खेचली आणि फेकून दिली. क्षणभर तिचा चेहरा रागानं फुलला. सुंदरसा.

“माझ्या प्रश्नाचं तुम्ही उत्तर दिलं नाहीत मिस्टर सावंत! तुम्ही तुमचं तरुणपण कसं घालवलंत? स्पष्ट बोला! मला खरंच राग यायचा नाही. आपली दोघांचीही वयं ही ' पल्याड ' गेलीत! बोला!”

“मी स्वतःला ऑफिसच्या कामात बुडवून घेतलं! मग मी लेखनाकडे वळलो. एकदां जीव द्यायचा पण प्रयत्न केला. त्यावेळी शाम जवळ होता. नियतीनं मला वाचवलं म्हणू. वाचन मात्र खूप केलं मी!”

नर्मदा छानशी हसली.

“लेट अस फरगेट द पास्ट! मागचं उगाळून आता दुःखी का व्हायचं? उरलेले दिवस समंजसपणे घालवू या. इतक्या मधल्या वर्षात दोघांच्याही हातून कळत नकळत काही चुका झाल्याही असतील. पण त्या पोटात घालायची तयारी दोघांनीही ठेवू या.  चालेल?”

“अरे वा! स्वतःला कव्हर करायला सुरुवात झाली तर?”

“कोण कोणाला कव्हर करणार हो? इतकी वर्षे आपण दूर राहीलो. देवानं आपल्याला सुदृढ, सुस्थितीत परत भेटायची संधी दिलीय. या गोष्टीचं सेलीब्रेशन आपण करू या!”

“सेलीब्रेशन? कसलं? कसं?”

“रात्रभर गप्पा मारु. तुमच्या लेखनावर बोलू. मला उत्सुकता आहे. हस्तलिखितावर किती वेळा संस्कार करावे लागतात? ते तुम्ही कोणा जाणकाराला वाचायला देता की सरळ प्रकाशकाकडे पाठवता?”

“माझा माझ्या विचारांवर विश्वास आहे. मी कोणाचा सल्ला घेत नाही. प्रकाशक माझ्याकडून हस्तलिखित मागवतात.”

“ग्रेट! म्हणजे तुम्ही सुरुवातीपासूनच सकस कसदार लेखन करता म्हणायचं!”

“सुरुवातीला मी खूप वाचन केलं. मग चिंतन. माझा एकटेपणा वाढू लागला म्हणून लेखनाकडे वळलो. जमून गेलं. मला शब्दांसाठी अडून बसावं लागलं नाही.”

“प्रकाशकाचं नाव, नेटवर्क बघूनच लेख पाठवता?”

“अर्थातच! माझे प्रकाशक मोठे आहेत.”

“कोणाची मदत घ्यावी असं वाटलं नाही?”

“मदत? कोणाची? तुझी?”

“मी असं म्हणाले नाही!”

“मला गरज वाटली नाही”

“छान! मग तुमचं लेखन निराशावादी का वाटतं?”

“तुझ्यासारख्या सामान्य वाचकाचं हे मत आहे. जाणकारांना शब्दांचा मतितार्थ कळतो.”

“हो का? असेल. असेल.”

“माझ्या लेखनाची मीच जाहीरातगिरी करीत नाही.”

“तुमच्या लेखनात कोणा लेखकाचं पुस्तक संदर्भ म्हणून वापरलंय का? तसा उल्लेख कोठे दिसत नाही!”

----श्रीपाद सावंतने बायकोच्या डोळयांत निरखून पाहिलं. तेच डोळे. करवंदासारखे काळे काळे. त्यांच्यातला काळेभोरपणा राजकारणी वाटत नाही. हे टपोरे डोळे त्याला लग्नानंतर खूप आवडले होते. त्यावेळी लेखनाची उर्मी काय असते ते कळालेलंही नव्हतं. पण आपण तिच्या नजरेवर फिदा आहोत हे तो एकदा उत्कट क्षणी बोलला होता. त्या उत्कट क्षणी तिलाही ते फार आवडलं होतं.

आज, इथे, ती एकटी. आपण एकटे. हा एकांत. बाहेर काळोखात कोसळणाऱ्या पावसाची झमझम. खिडक्यांच्या तावदानांवरून लोटांनी ओघळणारा पाऊस. जिवंत वाटणारा. तिचे बाळबोध प्रश्न. काळेभोर डोळे. भले जगासाठी ती एक कर्मठ राज्यमंत्री असेल. पण आज ती एक स्त्री म्हणून आपल्यासमोर बसलेली आहे. आपल्या लेखनावर विचारीत आहे. इतक्या वर्षात असं कोणी मनापासूनचं विचारलं नव्हतं. प्रामाणिकपणा नव्हता. तिचं मन अम्लान होतं.

पण दुसऱ्याच क्षणी श्रीपाद सावंत सावध झाला. मधल्या वर्षांतली तिची वागणूक, धूर्तपणा त्याच्या अंगावर चरचरा पुढं चढवू लागली. एकदम कोषात जाऊन गुरगुरला,

“विषयांतर पुरे.”

“ठीक. आम्ही भारतीय स्त्रीया संकुचित वृत्तीच्या आहेत. वुई आर पझेसिव्ह. आपल्या नवऱ्यानं इतर स्त्रीयांशी मैत्री करू नये वगैरे. तरुणपणी हे विचार ठीक. कधी कधी वाटतं, स्त्रीयांनीच का? पुरुषांनी पण पझेसिव्ह होण्यात काय गैर आहे?”

“म्हणूनच मी तुला विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तराची वाट बघतोय!”

“आतां? या वयात? इतक्या वर्षांच्या अंतरानं?”

“आपण घटस्फोट घेतलेला नाही. तू दिला नाहीस.”

“मला आठवतंय. घर सोडताना मी तुम्हाला पुरुषाला लागणाऱ्या सर्व गरजांचं स्वातंत्र्य दिलेलं होतं. नाही का?”

“मग भारतीय स्त्रीचा पझेसिव्हपणा कुठे गेला?”

“त्यासाठी दोघे एकत्र लागतात. नाही का?”

-------- तो अस्वस्थपणे बोलला,

“बोलायला ठीक आहे ते. प्रत्यक्षात मी एखाद्या स्त्रीशी संबंध ठेवले असते तर तुला चालले असते? तुझ्या राजकीय इमेजला?”

“माझं वैयक्तिक आणि राजकीय जीवन या दोन वेगळया गोष्टी आहेत. तुमचे तसे संबंध कळले असते तरी मी ते समजू शकले असते -----”

“हा शुध्द दांभिकपणा झाला नर्मदे! एकीकडे पझेसिव्ह म्हणायचं आणि दुसरीकडे उदात्तीकरण दाखवून समाजाची सहानुभूती घ्यायची! तुला ते जमलं असतं म्हणा! उलट तुझ्या इमेजला उजाळी आली असती.”

“तसं समजा.”

“मग माझ्या प्रश्नाचं उत्तर दे.”

बाहेर पावसाची झोड थांबलेली नव्हती. ती खुर्चीतून काहीशा नाखुशीनं उठली. हळूहळू येरझाऱ्या घालू. तिचा चेहरा तणावाखाली. मग कष्टी झाला. तरीही शरीराचा झोक कायम होता.

“आपण इतक्या वर्षांनी हा पोरकटपणा करू नये असं मला वाटतं.”

“मला माझ्या प्रश्नाचं उत्तर हवंय, आत्ता!”

“तुम्ही तपासावर का राहीला नाहीत?”

“खूप राहीलो. पण माझं समाधान झालेलं नाही. म्हणून आज मी तुला प्रत्यक्षच विचारतोय.”

“इतकी वर्षे दूर राहून आपल्याला हा अधिकार पोचतो, असं तुम्हाला वाटतं?”

“कायदेशीर नाती अजून तुटलेली नाहीत!”

“ठीक! इतकी वर्षे तुम्ही स्वच्छ सोवळे राहीलात का?”

“हो”

“अगदी खरं? मनापासून सांगताय? आईची शप्पथ?”

“हो”

“एकाही स्त्रीला स्पर्श केला नाही?.”

“नाही”

“तसा प्रयत्न केला नाही? आठवून सांगा! तरुणपणी --------”

“नाही!”

“मग तुम्ही पुरुष ते कसले?”

“माझा माझ्या मनावर ताबा आहे!”

“मग माझ्याच मनावर का असू नये?”

“कारण -- कारण तू एक स्त्री आहेस!”

ती चालत कोपऱ्यातल्या कपाटाशी गेली. समोरच्या आरशात स्वतःला बघत मिनीटभर उभी राहीली. मग झुंबराखाली आली. स्तब्ध उभी राहीली. एखाद्या कलाकृतीसारखी. परत निश्चय करून कपाटाशी गेली. दार उघडून आतून एक लाल रंगाची जाड फाईल बाहेर काढली आणि पुन्हा खुर्चीत बसली. फाईलमधून एक खाकी रंगाचा लिफाफा बाहेर काढला आणि त्याच्यापुढं सरकवून कोरडया आवाजात बोलली,

"हा लिफाफा उघडा. आत पहा. मग मी या फाईलमधला मजकूर वाचते. तुम्हाला तो आवडेल."

----त्याने काहीशा उत्सुकतेनं लिफाफा हातात घेतला. जड वाटला. उघडला. आतमध्ये तीन मोठे फोटोग्राफ्स होते. त्यांच्यावर लाल शाईनं नंबर लिहिलेले होते. पहिला फोटो पाहिल्याबरोबर त्याचा चेहरा खाडकन उतरला. काळवंडला. बाहेर पाऊस नाचत असला तरी वातानुकुलीन वातावरण होतं. त्याच्या कपाळाला घाम फुटल्यागत वाटलं. त्याच्यात होत जाणारे बदल बघत नर्मदानं फाईलमधला मजकूर हळूहळू वाचायला सुरुवात केली,

"रिपोर्ट नंबर एक. आज दिनांक आठ मार्च १९७६. वेळ रात्रौ ८.३०. श्री. श्रीपाद सावंत हे शामा नावाच्या वेश्येकडे तिच्या निवासस्थानी पोचले. स्थळ सांगली. संपूर्ण रात्रभर ते तिच्या घरी होते. तद्संबंधीचे फोटो काढून ठेवलेले आहेत. निगेटिव्हज् सुरक्षित आहेत. पूर्ण पत्ता गुप्त ठेवण्यात आलेला आहे. वाटल्यास मिळू शकेल. श्री. सावंत आणि शामा यांच्या सबंधांसंबंधी नमुनादाखल एक फोटो जोडलेला आहे. इतर निगेटिव्हज् हव्या असल्यास पुरवण्यात येतील ०००००."

------श्रीपाद सावंतने दुसरा फोटो पाहीला.

"रिपोर्ट क्रमांक दोन--- आज दिनांक सात जुलै १९७६ रोजी श्री. सावंत कुलाबा येथे ज्यूली परेरा नावाच्या वेश्येकडे रात्रभर होते. त्यासंबंधी वेळ, स्थळ, फोटो नमुना म्हणून येथे जोडलेला आहे. तपशीलवार नोंद संलग्न आहे. निगेटिव्हज् सुरक्षित आहेत ००

तिसरा फोटो डोळ्यांसमोर धरला.

"रिपोर्ट नंबर तीन --- आज दिनांक नऊ नोव्हेंबर १९७७ रोजी श्री. श्रीपाद सावंत पुणे मुक्कामी रेश्मा नावाच्या कॉलगर्लच्या सहवासात होते. त्य संबंधातला एक फोटो नमुनादाखल जोडलेला आहे. श्री सावंत यांनी नाव बदलून हॉटेलचा रूम घेतलेला आहे. रूम सोडताना पैशावरून त्यांची आणि मॅनेजर सुभाष गुप्ते याची शाब्दीक बाचाबाची झाली. निगेटिव्हज् सुरक्षित आहेत. पुढील हुकुमाची गरज आहे ००००००."

----नर्मदेकडे न बघता त्यानं फोटो परत लिफाफ्यात भरले आणि मान खाली घालून खुर्चीत बसला. हाताची ओलसर बोटं गुंतवली. छातीत गच्चसं वाटू लागलं. दशा दशा झाली.

----बँकेत इतकी वर्षे नोकरी केली. कामावरून वरीष्ठांशी काही वेळा शाब्दीक चकमक उडाली. पण तेवढ्यापुरतीच. एरव्ही पूर्ण करीयर ताठ मानेनं स्वच्छ, स्ट्रेट फॉरवर्ड, क्लीन ऑफीसर म्हणून लौकीक मिळवला. पण आजची मानहानी आयुष्यात प्रथमच झालेली होती. तिचे शब्द त्याच्या कानात गरम तेल ओतावं असे वाटले. अंगावर कोणीतरी थुंकलं होतं.

मग तो एकदम हादरला. गोंधळला. सावध झाला. ही बाई पाताळयंत्री आहे! ही काहीही करू शकेल! काहीही. आपण तिचा शोध घेत चाचपडत होतो पण तिनं तर आपलंच गुप्त रेकॉर्ड सुरक्षित ठेवलेलं आहे! तिचा हा शोध आपला अंत आहे. ऑडीट सुरुवातीपासून कपाटात बंद आहे.

व्यक्तिस्वातंत्र्यावर हा हल्ला झालेला आहे. तिला हे शक्य झालं कारण राजकीय स्थान आणि तिच्यासाठी तत्पर असलेली गुप्तयंत्रणा!

हे रिपोर्ट्स आपण ऐन तारुण्यात असतानाचे आहेत. आणि तिनं ते इतकी वर्षे जपून ठेवले आहेत. कशाला? ब्लॅकमेलींग? ----याचा अर्थ जितका आपल्याला तिच्या चारित्र्याचा संशय राग मत्सर होता तेवढाच तिचाही आपल्याविषयी आहे!

-----ती आपल्याविषयी ' पझेसीव्ह ' आहे. पण तोल सावरून आहे.

-----आपण खोदून विचारलं नसतं तर तिनं ती फाईल आपल्या मृत्यूपर्यंत सांभाळून ठेवली असती आणि नंतर जाळून टाकली असती.

-----नर्मदेनं आपल्याला चिमटीत धरून उचललं आहे आणि आपण हवालदिलपणे हवेत पाय हलवीत लटकलो आहोत ०००००

नर्मदा उठली. फाईलमध्ये लिफाफा ठेवला. पुन्हा येराझाऱ्या घालू लागली. आता एखाद्या शिक्षिकेसारखी.

"मिस्टर सावंत! आपण गप्पसे?"

"इतकी वर्षे तू माझ्यावर नजर ठेवलीस तर?"

"तुम्ही ठेवली नाही?"

------श्रीपाद सावंतला तीव्र इच्छा झाली. माणसाच्या शरीरात छत्तीस ठिकाणं आहेत की जिथे नेमकं मारलं तर हमखास मृत्यू येतो. बाहेर धुवाधार पाऊस पडतोय. एका झेपेत उडी मारावी आणि तिचा गळा दाबावा. अगदी शेवटचा श्वास निघून जाईपर्यंत. अशी संधी पुन्हा केव्हांही येणार नाही. ही वेळ निघून गेली की पश्चात्तापाला अर्थ उरणार नाही. गळा दाबून झाला की शांतपणे सिक्यूरिटीला फोन लावावा.

----- पण --- पण कदाचित आपण तिच्यावर उडी मारलीच तर खिडकीच्या काचा फोडून मशीनगनचा मारा होईल आणि आपली चाळण उडेल! नेम नाही. नर्मदेनं तेवढी सोय अगोदरच

करून ठेवली असेल! बाई महा धोरणी आहे. तिनं सिध्द करून दाखवलंय ००० जखमी नजरेत श्रीपाद सावंतनं बायकोच्या डोळयांत बघत विचारलं,

"आणखी काय काय शोधलं आहेस?"

"सारं काही."

"म्हणजे?"

"तुमचा पहिला आत्महत्त्येचा प्रयत्न. खरंतर त्यावेळी मी समाजकार्यात कोणी नव्हते. पण नंतर कुणकुण लागली. कोणी मार्तुन्डकर साहेब होता. दुसऱ्याकडून मी त्याचा खुबीनं इंटरव्यू घेतला. तुमची त्यावेळची मनस्थिती रेकॉर्डला आहे माझ्या!"

"छान! आणि दुसऱ्या प्रयत्नाचं?"

"तेही आहे -------"

"कसं कळलं?"

"ते महत्वाचं नाही."

"शामसाठी काय केलंस?"

"त्याला त्रास होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली."

"माझ्या बाह्य संबंधाविषयी कळल्यावर काय वाटलं?"

"त्यावेळी वाईट वाटलं. थोडासा रागपण आला. स्वतःला सावरलं. मी माझ्या मतांशी प्रामाणिक आहे. दुःख याचं की इतक्या वर्षांनी भेटून, वयाची साठी उलटली तरी तुम्ही खोटं बोलता, याचं!"

“तू किती खरं बोलतेस?”

“जेव्हा आपण एखाद्याकडे बोट करतो तेव्हां तीन बोटं आपल्याकडे वळलेली असतात मिस्टर सावंत!”

“मी याचा अर्थ असा लावू का? तुझं एक बोट माझ्याकडे वळलं म्हणजे तुझ्या फाईल्समधले हे सगळे रिपोर्ट्‌स आणि फोटो. पण तुझ्याकडे वळलेल्या तीन बोटांचं रेकॉर्ड माझ्याशी नाही. माझी धडपड अनाठायी ठरली आहे, असंच ना?”

-----त्या वयात ती छद्मी हसली

“टिपकागदासारखे तुम्ही निळे पडला आहात हो! उगाच भिंतीवर डोकं आपटून का घेता? सॉरी.”

“आणखी कसली माहिती गोळा केली आहेस?”

“एखादी कादंबरी व्हावी. गांधींचं आत्मचरित्र प्रामाणिक आहे कारण ते धीट होते. तुमच्याशी तेवढे गटस् नाहीत सावंत! ऐकून काय कराल? पुन्हा आत्मनाश?”

“मुद्द्याचं बोल!”

-----श्रीपाद सावंत केवळ उरला. तिच्या प्रभावाखाली चिरडल्यागत झालं. वाटलं, खूप रडावं. ती आपल्याला रडू देईल. जवळ घेईल थोपटील. मग आपण उन्मळून जाऊ. तिच्या उष्ण जड उरोजांखाली आपल्याला आधार वाटत राहील.

थरथरत्या बोटांनी सिगरेट पेटवली. पोटातल्या बियरचं पाणी झालं.

“आणखी काय?”

"ठीक. तुमचे सी. आर. बँक दरवर्षी माझ्याकडे माहीतीसाठी पाठवीत होती. ऑफिसला असताना तुमच्या पोझीशनचा तुम्ही घेतलेला गैरफायदा! बँकेनं तुम्हाला वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षीच कोड ऑफ कॉन्डक्ट नुसार निलंबीत केलं असतं. पण माझ्या सांगण्यावरून रिपोर्टस् बँक दाबून ठेवीत होती. केवळ मी ----- मी सांगीतलं म्हणून! ऐकायचेत?"

("००००००००००?")

"पहिली केस.----तुमच्या डिपार्टमेंटमध्ये मिसेस सुचित्रा साखरदांडे नावाची स्टेनो होती तिचा तुम्ही बॉस म्हणून मानसिक छळ केलात! हे खोटं आहे म्हणा!"

"दुसरी तशीच केस. त्या स्टाफनं युनियनला लेखी तक्रार केली. तुम्हाला माहीत नसेल सावंत! तुमच्या तोंडाला काळं फासण्यापर्यंत तयारी झाली होती. पण तुमची अचानक बदली झाली. केवळ मी सांगितलं म्हणून, आठवतंय?"

त्याला वाटलं, मातीत डोकं खुपसून मरून जावं. अवाक् होऊन तो बायकोकडे बघतच बसला. ती हसली ते हसणं हॉरर फिल्ममधलं वाटलं. तिचे शब्द आदळत होते,

"अशाच थिल्लर वागणूकीच्या घटना मॅनेजमेंटनं दुर्लक्षित केल्यात कारण बँक राज्यसरकारच्या अधिकारात आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल. बँकेचा स्टाफ तुमच्या तोंडावर का बोलला नाही? खरं की नाही?"

("००००००००!")

"त्यालाही उत्तर आहे. घोड्यानं डोळयांवर झापा असल्यामुळं समोरच्या रस्त्यापलीकडे आजूबाजूला पाहीलं नाही. तुम्ही भ्रामक अधिकारात वागत होता! स्टाफ आपल्याला घाबरतो. लांब लांब रहातो कारण आपण स्वच्छ, स्ट्रेटफॉर्वर्ड! या भ्रमात तुम्ही अगदी सुखात रिटायर झालात! तुमचा कधीही होणारा स्फोट केवळ माझ्यामुळे झाला नाही. माझ्यामुळे!"

-------श्रीपाद सावंत नुसता झाला.

वातानुकुलीत दिवाणखान्यात नर्मदा घामट दिसत होती. हवीहवीशी. तिनं त्याच्यापुढं खुर्ची ओढली. बसली. कापऱ्या शब्दात पुटपुटली,

"सगळं सगळं माफ केलेलं आहे मिस्टर सावंत! मी समाजात वावरले आहे. बरेच विचित्र मनोरुग्ण पाहीलेत. तुम्ही फार दुबळे आहात. गुन्हेगार नाही. तुमच्या पुस्तकांवर एकाने परीक्षण लिहिलंय की श्रीपाद सावंत हा अतृप्त पण फुकट गेलेला घाबरट तथाकथित विचारवंत आहे. मी या मताशी सहमत आहे!"

-------पहिल्यांदाच तो चित्कारला.

"मूर्ख आहे तो माणूस. सृजनशीलता कशाशी खातात ते या टीकाकारांना माहित असतं का"

---नर्मदा काहीशी बेफिकीरपणे मान उडवून हसली. बियरची धुंदी मस्तकात ठेवल्यासारखी.

"जाऊ दे मिस्टर सावंत! आज तुम्हाला दुःखी करण्याचा हेतू नाही. ओघओघानं सारं बाहेर येत गेलं. आणि ते तरी का? तर तुम्ही अजूनही ढोंग करीत आहात म्हणून. मला वाटतं तुम्हाला औषधोपचारांची गरज आहे."

"माझ्या लेखनाबद्दल काही बोलायचा तुला अधिकार नाही नर्मदे! तो तुझा प्रांत नाही. लेखन ही ईश्वरी देणगी आहे. चिंतन मनन म्हणजे काय, तुला काय सांगायचं? राजकारणात शिरून लाघवी हसण्यावर आणि पुंडांना चाळवून सेलिब्रिटी होण्यात इतकी वर्षे मस्त घालवलीस. छान जमून गेलं बरं का! ढोंग जमलं आणि माझ्यावर मात्र वॉच ठेवलास! तुला लेखनातलं काय कळतंय?"

"तुमच्या लेखनावर माणसानं प्रांजळ मत द्यायचं नाही का?"

"त्यासाठी मुळात साहित्याची जाण नको?"

-----बाहेरच्या पावसाची तडतड कानावर अधिक येवू लागली.

तावदानावर बोटं ओढल्यासारखं वाटू लागलं. खूप अस्वस्थल्यागत वाटून तो उठणार तेवढयात हाताचा पंजा उगारून नर्मदेनं त्याला बसायची खूण केली. डोळयांत ठिणगी उठली होती. अशी ठिणगी त्यानं फार वर्षांपूर्वी ती घर सोडताना पाहिली होती. नाकपुड्या किंचित थरथरत होत्या. चेहऱ्यावर कोंडलेला राग उठला होता. बायकोच्या या नवीन अधिकारी व्यक्तिमत्वाला बघून तो स्तिमित झाला.

तिनं झणकाऱ्यानं फाईल परत उघडली आणि आतून एक पांढरास्वच्छ लिफाफा बाहेर काढला. बोटात नाचवीत ती मांजरीसारखी फिस्कारली,

“ता वरून ताकाची परीक्षा ओळखणारी माणसं वेगळी असतात. मिस्टर सावंत तुम्हाला काहीच कळत नाही! आता मात्र मला या प्रकारांचा राग आणि कंटाळा येवू लागला आहे!”

(“००००००००००?”)

“ज्येष्ठ आणि श्रेष्ठ यात खूप फरक असतो. चार पुस्तकं लिहून झाली तरी स्वतःची पाण्यातली खोली तुम्हाला कळालेली नाही!”

-----त्यानं तुसडेपणानं विचारलं,

“काय आहे त्या लिफाफ्यात?”

तिनं लिफाफा त्याच्या डोळयांपुढं नाचवीत म्हटलं,

“तुमच्या दुसऱ्या पुस्तकाच्या प्रकाशकाकडून मला आलेलं हे खाजगी पत्र आहे. तुम्ही वाचता की मी वाचू?”

श्रीपाद सावंतला लिफाफ्यावर प्रकाशनसंस्थेचं नाव दिसलं.

“वाच!”

बाहेरच्या काळोखात वीज चमकल्यासारखं झालं.

नर्मदेनं उभ्या उभ्या लिफाफ्यातून पत्राचा एक मोठा कागद बाहेर काढला. नीट उघडला. बाहेरच्या तडतडाचा ताल धरून वाचू लागली,

“माननीय सौ. नर्मदादेवी सावंत यांस. स.न.वि.वि. श्री. श्रीपाद सावंत, आपले पतीदेव यांच्याकडून आमच्या प्रकाशन संस्थेकडे आलेल्या हस्तलिखीताविषयी आणि तद्नंतर त्याच संदर्भात आपण फोन करून संवाद साधलात त्याचा संदर्भ घेऊन मी आपणास हे पत्र अत्यंत गोपनीय माहीती म्हणून लिहीत आहे. कृपया गैरसमज नसावा.

मी आपणास प्रत्यक्ष येवून भेटणं रास्त होतं. परंतु आपण माझ्यातर्फे लेखी उत्तराचीच अपेक्षा केलीत. आपण व्यक्तीशः या पत्राची काळजी घ्यावी ही नम्र विनंती. हस्तलिखीतावर आपण माझे स्पष्ट मत मागीतलंत. या ना त्या निमित्तानं या व्यवसायाला राजकीय पाठबळ असावे लागतेच! असो.

आता मुख्य विषयाकडे वळतो.

श्री. श्रीपाद सावंत यांचे पहिले पुस्तक बाहेर काढायला कोणी प्रकाशक मिळत नव्हता. ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी दोन तीन ठिकाणी प्रयत्न केला. शेवटी एक छोटा प्रकाशक तयार झाला. त्याला पंचाहत्तर टक्के आर्थिक सहाय्य अर्थात लेखकाकडून झाले! छोटया प्रकाशकांना जाहीरात परवडत नाही. पावसातल्या छत्र्यांसारखी गत असते. आपण सूज्ञ आहात. तेव्हां ते पुस्तक परीक्षणाच्या दृष्टीने दुर्लक्षित राहीले.

दुसऱ्या हस्तलिखीताविषयी लिहीतोय. आमची संस्था अभ्यासपूर्ण वाचन, दर्जा, नेटवर्क आणि साहित्यिक मूल्यांना जपणारी आहे. प्रतिथयश लेखकांची हस्तलिखिते जर आमच्या धोरणात बसली नाहीत तर आम्ही ती नाकारतो. अर्थात दर्जेदार मोठया लेखकांना साहित्य पाठवण्याविषयी आम्ही पाठपुरावा करतोच!

श्री. सावंतांचे लेखन मी दोन जाणकारांना वाचयला दिलं. पहिल्या फेरीतच लेखन परत पाठविण्याचा विचार होता. त्यांच्या मते लेखन दुय्यम दर्जाचे असून बैठक उथळ आहे. सेल्फसेंटर्ड टाइप लेखनाला जीव धरता येत नाही. वैचारिक गोंधळ, नैराश्य, जीवनाची काळी बाजू म्हणजे मानवाच्या जीवनाचं पूर्ण सुटलेलं गणित नाही. लेखकाने एकच निगेटिव्ह विचार वेगवेगळ्या शब्दात पुन्हापुन्हा सांगायचा प्रयत्न केला आहे. भाषेचा फुलोरा असह्य वाटण्याइतका नसावा. विद्वत्तेचा आव आणताना काही विचारवंतांच्या लेखनाचा आधार घेतलाच असला तर त्याचा उल्लेख करणं महत्वाचं आहे. नाहीतर ती उचलेगिरी वाटते आणि ती चोखंदळ वाचकाला कळते! थोडक्यात असे पुस्तक आमची संस्था प्रसिध्द करायला धाडस करणे कठीण.

त्यातूनही, व्यावसायिक दृष्टीकोन, भविष्यातील तडजोड आणि स्नेहसंबंध विचारात घेऊन एक प्रयोग म्हणून हे हस्तलिखित स्वीकारायचा आम्ही निर्णय घेत आहोत. फक्त पहिल्या अकराशे प्रतींची जोखीम घेऊन. कृपया गैरसमज नसावा आणि ठरविलेल्या संवादानुसार हे पत्र कृपया फाडून टाकणे ही नम्र विनंती. बाकी सर्व ठीक.

स्नेहसंबंध वृद्धींगत व्हावेत.

कळावे,

आ. कृपाभिलाषी

‘XXX’

------- ती त्याच्या समोर बसली. तिच्या चेहऱ्यावर विजयाची तीळमात्र रेषा नव्हती. उलट नजर उदास वाटत होती.

बाहेरची धून आता कमी झाली होती. सरीवर सरी येत होत्या आणि त्यांची लय तावदानांवर दिसत होती. तिनं हातातल्या प्रकाशकाच्या पत्राचे तुकडे केले. फाईलमधून आणखी दोन पत्रे काढून ती न वाचताच तुकडे केले आणि प्लास्टिकच्या बादलीत टाकले. श्रांतपणे म्हणाली,

"आज मी तुमच्या प्रकाशकांच्या शपथांतून मोकळी झाले आहे. खूप हलकं वाटत आहे. ते प्रामाणिक वागले. मीही. माझ्या शब्दाखातर त्यांनी तुमची हस्तलिखीते स्वीकारली. प्रसिध्द करून व्यावसायिक दृष्ट्या थोडीफार कच खाल्ली ती मी या ना त्या निमित्ताने त्यांच्यासाठी भरून काढली. अर्थातच माझ्या क्षेत्रात हे कोणाला कळणार नाही. हे मी केलं!"

श्रीपाद सावंत थकला. तिनं पुढं होऊन त्याच्या दोन्ही गुढग्यांवर हात ठेवले. थोडी भावनावश होऊन म्हणाली,

"प्लीज. प्लीज! तुम्हाला दुखवायचा हेतू नाही हो! मी वाटते तेवढी निष्ठूर क्रूर नाही. या वयातली तुमची घालमेल मला कळते. तुम्ही रक्तदाबाचे पेशंट आहात. खूप लेखन करा! प्रसिद्धीचं माझ्यावर सोपवा. पण आतातरी संशय, संकुचित वृत्ती सोडून जगायला शिका. प्रत्येकाला स्वतःची मर्यादा कळायला नको का? तुमच्या आईकडे बघा. तिच्यातला उत्साह चैतन्य दहा टक्के घेतलंत तरी पुरे!"

--------- पाच मिनिटं दोघं त्याच स्थितीत बसली.

"ठीक. नर्मदे, मी एक सामान्य माणूस उरलोय. उघडा ओसाड. माझी प्रत्येक हालचाल तुला कळत होती. काही वर्षांपूर्वी मी एका गडावरच्या योगीमहाराजांच्या दर्शनाला गेलो होतो हे तुला माहीत असेलच! त्यांचा फोटो इथे लावलायच म्हणा."

"मिस्टर दिगंबर गायकवाड म्हणून?"

----- झड लागलेल्या कोंबडीसारखं वाटू लागलं. चिडून बोलला,

"आणि तिथल्या पोलीस शिपायांच्या गरम गप्पा पण ऐकून घेतल्या मी!"

"ऐरावत चालतो तेव्हां कुत्री भुंकतातच की!"

"गडावर एक वृध्द गृहस्थ होते. त्यांना मी कोण हे माहीत होतं का?"

"त्यांना कळणं योग्य नव्हतं. त्यामुळेच ते तुमच्याशी मोकळेपणानं बोलले.

"वा! तुला तर इत्थंभूत माहीती आहे!"

------- नर्मदेनं हॉलच्या भिंतीवर लावलेल्या मोठया फोटोला नमस्कार केला. आता त्याचं लक्ष गेलं. मंद हसत योगी त्याच्याकडे बघत होते. ती गुणगुणली,

"गुरूमाउलींवर माझी नितांत श्रध्दा आहे. दरवर्षी दसऱ्याला गडावर लक्षदीप लागतात. तेव्हां मी जाते. भंडारा घालते. मला तिथे मनःशांती मिळते. तुम्ही गडावर आहात हे मी गुरुमाउलींना एकांतात सांगीतलं होतं. दीक्षा घेतली. त्यांच्या उपदेशामुळं पुन्हा ताजीतवानी झाले."

"तुझ्यातला कमकुवतपणा तुला कळतोय तर!"

"मी एक स्त्री आहे --------"

"समाजकार्याच्या नावाखाली वासनांचा निचरा चांगला करून घेत होतीस म्हणायचं!"

"दुय्यम दर्जाचं लेखन करून तुम्ही घेत नव्हता?"

"ठीक. याचाच अर्थ गडावरच्या गुरुमाउलींचा माझ्याशी झालेला संवाद एक चमत्कार नव्हता तर? तेही छानपैकी जुळवून आणलेलं होतं!"

--------- ती अस्वस्थ झाली.

"तुमच्यासारख्या माणसाला चमत्कार करून दाखवायची गुरुमाउलींना गरज नाही मिस्टर सावंत! ते अंतर्ज्ञानी आहेत. या शतकातले चैतन्यमूर्ती आहेत. दिव्यदृष्टी योगी आहेत! त्यांचं समाजकार्य जनसंपर्क फार मोठा आहे. माणसांना तिथे भाव मिळतो. ईश्वरी अंश असलेला तो मानवी अवतार आहे आणि या जन्मी तो मला पहायला मिळाला, मला नावानं तो ओळखतो हे माझं परमभाग्य आहे!"

आता तो कष्टी झाला. उन्हातल्या विहीरीच्या तळाशी ठिपका झालेल्या पाण्याइतका अर्थहीन झाला. काय उरलं होतं आता? खूप मार खाल्लेल्या मलूल मुलासारखा झाला. असं मूल त्या स्थितीतही भीतीपोटी मार देणाऱ्या माणसाचा आधार घेण्यासाठी त्याच्याकडेच धाव घेतं तशी काहीशी स्थिती झाली.

"आणखी काही उरलंय?"

-------- मग तीही तगमगली

"अगदी कालपर्यंत तुम्ही रिटायर होईपर्यंत मला कळलंय. झालं समाधान?"

"ठीक. पण आणखी किती फोटो संग्रही आहेत?"

"आहेत पण ते सर्व फोटोज कागदपत्रे आज तुमच्यासमोर मी गॅसशेगडीत टाकून मुक्त होणार आहे."

"मुक्त हो. पण काशीनाथ सूर्वे या बॉडीगार्डशी तुझे संबंध कसे --- किती होते --- आहेत --- खरं सांग बरं!"

------- ती घामानं चलबिचल झाली. चिडली,

"रघुनाथ राणेनं तुम्हाला सांगितलं होतं ना?"

या शरीराचं करायचं काय?

प्रत्येक अवयवानं न्याय मागितला तर आपल्याशी उत्तर आहे काय? हजार वाटांचं हे शरीर, त्यातलं मन तर क्षणात लक्षयोजने जाणारं. पण या विलक्षण रचनेवर मृत्यूची झडप इच्छेनुसार पडते ००००

------ आपण समोरचा समुद्र बघतो ००

---- पोस्टमार्टेम करताना सुडौल तरुणीच्या शरीररचनेकडे बघून लैगिक भावना चाटून जात असतील काय? ००

----गिरसप्प्याच्या प्रचंड कडेलोटापुढे कातळावर बसून कसलं स्वामित्व सिध्द होतं? ००

----झाडांवर ताटकळत बसलेले कावळे पिंडाला वचन दिल्यानंतरच  जमीनीवर काळा तडतडाट कोणत्या आदेशानं करतात? ००

---- तान्हुलं कोणत्या भाषेत विचार करतं? ००

---- चाळीस हजार फुटांवरून बिघडलेल्या इंजिनानं जमीन वेगानं जवळ होणाऱ्या विमानाची स्थिती कशी असेल? ०००

---- हॉस्पिटलात कोणाला बघायला जाताना, आपण त्या स्थितीत नाहीहोत याचं सूक्ष्म समाधान असतं का? ०००

----आपण निळयातलं निळं निळं आभाळ बघतो ००

---- रात्रंरात्र सिगरेटस् ओढीत शब्दांसाठी अडतो ००

पण नर्मदेनं प्रकाशकांची पत्रं वाचून दाखवली आणि मैलोन मैल माळरानं, सारा निसर्ग एकदम परका होऊन गेला ००

---- आपले पाय जमिनीला लागले.

---- डोक्यातल्या चित्र विचित्र कल्पना शब्दांचे खेळ कवड्यांसारखे निरर्थक झालेत. ऍबस्ट्रॅक्ट पेंटींग झालंय.

---- काही उरलं नाही.

नर्मदेचा प्रश्न दिवाणखान्याच्या चार भिंतीवर आदळून परत आला ००० त्याला वाटलं की आता पक्षाघात होईल.

हतबल होऊन थिजलेल्या डोळयांनी तो बघत राहिला.

------आपली राजकारणी बाई महाधोरणी स्त्री आहे.

------अगदी घर सोडल्यापासून तिनं आपल्यावर रघुनाथ राणेसारख्या माणसातर्फे इमानी डोळा ठेवलेला आहे! आपण जाऊ तेथे रघुनाथ राणे पाठोपाठ येवू लागला. आपल्या अवतीभवती कॅमेऱ्यासारखा फिरत राहीला. आणि इतकी वर्षे, त्याच्यातर्फे दर आठवडयाला आपल्यासंबंधीचे गौप्य रिपोर्टस् अगदी भक्तीभावाने `जात राहीले! हे इतकं शिस्तीत. साधी चुणीही पडली नाही. आपण राणेवर मूर्खागत विश्वास ठेवीत गेलो. त्यानं ( आणि इतरांनीही ) आपली कीव केली असेल! राणेचे आपल्याविषयीचे विचार ही एक क्रूर थट्टा झालीय.

-----आपलं काय होतंय कळत नाही. या बाईनं आपलं पूर्ण आयुष्य झाकोळून टाकलेलं आहे. विकून टाकलंय. गडावरच्या गुरुमाऊलीलापण हिनं आपलसं केलेलं आहे!

ग्रेट! ग्रेट!!

शुष्कपणे विचारलं,

“रघुनाथ राणे माझ्याबरोबरच रिटायर झाला. थोडा पुढं मागं. पण काही महिन्यांनी, म्हणजे नुकतंच कळलं की त्याचा अपघाती मृत्यू झाला म्हणून?”

“खरं आहे. मुंबई गोवा हायवेवर ------”

“वा! एक सद्‌गुणी म्हातारा ट्रकखाली चिरडून मेला. का बरं? तो तुझा गुप्तहेर होता म्हणून? की ही पण एक राजकीय खेळीच? सोंगटी निकामी झाली की पटावरून उडवायची?”

------नर्मदानं साडीच्या पदरानं डोळे टिपले. नाक शिंकरलं.

“इतकी प्रामाणिक माणसं जमीनीवर आहेत म्हणून माणुसकी जिवंत राहीलीय. राणे शेवटपर्यंत शब्दाला जागले. त्यांचा मृत्यू अपघातच होता. रिटायर होईपर्यंत या माणसानं मोठ्या भावासारखं प्रेम केलं. माझ्या ओळखीचा एकदाही फायदा घेतला नाही.”

( भले! अशा जवळच्या माणसाचं कळून आपण त्याच्या कुटुंबीयांना साधा शोकसंदेश का पाठविला नाही. )

“इतकी वर्षे मी राजकारणात आहे. या क्षेत्रात मानसिक खून बलात्कार नेहमीच होत असतात. मला ठार करण्याचे कट झाले पण मी कोणाशी वैयक्तिक वैर ठेवलेलं नाही. रघुनाथ राणेच्या कुटुंबीयांना विमा कंपनीतर्फे महिन्याच्या आत पुरेपूर मोबदला मिळवून दिलाय. त्यांच्या मुलांचं शिक्षण, त्यांची नोकरी ही माझी नैतिक जबाबदारी मी पूर्ण करीन. राणेंचं ऋण मी फेडू शकणार नाही.”

------त्याने तिचा खराखरा चेहरा पाहीला. लग्नानंतर काही भावोत्कट क्षणी दिसलेला. अल्पायुषी ठरलेला. पण आता निबर झालेला. कुत्सितपणे विचारलं,

“याचाच अर्थ, राणेनं मला काशीनाथ सूर्वे विषयी दिलेला रिपोर्ट खोटा आहे. असंच ना?”

ती त्राग्यानं उठली. खिडकीशी जाऊन उभी राहीली. घाटदार. बाहेरचा नाद ऐकणारी. म्हणाली,

"तुमच्या मानेवरचं हे भूत जात नाही तर!"

"तसं समज."

"सगळया जगानं अक्रोश केलाय की तुम्हाला काडीचा नैतिक अधिकार नाही. वय नाही. तरीही पिच्छा पुरवीतच आहात सावंत!"

"तसं समज."

"ठीक आहे! तुम्हाला वाटेल तो अर्थ तुम्ही काढू शकता."

"माझ्या प्रश्नाचं हे उत्तर नव्हे."

"होका? मग नीट कान देऊन ऐका. माझा पहिला संघर्ष मी गुंडाला बाजारात एकटीनं तुडवला तेव्हा सुरु झाला. पण नवरा म्हणून तुमची प्रतिक्रिया एका शहरी बाबूची होती. आठवतंय?"

("००००००००!")

"मी राजकारणात उतरले आणि संरक्षण मिळू लागलं. केवळ ड्यूटी म्हणून जिवाची पर्वा न करणारे पुरुष मी पाहीलेत सावंत! बॉर्डरवर युध्द करणारे जवान, तुम्हा आम्हा सारख्या व्हाइट कॉलरवाल्यांना सुखानं जगवून ठेवणारे पोलीस फोर्सचे अधिकारी, हे वेगळया बांधणीचे पुरुष असतात."

("०००००००००००!")

"आपल्या बायकोला छळणारा गुंड बघून तिचा नवरा हातात सुरा घेऊन गुंडाचा कोथळा काढायला गेला असता आणि ताठ मानेनं पोलीसांसमोर उभा राहीला असता!"

("०००००००००००!")

"यातलं मी एक असुरक्षित स्त्री म्हणून किती पेलवू शकले असते? देवा ब्राम्हणासमोर, समाजासमोर प्रतिज्ञा घेऊनही जर स्त्रीला नवऱ्यापासून संरक्षण मिळालं नाही तर तिनं काय करावं?"

("०००००००००००!")

"अशावेळी धर्मिक बंधनांची किंमत काय? मंगळसूत्र गळयात अडकवण्य़ापुरती?

मशाल मीच हाती घेतली होती. म्हणून राजकारणात शत्रूपण निर्माण झाले. एक स्त्री म्हणून प्रचंड प्रमाणात घबराट उडवून दिली गेली. धमक्या आल्या. अशावेळी मी सरकारतर्फे चांगला बॉडीगार्ड मागीतला त्यात माझं चुकलं का?"

("००००००००००००००!")

"सुर्वेसारखे बरेच पुरुष आजही जन्माला येत आहेत सावंत! माझं संरक्षण, हेच ध्येय ठेवून दोन वेळां गंभीररीत्या जखमी होऊन हॉस्पिटलात ऍडमिट होणारा पुरुष, एक तरुण स्त्री म्हणून मला आवडू लागलाच, तर त्यात काही चुकत होतं का?"

("०००००००००"! )

"आणि नवऱ्याव्यतिरिक्त स्त्रीला दुसरा पुरुष आवडू शकतच नाही का? एखादा ऍक्टर, विचारवंत, आर्टीस्ट, योध्दा?"

----त्यानं डोकं दोन हातात धरलं.

"मिस्टर सावंत! तुम्ही निरुत्तर झालात काय?"

--------उत्तर नाही. ती खिडकीतून बोलली,

“ठीक आहे! तुम्हाला जे वाटतं तसंच आहे समजा. झालं?”

त्याला वाटलं तिनं आता खिडकीशीच वितळून जावं. आपण काही ऐकलं नाही. रानात दूरवर ढोल वाजत आहेत. आपल्याला झाडाला बांधून नरभक्षक आपल्याभोवती हींस्र नाच करीत आहेत.

------आता बाहेरची झमझम थांबली होती. स्खलीत झाल्यासारखी. पानांवरचा टिपटीप आवाज. विस्तीर्ण उरलेली शांतता.

-------पाठमोरी राहून नर्मदेनं इंटरकॉमवर काही बोलाचाली केली. समोरच्या खुर्चीत येवून शांतपणे बसली.

-------काही वेळ अति शांततेत गेला.

-------मग दारावर टकटक झाली.

नर्मदा उठून दाराकडे गेली आणि तिनं दार उघडलं.

-----सहा फूट उंच, राकट डौलदार सावळासा काशीनाथ सूर्वे चित्यासारखा पावलं न वाजवता आत आला आणि तिच्या शेजारी त्याच्यासमोर पिसागत बसला.

-----कसा ते कळलं नाही.

श्रीपाद सावंतला वाटलं की आपल्याभोवती वारूळ रचलं जात आहे. ए. सी. दिवाणखान्यात आपण हळूहळू वितळत चाललो आहोत.

इतक्या वर्षात समोरच्यात काडीचा फरक पडलेला नाही. सगळीकडेच अनिश्चितता. आयुष्य उनात वाळत पडलेलं आहे. समोरचा दगडी. शतकानुशतके दुसऱ्यांच्या जीवनात हक्काचं घर बांधण्यासाठी जन्माला आलेला.

-----गडावरच्या गुरुमाऊलींच्या दर्शनाला आपण राहिलो होतो त्यावेळी हा समोरचा गडावरच्या उत्सवाकडे पाठ फिरवून समोरची दरी बघत दिक्काल उभा होता. नर्मदेनं याला आपल्यावर लांबून नजर ठेवायला सांगीतली होती!

काळा गॉगल घालून यानं आपल्याला थंड पेय घेणार का, विचारलं होतं! नंतर दणदण निघून गेला होता.

स्मितहास्य करून जनतेसाठी हात हलवीत नर्मदा गड उतरून गेली होती आणि आपण मात्र दगडावर मूर्खासारखे उभे होतो! सगळंच विनामतलब होऊन बसलं आहे. परुळेकरांनी त्यांच्या हॉटेलमध्ये सूचक सल्ला दिला होता.

आपण अज्ञानी, पण जगाला खूपसं कळालेलं होतं. ------- अँबीग्यूअस लॉस झाल्यागत श्रीपाद सावंत उठला आणि समोरच्या उघडया दारातून गेस्टहाउसच्या बाहेर पडला. आपल्यातली खूपशी पावलं दिशाहीन खुणा ठेवून अशीच जात आहेत ००० 

पावसाची रिपरिप पुन्हा सुरु झाली.

चोवीस तास उलटले.

आत्महत्त्या केलीच असती तर एव्हाना सगेसोयरे मित्रगोत्र स्मशानातल्या नळावरचं मचूळ पाणी गालफडांवर, हातापायांवर घेत धगधगत्या चितेकडे बघत आपापसात गुणगुणले असते. स्मशानातल्या कभिन्न मुर्दाड भिंती, माजोरी झाडं, बोचरं गवत सिमेंटची बाकडी आणि छाटून ठेवलेल्या लाकडाच्या ओंडक्याशेजारी निर्विकार चेहऱ्यानं बसलेल्या कारकुनाच्या रजिस्टरवर मित्रांच्या गुणगुणण्याचा काडीमात्र बदल झाला नसता.

“मनुष्यजन्म किती योनीतून फिरून एकदाच मिळतो म्हणतात आणि ह्यानं फुकटचोट स्वतःला संपवलन पण साला!”

“नाहीतर काय? माणसं कशाकशा कष्टात आपली जगत असतात. वर्षानुवर्षे अंथरुणात हगतमुतत शिव्याशाप खात कुजत, लोळत रहातात! ह्याला सूख अजीर्ण झालं -------.”

“इटस् क्रेझी यार! इटस् ऍक्यूट स्वीसाईड! बास, आया मनमे, मार डाला खुदको! परसो बोलता था डायबेटीस कंट्रोलमे है, गाडी गॅरेजमे सर्व्हीसिंगके लिये लेके जाना है, इंटरनेटपर रोज इंग्लंडवाला छोकरा और बहु बोलते है! कॅमेरापर दिखते है. सबकुछ ठीक ठाक है.”

-------ठीक चल रहा है

####### संपूर्ण #########

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष.**

**श्री. राजा कदम यांचे हे ईसाहित्यवर पहिलेच पुस्तक.**

श्री. राजा कदम यांची यापुर्वीची पुस्तके मराठीतील नामवंत प्रकाशकांनी प्रकाशित केली. त्यांना राज्यस्तरीय पुरस्कारही आहेत. “अंत नाही” हे पुस्तक वाचल्यावर त्यांच्या साहित्यिक ताकदीचा अंदाज वाचकांना आलाच असेल. त्यांना आपली पुस्तके मोठ्या प्रकाशकांना देऊन पैसे कमवणे अजिबात अशक्य नाही. पण तरीही ते आपले पुस्तक ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (बारा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१७ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १० पुस्तके), डॉ. वृषाली जोशी (८ पुस्तके) उल्हास हरी जोशी(५), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४) विनिता देशपांडे (४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक

ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।